ALAN PATON

Cry,

The Beloved Country

क्राय,

द बिलव्हेड कंट्री

लेखक : ॲलन पॅटन

मराठी अनुवाद : जयदीप कर्णिक

अनुवादकाची भूमिका

ॲलन पॅटन ह्यांची Cry, The Beloved Country ही दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या पार्श्वभूमीवरील १९४८ साली प्रकाशित झालेली कादंबरी. कादंबरी प्रकाशित झाल्याला सत्तर वर्षांचा काळ लोटून गेलाय. वर्णभेदाच्या काळ्या कालखंडातून दक्षिण आफ्रिका अधिकृतपणे बाहेर पडली त्यालाही पंचवीस वर्षे होऊन गेलीत. मग ह्या पार्श्वभूमीवर ह्या कादंबरीचा अनुवाद करायचं प्रयोजन काय असा प्रश्न माझ्या अनेक जवळच्या माणसांना पडला. त्या संदर्भातील माझे विचार इथं मांडणं मला महत्वाचं वाटतंय.

कादंबरीत एक शोध आहे. आपल्या अनोळखी मुलाचा शोध. आपापल्या मुलांचा शोध घेणाऱ्या दोन बापांची गडद गडद होत जाणारी ही एक साधी सरळ गोष्ट आहे. कादंबरीचं कथानक आपली उत्कंठा वाढवत नाही की धक्के देत नाही. पण ते आपल्या आत मुरत जातं. एका आर्त नादमय कवितेसारखं दुसऱ्या तिसऱ्या वाचनात आपलं खरं स्वरूप दाखवतं. डोळ्यात पाणी तर आणतंच पण विचारही करायला लावतं.

गोऱ्यांनी काळ्यांवर केलेला अन्याय हा कादंबरीचा एक भाग नक्कीच आहे. पण त्याहीपेक्षा माणसाला माणसाची वाटणारी चिरंतन भीती हा ह्या कादंबरीचा गाभा आहे. सहृदयता, सौहार्द आणि प्रेम हाच ह्या भितीवरील सर्वंकष उपाय आहे हे कळकळीनं सांगणारी ही कादंबरी आहे.

जगाच्या पाठीवर सगळीकडे वर्ण, वंश, धर्म, जात असा कोणत्या ना कोणत्या स्वरूपातील भेद आजही आहेच. एकमेकांबद्दल द्वेष आहे, भीती आहे. आपण आणि ते हा भेद अधिकाधिक तीव्र होत चाललाय. वैयक्तिक पातळीवर चांगली असणारी माणसं समाजातील 'ते' वर्गाबाबत असंवेदनशील का असतात, कोणते पूर्वग्रह, कशाची भीती त्यांना दुसऱ्या माणसापासून तोडते याचा विचार आता तरी करायलाच हवा.

ह्या पार्श्वभूमीवर आशेचा संदेश देणाऱ्या ह्या कादंबरीचा अनुवाद करणं मला गरजेचं वाटलं.

तुमच्या प्रतिसादाची वाट बघत आहे.

जयदीप कर्णिक

मो. ९५५२५९९६२९

इमेल: Jaydeep_karnik@rediffmail.com

प्रकरण १

1

एक सुंदर रस्ता इकोपोकडून टेकडयांकडे जातो. टेकड्या सुमधूर आवाजाने सळसळणाऱ्या भरगच्च गवतांनी आच्छादलेल्या. रस्ता तिथून सात मैल चढत कॅरिसब्रूकला जातो. धुकं नसेल तर तिथून विस्तीर्ण पसरलेलं आफ्रिकेतील सुंदर खोरं तुमच्या सहज नजरेत भरेल. तिथल्या हिरव्यापिवळ्या माळरानातून टिटवीचे आर्त स्वर तुमच्या कानी पडू शकतील. तिथून अगदी खाली उम्झीकुलूचं खोरं, नदीच्या पार पलीकडे मोठ्या टेकड्या, आणखी मोठ्या टेकड्या. त्याच्या अलीकडे आणि पलीकडे इंगायली आणि ग्रीकलँडमधील पर्वत.

गवत इतकं रसरशीत आणि दाट की तुम्हाला माती दिसणारच नाही. ह्या गवतानं घट्ट धरून ठेवलेलं पावसाचं पाणी आणि दव जमिनीत झिरपतं आणि दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या झऱ्यांना रसद पुरवतं. वणव्यांनी होरपळणं, गाईगुरांनी ओरबाडलं जाणं अशा संकटांना सामोरं न जावं लागल्यामुळे ते गवत जणू कुणीतरी प्रेमानं सांभाळलेलं वाटतं. त्यावर अनवाणी उभे रहा. जणू निर्मिकानं बनवलं तेव्हापासून ते तसंच आहे, अनाघ्रात, पवित्र! त्या गवताला सांभाळा, त्याचं रक्षण करा, त्याची काळजी घ्या, कारण ते माणसांना सांभाळतं, रक्षण करतं, काळजी घेतं. ते नष्ट झालं तर मानवजात नष्ट होईल.

तुम्ही उभे आहात तिथं गवत इतकं रसरशीत आणि दाट आहे की तुम्हाला माती दिसणारच नाही. पण ह्या हिरव्या टेकड्या जिथे तुटतात, पुढल्या माळरान आणि खोऱ्यात कोसळतात, तिथं कोसळताना मात्र मातीनं आपले गुणधर्म बदललेले असतात. पावसाचं पाणी किंवा दव धरून ठेवण्याची ताकद नसल्यानं ती माती लालसर आणि रखरखीत होत जाते. झरे तर सुकलेलेच असतात. मोठ्या प्रमाणात चरणारी गाई-गुरं आणि वारंवार लागणारे वणवे तिथलं गवत सहन करत असतं. त्यावर अनवाणी उभं राहू नका. ते रखरखीत, टोकदार आणि विरळ झालंय. इतकं, की मातीतले टोकदार खडे पायाला टोचत राहतील. या गवताचा ना कोणी सांभाळ केला, ना कोणी रक्षण केलं, ना काळजी घेतली. हे गवतही आता कोणाचा सांभाळ करु शकत नाही, रक्षण करू शकत नाही आणि काळजीही घेऊ शकत नाही. टिटवीचा आर्त स्वर इथं तुमच्या कानी पडणार नाही.

मोठाल्या लाल टेकड्या उजाड झाल्या आहेत. उघडीबोडकी पडलेली जमीन जणू शेवटचा श्वास घेत आहे. विजा चमकतात, ढग कोसळतात आणि सुकलेले झरे पृथ्वीच्या लाल रक्तासह वाहू लागतात. दरीच्या तळाशी बायका कशीतरी खुरपणी करतात आणि मका कसाबसा माणसाच्या उंचीएवढा होतो. हे खोरं फक्त म्हातारे, म्हाताऱ्या, पोरं आणि

आयांचं आहे. पुरुष दूर निघून गेलेत, तरुण दूर निघून गेलेत, तरुण मुली दूर निघून गेल्यात. ही जमीन आता कोणालाही थोपवू शकत नाही.

2

छोटी मुलगी हातात पत्र घेऊन लगबगीनं जुनाट चर्चकडे आली. चर्चजवळच्या घराचा दरवाजा तिनं हळूवारपणे ठोठावला. लिहित बसलेल्या रेव्हरंड स्टीफन कुमालोंनी आवाज दिला.

"आत ये."

अदबीनं दरवाजा उघडून ती मुलगी आत शिरली.

"ऊम्फुंडीस,* आपलं पत्र आणलंय."

"पत्र ? बाळ, तुला कोणी दिलं हे पत्र"?

"दुकानातल्या गोऱ्या माणसानी हे पत्र मला तुम्हाला द्यायला सांगितलं."

पत्र देऊनही ती गेली नाही. डावा पाय उजव्या पायाच्या तळव्याने घासत आणि बोटाने टेबलाच्या कडेला हळूच स्पर्श करत तिथेच घुटमळत राहिली.

"तुला भूक लागली असेल, नं?"

"नाही, इतकी पण नाही."

"थोडीशी?"

"हो, अगदी थोडीशी."

"मग मदरजवळ जा ना. ती देईल काहीतरी..."

"धन्यवाद ऊम्फुंडीस."

टेबल, खुर्च्या, घड्याळ, कुंड्या, पुस्तकं - शाळेपेक्षाही भरपूर पुस्तकं असलेल्या या घरात वावरताना आपल्या पावलांचा त्रास होऊ नये असा विचार करून दबकत दबकत ती स्वयंपाकघराकडे गेली.

**ऊम्फुंडीस : झुलू भाषेतील पाद्र्यांसाठीचे आदरार्थी संबोधन*

कुमालोंनी पत्राकडे पाहिलं. पत्र चांगलंच मळलं होतं. स्टॅंपजवळ तर जास्तच. नक्कीच ते बऱ्याच जणांनी हाताळलं असणार. पत्र जोहान्सबर्गहून आलं होतं. त्यांची अगदी जवळची कितीतरी माणसं जोहान्सबर्गला रहात होती. त्यांचा सुतारकाम करणारा धाकटा भाऊ जोहान्सबर्गला गेला आणि सोफियाटाऊनला त्यानं त्याचा स्वतःचा व्यवसाय उभारला. त्यांच्याहून पंचवीस वर्षांनी लहान असलेल्या त्यांच्या बहिणीचा, गर्टरुडचा नवरा खाणीत काम करायला जोहान्सबर्गला गेला होता. तो बरीच वर्षे परत आला नाही म्हणून मध्यंतरी ती आणि तिचा मुलगा त्याला शोधायला तिकडं गेले. त्यानंतर काही महिन्यांनी आत्याला शोधायला त्यांचा मुलगा अब्सालोम गेला आणि अजून परत आला नाही. याशिवाय आणखी कितीतरी थोडे दूरचे नातेवाईक होतेच. ह्या सगळ्यांपैकी हे पत्र नेमकं कोणाचं होतं हे कळणं कठीण होतं. कैक दिवसांपासून त्यांना कोणाचंही पत्र आलं नव्हतं.

त्यांनी पत्र उलटसुलट करून बघितलं पण ते कोणाचं असावं ह्याचा काहीच थांगपत्ता लागेना. पत्र उघडायला त्यांना अगदी जीवावर आलं होतं कारण अशा गोष्टी एकदा उघडल्या की पुन्हा बंद करता येत नाहीत.

त्यांनी त्यांच्या बायकोला हाक मारली -

“ती मुलगी गेली का गं?”

“नाही, स्टीफन. ती खातेय.”

“अच्छा. खाऊ दे सावकाश. तिनं हे पत्र आणलंय. तुला काही माहितीये का या पत्राबद्दल?”

“मला कसं माहित असणार, स्टीफन?”

“हो, तेही खरंच म्हणा. हे बघ.

तिनं पत्र हातात घेतलं. पण पत्रावर हात फिरवूनही तिला काहीच जाणवेना. तिनं पत्ता काळजीपूर्वक वाचला.

रेव्हरंड स्टीफन कुमालो.

सेंट मार्क्स चर्च,

न्दोत्शेनी,

नाताळ.

धीर गोळा करून ती म्हणाली. “आपल्या मुलाचं वाटत नाहीये हे पत्र.”

“हो.” सुस्कारा सोडून ते म्हणाले. “आपल्या मुलाचं नाहीय.”

“कदाचित त्याच्याविषयीचं असू शकेल.”

“हं.”

“हे गर्टरुडचंही नाहीये.” ती म्हणाली.

“माझ्या भावाचं, जॉनचं असेल का?”

“मला नाही वाटत जॉननं पाठवलं असेल.”

थोडा वेळ ते शांत बसले. ती म्हणाली, “पत्रांची आपण किती वाट बघत असतो! पण ते आलं की मात्र उघडायलाही भीती वाटते.”

“भीती? भीती कसली? उघड की”

पत्र उघडायची सवय नसल्यासारखं कसंतरी तिनं ते पत्र उघडलं आणि हळूहळू वाचायला सुरुवात केली. इतक्या हळू की त्यातल्या काही गोष्टी त्यांना ऐकायला जाऊ नयेत.

“मोठ्यांनी वाच.” त्यांनी म्हटलं.

तोडकं मोडकं इंग्रजी शिकलेल्या एखाद्या झुलुनं वाचावं तसं अडखळत पण मोठ्या आवाजात तिनं वाचायला सुरुवात केली.

द मिशन हाउस,

सोफिया टाऊन,

जोहान्सबर्ग,

सप्टेंबर २५, १९४६

नमस्कार, रेव्हरंड स्टीफन कुमालो.

जोहान्सबर्गमध्ये मला नुकतीच गर्टरुड कुमालो नावाची एक तरुण मुलगी भेटली.

ती न्दोत्शेनीतील सेंट मार्क्स चर्चमधील पाद्र्यांची म्हणजेच तुमची बहीण आहे असं समजलं. ती खूपच आजारी आहे. म्हणून तुम्ही ताबडतोब 'द मिशन हाउस, सोफियाटाऊन जोहान्सबर्ग' येथे मला भेटायला यावे. म्हणजे आपल्याला सविस्तर बोलता येईल. फार महाग नसेल अशा ठिकाणी मी तुमच्या राहण्याची सोयही करू शकेन.

तुमचा विश्वासू,

रेव्हरंड थिओफ़िलस सिमॅंगु

खूप वेळ शांत राहिल्यावर शेवटी तिनं बोलायला सुरुवात केली.

"ऐकलंस का?"

"काय?"

"अरे, ह्या पत्राबद्दल म्हणतेय मी ."

"हो ऐकलं. मला काहीच सुचत नाहीये."

"मलाही. काय करणारेस तू?"

"त्या मुलीनं काही खाल्लं?"

ती स्वयंपाकघरातून मुलीला बाहेर घेऊन आली.

"तू खाल्लंस का बाळ?"

"हो, ऊम्फुंडीस."

"मग आता सावकाश जा हं. पत्र घेऊन आल्याबद्दल धन्यवाद. आणि दुकानातल्या त्या गोऱ्या माणसाला माझ्याकडून धन्यवाद देशील?"

"हो, ऊम्फुंडीस."

"मग आता ये तू बाळ."

"येते ऊम्फुंडीस. येते मदर."

"सांभाळून जा, बाळ"

मग ती मुलगी सावकाश दरवाज्यापाशी गेली आणि हँडलचा आवाजही होऊ नये याची काळजी घेत तिनं हळूच दरवाजा बंद केला.

मुलगी गेल्यावर तिनं पुन्हा विचारलं, “आता तू काय करणार आहेस?”

“कशाचं म्हणतेस?”

“ह्या पत्राचं म्हणतेय मी स्टीफन.” तिने अगदी हळूवारपणे विचारलं.

“ते आपण सेंट चॅडसाठी* साठवलेले पैसे आणशील?”, ते उसासा टाकत म्हणाले.

ती बाहेर गेली आणि एक डबा घेऊन आली. त्यात कॉफी आणि कोको विकून साठवलेले पैसे ठेवलेले होते. त्यांनी त्या डब्यावर हात फिरवला. जणू त्या डब्यालाच ते काही विचारत होते..

“आता त्याला काही इलाज नाही, स्टीफन” ती म्हणाली.

“अगं पण हे पैसे तर आपण अब्सालोमला सेंट चॅडकडे पाठवण्यासाठी साठवले आहेत ना?”

“हो, पण अब्सालोम आता कधीच सेंट चॅडकडे जाणार नाही.”

“कधीच सेंट चॅडकडे जाणार नाही? असं कसं म्हणतेस तू?” ते वैतागले. “असं तू म्हणूच कसं शकतेस?”

“तो जोहान्सबर्गला गेलाय, स्टीफन. माणसं जेव्हा जोहान्सबर्गला जातात तेव्हा परत येत नाहीत.”

**सेंट चॅड चर्च : दक्षिण आफ्रिकेतील काळ्या मुलांसाठी धार्मिक शिक्षण घेण्याचे चर्च*

“झालं, बोललीस? नाही राहवलं? आता तू बोललीस म्हणजे तसंच होणार. अब्सालोम आता घरी परत कधीच येणार नाही. तो आता कधीच सेंट चॅडकडे शिकायला जाणार नाही. ज्या कारणासाठी आपण हे पैसे साठवले होते ते त्यासाठी आता कधीच वापरता येणार नाहीत. तू का बोललीस असं ?”

कधीच तोडून न बोलणाऱ्या कुमालोंच्या चिडण्यामुळे ती कळवळून गेली.

“स्टीफन, मलाही अब्सालोम परत यावा असंच वाटतंय रे. आजूबाजूला जे दिसतंय तेच मी बोलले.”

“आपल्याला एकच मुलगा. खरंतर झुलूंना खूप मुलं असतात, पण आपल्याला एकच. तो जोहान्सबर्गला गेलाय आणि तू म्हणतेस - माणसं जेव्हा जोहान्सबर्गला जातात तेव्हा परत येत नाहीत; ते खुशालीही कळवत नाहीत. प्रत्येक काळ्या माणसानं अत्यावश्यक ज्ञान घेण्यासाठी जिथं जायला हवं त्या सेंट चॅडकडेही जात नाहीत. ते जोहान्सबर्गला जातात आणि हरवतात. कोणाला त्यांचं काहीच समजत नाही. आणि आता हे पैसे...”

ती काहीच बोलली नाही म्हणून ते पुन्हा म्हणाले,

“हे, माझ्या हातातले पैसे....”.

“तू खूप त्रास करून घेतोयस, स्टीफन.” ती म्हणाली.

“मी? मी खूप त्रास करून घेतोय? मी त्रास करून घेत नाहीये, ते त्रास देतायत मला! माझा मुलगा, माझी बहिण, माझा भाऊ...सगळे निघून गेले आणि आता साधं पत्रही पाठवत नाहीयेत. आपल्याला काय त्रास होतोय ह्याची जाणीवच नाहीये, आपली जरासुद्धा पर्वा नाहीये त्यांना.”

त्यांचा आवाज तापला आणि तारस्वरात ते ओरडले,

“जा आणि त्या गोऱ्याला विचार. कदाचित आणखी पत्रं असतील. काउंटरमधेच राहिली असतील, दुकानाच्या पसाऱ्यात लपली असतील. झाडाझुडुपातही बघा, कदाचित वाऱ्याने इकडे तिकडे उडाली असतील.”

“मला ह्याचा त्रास होतोय,स्टीफन.” ती अगदी काकुळतीला आली.

ते एकदम वरमले आणि तिच्याजवळ येत हळुवारपणे म्हणाले, “मला तुला त्रास द्यायचा नव्हता गं. घे, उघड हा डबा.”

थरथरत्या हाताने तिने तो उघडला आणि टेबलावर उपडा केला. काही मळक्या जुन्या नोटा आणि भरपूर नाणी टेबलावर पसरली.

“पैसे मोजशील?”

तिने नोटा आणि नाणी नीट मोजली.

“बारा पाउंड, पाच शिलिंग आणि सात पेन्स”

“मी बारा पाउंड घेतो त्यातले.”

“सगळे घेऊन जा, स्टीफन. डॉक्टर्स, दवाखाने आणि आणखी कितीतरी खर्च असतील तिकडे. सगळे घेऊन जा. ते पोस्टाचं पुस्तकही घेऊन जा. दहा पाउंड आहेत त्यात. तेही लागतील तुला.”

“अगं, ते तर मी तुझ्या स्टोव्हसाठी साठवत होतो.”

“असू देत. हे पैसे जरी आपण सेंट चॅडकडे जाण्यासाठी साठवले असले तरी त्यातून तुला चर्चसाठीचा नवीन काळा कोट, हॅट आणि पांढरी कॉलर घ्यावी असंही माझ्या मनात होतं.”

“ कोट, हॅट वगैरेची काहीच गरज नव्हती. बरं ते जाऊ दे. मी घेतो हे पैसे…”.

“तुला उद्याच कॅरिसब्रूकहून निघायला लागेल.” ती म्हणाली.

“हो, उद्या सकाळीच निघेन. आधी बिशपना पत्र लिहून कळवतो की मी चाललोय आणि किती दिवस लागतील ते सांगता येणार नाही.”

ते जड अंत:करणाने उठले आणि तिच्यासमोर गेले. “मी तुला दुखावलं, मला माफ कर. चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करुन येतो.”

ते दरवाज्यातून बाहेर गेले आणि ती छोट्याशा खिडकीतून चर्चकडे हळूहळू जाणाऱ्या त्यांच्या आकृतीकडे पाहत राहिली. नंतर ती त्यांच्या टेबलावर डोकं टेकवून शांत बसून राहिली . बिनबोभाट सगळं सहन करणाऱ्या काळ्या सोशिक आफ्रिकन बाईसारखी, पाळलेल्या गुरासारखी, कोणत्याही शोषितासारखी!

**

सगळे रस्ते जोहान्सबर्गला जातात. अंधाऱ्या रात्रींना कापत ट्रेन जोहान्सबर्गला जाते. मागेपुढे कलणाऱ्या कोचमधील प्रकाश गाढ झोपलेल्या प्रदेशातल्या दगडांवर, गवतांवर पडत राहतो. डोळे मिटून घेता येणाऱ्यांचं बरं असतं.

3

नॅरोगेजनं जाणारी टॉय ट्रेन उम्झीकुलू खोऱ्यातून टेकडयांकडं जाते. ती कॅरिसब्रूकपर्यंत चढते आणि क्षणभरासाठी विश्रांती घेते. इथं तुम्ही गाडीतून उतरून केवढ्या विस्तीर्ण प्रदेशातून आपण आलो ते बघू शकता. अगदी मोजकी माणसं तिथं असतात आणि त्यातली जवळजवळ सगळी तुम्हाला ओळखणारी असतात. गाडी तुम्हाला सोडून जाण्याची काळजी नाही. तुम्ही अगदीच अपंग किंवा म्हातारे नसलात तर गाडी निघाली तरी फारशी चिंता नाही. तुम्ही सहज धावत जाऊन ती पकडू शकता.

धुकं असलं तर तुम्ही ह्या विस्तीर्ण खोऱ्यातलं काहीच बघू शकणार नाही. तुमच्या अवतीभवती धुकं फिरत राहील. ती ट्रेन आणि त्यातली माणसं ह्यांचं धुक्यात गुरफटलेलं एक छोटसं जगच तयार होईल. काहींना ते अगदीच कंटाळवाणं वाटेल तर काहींना मात्र मोहक, रहस्यमय, साहसी, सूचक आणि अज्ञाताची जाणीव करून देणारं भासेल. आभासी दुनियेतून ट्रेन जात राहील आणि तुम्हाला धुक्यानं अर्धपारदर्शी झालेल्या खिडक्यातून गवताच्या आणि नेच्याच्या हिरवट झाक असलेल्या सावल्या दिसत राहतील. मोसमाप्रमाणे इथं निळी जांभळी रानफुलं, मोहक लाल गुलाबी गवतफुलं फुलतात. निरखून पाहिलंत तर पांढरी शुभ्र जाई आणि त्यांच्यामागे धुक्यातल्या भुतांसारखे इवल्या इवल्या झोपड्यांचे पाडे दिसतील.

कॅरिसब्रूकला थांबून घाटातून वर येणाऱ्या गाडीची वाट बघण्यात पण एक मजा असते. ज्यांना नेहमीचं आहे ते शिट्टीच्या नुसत्या आवाजावरून गाडी आत्ता कुठं आहे ते ओळखू शकतील. कुठल्या रस्त्यावर, कुणाच्या शेताजवळ, नदीच्या कुठल्या वळणापाशी. स्टीफन कुमालो एक तास आधी तिथे येऊनही त्यांना यातलं काहीच ऐकू आलं नाही...

खूप लांबवर जायचंय आणि पैसेही खूप लागणार आहेत. गर्टरुड किती आजारी आहे कुणास ठाऊक! तिला बरं करायचं आणि घरी परत आणायचं म्हणजे खूप पैसे लागतील. आणि जोहान्सबर्ग एवढं मोठ्ठं शहर. रस्त्यांचं प्रचंड मोठं जाळं असलेलं. असं म्हणतात की माणसांनी एक रस्ता दोनदा न घेता नुसते रस्ते पालथे घालायचं ठरवलं तरी अनेक दिवस लागतील. बसनेही प्रवास करावा लागतो; पण आपल्या इथल्यासारखं नाही. आपल्या इथं कुठल्याही बसमध्ये बसलात तरी चुकण्याची भीती नसते. तिथं मात्र प्रचंड संख्यांनी बसेस, वेगवेगळ्या ठिकाणी जाणाऱ्या. त्यामुळे दहापैकी किंवा वीसपैकी एक बस आपल्या कामाची असते. चुकीची बस निवडलीत तर दुसरीकडे कुठेतरी

भलतीकडेच जाऊन पोचाल. लोक म्हणतात, रस्ता ओलांडणं धोक्याचं असतं आणि तरीही रस्ते तर ओलांडावे लागतातच. न्दोत्शेनीतल्या म्पान्झाची बायको तो मरायला टेकल्यावर त्याला बघायला गेली तर रस्ता ओलांडताना तिला आपल्या मुलाचा मृत्यूच बघावा लागला. बारा वर्षांचा, उत्साहाने मुसमुसलेला मुलगा रस्ता ओलांडू लागला आणि ती घाबरून फुटपाथवरच राहिली. एक मोठ्ठी लॉरी आली आणि तिच्या मुलातलं चैतन्य घेऊन गेली.

आणि त्यांच्या मनातली सगळ्यात मोठी भीती - इतकी की जी कोणासमोरही कधीच बोलली गेली नाही. त्यांचा मुलगा कुठं असेल? तो हल्ली पत्र का पाठवत नाही?

शेवटची शिट्टी वाजली आणि ट्रेन एकदाची स्टेशनजवळ यायला लागली. सोडायला सोबत आलेल्या मित्राला कुमालो म्हणाले,

“मित्रा, तुझ्या मदतीबद्दल धन्यवाद.”

“ऊम्फुंडीस, मला छानच वाटलं तुम्हाला मदत करताना. तुम्हाला एकट्याला नसतं जमलं एवढं सगळं. तुमची ही बॅगपण किती जड आहे.”

ट्रेन स्टेशनाच्या आणखी जवळ आली.

“ऊम्फुंडीस”

“बोल मित्रा.”

“एक विचारू का?”

“विचार ना.”

“तुम्हाला सिबेको माहित्ये?”

“हो, माहिती आहे.”

“इकोपोमधल्या गोऱ्या स्मिथकडे सिबेकोची मुलगी काम करायची. स्मिथची मुलगी लग्नानंतर जोहान्सबर्गला गेली आणि जाताना सिबेकोच्या मुलीला घरकामासाठी घेऊन गेली. हा स्मिथच्या मुलीचा पत्ता. सिबेकोला गेल्या दहा बारा महिन्यात तिची काहीच खबरबात मिळाली नाहीये. त्याने तुम्हाला चौकशी करायची विनंती केली आहे.”

कुमालोंनी तो कागदाचा मळकट तुकडा पाहिला आणि ते म्हणाले,

"स्प्रिंग्स. नाव ऐकलंय, पण ते जोहान्सबर्गमध्ये नाही. त्याच्या जवळपासच कुठे तरी आहे वाटतं. मित्रा, ट्रेन आली आहे, मी बघीन मला काही करता येईल का."

त्यांनी तो कागद पाकिटात ठेवला आणि ते दोघं त्या येणाऱ्या ट्रेनकडे बघू लागले. दक्षिण आफ्रिकेतल्या सगळ्या ट्रेनसारखीच ही ट्रेनही काळ्या प्रवाशांनी भरली होती. त्यांच्या भागातल्या सगळ्या युरोपियन लोकांकडे कार होत्या आणि ते क्वचितच ट्रेनने प्रवास करायचे. त्यामुळे ट्रेनमध्ये काळ्या प्रवाशांशिवाय दुसरं कोणी नव्हतं.

काळ्या लोकांसाठीच्या डब्यात कुमालो चढले. डब्यात आधीच त्यांच्या वंशाची गरीब माणसं खच्चून भरली होती. कुणी वरपासून खालपर्यंत युरोपीय पद्धतीचे आधुनिक कपडे घातले होते तर कुणी युरोपिय पद्धतीच्या आधुनिक कपड्यांवर जुनाट घोंगडी गुंडाळली होती. पुरुष आपले जुन्या पद्धतीचे कपडे हल्ली प्रवासात घालत नाहीत. बायकांनी मात्र आपल्या जुन्या पद्धतीच्याच अर्ध्या-उघड्या वेषावर गोधडी गुंडाळली होती.

दिवस उबदार होता आणि उकाड्यामुळे संपूर्ण डब्यात एक प्रकारचा तीव्र वास पसरला होता. पण साध्यासुध्या कुमालोंना त्याचा काहीच त्रास होत नव्हता. पाद्रीच्या वेषातल्या कुमालोंना बघून लोकांनी इकडे तिकडे सरकत त्यांना लगेच जागा करून दिली. प्रवासात ज्याच्याशी गप्पा मारता येतील असा कोणीतरी असेल ह्या आशेने त्यांनी आजूबाजूस पाहिलं, पण तसा कोणीच दिसेना. मित्राला निरोप देण्यासाठी ते खिडकीत वाकले.

"सिबेको स्वतः माझ्याकडे का आला नाही?"

"तो घाबरला, ऊम्फुंडीस. तो आपल्या चर्चचा नाही ना."

"अरे, म्हणून काय झालं? तो आपला माणूस नाहीये? मदतीसाठी आपल्याच चर्चमध्ये जायला हवं का?"

"मी सांगतो त्याला, ऊम्फुंडीस."

आजूबाजूच्या गोंधळातून ऐकू जावं म्हणून लहान मूल किंवा म्हाताऱ्या माणसासारखा आवाज चढवत कुमालो म्हणाले.

"त्याला सांग, जोहान्सबर्गमध्ये असताना मी मधेच कधीतरी स्प्रिंग्सला त्या पत्त्यावर जाऊन येईन." कागद ठेवलेल्या पाकीटाचा कप्पा चाचपत ते म्हणाले, "चौकशी

करीन त्याच्या मुलीची, पण मी खूप गडबडीत असीन. मला खूप कामं करायची आहेत तिकडे."

स्वतःशी पुटपुटत ते खिडकीपासून बाजूला झाले.

"त्याच्यावतीने तुम्हाला धन्यवाद, ऊम्फुंडीस."

शिट्टी वाजवत आणि जोराने झटका देत ट्रेन निघाली. कुमालो थोडक्यात पडता पडता वाचले. सगळ्यांसमोर हसं होण्यापेक्षा बसावं असा विचार करत ते जागेपाशी जाऊ लागले.

"नीट रहा, मित्रा."

"सांभाळून जा, ऊम्फुंडीस."

ते जागेपाशी पोहचले आणि नेहमी जोहान्सबर्गला जाणारे प्रवासी असावेत असं वाटून आजूबाजूचे लोक त्यांच्याकडे आदराने आणि कुतूहलाने पाहू लागले. पर्वतरांगातून सरपटत चढण्यासाठी, दऱ्याखोऱ्यांतून घसरत उतरण्यासाठी, नेचे आणि फुलातून फिरण्यासाठी, झोपडया आणि छोटे छोटे पाडे असलेल्या अंधारात शिरण्यासाठी, स्टेंटनमार्गे इकोपोला जाण्यासाठी ट्रेन निघाली.

प्रवास सुरु झाला आणि भीतीनं पुन्हा डोकं बाहेर काढलं. अज्ञाताची भीती, रस्ते ओलांडताना मुलं मरतात त्या प्रचंड शहराची भीती, गर्टरूडच्या आजारपणाची भीती. खोलवर रुजलेली आपल्या मुलासाठीची भीती. स्वतःचं जग नष्ट होत असताना, पुन्हा कधीच साकार होऊ शकणार नाही इतकं उद्ध्वस्त केलं जात असताना, एका वेगळ्याच संपूर्णपणे परक्या जगात गेलेल्या माणसाच्या काळजीने दाटून आलेली खोल खोल रुजलेली भीती.

पाद्री असणं मिरवल्यानं, ह्या भोळ्या भाबड्या लोकांपेक्षा थोडं वरचढ असल्याचा आव आणल्यानं कुमालो किंचित शरमले.

त्यांनी आपल्या पाकिटातून छोटसं पुस्तक काढलं आणि ते वाचू लागले. कारण तेवढंच विश्व त्यांना ओळखीचं आणि आपलं वाटत होतं.

इकोपोपासून टॉय ट्रेन पुढच्या हिरव्यागार लुफाफा, इस्टवल्ड्स, डॉनिसब्रूक वगैरे टेकड्यांवर चढू लागते. डॉनिसब्रूकपासून उम्कोमास खोऱ्यातून ब्रॉडगेज ट्रेन धावते. इथे सगळे काळे राहतात आणि माती अगदी रेताड झालेली आहे. या खोऱ्यातून बाहेर पडली की ट्रेन हेमुहेमूहून इलान्द्स्कोपपर्यंत चढते. उम्सिंदुसीतून उतरून एडेंडेलवरून काळ्यांच्या झोपडपट्टीवरून ट्रेन पिटरमॅरिट्झबर्ग या सुंदर शहरात येते. इथून मिळते सगळ्यात महत्वाची ट्रेन! जोहान्सबर्गला जाणारी ट्रेन! इथं गोऱ्या लोकांची खरी कमाल दिसते - ट्रेनला इंजिन नाही, फक्त डोक्यावरचा छोटासा पिंजरा, जो वर ताणलेल्या तारांमधून वीज घेत राहतो.

हिल्टन आणि लायन नदीपर्यंत आणि तिथून बालगोवन, रोसेत्ता, मुई नदीपर्यंत सुंदर टेकड्यांमधल्या जुन्या युद्धभूमीतून* रात्रभर ट्रेन चढत राहते. ड्रॅकन्सबर्गपर्यंत चढलं की मैदानी भाग सुरु होतो.

नुकतंच तांबडं फुटतं तेव्हा डुलणारे लोक जागे होऊ लागतात. ओव्हरहेड वायरी नसल्या तरी इंजिन पुन्हा वेगात धावू लागतं. हाच तो नवीन देश, दूरदूरवर पसरलेला अनोळखी देश! इंग्रजी शाळेतून शिकलेल्या झुलूलाही जड जावीत अशी नवनवीन नावं आहेत इथं. कारण ती नावं आफ्रिकान्स** भाषेतली आहेत, त्यांनी कधीच न ऐकलेल्या आफ्रिकान्स भाषेतली!

“खाणीSS” *काही लोक* जोरात ओरडले.

“खाणी आल्या.” त्यांच्यापैकी बरेच जण ह्या खाणीत काम करणार होते.

“ज्या मोठाल्या पांढऱ्या टेकड्या दिसतायत त्या खाणी आहेत?”

**जुनी युद्धभूमी : स्थानिक काळ्या शाका आणि अनेक झुलू राजांच्या आणि वीरांच्या पराक्रमाची साक्ष देणारी युद्धभूमी. दक्षिण आफ्रिकेला स्थानिक काळे आणि बाहेरून आलेले गोरे यांच्या युद्धाची मोठी परंपरा आहे.*

***आफ्रिकान्स भाषा: पश्चिम जर्मनीतून आफ्रिकेत आलेले गोरे आणि मिश्रवर्णीय यांची डच भाषेतून विकसित झालेली भाषा. इंग्रजी आणि आफ्रिकान्स ह्या दक्षिण आफ्रिकेतील दोन अधिकृत भाषा आहेत.*

काल त्यांना ज्ञानी समजलेले कोणीही सहप्रवासी आज सोबत नसल्यामुळे त्यांनी नि:संकोचपणे प्रश्न विचारायला सुरुवात केली.

“ती तर खाणीतून बाहेर काढलेली दगडं आहेत, ऊम्फुंडीस. त्यांतून सोनं काढलं गेलंय.”

“एवढे सगळे दगड बाहेर कसे येतात?”

“आम्ही खाणीत खोल खोल शिरतो आणि ते खणून काढतो, ऊम्फुंडीस. जेव्हा खणणं कठीण होतं तेव्हा आम्ही खाणीपासून दूर होतो आणि गोरी लोकं सुरुंग लावतात. आम्ही पुन्हा येऊन सगळं नीट एकत्र करतो, ट्रक मध्ये भरतो. तिथून ते ट्रक भलं मोठ्ठं धुरांडं असलेल्या पिंजऱ्यात रिकामे केले जातात.”

“पण ते वरती कसं जातं?”

“मोठ्या चाकाला ते बांधलेलं असतं. थांबा, आता दिसेलच इतक्यात तसं एखादं चाक.”

ते एकदम स्तब्ध होऊन गेले. भीती आणि उत्सुकतेने त्यांच्या छातीतील धडधडही वाढू लागली.

“ते बघा, ते बघा मोठ्ठं चाक.”

ते मोठ्ठं चाक फिरत होतं आणि त्याबरोबर तो लोखंडाचा भला मोठा सांगाडाही वेगाने हवेतून वर वर चढत होता. इतक्या वेगाने की डोळ्यासमोर वेगवेगळे आकार तयार होत होते. मोठाल्या इमारती, वाफेचे भले मोठे पाईप्स आणि धावाधाव करत असणारी माणसं. मोठ्ठी पांढरी टेकडी आणि मिरवणूक निघाल्यासारखे त्यावर हळूहळू चढणारे ट्रक्सचे जत्थे. खाली जमिनीवर, अनेक कार, लॉरी, बस... नुसता गडबड गोंधळ.

“हेच जोहान्सबर्ग का?” त्यांनी विचारले.

आजूबाजूचे जाणते लोक हसले.

“हे तर काहीच नाही. जोहान्सबर्गला तर एवढ्या उंच इमारती आहेत की विचारूच नका.”

"ती लांब सरळसोट मोठ्ठी टेकडी दिसतेय? त्याच्या अगदी मागे माझ्या वडिलांची छोटीशी जहागीरदारी होती. इवल्या इवल्या सहा सात झोपड्यांचं त्यांचं राज्य."

कुणीतरी मान हलवली, पण कुमालोंना त्यातलं काहीच माहित नव्हतं.

आणि आता मात्र मोठमोठ्या इमारतींमागे इमारती सुरु झाल्या. इमारती, ते पांढरे डोंगर, ती मोठ्ठी चाकं, नावं नसलेले रस्ते, त्यावरून वेगाने धावणाऱ्या गाड्या.

"हे नक्कीच जोहान्सबर्ग असणार." ते म्हणाले.

बाकीचे पुन्हा हसले. एकजण म्हणाला, "हे तर काहीच नाहीये."

इकडून तिकडे पसरलेले आगगाडीचे रूळ. डावीकडे, उजवीकडे. मोजता न येण्याइतके! एक ट्रेन इतक्या जोराने आवाज करत त्यांच्या गाडीच्या पुढे गेली की कुमालो दचकून जागेवरच उडाले. दुसऱ्या बाजूने वेगाने आलेली आणखी एक ट्रेन. त्यांनी कधी कल्पनाही केली नव्हती एवढी एका मागून एक येत जाणारी स्टेशनं, ट्रेनची वाट बघत असलेली त्या स्टेशनांवरची शेकडो माणसं आणि त्यांना निराश करीत सुसाट चाललेली ट्रेन!

इमारती आणखी उंच होतायत. रस्ते आणखी मोजण्यापलीकडे. ह्या गोंधळात आपला मार्ग आपण शोधायचा तरी कसा? काळोख असूनही रस्ते उजळलेले होते.

आता मात्र कोणीतरी दाखवलं.

"जोहान्सबर्ग, ऊम्फुंडीस."

महाप्रचंड इमारती, त्यांच्या उंची इतकेच लाल हिरवे दिवे असलेले खांब. अगदी ठरल्या वेळी हे दिवे चालू बंद कसे होतात ह्याबद्दल कधीतरी त्यांनी ऐकलं होतं. ग्लास पूर्ण भरेपर्यंत बाटलीतून पाणी पडतं आणि मग दिवे बंद होतात. दिवे पुन्हा चालू होतात तेव्हा चक्क पुन्हा बाटलीत पाणी आणि ग्लास रिकामा! काही वेळातच पुन्हा बाटलीतून पाणी ग्लासात. गोऱ्या माणसांच्या कल्पकतेची त्यांना कमाल वाटली. काळे-गोरे! लाल हिरवे असूनही सगळे त्या दिव्यांना काळे गोरे म्हणतात. त्यांच्या आकलनाच्या पलीकडचं होतं हे सारं.

ते भिरभिरले होते, भेदरले होते. महाप्रचंड बोगद्यांमधलं ते स्टेशन एकदाचं आलं. संपूर्णपणे जमिनीखालच्या बोगद्यात असलेले ते स्टेशन. एका मोठ्या छताखाली ट्रेन थांबली आणि हजारो माणसं तिथं दिसायला लागली. पृथ्वीच्या पोटात जाणाऱ्या पायऱ्या आणि तिथला हा भला मोठा बोगदा. काळी माणसं, गोरी माणसं, कुणी जाणारी, कुणी येणारी. इतकी की संपूर्ण बोगदा जणू माणसांनी भरून गेलेला. कोणालाही धडकू नये ह्याची काळजी घेत, बॅग घट्ट पकडून ठेवत ते निघाले. ते एका मोठ्या सभागृहात आले आणि तिथून लोंढ्याबरोबर पायऱ्या चढत रस्त्यावर येऊन पोचले. प्रचंड आवाज येत होता. त्यांनी कधी कल्पनाही केली नसेल, इतक्या कार आणि बस एकमेकांमागे जात होत्या. तो लोंढा रस्त्यावरून जाऊ लागला, पण म्पान्झाच्या मुलाची आठवण येऊन त्या लोंढ्याबरोबर जाण्याची त्यांना भीती वाटू लागली. दिवे सारखे बदलत राहतात. हिरव्याचे लाल, आणि पुन्हा लालचे हिरवे. त्यांनी हे ऐकलं होतं. हिरवा दिवा लागला की आपण जायचं. पण रस्ता ओलांडायला सुरुवात केली की एखादी बस वेगाने येताना दिसायची. काहीतरी एक नियम असणार जो त्यांच्या अजिबात लक्षात येत नव्हता. एका भिंतीचा आधार घेत ते उभे राहिले, जणू वाटावं की कोणाची तरी वाट बघत आहेत. लहान मुलासारखं त्यांचं हृदय दुप्पट वेगाने धडधडायला लागल आणि त्याचा वेग कमी करणं त्यांच्या हातात नव्हतं. देवा! सांभाळ रे बाबा, ते पुटपुटले, देवा, मला सांभाळ.

**

एक तरुण मुलगा त्यांच्याजवळ आला आला आणि काहीतरी अगम्य भाषेत बोलू लागला.

"मला समजत नाहीये तुझं बोलणं." ते म्हणाले.

"तुम्ही झोसा* आहात का ऊम्फुंडीस?"

"झुलू**."

"तुम्हाला कुठे जायचय, ऊम्फुंडीस?"

"सोफियाटाऊनला."

"चला माझ्याबरोबर. मी दाखवतो तुम्हाला."

**झोसा: [Xosa] पूर्व केप मधील काळ्या लोकांची प्रमुख जमात*

***झुलू : झुलूलँड मधील काळ्या लोकांची प्रमुख जमात*

त्याने देऊ केलेल्या मदतीने त्यांना बरं वाटलं. पण मनात त्याच्याबद्दल शंका होतीच. त्याने मी बॅग धरतो म्हटलं नाही ह्यामुळे कुमालोंना हायसंच वाटलं. तो अदबीने बोलत होता, पण जरा वेगळ्याच झुलू भाषेत.

हिरवे दिवे लागले आणि त्याच्याबरोबर त्यांनी रस्ता ओलांडायला सुरुवात केली. एक कार वेगाने आली, पण तरीही त्यांचा वाटाड्या न बिचकता चालत राहिला आणि ती कार त्यांच्या अगदी जवळ येऊन थांबली. त्यांचा आत्मविश्वास वाढलाच.

कुठली वळणं वळणं घेत आपण जातोय हे त्यांना काही कळत नव्हते. बॅगेच्या वजनाने हाताला लागलेली रग असह्य होईपर्यंत एकदाचं ते अनेक बसची गर्दी असलेलं ठिकाण आलं.

"तुम्हाला या रांगेत उभं राहायला लागेल, ऊम्फुंडीस. तिकीट काढायला तुमच्याजवळ पैसे आहेत ना?"

ह्या तरुणाचे आभार मानायलाच हवेत ह्या विचाराने तत्परतेने त्यांनी बॅग खाली ठेवली आणि पैशाचं पाकीट बाहेर काढलं. किती पैसे होतील असं विचारणं अवघड झाल्याने त्यांनी सरळ एक पाउंड काढला.

"तिकीट ऑफिसात जाऊन मी आणून देऊ का तुम्हाला तिकीट? म्हणजे तुमची रांगेतली जागा जायला नको."

"खूप खूप आभार, मित्रा."

तो तरुण तो पाउंड घेऊन थोडसं दूर गेला आणि एका वळणावर दिसेनासा झाला. आता मात्र कुमालोंना पुन्हा भीती वाटायला लागली. रांग पुढे पुढे सरकत होती आणि बॅगेला घट्ट धरून तेही. ते आणखी आणखी पुढे सरकत गेले, अगदी बसच्या जवळ आले तरी त्यांच्याजवळ तिकीट आलं नव्हतं. काहीतरी राहिलंय असं दाखवत ते रांगेतून बाहेर आले आणि तो तरुण जिथे वळला होता तिकडे गेले. पण तो तरुण काही दिसला नाही. धीर एकवटून शेवटी एका सभ्य आणि नीटनेटके कपडे घातलेल्या वृद्ध गृहस्थाला त्यांनी विचारले.

"तिकीट ऑफिस कुठे आहे हो?"

“कुठलं तिकीट ऑफिस, ऊम्फुंडीस?”

“ह्या बससाठी लागणारं तिकीट काढायला.”

“ते तर तुम्हाला बसमधेच मिळेल. इथे असं तिकीट ऑफिस नाहीये.”

तो वृद्ध सभ्य दिसत होता. त्यांनी शेवटी त्याला सांगायचं ठरवलं.

“मी एका तरुण मुलाला तिकीट काढायला एक पाउंड दिला आणि तो मला तिकीट आणून देतो म्हणाला.”

“तुम्हाला फसवलं त्यानं, ऊम्फुंडीस. दिसतोय का तो तरुण आता इथे? आता नाहीच दिसणार. चला माझ्याबरोबर. कुठे जायचय तुम्हाला? सोफियाटाऊन?”

“हो, मिशन हाउसला.”

“अच्छा! मीही अँग्लिकन* आहे. मी दुसऱ्या एकाची वाट बघत होतो, पण ते आता राहू दे. मी येतो तुमच्यासोबत. तुम्हाला रेव्हरंड सिमँगु माहित्येत का?”

“हो हो. त्यांनीच बोलावलंय मला.”

ते पुन्हा रांगेत शेवटी उभे राहिले आणि काही वेळातच बसमध्ये आपल्या जागेवर जाऊन बसले. बसमधून पुन्हा सगळे गोंधळात टाकणारे रस्तेच रस्ते दिसू लागले. चालक बेजबाबदारपणे धुम्रपान करीत होता पण तरीही त्याच्या हिंमतीचे त्यांना कौतुक वाटत होतं. एका रस्त्याकडून दुसऱ्या रस्त्याकडे, एका दिव्याकडून दुसऱ्या दिव्याकडे. धक्के खात, हेलकावे देत, मोठ्ठा आवाज करीत गाडी जणू न संपणाऱ्या प्रवासालाच निघाली होती.

ते एका छोट्या रस्त्यापाशी उतरले. तिथंही हजारो माणसं होती. गर्दीतून वाट काढत ते खूप लांबपर्यंत चालत राहिले. त्यांच्या नवीन मित्राने त्यांची बॅग घ्यायला मदत केली होती, पण त्यांना त्याच्याबद्दल विश्वास वाटत होता. एकदाचे ते एका घरापाशी थांबले आणि त्यांनी दरवाजा ठोठावला.

**अँग्लिकन: इंग्लंडच्या चर्चशी संबंधित व्यक्ती*

एका उंच, पाद्रीच्या वेशातल्या माणसाने दरवाजा उघडला.

“मि. सिमँगु, तुमच्या मित्राला घेऊन आलोय. हे बघा, हे न्दोत्शेनीचे रेव्हरंड कुमालो.”

“या, या, मित्रांनो. मि. कुमालो, तुमचं स्वागत करताना मला खूप आनंद होतोय. जोहान्सबर्गला प्रथमच आलायत का?”

एकदाचं सुरक्षित जागी पोहोचल्यामुळे कुमालोंना हायसं वाटलं. सुटकेचा निश्वास टाकत ते म्हणाले,

“हो. पहिल्यांदाच आलोय. तुमच्या जोहान्सबर्गने खूप गोंधळवलंय मला. ह्या मित्राची मात्र खूपच मदत झाली.”

“तुम्हाला चांगली माणसं मिळाली,मि. कुमालो. हे मि. मफोलो. मोठे व्यावसायिक आहेत आणि आपल्या चर्चचे पाईक सुद्धा.”

“पण मी भेटायच्या आधी त्यांना वेगळी माणसंही भेटलीच.” मफोलो हसत म्हणाले.

आता ह्यातून सगळी गोष्ट सांगणं आलं. कुमालोंना त्यातून भरपूर सहानुभूती आणि अनेक सल्लेही मिळाले.

“तुम्हाला नक्कीच भूक लागली असणार मि. कुमालो. मि. मफोलो, तुम्हीही थांबा ना आमच्याबरोबर जेवायला.”

मि. मफोलो थांबले नाहीत. ते गेले आणि कुमालो एका मोठ्ठ्या आरामदायी खुर्चीत बसले. नेहमीची सवय नसतानाही देऊ केलेली सिगारेट त्यांनी स्वीकारली. घाबरवून सोडणाऱ्या शहराला दरवाजाच्या बाहेर ठेऊन ती खोली एकदम निवांत झाली होती. पहिल्यांदाच धुम्रपान करणाऱ्या मुलासारखा त्यांनी जोरदार झुरका मारला आणि त्यांना बरं वाटलं. एवढा लांबचा प्रवास एकदाचा संपला होता. हा उमदा तरुण त्यांना फारच आवडला. आपण चांगल्या माणसाच्या हाती कसे पोहचलो ह्याची निवांत वेळी चर्चा नक्कीच होऊ शकेल. पण आत्ता ह्या क्षणी स्वीकारलं जाणं आणि सुरक्षित वाटणं त्यांच्या दृष्टीने अगदी पुरेसं होतं.

5

तुम्हाला राहण्यासाठी मी खोली शोधली आहे. मिसेस लिथेबे आपल्याच चर्चच्या आहेत. त्या म्सुतू आहेत पण झुलूही चांगलं बोलू शकतात. पाद्रीने आपल्या घरी येणं हा त्यांना त्यांचा सन्मानच वाटेल. ती जागा खूप स्वस्तही आहे, आठवड्याचे फक्त तीन शिलिंग. जेवणाची सोय आपल्या मिशनच्या लोकांसोबत होऊ शकते. ती बघा घंटा वाजलीच. तुम्हाला हात धुवायचेत का?

ह्या आधुनिक शहरातल्या चर्चच्या कार्यालयातील हात धुण्याची जागाही आधुनिकच होती. पांढरे शुभ्र बेसीन, गरम आणि गार पाणी, जीर्ण पण स्वच्छ टॉवेल. आधुनिक पद्धतीचं शौचालय. आटपल्यावर तुम्ही एक खटका दाबलात की काहीतरी फुटल्यासारखं धो धो करीत पाणी येऊ लागतं. आधी कधी तुम्ही ऐकलं नसेल तर तुम्हाला ह्या सगळ्या प्रकारची भीतीच वाटेल.

नंतर ते एका मोठ्ठं टेबल मांडलेल्या खोलीत गेले. तिथे त्यांना काळे - गोरे असे अनेक पाद्री भेटले. प्रार्थनेनंतर त्यांनी तिथं एकत्र जेवणही केलं. इतक्या साऱ्या प्लेट्स, काटे, चमचे वगैरे बघून आधी ते थोडे गांगरले पण इतरांचं बघत ते लगेच त्यांच्यासारखं जेऊ लागले.

इंग्लंडमधल्या एका गोऱ्या-गोबऱ्या पाद्र्याच्या बाजूला ते बसले होते. त्याने कुठून आलात, तिथं काय काय आहे अशी चौकशी करायला सुरुवात केली. एक काळा पाद्री जोरात ओरडला - मी पण इकोपोचा आहे. माझे म्हातारे आई बाबा अजून तिथंच, लुफाफाच्या खोऱ्यात राहतात. कसं आहे तिकडं सगळं?

मग त्यांनी त्या दूरवरच्या देशातील ठिकाणं, पर्वत आणि दऱ्या ह्यांच्याबद्दल बरंच काही सांगितलं. त्यांच्या सांगण्यात इतकं प्रेम होतं की सगळ्यांनी त्यांचं अगदी शांतपणे ऐकलं. मग त्यांनी ओसाड पडत चाललेली जमीन, नाहीसं होत गेलेलं गवत, डोंगरापासून दरीपर्यंत कोरडे पडलेले ओढे, फक्त म्हातारे, म्हाताऱ्या, आया आणि मुलं ह्यांचाच बनून राहिलेला प्रदेश, कसाबसा पुरुषभर वाढणारा मका, तुटलेली समाजव्यवस्था, मोडलेली घरं, उध्वस्त झालेली माणसं, त्यांचं घर सोडून निघून जाणं, परत कधीच न येणं, पत्रसुद्धा

न लिहिणं ह्या सगळ्या सगळ्या विषयी सांगितलं. फक्त न्दोत्शेनीतच नाही तर लुफाफा, इन्ह्लाविनी, उम्कोमास, उम्झीकुल्लू सगळीकडे हीच परिस्थिती आहे हेही त्यांनी सगळ्यांना सांगितलं. पण गर्टरुड आणि अब्सालोमविषयी मात्र कोणालाच काही सांगितलं नाही.

सगळेच ओसाड पडलेल्या जमिनी, दुभंगलेला समाज आणि तुटलेली घरं, घरापासून तुटलेले आणि आपल्या चालीरीती विसरलेले तरुण-तरुणी, त्यांचं बेबंद आणि निरुद्देश जगणं ह्याविषयी बोलू लागले. लहान वयातले भुरटे गुन्हेगार आणि मोठ्या वयाचे अट्टल गुन्हेगार ह्याविषयी आणि जोहान्सबर्ग कसं काळ्या लोकांच्या गुन्हेगारीने त्रस्त आहे ह्याविषयीही सगळे बोलत राहिले. एकाने जाऊन जोहान्सबर्ग मेल नावाचं वर्तमानपत्र आणलं आणि त्यातली ठळक बातमी दाखवली - ***वृद्ध जोडप्याची त्यांच्या घरातच लुटमार आणि मारहाण. चार काळ्यांना अटक.***

“हे आता रोजचंच झालंय. फक्त युरोपीय लोकंच घाबरलेत असं नाही. अगदी परवाची गोष्ट. तरुणांच्या टोळक्याने एका आपल्याच काळ्या आफ्रिकी मुलीवर हल्ला केला, तिची बॅग हिसकावली, पैसे चोरले. त्यांनी कदाचित तिच्यावर बलात्कारही केला असता, पण तोपर्यंत आजूबाजूच्या घरांमधून लोक बाहेर आले म्हणून ती वाचली.”

“तुम्हाला इथे जोहान्सबर्गमध्ये बरंच काही पहायला मिळेल.” गोरा-गोबरा पाद्री म्हणाला. “फक्त तुम्ही राहता तिथेच सगळं उद्ध्वस्त झालंय असं नाहीये. इथेही काही फार वेगळी परिस्थिती नाहीये. आपण बोलूया पुन्हा. मला तुमच्या भागाबद्दल आणखी ऐकायला आवडेल, पण आता मात्र मला निघायला हवं.”

म्हणून ते निघाले आणि सिमँगु म्हणाला मी तुम्हाला माझी खोली दाखवतो.

“आपल्याला खूप काही बोलायचय.” तो म्हणाला.

ते खोलीत आले, सिमँगुने खोलीचा दरवाजा बंद केला. कुमालो म्हणाले, “तुला मी खूप उतावळा वाटत असेन. पण मला खरच माझ्या बहिणीबद्दल ऐकायचंय.”

“हो.” सिमँगु म्हणाला, “मी अगदी समजू शकतो. त्यासाठी तर एवढ्या लांबून तुम्ही इथे आला आहात. माफ करा पण मला आधी तुमच्याकडून जाणून घ्यायचं आहे की तुमची बहीण जोहान्सबर्गला कशासाठी आली होती?”

त्याच्या प्रश्नाने किंचित विचलित होऊनही त्यांनी तत्परतेने उत्तर दिलं,

“ती तिच्या खाणीत काम करणाऱ्या नवऱ्याला भेटायला आली होती. त्याचं काम संपलं तरी तो ना घरी परतला, ना त्याने पत्रातून आपली ख्याली खुशाली कळवली. म्हणून तो जिवंत तरी आहे ना असा विचार करीत तिच्या लहान मुलाला बरोबर घेऊन ती त्याला शोधायला आली.”

सिमँगु पुढे काहीच बोलला नाही म्हणून त्यांनीच विचारले, “ती खूपच आजारी आहे का?”

गंभीर होत सिमँगु म्हणाला, “हो, ती खूप आजारी आहे. पण हे नेहमीचं आजारपण नाही, हे वेगळंच, अतिशय वाईट आजारपण आहे. मी तुम्हाला निरोप पाठवला कारण की ती एकटी होती आणि मुख्य म्हणजे पाद्री भावाची बहिण होती. तिला तिचा नवरा सापडला की नाही, मला कल्पना नाही. पण तिला आता नवरा नाही.”

त्याने कुमालोंकडे बघितलं व पुढे म्हणाला, “खरं तर असं म्हणणं जास्त योग्य ठरेल की आता तिला अनेक नवरे आहेत.”

“अरे बाप रे! अरे देवा!!” कुमालो म्हणाले.

“ती क्लेअरमाउंटला म्हणजे जोहान्सबर्गमधल्या सगळ्यात घाणेरड्या ठिकाणांपैकी एका ठिकाणी राहते. पोलिसांची धाड पडली की तिथे रस्त्यावरून दारूच्या नद्या वाहतात. तुम्हाला दारूचा वास यायला लागतो, खरं तर तिकडे कुठेही गेलात तरी दारूच्या वासाशिवाय दुसरा कुठलाच वास येत नाही.”

कुमालोंच्या थोडं जवळ जाऊन तो म्हणाला, “मी पूर्वी दारू प्यायचो, पण ती चांगली दारू, आपले वाडवडील बनवायचे तशी. पण आता मात्र मी दारूला स्पर्शही न करण्याची शपथ घेतली आहे. तिथे बनवतात ती मात्र अतिशय घाणेरडी दारू, आपल्या लोकांनी कधीच न वापरलेल्या वस्तू वापरून कुठल्याही पद्धतीने बनवलेली. अशी दारू बनवण्याचं आणि विकण्याचं काम ती करते. मला सांगायला त्रास होतोय, पण मला तुमच्यापासून काहीच लपवायचं नाहीय. अशा बायका पैसे घेऊन कुठल्याही माणसाबरोबर झोपतात. तिच्याकडे येणारी माणसं जुगार खेळतात, दारू पितात आणि एकमेकांना सुऱ्यांनी भोसकतात. तिच्या घरी एका माणसाचा खूनही झालाय. ती बरेचदा तुरुंगातही जाऊन आली आहे.”

आधार सुटल्यासारखे कुमालो खुर्चीवर मागे कलले आणि टेबलावरचं एक पुस्तक ओढून मागे पुढे करत राहिले.

“तुमच्यासाठी ही भयंकर बातमी आहे.” तो म्हणाला.

कुमालोंनी मुकाट्याने मान हलवली. सिमँगुने सिगारेट काढली आणि विचारलं, “ओढणार?”

“मी खरंच फारसं धुम्रपान करत नाही.”

“काही वेळेस धूम्रपानाने मनाला एक शांतता मिळते. पण सिगारेट ओढण्यासाठीही मनाला आधी एक निवांतपणा असायला लागतो. तरच ते आरामदायक वाटू शकतं. पण इथं जोहान्सबर्गमध्ये ती शांतता मिळणं कठीणच.”

“फक्त जोहान्सबर्गमध्येच असं नाही. ईश्वर चिंतनातून आपल्याला कुठंही शांतता मिळू शकते.”

आणि यापुढे काही बोलणं शक्य नसल्यासारखे दोघेही शांत झाले. शेवटी कुमालोच म्हणाले, “तिचा मुलगा कुठाय?”

“मुलगाही तिथेच आहे, पण खरं तर ती मुलांसाठीची जागा नाही. या कारणासाठीही मी तुम्हाला बोलावलं. कदाचित तुम्ही आईला नाही तरी मुलाला वाचवू शकाल.”

“कुठाय हे ठिकाण?”

“इथून फार लांब नाहीये ते. मी तुम्हाला उद्या तिथे घेऊन जाऊ शकतो.”

“मला आणखीही एक मोठी काळजी लागून राहिली आहे.”

“बोला.”

“हो.”

पण ते शांत झाले, सांगायची इच्छा असूनही बोलू शकले नाहीत. तेव्हा सिमँगु त्यांना म्हणाला, “दादा, अगदी निश्चिंत होऊन बोला.”

“सोपं नाहीये हे सांगणं. ते आमचं सगळ्यात मोठं दुःख आहे.”

“कदाचित मुलाबद्दल? किंवा मुलीबद्दल?”

“मुलाबद्दल.”

“अच्छा, अगदी मोकळेपणे बोला.”

“अब्सालोम नाव आहे त्याचं. तोसुद्धा माझ्या बहिणीला शोधायला इकडे आला आणि कधीच परतला नाही. काही दिवसांनी त्याची पत्रं येणंही थांबलं. त्याच्या आईने आणि मी पाठवलेली सगळी पत्रही परत आली. आता तुम्ही सांगितलंत ते ऐकल्यावर तर मला खूपच भीती वाटायला लागली आहे.”

“काळजी करू नका. आपण त्याला शोधायचा प्रयत्न करूया. कदाचित तुमच्या बहिणीला तो कुठे आहे ते माहीत असेल. तुम्ही खूप दमला असाल ना? चला, मी तुम्हाला तुमच्या खोलीकडे घेऊन जातो.”

“हो, चल.

ते उठले आणि कुमालो म्हणाले, “झोपण्यापूर्वी चर्चमध्ये जाऊन प्रार्थना करायची माझी सवय आहे. प्रार्थना कुठे करायची, दाखवशील ?”

“हो, आपल्याला जातानाच लागेल .”

“तूही माझ्यासाठी प्रार्थना केलीस तर...” कुमालोंनी नम्रपणे विचारलं.

“अगदी, अगदी. मला नक्की आवडेल. एरवी मी इतर बरीच कामं करत असतो, पण जोपर्यंत तुम्ही इथे आहात तोपर्यंत मी तुमचाच आहे.”

“तू खूप दयाळू आहेस.”

कातरलेल्या आवाजाने सिमँगुचं मन हेलावलं.

“मी दयाळू नाहीये. मी एक स्वार्थी आणि पापी माणूस आहे, पण देवाचा वरदहस्त मिळालाय, इतकंच.”

त्याने कुमालोंची बॅग उचलली पण ते पोचणार इतक्यात दरवाज्याशी थांबत कुमालो म्हणाले,

“मला आणखीही काहीतरी सांगायचंय.”

“बोला.”

“माझा एक भाऊही आहे इथे जोहान्सबर्गमध्ये. तोही हल्ली पत्रं पाठवत नाही. जॉन कुमालो. तो सुतार आहे.”

सिमँगु हसला. “अच्छा, तो तुमचा भाऊ आहे होय? मला माहितीये तो. तो इतका कामात असतो की तुम्हाला पत्र पाठवायला त्याच्याकडे वेळच नसेल. तो आता आपला नेता आहे, महान नेता!”

“नेता? माझा भाऊ?”

“तो सध्या राजकारणातली एक बडी असामी आहे.”

क्षणभर थांबून सिमँगु म्हणाला, “मला तुम्हाला दुखवायचं नाहीये, पण तुमचा भाऊ आता चर्चच्या काहीच कामाचा नाहीये. जे देवानं दक्षिण आफ्रिकेसाठी केलं नाही ते माणसानं केलं पाहिजे असं म्हणणं आहे त्याचं.”

“हा प्रवास खूप थकवणारा आहे.”

“खरंय.”

“मला कधी कधी काळजी वाटते, बिशपना कळलं तर ते काय म्हणतील? एका पाद्र्याने...”

“बिशप काय म्हणणार? जे काही चाललंय ते बिशप थांबवू शकत नाही. खरं तर जे काही चाललंय ते कुणीच थांबवू शकत नाही. चालू दे..”

“चालू दे? असं कसं म्हणतोस, रे?”

“आणखी दुसरं काय म्हणणार?” सिमँगु गंभीरपणे म्हणाला. “जगात जी उलथापालथ चालल्ये ती तुम्ही थांबवू शकत नाही. अहो, मी ख्रिश्चन आहे. माझ्याच ख्रिश्चन गोऱ्या बांधवांविषयी माझ्या मनात द्वेष कसा असेल? एका गोऱ्या माणसानेच माझ्या बापाला अंधारातून बाहेर काढलं. माफ करा, मी जरा स्पष्टच बोलतो. दुःख ह्याचं नाही की जुन्या गोष्टी तुटतायत. दुःख ह्याचं आहे की त्या नव्याशी सांधण्याचा प्रयत्न केला जात नाहीये. गोऱ्यांनी आपला समाज उद्ध्वस्त केला. तुम्हाला कदाचित वाईट वाटेल पण मला मनापासून वाटतं की आता तो पुन्हा सावरला जाऊ शकणार नाही. घरं तुटतायत, तुटलेल्या घरांमधून माणसं दूर फेकली जातायत हे सगळ्यात जास्त वाईट

आहे. म्हणूनच मुलं कायदे मोडतायत आणि गोरी म्हातारी लोकं लुटली जातायत." त्याने कपाळावरून हात फिरवला.

"गोऱ्यांनी आपला समाज, आपल्या चालीरीती तोडल्या इथपर्यंत एकवेळ ठीक होतं. पण त्याच्या जागी आज त्यांनी जे भलतंच काहीतरी आणलंय ते मात्र साफ चुकीचं आहे." तो गंभीरपणे म्हणाला.

"मी तासनतास यावर विचार केलाय आणि मला हे बोलायलाच हवं कारण माझ्या मते हेच सत्य आहे. अर्थात सगळेच गोरे तसे नाहीत. काही गोरे हे पुन्हा सांधण्यासाठी त्यांचं आयुष्यही वेचतायत. पण ते पुरेसं नाही. ते घाबरलेत हेही खरंय. या भूमीवर सध्या भीतीचंच साम्राज्य आहे."

तो ओशाळवाणं हसला. "बाप रे मी किती बडबडत राहिलो! हा विषयच असा आहे की त्यावर भरपूर बोलता येईल. नंतर कधीतरी निवांतपणे ह्यावर बोललं पाहिजे. तुम्ही फादर विन्सेंट ह्यांच्याशी ह्या विषयावर बोलायला हवं. ते गोरे आहेत आणि जे बोलायला हवं ते निर्भीडपणे बोलू शकतात. ते, लहान मुलांसारख्या गोबऱ्या गालांचे, तुम्ही जेव्हा तुमच्या गावाकडचं सांगत होतात तेव्हा अगदी उत्सुकपणे ऐकत होते ते. आठवले? "

"हो, आठवतायत ना."

"उदारपणाचा आव आणत गोरे आपल्याला काय देतात?" तो उदासपणे म्हणाला. "ते जवळजवळ आपल्याला काहीच देत नाहीत. असो. चला आपण चर्चमध्ये जाऊया."

**

"मिसेस लिथेबे, मी माझ्या मित्राला घेऊन तुमच्याकडे आलोय. हे रेव्हरंड स्टिफन कुमालो."

"तुमचं स्वागत आहे, ऊम्फुंडीस. खोली छोटी आहे पण स्वच्छ आहे."

"तुमचा आभारी आहे मी."

"गुड नाईट, दादा. उद्या सकाळी ७ वाजता चर्चमध्ये भेटूया."

"हो, नक्की."

"त्यानंतर मी तुम्हाला न्याहारीकरिता घेऊन जाईन. येतो मी."

“ये. सकाळी भेटूच.”

ती त्यांना एका छोट्याशा पण नीटनेटक्या खोलीत घेऊन गेली आणि तिने तिथली मेणबत्ती पेटवली.

“तुम्हाला काहीही हवं असेल तर मला जरूर सांगा, ऊम्फुंडीस.

“नक्की. धन्यवाद, मदर.”

“आता निवांत झोपा, ऊम्फुंडीस.”

“तुम्हीही निवांत झोपा, मदर.”

ते आपल्या खोलीत आले. अठ्ठेचाळीस तासांपूर्वी ते आणि त्यांची पत्नी न्दोत्शेनीत बॅग भरत होते. चोवीस तासांपूर्वी त्यांनी ट्रेनमधील न पाहिलेल्या देशाच्या प्रवासाचा थरार अनुभवला होता. आता ते बसले आहेत तिथून बाहेर दिसतायत गडबडीत, धावपळीत असलेले लोक आणि किंचाळत त्यांच्या मागे लागलेली ही अक्राळविक्राळ नगरी - जोहान्सबर्ग...जोहान्सबर्ग!

6

क्लेअरमाउंट काही फार दूर नाहीये. जिथे कोणीही जागा घेऊ शकतो असं सोफियाटाऊन, जोहान्सबर्ग महानगरपालिकेच्या ताब्यातलं वेस्टर्न नेटिव्ह टाऊनशिप आणि ह्या दिमाखदार नगरीच्या कचऱ्याचा अस्ताव्यस्त ढीग म्हणवलं जाणारं क्लेअरमाउंट हे तिन्ही विभाग एकमेकांना चिकटून आहेत. त्यांची हद्द पश्चिमेकडून न्युलँड आणि पूर्वेकडून वेस्टडेन या युरोपीय लोकांच्या जिल्ह्यांपर्यंत आहे.

"काळे आणि गोरे यांना वेगवेगळे करण्याच्या धोरणाच्या मी पूर्ण विरोधात आहे." सिमँगु म्हणाला. "पण आपण एकमेकांच्या फारच जवळ आहोत हेही काही चांगलं नाही. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणांपासून ट्राम चालतात. त्यातला काही भाग युरोपीय लोकांसाठी आणि काही आपल्यासाठी आहे. पण तरीही बरेचदा त्यांचे हुल्लड माजवणारे गुंड आम्हाला ट्राममधून हाकलवून लावतात. आपल्यातले गुंडही मग गडबड करायला टपलेलेच असतात."

"पण पोलीस हे चालू देतात?"

"पोलीस विरोध करतात, पण ते प्रत्येक ट्रामची तपासणी नाही करू शकत. आणि गडबड सुरु झाल्यावर कसं कळणार की कोणी सुरुवात केली? कोण चूक कोण बरोबर हे कसं ठरवणार? आपण एकमेकांच्या फारच जवळ आहोत याचं वाईटच वाटतं मला. बघा, ती मोठी बिल्डींग दिसतेय?"

"ती समोरची?"

"हो. ती बंटू प्रेस ह्या आपल्या वर्तमानपत्राची बिल्डींग आहे. अर्थात त्यात काही युरोपीय लोकही आहेत. प्रेसची भूमिका मध्यममार्गी आहे. जे बोलायला हवं त्यातलं सगळंच्या सगळं काही ते बोलत नाही. थोडं फार मात्र नक्कीच बोलतात. पण तुमच्या भावाचं जॉनचं मात्र वेगळंच मत आहे. तो आणि त्याचे सहकारी तिला चेष्टेने बंटू रिप्रेस म्हणतात."

ते क्लेअरमाउंट येईपर्यंत चालतच राहिले. कुमालो तिथला बकालपणा आणि गलिच्छपणा पाहून, एकमेकांना चिकटलेली घरं पाहून, रस्त्यावरचे अस्ताव्यस्त कचऱ्याचे ढीग पाहून सुन्न होऊन गेले होते.

“तुम्ही त्या बाईला बघितलंत?”

“हो.”

“दारूचा मोठा व्यवसाय असलेली ती इथली एक फार मोठी हस्ती आहे. लोकं म्हणतात ती जोहान्सबर्गमधल्या सगळ्यात श्रीमंत लोकांपैकी एक आहे.”

“आणि ही मुलं? ती शाळेत का गेली नाहीयेत?”

“काही मुलांना जायचं नाहीये, काही जणांच्या पालकांना पाठवायचं नाहीये आणि बऱ्याचशा मुलांना शाळाच घेत नाहीये.”

ते लिली स्ट्रीटवरून हायसिंथ स्ट्रीटकडे वळले. रस्त्याची नावं तर भलतीच सुंदर होती.

“हा बघा, नंबर अकरा. तुम्ही एकटेच आत जाल?”

“तेच बरं होईल, नाही का?”.

“तुमचं झालं की तेरा नंबरपाशी या. तिथं आपल्या चर्चमध्ये येणारी एक बाई राहते. खूप चांगली आहे ती. नवऱ्याबरोबर आपल्या मुलांचं अगदी मनापासून संगोपन करते. तिच्या सगळ्यात मोठ्या मुलीला मी चर्चच्या कामासाठी तयार केलं होतं. पण ती एका भटक्या मवाल्याबरोबर पळून गेली. ते आता पिम्विलेला राहतात. तुम्हाला या घरात जायचंय. मी कुठे असेन ते तुम्हाला सांगितलंच.”

घरातून जोरजोरात हसू ऐकू येत होतं, एक असं हसू ज्याची किळस वाटावी. खरंतर कोणीतरी खूप भ्यालंय म्हणून इतकं वाईट हसतंय. एका स्त्रीचा आवाज आणि एका पुरुषाचा आवाज. पण तरीही त्यांनी दरवाजा वाजवलाच आणि तिनं तो उघडला.

“गर्टरुड, मी आलोय.”

त्या आवाजानं ती घाबरली. काय करावं ते सुचत नसल्यासारखी ती चटकन मागे सरकली. त्यांना कळणार नाही अशा आवाजात मागे वळून काहीतरी पुटपुटली. खुर्च्या हलल्या, इतर गोष्टी हलवल्या गेल्या. त्यांच्याकडे न बघता ती म्हणाली,

“मी आवरते आहे, दादा.

ते एकमेकांकडे बघत राहिले. ते दुखावलेले, ती भेदरलेली. तिनं पुन्हा खोलीकडे वळून बघितलं, खोलीचा मागचा दरवाजा बंद झाला होता. आता ती त्यांना म्हणाली, “आत ये दादा.”

तिनं हस्तांदोलनासाठी तिचा हात त्यांचा हातात दिला. तो अगदी थंड पडला होता आणि थोडा घामाने भिजलाही होता. त्यात काही जीवच नव्हता

ते दोघेही खुर्चीत बसले. तिला काहीच सुचत नव्हतं.

“मी आलोय.” ते म्हणाले.

तिनं मान खाली घातली.

“तू पत्र पण पाठवलं नाहीस.”

“हो, पाठवायचं राहून गेलं”

“तुझा नवरा कुठाय?”

“त्याला खूप शोधलं मी, दादा. कुठं सापडलाच नाही तो .”

“हेही तू आम्हाला कळवलं नाहीस.”

“हो, राहिलंच.”

“तुला माहित नव्हतं की आम्ही तिकडे वाट बघत असू?”

“माझ्याकडे कळवायला पैसे नव्हते.”

“स्टॅंपसाठी दोन पेनी नव्हते तुझ्याकडे?”

तिनं काहीच उत्तर दिलं नाही. त्यांच्याकडे बघितलंही नाही.

“पण मी ऐकलंय, तू तर श्रीमंत झाली आहेस.”

“नाही दादा, मी श्रीमंत नाहीये.”

“मी ऐकलं, तू तुरुंगात गेली होतीस?”

“हो.”

“दारूमुळे?”

तिच्या एकदम लक्षात आलं. काहीतरी बोललं पाहिजे, एवढं गप्प राहून चालणार नाही. तिनं आपण दोषी नसल्याचं आणि दुसऱ्या एका बाईमुळे त्यात अडकल्याचं सांगितलं.

“तू त्या बाईबरोबर रहात होतीस?”

“हो.”

“तू अशा बाईबरोबर का रहात होतीस?”

“कारण मला रहायला दुसरी जागा नव्हती.”

“आणि तू तिला तिच्या धंद्यात मदत करत होतीस?”

“मला माझ्या मुलासाठी कमावणं गरजेचं होतं.”

“मुलगा कुठाय?”

ती अंदाज घेण्यासाठी इकडे तिकडे पाहत राहिली. मग उठली आणि मागच्या मोकळ्या भागाकडे जाऊन हाका मारू लागली. एकेकाळी अतिशय गोड असणाऱ्या आवाजात आता एक वेगळीच छटा होती, तीच छटा जी थोड्या वेळापूर्वीच्या हसण्यात होती.

“मी सांगितलंय त्याला पाठवायला.”

“कुठाय तो?”

“इथंच असेल कुठेतरी. कोणीतरी आणेलच त्याला.”

अस्वस्थपणे भिंतीवरचे पोपडे काढत ती उभी राहिली.

“मी कुठे झोपू?” त्यांनी धारदार आवाजात विचारलं.

ती शरमेने थिजून गेली. राग अनावर झाला तरीही ते किंचाळले नाही.

“तू आमची लाज घालवलीस.” दबक्या आवाजात ते ओरडले. इतके हळू, की इतरांना कळू नये. “दारू विकणारी, शरीर विकणारी, मुलाकडे अजिबात लक्षही न देणारी झालीस तू. हे काय केलंस गं. तुझा भाऊ पाद्री आहे ह्याचा तरी थोडा विचार करायचास!

तू आमच्याशी असं कसं वागू शकतेस?” इतरांना कळू नये इतक्या हळू आवाजात ते बोलले.

एखाद्या गांजलेल्या मुक्या जनावरासारखी केविलवाण्या नजरेने ती पहात राहिली.

“मी तुला न्यायला आलोय.”

आता मात्र तिच्या मनाचा बांध फुटला आणि ती जमिनीवर पडून जोरजोरात रडायला लागली. सगळी लाज सोडून धाय मोकलून रडू लागली.

“हळू, इतरांना ऐकू जाईल.” त्यांनी पटकन सांगितलं.

आपले हुंदके ती आवरत राहिली.

“तुला परत यायचंय ना?”

तिने मान हलवली.

“मला जोहान्सबर्ग अजिबात आवडत नाही, दादा. मी आजारी आहे. मुलगाही आजारीच असतो.”

“तुला अगदी मनापासून परत यावसं वाटतंय?”

तिने पुन्हा मान हलवली. हुंदके देत ती म्हणाली, “मला जोहान्सबर्ग अजिबात आवडत नाही.”

तिनं कळवळून त्यांच्याकडे बघितलं आणि त्यांच्या नजरेत आशेचा किरण उगवला.

“मी एक वाईट बाई आहे, दादा. मला परत येण्याचा हक्क नाही.”

त्यांच्या डोळ्यात अश्रू तरळले. त्यांच्यातला खोलवर रुजलेला कनवाळूपणा जागा झाला. तिच्याजवळ जात त्यांनी तिला जमिनीवरून खुर्चीवर बसवलं. नि:शब्दपणे ते तिचं डोकं थोपटत राहिले. त्यांच्या मनात करुणा दाटून आली.

“देव आपल्याला क्षमा करतो. मी कोण आहे माफ न करणारा? चल, आपण प्रार्थना करूया.”

ते खाली बसले आणि शेजाऱ्यांना ऐकू येऊ नये इतक्या हळू आवाजात प्रार्थना म्हणू लागले. तीही त्यांच्या विनंत्यांना ‘आमेन’ असं उत्तर देऊ लागली. त्यांची प्रार्थना

संपली आणि स्वत:ची चीड येऊन ती पुन्हा रडू लागली. थोडा वेळ ते एकमेकांचा हात हातात घेऊन बसून राहिले.

“आणि मला थोडी मदत करशील?” ते म्हणाले.

“तुला मदत? काय दादा?”

“तुला शोधायला आलेल्या मुलाबद्दल तुला काहीच माहित नाही का ?”

“माहित्ये दादा. अब्सालोम जोहान्सबर्गमध्ये कुठल्यातरी मोठ्या ठिकाणी नोकरी करत होता आणि सोफियाटाऊनला रहात होता. नक्की कुठे असेल हे मला माहित नाही पण आपल्या जॉनचा मुलगा आणि तो बरेचदा एकत्र असायचे. त्याला नक्की माहित असेल.”

“मी जाईन तिकडे. आणि हे बघ, मी मिसेस लिथेबेंकडे तुझ्यासाठी खोली बघतो. तुझं बरंच सामान आहे का?”

“फारसं नाही. हे टेबल, खुर्च्या, तो पलंग आणि थोडीशी भांडीकुंडी. बस एवढंच.”

“मी पाठवीन कोणालातरी ते सगळं आणायला. तू तयार आहेस ना?”

“दादा, हा बघ, माझा मुलगा आला.”

खोलीत एक मोठी मुलगी त्यांच्या भाच्याला घेऊन आली. त्याचे कपडे मळलेले होते आणि नाक वाहत होतं. तोंडात बोट घालून मोठ्यामोठ्या डोळ्यांनी तो आपल्या मामाकडे बघत होता.

कुमालोंनी त्याला चटकन उचलून घेतलं, त्याचं नाक पुसलं आणि छानपैकी कुरवाळून त्याची पापी घेतली.

“परत आपल्या गावी जाणं ह्या बाळासाठी किती महत्वाचं आहे. तो अशा ठिकाणी मोठा होईल, जिथे वारे मोकळेपणाने वाहतात आणि जिथे त्याच्यासाठी शाळा असेल.”

“खरंय. चांगलंच होईल.” ती म्हणाली.

“चल, आता मला निघायला हवं, खूप गोष्टी करायच्यात.”

ते घरातून रस्त्यावर आले आणि सगळे शेजारीपाजारी त्यांच्याकडे टक लावून पाहू लागले. आपल्याकडे पाद्री आलेले!

ते त्यांच्या मित्राकडे आले आणि मोठया उत्साहाने त्यांना सगळं काही सांगितलं. “मी बहिणीला आणि भाच्याला परत घेऊन जायचं म्हणतोय. गाडी मिळेल का सामान न्यायला?”

“हो, हो. लगेच त्यांना घेऊन निघूया. तुम्हाला बरं वाटलेलं बघून मलाही बरं वाटतय.”

“माझ्या डोक्यावरचा एक मोठ्ठा भार हलका झाला. देवा, बाकीच्या गोष्टीही अशाच सुरळीत होऊ देत.”

उत्सुक, मोकळ्याढाकळ्या, मोठमोठ्यांनी बोलणाऱ्या, विचित्र हसू हसणाऱ्या शेजारणींच्या घोळक्यातून वाट काढत त्यांनी तिला लॉरीत बसवलं. लॉरी भरली तेव्हा समाधानाने ते सोफियाटाऊनकडे निघाले.

मिसेस लिथेबेंनी गर्टरुड आणि मुलाला त्यांची खोली दाखवली आणि कुमालो चर्चकडे गेलेले असताना त्यांना जेवायला वाढलं. त्या रात्री जेवण्याच्या खोलीत मोठ्या उत्साहात प्रार्थना म्हटली गेली आणि मिसेस लिथेबे आणि गर्टरुड ‘आमेन’ म्हणत राहिल्या. कुमालो आता पूर्वीपेक्षा कितीतरी जास्त कनवाळू बनले होते. त्यांच्या सोशिक चेहऱ्यावर एक निष्पाप हसू फुललं. जोहान्सबर्गमध्ये येऊन फक्त एकच दिवस झालाय आणि समाज पुन्हा बांधला जातोय, घर आणि मनं पुन्हा सांधली जातायत!

7

गर्टरुडचा पोशाख एकेकाळी कदाचित झोकदार असेलही, पण आता मात्र तो खूपच मळला होता. तिच्या डोक्यावरची हॅट तर अगदीच काळी चिकट आणि कशीतरीच दिसत होती. हातात फारसे पैसे नसूनही त्यांनी तिच्यासाठी एक लाल पोशाख आणि पांढरी हॅट आणली. छोट्या भाच्यासाठी एक शर्ट, दोन पँट, एक जर्सी आणि त्याच्या आईला त्याचं नाक पुसता येईल असे दोन मोठ्ठे रुमालही घेतले. त्यांच्या पाकिटात त्यांचं पोस्ट ऑफिसचं पुस्तक होतं. त्या पुस्तकात ते आणि त्यांची बायको यांनी कोणतीही संसारी बाई ज्याची मनापासून वाट बघत असते असा स्टोव्ह घेण्यासाठी साठवलेले दहा पाउंड होते. आठ पाउंड महिना मानधन मिळणाऱ्यानं दहा पाउंड साठवणं मोठं चिकाटीचं काम असतं. पाद्र्यासाठी तर आणखीच जास्त, कारण ह्या पैशातूनच त्याला त्यांच्या पदाला साजेसे काळे कपडे घ्यावे लागतात. त्यांची क्लेरीकल कॉलर* खूप जीर्ण आणि मळकी झाली होती पण आता नवीन कपड्यांसाठी त्यांना आणखी थांबायला लागणार होतं. आज ना उद्या दहा पाउंड मोडावे लागणार असल्याची रुखरुख होतीच. गर्टरुडच्या वस्तू मोडून फारसं काही मिळणारही नव्हतं. आश्चर्य ह्या गोष्टीचं होतं की तिच्या वाईट चालीच्या कमाईतून तिनं काहीच साठवलं नव्हतं. लोकं तर म्हणतात त्यांना भरपूर पैसे मिळतात.

गर्टरुड स्वयंपाकघरात मिसेस लिथेबेंना मदत करताना काहीतरी गुणगुणत असल्याचं त्यांनी ऐकलं. मुलगा मागच्या अंगणात बांधकाम करणाऱ्यानी टाकलेल्या विटा आणि लाकडी ठोकळ्यांबरोबर खेळत होता. सूर्य तळपत होता आणि ह्या महानगरातही वेगवेगळे पक्षी आणि चिमण्या इकडून तिकडे उडत होत्या.

किंचित समाधानाच्या ह्या क्षणी त्यांनी आपल्या बायकोला पत्र लिहायला घेतलं. लांबलचक प्रवासाविषयी, ह्या अजब महानगरीविषयी, त्यांचा पाउंड चोरणाऱ्या तरुणाविषयी, अचानक सापडलेल्या गर्टरुडविषयी, तिच्या छोट्या मुलाच्या बाललीलांविषयी अगदी सविस्तरपणे त्यांनी लिहिलं. आजपासून त्यांच्या मुलाचा शोध घ्यायलाही ते सुरुवात करणार आहेत हे लिहिणार इतक्यात त्यांना रस्त्यावरून सिमँगु येताना दिसला आणि ते थांबले.

**क्लेरीकल कॉलर : चर्च मधील बिशप, पाद्री पारंपारिक वेशभूषेबरोबर घालतात ती कॉलर*

“चला, निघायचं का ?”

“हो, हो. निघूया ना. मी कधीचाच तयार आहे. वेळ होता म्हणून बायकोला पत्र लिहायला घेतलं होतं.”

“मी ओळखत नाही त्यांना, पण तरी पण त्यांना माझा नमस्कार सांगा.”

ते एका रस्त्यावरून दुसऱ्या, दुसऱ्यावरून तिसऱ्या रस्त्यावर चालत राहिले. लोक म्हणतात ते खरंच आहे, तुम्ही एका रस्त्यावरून दुसऱ्या रस्त्यांवर, दुसऱ्यावरून तिसऱ्या असे दिवसेंदिवस चालत रहा, तरी तुम्ही पुन्हा तुम्ही त्या पहिल्या रस्त्यावर येणार नाही.

“हे बघा तुमच्या भावाचं दुकान. पाटीवरचं नाव बघितलंत न?”

“हो, हो. माझ्या भावाचंच नाव दिसतंय.”

“मी येऊ आत, की ...?”

“ये ना, आपण दोघंही जाऊया.”

त्यांचा भाऊ जॉन खुर्चीवर बसून दोन माणसांशी बोलत होता. तो चांगलाच जाडजूड झाला होता आणि हात एखाद्या मुखियासारखे रुबाबात गुढघ्यावर फिरवत होता. बाहेरून येणारा उजेड त्या दोन माणसांच्या पाठीवर पडत असल्यामुळे त्या अंधुक प्रकाशात जॉनने त्यांना ओळखलंच नाही.

“गुड मॉर्निंग, जॉन.”

“गुड मॉर्निंग, सर.”

“जॉन, गुड मॉर्निंग. अरे, मी आलोय.”

जॉनने निरखून त्यांच्याकडे बघितलं आणि चटकन उठत दिलखुलास हसला.

“दादा! कमाल आहे! तू इकडे जोहान्सबर्गमध्ये काय करतोयस?”

कुमालोंनी त्याच्या पाहुण्यांकडे बघितलं आणि ते म्हणाले मी एका कामाच्या निमित्ताने आलोय.

“माफ करा मित्रांनो, माझा दादा गावाहून आलाय.”

ते दोघेही उठले आणि नमस्कार करून निघून गेले.

“तू ओळखतोस ह्यांना? हे रेव्हरंड सिमँगु.”

“ह्यांना कोण ओळखत नाही दादा? रेव्हरंड सिमँगुना सगळे ओळखतात. बसा, बसा. आधी थोडा थोडा चहा घेऊया.”

तो दरवाज्याजवळ गेला आणि त्याने आत हाक मारली.

“तुझी बायको इस्थर बरी आहे ना?”

खट्याळ हसू हसत जॉन म्हणाला, “माझी बायको दहा वर्षांपूर्वीच मला सोडून गेली, दादा.”

“आणि मग तू पुन्हा लग्न केलंस?”

“अगदी चर्च म्हणतं तसं लग्न नाही. पण ती चांगली बाई आहे.”

“तू ह्यातलं आम्हाला काहीच कळवलं नाहीस रे.”

“कसं कळवणार? तुम्हा न्दोत्शेनीतल्या लोकांना जोहान्सबर्गमधलं आयुष्य माहित नाहीये. म्हणून न कळवलेलं बरं असं वाटून मी तुम्हाला काहीच लिहिलं नाही.”

“आम्हाला वाईट वाटेल म्हणून काय पत्रच पाठवायचं नाही ?”

“तुम्हाला कशाला उगाचच त्रास द्यायचा?”

“पण मला हे कळत नाहीये जोहान्सबर्गमधे असून असून असं काय वेगळं आयुष्य असणार आहे?”

“ते असं सांगणं कठीण आहे, दादा. मी इंग्रजीत बोललो तर चालेल? इंग्रजीत मला जरा जास्त नीट सांगता येईल.”

“काही हरकत नाही, इंग्रजीत बोल.”

“जोहान्सबर्ग न्दोत्शेनीसारखं नाही. इथं राहिल्याशिवाय इथले अनुभव कळणार नाहीत.” त्यांनी कुमालोंकडे बघितलं. “काहीतरी नवीन घडतंय इथं.”

येरझाऱ्या घालत, खिडकीतून लांब रस्त्याकडे नजर टाकत वेगळ्याच सुरात त्यानं बोलायला सुरुवात केली. त्यांच्या नजरेला नजर न देता कधी घराच्या आढ्याकडं तर कधी आणि खोलीच्या रिकाम्या कोपऱ्याकडं बघत तो पुढे बोलू लागला.

“तिकडं न्दोत्शेनीत मी कुणीच नाही. तूही कुणीच नाहीस, दादा. आपल्या गावातल्या मुखियाच्या मिजासखोर नजरेतून मी कुणीच नाही. अगदीच कस्पट. तो अशिक्षित असला, बिनडोक असला तरी मी त्याच्यासमोर वाकायचं, त्याला सलाम ठोकायचा. इथं जोहान्सबर्गमध्ये मी कुणीतरी आहे. माझी काहीतरी ओळख आहे, माझा काहीतरी प्रभाव आहे. दादा, माझा स्वतःचा व्यवसाय आहे आणि तो चांगला चालतो तेव्हा मी आठवड्यात दहा, बारा पाउंड कमावतो.”

तो इकडून तिकडं फिरत राहिला. आता तो त्यांच्याशी नाही तर जणू स्वतःच्याच तंद्रीत इथं नसलेल्या लोकांशी बोलत होता.

“आम्ही इकडे मुक्त आहोत असं मला म्हणायचं नाहीये. माणसांनी जेवढं स्वतंत्र असायला हवं तेवढे आम्ही स्वतंत्र आहोत असंही मला म्हणायचं नाहीये. पण निदान जो गोऱ्या लोकांचा कुत्रा आहे अशा घमेंडखोर मुखियापासून तरी मी मुक्त आहे. मुखिया म्हणजे फक्त एक कठपुतळी आहे, गोऱ्या लोकांना आपण जसे नाचलं जायला हवंय तसं नाचणारी! आपल्या सगळ्या समाजाला धाक दाखवून बांधून ठेवणारा मुखिया म्हणजे एक फालतू बुजगावणं आहे.

तो नेहमीप्रमाणे लबाड हसला आणि क्षणभरासाठी पाहुण्यांना उद्देशून बोलला.

“पण आपला समाज आता असा घाबरून बांधलेला राहणार नाही. तुमची ती जुनाट जाती व्यवस्था मोडून पडते आहे. इकडे जोहान्सबर्गमध्ये एक नवा समाज आकार घेतोय. इकडे काहीतरी नवीन घडतंय.”

क्षणभर थांबून तो म्हणाला, “मला तुमचा अपमान करायचा नाहीये, पण चर्चपण त्या मुखियासारखंच आहे. तुमचे अनुभव घेण्यासाठी तुम्ही मुक्त नाही. चर्च नियम आखून देतं. माणसानं फक्त विश्वासू, लीन आणि आज्ञाधारक असलं पाहिजे. त्यानं कायदे पाळलेच पाहिजेत, मग ते कायदे कसेही असोत. हे खरंय की चर्चवाले फार मधाळ आवाजात बोलतात आणि काही बिशप जुलमी कायद्याच्या विरोधीही बोलतात. पण गेली

पन्नास वर्षं ते फक्त बोलतायत आणि परिस्थिती सुधारण्याऐवजी बिघडतच चालली आहे.”

त्याचा आवाज चढला होता आणि तो पुन्हा भाषण ठोकत असल्यासारखा बोलायला लागला.

“इथं जोहान्सबर्गमध्ये खाणी आहेत, खाणी हेच इथलं सर्वस्व आहे. इथल्या उंच उंच इमारती, भले मोठे सिटी हॉल, देखणे पार्कटाऊन, इथली सुंदर घरं, सगळं सगळं खाणीतल्या सोन्याच्या बळावर बनलंय. युरोपीय लोकांचं ह्या गोलार्धातलं सर्वात भव्य हॉस्पिटल खाणीतल्या सोन्याच्या पैशावरच बांधलं गेलंय.”

त्याचा आवाज आणखी चढला, मस्तवाल बैलासारखा..

“आणि आमच्या हॉस्पिटलात जाऊन बघा. आमची माणसं थंडगार लाद्यांवर झोपतात. ते एकमेकांच्या एवढे जवळ झोपतात की त्यांना ओलांडूनही जाता येत नाही. सोनं ते खणून बाहेर काढतात. दिवसाला फक्त तीन शिलिंग ह्या मजुरीने. आम्ही ट्रान्सकेईतून इकडे येतो. बसुलँड, स्वाझीलँड, झुलूलँड आणि न्दोत्शेनीतून इकडे येतो. बायकापोरांना, घरादाराला मागे टाकून इथे दाटीवाटीत वस्ती करून राहतो. नवीन सोनं मिळतं तेव्हा आम्हाला साधी जास्त मजुरीसुद्धा मिळत नाही. गोऱ्या लोकांच्या शेअरच्या किंमती मात्र वाढतात. तुम्हाला पेपरमध्ये हे सगळं वाचायला मिळेल. नवीन सोनं मिळालं की ही गोरी लोकं वेडी होतात. ते आमच्यापैकी आणखी काही लोकांना घाणेरड्या वस्तीत रहायला आणि तीन शिलिंगच्या रोजावर आणखी खड्डे खणायला घेऊन येतात. आता मजुरांची मजुरी वाढवण्याची वेळ आली आहे असा विचार ते करत नाहीत. नवीन मोठे घर, नवीन मोठी गाडी घेण्याची वेळ आली आहे असाच विचार ते करतात. दक्षिण आफ्रिका खाणींवर आधारलेली आहे, त्यामुळे सोनं शोधणं गरजेचं आहे असं ते म्हणतात.”

त्याचा आवाज आणखी तापला, घुमायला लागला, वादळासारखा घोंघावायला लागला.

“दक्षिण आफ्रिका खाणींवर नाही तर आमच्या घामावर, आमच्या कष्टावर उभी आहे. इथला प्रत्येक कारखाना, प्रत्येक सिनेमागृह, प्रत्येक सुंदर घर आम्ही बांधलं आहे. मुखियाला यातलं काय माहित आहे? पण जोहान्सबर्गमध्ये सगळ्यांना ते माहित आहे.”

एवढं बोलून तो गप्प झाला. पाहुणे तर गप्पच होते. त्याच्या आवाजातच समोरच्याला गप्प करण्याचं कसब होतं. स्टीफन कुमालो गप्प होते कारण भावाचं हे रूप त्यांच्यासाठी अगदी नवीन होतं.

जॉन कुमालोने त्यांच्याकडे बघितलं.

“एकीकडे हे सगळं चुकीचं आहे असं बिशप म्हणतात, आणि दुसरीकडे स्वतः मात्र अलिशान घरात राहतात. साधा फरक सांगू? गोऱ्या धर्मगुरूंना तुझ्यापेक्षा चार ते सहापट जास्त पैसे मिळतात, दादा.”

तो खुर्चीत बसला आणि मोठ्या लाल रुमालाने त्याने त्याचं तोंड पुसलं.

“हा माझा अनुभव आहे, म्हणून मी आता चर्चमध्ये जात नाही.” तो म्हणाला.

“आणि म्हणून तू हल्ली आम्हाला पत्र लिहित नाहीस?”

“हं, तेही कारण असेल न लिहिण्याचं.”

“आणि तुझी बायको इस्थर?”

“हो तिचंही हेच कारण असेल. हे सगळं पत्रातून सांगणं किती अवघड आहे. इथे आमच्या चालीरीती आता खूप वेगळ्या आहेत रे.”

“इकडे काही चालीरीती आहेत?” सिमँगुने विचारलं.

जॉन कुमालोने त्याच्याकडे बघितलं.

“नवीन गोष्टी येतायत, चर्च आणि मुखियाहून चांगल्या. एक दिवस कळेलच तुम्हाला.”

“आणि तुझी बायको? ती का तुला सोडून गेली?”

“तिला माझं म्हणणं पटतच नव्हतं.” तो हसत म्हणाला.

“म्हणजे तिचा नैतिकतेवर विश्वास होता?” सिमँगुने निर्विकारपणे विचारलं.

शंकेखोरपणे जॉनने त्याच्याकडे बघितलं.“नैतिकता?”

नैतिकता हा शब्द त्याला कळला नाहीये हे सिमँगुच्या लगेच लक्षात आलं.

"आपण पुन्हा झुलूमधेच बोलूया." तो म्हणाला

जॉनच्या कपाळावरची शीर फुगली. मुठीही नकळत आवळल्या गेल्या. तो रागाने काही बोलणार इतक्यात स्टीफन कुमालोंनी मध्यस्थी केली.

"अरे वा! चहा आला."

त्या बाईची ओळख करून दिली गेली नाही, पण तिने अदबीने सगळ्यांना चहा दिला. ती गेल्यावर कुमालो भावाला म्हणाले,

"मी तुझं म्हणणं अगदी नीट ऐकलं, जॉन. तू बोललास त्यातल्या बऱ्याच गोष्टींनी मला धक्का बसला. तुझ्या बोलण्याची पद्धत काही मला फारशी आवडली नाही पण काही मुद्दे मात्र मनाला भिडले. बरं, ते जाउदे. तुला काही विचारायला म्हणून मी इकडे आलो होतो. पण त्याआधी सांगतो, कालच गर्टरुडची आणि माझी भेट झाली. ती माझ्याबरोबर पुन्हा न्दोत्शेनीला येणार आहे."

"हो, का! अच्छा!! बरंय की. तसंही जोहान्सबर्गमध्ये एकट्या बाईनं राहणं तेवढं चांगलं नाहीच. मागे मी एकदा तिला समजावण्याचा प्रयत्न केला होता, पण तिनं माझं काही ऐकलं नाही. म्हणून मग परत आम्ही कधीच भेटलो नाही."

"आणि आता मला सांग, माझा मुलगा कुठे आहे?"

जॉनच्या नजरेत अस्वस्थता दिसू लागली आणि त्याने पुन्हा त्याचा रुमाल काढला.

"हं. तुला कळलं ते खरंय की माझा मुलगा आणि अब्सालोम मित्र आहेत. पण आता तुला काय सांगणार? तुला माहीतच आहे तरुण रक्त कसं असतं ते. मी त्यांना दोष देत नाही. माझा मुलगा आणि त्याची नवीन आई ह्यांचं फारसं कधी जमलंच नाही. कशामुळे ते मला कधीच कळलं नाही. त्याच्या इतर भावंडांबरोबरही त्याचं फारसं सख्य नाही. मी खुपदा प्रयत्न केला पण नाहीच जमलं. म्हणून तो घराबाहेर पडला. त्याला चांगलं काम मिळालं म्हणून मीही त्याला थांबवलं नाही. तुझा मुलगाही त्याच्याबरोबर गेला."

"कुठं ?"

"मला नक्की माहित नाही, पण त्यांनी अलेक्झांड्रामध्ये कुठंतरी खोली घेतली आहे असं मी ऐकलं होतं. एक मिनिट थांब. मला आठवतंय, ते एका फॅक्टरीत काम करतात. एक मिनिट थांब हं, मी टेलिफोन बुकमध्ये बघतो."

तो टेबलाजवळ गेला आणि कुमालोंनी तिथे ठेवलेला टेलिफोन बघितला. अशी किंमती वस्तू बाळगणाऱ्या भावाचा त्यांना थोडा अभिमानच वाटला.

"हे बघ. *डूरंफोंटेन टेक्स्टाईल कंपनी, १४, क्राउस स्ट्रीट*. मी तुझ्यासाठी इथे लिहून देतो."

"आपण त्यांना फोन नाही का करू शकत?" कुमालोंनी जरा बिचकतच विचारलं.

त्यांचा भाऊ हसला.

"कशासाठी? अब्सालोम कुमालो इथे काम करतो का म्हणून विचारायला? की त्याच्याशी फोनवर बोलायला? की त्यांच्याकडे त्याचा पत्ता मागायला? ते काळ्या लोकांसाठी अशा गोष्टी करत नाहीत, दादा."

"मी आहे न तुमच्याबरोबर. आपण बघूया काय करायचं ते." सिमँगु म्हणाला.

त्याचा निरोप घेऊन ते बाहेर पडले.

"चला, तुम्हाला हवं होतं ते मिळालं ना?"

"मिळालं? हं मिळालं. "

"तुमचा भाऊ ह्या भागातला मोठा माणूस आहे. त्याचं दुकानं नेहमीच माणसांनी गजबजलेलं असतं. तो नेहमीच तुमच्याशी बोलला तसंच बोलत असतो. लोक म्हणतात, तो जेव्हा ड्युबुला आणि तोम्लीन्सोन नावाच्या ब्राऊन माणसांशी बोलत असतो तेव्हा त्याला ऐकायला हवं. तो बैलासारखा डुरकतो आणि सिंहासारखा डरकाळ्या फोडतो. त्याच्या बोलण्याने तो समोरच्या माणसाला वेड लावू शकतो. पण त्याच्या पलीकडे जाऊन कुठलीही कृती करण्याची त्याच्यात हिंमत नाही. त्याला माहिती आहे त्याने जरा काही केलं तर लगेच तुरुंगाची हवा खावी लागेल. कितीही शूरवीर असल्याचा आव आणला तरी त्याला तुरुंगाची भीती आहे. पण एक गोष्ट सांगतो, त्याच्या बऱ्याच गोष्टींमध्ये तथ्य आहे." सिमँगु म्हणाला.

तो रस्त्यात थांबून आस्थेने हळूहळू बोलत होता.

“गोऱ्या लोकांकडे सत्ता असते म्हणून ह्यालाही सत्ता हवी आहे. पण काळ्या माणसाच्या हातात सत्ता आली, पैसा आला की ते बिघडत नाहीत असं सहसा होत नाही. जे बिघडलंय ते दुरुस्त करण्यासाठी सत्ता मिळवली जाते आणि जेव्हा सत्ता मिळते तेव्हा ते फक्त तिचा उपभोग घेतात. गोरे लोक पितात ती दारू मिळवून, हजारो लोकांच्या टाळ्यांचा कडकडाट ऐकून ते त्यांची लालसा कशी शमवू शकतात? काहीजणांकडे सत्ता आली की ते गोऱ्यांनी केलेल्या अन्यायाचा बदला घेऊ बघतात. वाईट इच्छा धरली की आपण बिघडतो आणि मग ती सत्ता काही कामाची रहात नाही. बऱ्याच गोऱ्यांचीही हीच परिस्थिती आहे. त्यामुळे तेही सतत सत्ता जाईल ह्या दडपणाखाली असतात.”

स्वतःचं म्हणणं तपासत असल्यासारखा तो बोलत राहिला.

“सत्ता माणसाला बिघडवते हे खरंच आहे, पण प्रेम ही एक अशी गोष्ट आहे जिच्यात सगळी सत्ता आहे. कारण माणूस जेव्हा निरपेक्ष प्रेम करतो तेव्हा त्याला सत्ता नको असते आणि म्हणूनच त्याला तेव्हा सत्ता मिळते. जेव्हा आपल्या देशातील काळे आणि गोरे सत्ता किंवा पैशासाठी न भांडता देशासाठी एकत्र येतील तेव्हाच ह्या देशाचं भलं होईल.”

क्षणभर तो गंभीर आणि शांत झाला आणि मग खिन्नपणे म्हणाला,

“मला आणखीही एक भीती वाटत राहते. जेव्हा कधी काळे आणि गोरे एकमेकांवर प्रेम करायला लागतील तेव्हाच त्यांच्या लक्षात येईल की आपण एकमेकांचा द्‌वेष करायला लागलो आहोत.”

बोलण्याच्या नादात भलतीकडे आल्याचं सिमँगुच्या लक्षात आलं. “अरे हा डूरंफोंटेन कडे जाणारा रस्ता नाहीये. चला, आपल्याला तिकडून जायला हवं.”

ते त्याच्या खिन्न करणाऱ्या विचारांनी दबल्यासारखे निमुटपणे त्याच्या मागे जात राहिले.

**

जरी तिथल्या गोऱ्या माणसाने त्यांना आस्थेने वागवलं तरी डूरंफोंटेनला जाऊन फारसा फायदा झाला नाही. सिमँगुला गोऱ्या लोकांशी कसं बोलायचं माहित होतं. बऱ्याच धडपडीनंतर कळलं की अब्सालोमने बारा महिन्यांपूर्वीच तिथली नोकरी सोडली आहे. तेवढ्यात कोणाला तरी आठवलं, धालामिनी नावाच्या कामगाराबरोबर त्याचे मैत्रीचे संबंध होते. धालामिनीला त्यांच्याशी बोलण्यासाठी बोलावलं गेलं. त्याच्या म्हणण्यानुसार अब्सालोम सोफियाटाऊन, एंड स्ट्रीटला मिसेस न्द्लेला ह्यांच्या घरी रहात होता. त्यांचा खोली नंबर १०५ असावा असंही त्यानं सांगितलं.

म्हणून ते सोफियाटाऊनला आले. आणि खरोखरीच १०५, एंड स्ट्रीट मध्ये मिसेस न्द्लेला रहात होत्या. तिनं प्रेमानं त्यांचं स्वागत केले आणि त्यांची मुलं आईच्या स्कर्टमागून त्यांना निरखत राहिली. अब्सालोम तिथं नव्हता. पण तेवढयात तिला आठवलं, त्याच्या राहिलेल्या वस्तू मागण्यासाठी त्यानं तिला एक पत्र लिहिलं होतं. कुमालो तिच्या मुलांशी खेळत असताना आणि सिमँगु तिच्या नवऱ्याबरोबर बोलत असताना ती एका खोक्यात ठेवलेल्या त्याच्या वस्तू आणि पत्र घेऊन आली. शोधताना तिचा उतरलेला चेहरा आणि कुमालोंकडे दयेनं बघणं सिमँगुच्या लक्षात आलं. पत्रावर पत्ता होता - *मिसेस म्काईझ, ७९, ट्वेंटी थर्ड अव्हेन्यू, अलेक्झांड्रा.*

त्यांनी आग्रहाने चहा घ्यायला लावला. जेव्हा ते जायला निघाले तेव्हा काळोख झाला होता. मिसेस न्द्लेलाचा नवरा कुमालोंबरोबर चालत पुढे गेलेला बघून सिमँगुने तिला विचारलं, तुम्ही कुमालोंकडे असे दयेच्या नजरेने का बघत होतात?

तिने नजर खाली केली आणि पुन्हा वर करत ती म्हणाली,

“ते पाद्री आहेत?”

“हो.”

“मला आणि माझ्या नवऱ्याला त्यांच्या मुलाचे मित्र अजिबात आवडले नव्हते. म्हणूनच त्यानं आमचं घर सोडलं.”

“आलं लक्षात. ह्याहूनही अधिक वाईट काही नव्हतं ना?”

“तसं काही वावगं आढळलं नाही, पण मला त्याचे मित्र आवडले नाहीत.”

तिने अगदी मोकळेपणाने सांगितलं.

“गुड नाईट मदर.”

“गुड नाईट ऊम्फुंडीस.”

तिच्या नवऱ्याचा निरोप घेऊन ते मिशन हाउस कडे निघाले.

“उद्या आपल्याला अलेक्झांड्राला जायचंय.”

कुमालोंनी आपल्या मित्राच्या खांद्यावर हात ठेवला. “जोहान्सबर्गला येताना मनात फक्त भीती होती, काळजी होती. पण तू सोबत असल्यामुळे मनावरचा भार खूपच हलका झालाय.”

“हं, चला आपल्याला भराभर जायला हवं, नाहीतर आपल्याला जेवायला उशीर होईल.”

8

दुसऱ्या दिवशी सकाळी मिशन हाउसमध्ये पोटभर खाऊन सिमँगु आणि कुमालो निघाले. एका पाठोपाठ एक जिथे बस धावत असतात अशा हमरस्त्यावर ते पोचले.

“इथली प्रत्येक बस योग्यच बस असते.” सिमँगु म्हणाला.

कुमालो हसले कारण ही त्यांच्या चुकीची बस पकडण्याच्या भीतीची चेष्टा होती.

“इथल्या सगळ्याच बस जोहान्सबर्गला जातात. इथं चुकीची बस पकडण्याची भीती वाटण्याची गरज नाही.”

आलेली पहिली बस त्यांनी पकडली आणि जिथं कुमालोंनी पाउंड घालवला होता तिथं पोचले. नंतर बराच वेळ कार, बस आणि माणसांच्या गर्दीतून चालत राहिल्यावर अलेक्झांड्रासाठी बस जिथून सुटतात तिथं ते आले. इथं एक वेगळीच अडचण त्यांच्यासमोर आली. एका माणसाने सिमँगुला विचारलं,

“तुम्ही अलेक्झांड्राला चाललात का ऊम्फुंडीस?”

“हो, मित्रा.”

“कृपया बस वापरू नका अशी विनंती करू का तुम्हाला? तुमच्यावर कोणतीही जबरदस्ती करायची नाही, पण तुम्ही नक्कीच आमच्या भूमिकेशी सहमत व्हाल.” अटकाव करायला सज्ज असेलल्या पोलिसांकडे बघत तो कळकळीच्या सुरात म्हणाला. “जर तुम्ही बस वापरलीत तर आपण नेटानं चालवत असलेली ही चळवळ मंद होईल. जोपर्यंत बस भाडं पुन्हा चार पेन्स होत नाही तोपर्यंत बस वापरायची नाही असं आपण ठरवलंय.”

“हो खरंय, मी ऐकलं होतं.”

“चुकलच माझं. आज बस नसणार किंवा बसवर बहिष्कार असणार हे मी विसरूनच गेलो होतो.”

“आमचं खूपच महत्वाचं काम आहे.” कुमालो विनयाने बोलले.

“बहिष्कारही महत्वाचाच आहे, दादा.” तो माणूसही नम्रपणे म्हणाला. “बस भाडं सहा पेन्स केलंय, म्हणजे दिवसाचा एक शिलिंग आणि आठवड्याचे सहा शिलिंग. आमच्यापैकी अनेकांना फक्त पस्तीस-चाळीस शिलिंग मिळतात.”

“चालत जायला खूप लांब आहे का?” कुमालोंनी विचारलं.

“हो बरंच लांब आहे. अकरा मैल.”

“म्हणजे म्हाताऱ्या माणसासाठी लांबच आहे.”

“तुमच्या वयाची माणसं रोज चालतायत, ऊम्फुंडीस. बायका, आजारी-अपंग माणसं आणि लहान मुलं सगळेच चालतायत. सकाळी चारला ते चालायला सुरुवात करतात आणि रात्री आठपर्यंत सुद्धा ते घरी परतत नाहीत. कसेबसे दोन घास खातात. कधीकधी तर फक्त कोमट पाणी पिऊन अंथरुणावर टेकतात तोवर उठायची वेळ झालेली असते. मी तुम्हाला बस वापरण्यापासून थांबवू शकत नाही, ऊम्फुंडीस. पण हा आपला लढा आहे. जर आपण तो हरलो, तर आपल्याला सोफियाटाऊन, क्लेअरमाउंट, क्लिपटाऊन, पिम्विले सगळीकडेच जास्त पैसे मोजायला लागतील.”

“बरोबर आहे तुमचं. आम्ही नाही बस वापरणार. ”

त्या माणसाने धन्यवाद दिले आणि तो दुसऱ्या प्रवाशाकडे वळला.

“त्या माणसाचं बोलणं किती गोड होतं.” कुमालो म्हणाले.

“हाच तो सुप्रसिद्ध ड्युबुला, तुमच्या भावाचा मित्र.” सिमँगु हळूच म्हणाला. “लोक म्हणतात, तोम्लीन्सोनकडे डोकं आहे, तुमच्या भावाकडे आवाज आहे पण ड्युबुलाकडे हृदय आहे. ड्युबुलाला सरकार घाबरतं कारण तो कोणाला घाबरत नाही. त्याला स्वतःसाठी काही नकोय. त्याचं स्वतःचं काम बाजूला सारून तो इथल्या लोकांसाठी बसचं आंदोलन करतोय आणि त्याची बायको अलेक्झांड्रासाठीच्या दुसऱ्या बस स्थानकावर हेच काम करतेय.”

“त्यांचं कौतुकच करायला हवं. किती वेगवेगळी माणसं भेटतायत जोहान्सबर्गमध्ये”

“एकेकाळी ही सगळी चर्चची माणसं होती. पण ते आता चर्चसाठी काम करत नाहीत. तुमच्या भावाप्रमाणेच ह्यांनाही वाटतं की चर्च फक्त बोलत राहतं, करत काहीच नाही. बरं, काय करूया आपण?”

“मी चालायला तयार आहे.”

“अकरा मैल जायला आणि अकरा मैल यायला. तुमच्यासाठी ते खूपच जास्त होईल असं वाटतंय मला.”

“मला चालेल, मला खूप घाई झाली आहे, मित्रा. हे जोहान्सबर्ग आहे. इथं मुलाने एकट्यानं राहणं बरोबर नाही.”

“बरं, चला निघूया मग.”

मग ते बरेच मैल चालले. युरोपिअन सिटी, ट्विस्ट स्ट्रीट, क्लेरेन्डन सर्कल, लुईस बोथा असं करत करत ते ऑरेंज ग्रोव्हपर्यंत आले. दोन्ही बाजूंनी कार आणि लॉरींची ये-जा जोरात चालूच होती. बऱ्याच वेळाने एक कार त्यांच्याजवळ येऊन थांबली आणि त्यातल्या गोऱ्या माणसानं त्यांना विचारलं,

“तुम्ही दोघे कुठे चालला आहात?”

“अलेक्झांड्राला सर.” हॅट काढून सिमँगु अदबीने म्हणाला.

“वाटलंच मला. या, गाडीत बसा.”

चालण्याचे श्रम वाचल्यामुळं त्यांना जरा बरं वाटलं. अलेक्झांड्राच्या वळणावर उतरताना त्यांनी त्या गोऱ्या माणसाचे मनापासून आभारही मानले.

पुन्हा एकदा अभिवादन करण्यासाठी ते त्याच्या पुढे जाण्याची वाट बघत थांबले. पण तो पुढे गेला नाही. गाडी वळवून तो पुन्हा जोहान्सबर्गच्या रस्त्याला लागला.

“आपल्यासाठी तो इतका दूरवर आला. मन भरून येतं असं काही बघितलं की.” सिमँगु म्हणाला.

अजून ट्वेंटी थर्ड अव्हेन्यूसाठी बरंच चालायला लागणार होतं. एका अव्हेन्यूपासून दुसऱ्या अव्हेन्यूकडे जाताना सिमँगुने सांगितले की अलेक्झांड्रा जोहान्सबर्गच्या हद्दीबाहेर आहे. हे असं ठिकाण आहे जिथे काळी लोकं जागा घेऊ शकतात, आणि घरंही बांधू शकतात. पण तिथल्या रस्त्यांची कोणाला काळजी नव्हती. रस्त्यावर साधे दिवेही नव्हते. तिथं राहण्याच्या जागेची इतकी गरज होती की प्रत्येकजण आपल्या अंगणात खोल्या बांधत होता आणि पोटभाडेकरू ठेवत होता. त्यातल्या कितीतरी खोल्या ह्या चोरांच्या आणि दरोडेखोरांच्या लपण्याच्या जागा आहेत. वेश्याव्यवसाय आणि अवैध दारू बनवणंही तिथं सर्रास चालतं.

“हे सगळं इतकं वाईट आहे की ऑरेंज ग्रोव्ह, नॉरवूड आणि हायलंड नॉर्थ मधल्या गोऱ्यांनी अलेक्झांड्राची संपूर्ण वस्ती उठवून लावावी म्हणून कोर्टात फिर्याद केली आहे. आपल्यातल्या एका तरुण मुलानं एका गोऱ्या म्हाताऱ्या बाईची बॅग चोरली. त्या झटापटीत ती बाई पडली आणि त्या धक्क्यानं आणि भीतीनं जागच्या जागीच मेली. आणि इथं जवळच घरात एकट्याच राहणाऱ्या एका बाईच्या बाबतीत तर भयंकरच झालं. घरफोडीसाठी आलेल्या मुलांना तिनं विरोध केला तर त्यांनी तिला चक्क मारूनच टाकलं. कधी कधी प्रिटोरिया रोडवर गोरा पुरुष आणि बाई काळोखात आपल्या कारमध्ये बसतात, तेव्हा आपली मुलं त्यांची चेष्टा करतात, कधी कधी पुरुषांनाच नव्हे तर बायकांना सुद्धा लुबाडतात. बरेचदा त्या बायका चांगल्या चालीरीतीच्या नसतात हे खरंय पण त्या गुन्ह्याबद्दल आपण न बोललेलंच बरं.” सिमँगु म्हणाला.

“ह्यावरून वेगळाच एक प्रसंग आठवला, जोहान्सबर्गमध्ये दुसऱ्या ठिकाणी घडलेला, जोहान्सबर्गची दुसरी बाजू दाखवणारा. माझा एक मित्र पोश्चेफस्ट्रूम रोडवरच्या त्याच्या घरी होता. हिवाळ्यातल्या एका रात्री उजाडायच्या बरंच आधी कोणीतरी त्याच्या घराचा दरवाजा ठोठावला. एक बाई, गोरी बाई अंग झाकायला जेमतेम एक चादर घेऊन दरवाजा ठोठावत होती. जे काही तिच्या अंगावर होतं ते फाटलं होतं आणि त्यातून दिसणारी नग्नता झाकण्याचा ती आटोकाट प्रयत्न करीत होती. थंडीने ती अक्षरशः निळी पडली होती. एका गोऱ्या माणसाने तिला त्याच्या गाडीत घेतलं आणि उपभोगून झाल्यावर की नाही ते मला माहित नाही- कारण मी तिथं नव्हतो - गाडीतून रस्त्यावर ढकलून तो पुन्हा जोहान्सबर्गला निघून गेला. मग माझा मित्र आणि त्याच्या बायकोनं तिला एक जुना ड्रेस, गरम चहा आणि लपेटून घ्यायला बऱ्याच घोंगड्या दिल्या. आवाज ऐकून मुलं उठली आणि प्रश्न विचारू लागली. पण माझ्या मित्रानं त्यांनी काही पाहू नये म्हणून त्यांना पुन्हा झोपायला लावलं. त्यांनतर त्या काळोखातच माझा मित्र त्यांच्या जवळ राहण्याऱ्या गोऱ्या शेतकऱ्याच्या घरी गेला. तो त्याची गाडी घेऊन आला आणि त्यात बसवून त्यानं त्या बाईला आपल्या घरी नेलं. त्या बाईने त्यांचे आभार मानले आणि आत्ता त्यांना देण्यासाठी पैसे नसण्याबद्दल खंतही व्यक्त केली. माझ्या मित्रानं आणि त्याच्या बायकोनं पैशासाठी आम्ही काही केलं नाही असं सांगितल्यावर तुम्ही चांगले काफिर आहात असं ती अगदी मनापासून म्हणत राहिली.”

“वा! खरंच कमाल आहे !”

“हं, मी तुम्हाला त्या फिर्यादीविषयी सांगत होतो. अनेक गोऱ्या लोकांनीसुद्धा त्या फिर्यादीला विरोध केला आहे. ते म्हणतात की अलेक्झांड्रामध्ये काही वाईट गोष्टी नक्कीच आहेत पण कितीतरी चांगल्या गोष्टीही आहेत. स्वतःची जागा असणं, आपल्या घरात आपल्या मुलांना वाढवता येणं, आपली मत व्यक्त करण्यासाठी ठिकाण असणं हे अलेक्झांड्रामुळे काळ्यांना शक्य आहे. आपण जिथं जन्मलो तिथं आपण कोणीतरी असणं, आपली काहीतरी ओळख असणं किती महत्वाचं आहे. प्रोफेसर हर्नोल म्हणून आपल्या बाजूने लढणारे एक सद्गृहस्थ होते. आता ते नाहीत पण मला खरंच वाईट वाटतंय की तुम्हाला त्यांना ऐकण्याची संधी मिळाली नाही. त्यांच्याकडं तोम्लीन्सोनचं डोकं, तुमच्या भावाचा आवाज आणि ड्युबुलाचं हृदय होतं. ते जेव्हा बोलायचे तेव्हा त्यांच्याविरुद्ध कोणीही गोरा माणूस बोलायचा नाही. मला अजून आठवतंय त्यांचं बोलणं. ते खंतावल्या सुरात नेहमी म्हणायचे, काळे आणि गोरे दोघंही इथेच राहतात, दोघांचं आयुष्य एकमेकांना जोडलेलं आहे पण तरीही त्यांच्यात अशी एक अदृश्य भिंत आहे जी कुणीही तोडू शकत नाही. इंग्लिश, आफ्रिकानर, काळे, गोरे असा भेद राखूनच ते वर्षानुवर्ष एकमेकांच्या शेजारी राहतील पण माणूस म्हणून कधीही एकमेकांच्या जवळ येणार नाहीत. ”

त्यानं रुमाल काढून आपलं तोंड पुसलं. “मी बरंच काही बोललो आणि ही बडबड चालू असतानाच आपण शोधत असलेल्या ठिकाणी पोचलोसुद्धा.”

एका बाईने दरवाजा उघडला पण तिने त्यांना नमस्कार केला नाही. त्यांनी त्यांच्या येण्याचं कारण सांगितल्यावर तर ती त्यांना घरात घ्यायलाच तयार होईना.

“तो मुलगा इथून निघून गेला असं तुम्ही म्हणताय का मिसेस म्काईझ?”

“हो आणि तो कुठे गेला हेही मला माहित नाही.”

“कधी गेला तो?”

“बरेच महिने झाले, कदाचित वर्षही झालं असेल.”

“आणि त्याचे कोणी मित्रही होते?”

“हो, दुसरा कुमालो - त्याचा चुलत भाऊ. पण ते एकत्रच गेले.”

“तुम्हाला खरंच माहित नाही ते कुठे गेलेत?”

"ते कितीतरी ठिकाणांबद्दल बोलत होते. तुम्हाला माहितीच असेल आजकालची मुलं कसं बोलतात ते."

"कसा वाटला तुम्हाला अब्सालोम? त्याचं वागणं कसं वाटलं तुम्हाला?

तिच्या डोळ्यातली भीती आणखी आणखी गडद होत गेली. त्या भीतीनं त्यालाही घेरलं. आता संपूर्ण घरावरच भीतीचं सावट होतं.

"मला काही वावगं दिसलं नाही." ती म्हणाली.

"पण ते काहीतरी चुकीचं वागत होते असं वाटतंय का तुम्हाला?"

"नाही, तसं चुकीचं काहीच नव्हतं,"

"मग तुम्ही अशा घाबरताय का?"

"मी कुठे घाबरले आहे?"

"मग तुम्ही अशा थरथरताय कशामुळे?"

आपला सावध पवित्रा न सोडता ती म्हणाली, "मला थंडी भरली आहे."

चेहरा निर्विकार ठेवला असला तरी विचार करून, मोजून मापून ती बोलत होती हे स्पष्ट दिसत होतं.

"आम्ही आभारी आहोत." सिमँगु म्हणाला.

"काही हरकत नाही. सावकाश जा." तिनं सुटकेचा निश्वास सोडला .

बाहेर पडल्यावर कुमालो म्हणाले, "इकडं काहीतरी गडबड आहे."

"मलाही तसंच वाटतंय. काही वेळेस दोन माणसाचंही दडपण येतं. तुम्ही इथून डावीकडे वळा आणि मुख्य रस्त्यावरून छोटी चढण चढा. पुढे एक छोटसं उपाहारगृह आहे. तिकडे थांबा. मी आलोच."

जड अंत:करणाने कुमालो तिथून निघाले. ते डावीकडे वळले आहेत हे पाहूनच सिमँगु पुन्हा मागे त्या घराकडे गेला.

तिनं मोठ्या नाखुषीनेच पुन्हा दरवाजा उघडला. पण आता धक्क्यातून थोडं सावरल्यामुळे भीतीची जागा बेपर्वाईने घेतली होती.

“मी पोलीस नाहीय. माझा पोलिसांशी काही संबंधही नाहीय. माझ्याबरोबर जे वृद्ध गृहस्थ होते ते मात्र मुलगा सापडत नाही म्हणून खूपच दुःखात आहेत.”

“मलाही त्यांच्याबद्दल खूप वाईट वाटतंय.” ती ठरवून बोलल्यासारखी बोलली.

“हो, खरंच त्यांची अवस्था दयनीय आहे आणि म्हणूनच तुम्ही जे सांगितलं नाहीत ते सांगेपर्यंत मी इथून हलणार नाही.”

“पण मी काय सांगणार? माझ्याकडे सांगण्यासारखं काहीच नाही,”

“तुमच्याकडे सांगण्यासारखं काही नाही कारण तुम्ही घाबरला आहात. मला कळतंय तुमची ही थरथर थंडीमुळे नाहीये.”

“मग मी कशामुळे थरथरते आहे?” तिने विचारले.

“ते मला माहित नाही. पण ते माहित करुन घेतल्याशिवाय मी इथून हलणार नाही. गरज पडली तर मी नाईलाजाने पोलिसातही जाईन.”

“एकट्या बाईनं राहणं खूप कठीण असतं.” ती चिडून म्हणाली.

“म्हाताऱ्या माणसानं मुलाला शोधणंही खूप कठीण असतं.”

“मला खूप भीती वाटते आहे.” ती म्हणाली.

“ते सुद्धा खूप घाबरलेले आहेत. तुम्हाला त्यांची भीती दिसली नाही का?”

“मला दिसली आहे, ऊम्फुंडीस.”

“मग मला सांगा ते दोन तरुण कशा प्रकारचे आयुष्य जगत होते?” काय सांगावं आणि काय सांगू नये, तिला काहीच सुचत नव्हतं. तिला बोलतं करणं कठीण आहे हे त्यांच्या लक्षात आलं.

“मी पाद्री आहे. तुमचा माझ्या शब्दावर विश्वास नाही का?”

पण ती गप्पच राहिली.

“तुमच्याकडे बायबल आहे का?

“हो, आहे.”

“मग मी बायबलवर हात ठेऊन शपथ घेतो.”

पण मी बायबलवर हात ठेऊन शपथ घेतो असं तो पुन्हा पुन्हा बोलला तरी ती गप्पच होती. हो नाही करता शेवटी ती आत गेली आणि थोड्याच वेळात बायबल घेऊन आली.

“मी पाद्री आहे आणि खरं तर माझा हो म्हणजे हो आणि नाही म्हणजे नाही असतो, पण तरी तुम्हाला विश्वास वाटावा म्हणून मी ह्या पुस्तकाची शपथ घेऊन सांगतो की तुमच्यापर्यंत ह्यासाठी कोणतेही संकट मी येऊ देणार नाही. आम्ही फक्त त्या मुलाचा शोध घेत आहोत. त्या म्हाताऱ्या बापावर उपकार म्हणून तरी बोला !”

“कृपया सांगा, ते दोन तरुण कशा प्रकारचे आयुष्य जगत होते?” त्याने विचारले.

“ते रात्री खूप उशिरा बरंच काही इकडे घेऊन यायचे ऊम्फुंडीस. कपडे, घड्याळं, पैसे, कधी खाण्याचे पदार्थ तर कधी बाटल्या आणि आणखीही कितीतरी वस्तू.”

“ते काही खूनखराबा करून आले आहेत असं तुम्हाला कधी वाटलं का?”

“नाही, तसं कधी वाटलं नाही.”

“पण मग त्यांनी तुमचं घर का सोडलं?”

“माहित नाही पण ते अगदी पकडले जाण्याच्या तयारीत होते.”

“नक्की कधी सोडलं त्यांनी तुमचं घर?”

“मी तुम्हाला आधीच सांगितलं ना, साधारण वर्षापूर्वी.”

“आणि ह्या पुस्तकाची शपथ घेऊन सांगा ते कुठे गेले ते तुम्हाला माहित नाही.

ती पुस्तकाजवळ जाईपर्यंतच तो म्हणाला, “राहू दे.” तो घाईने तिचा निरोप घेऊन निघणार एवढ्यात तिने त्याला हाक मारली. “एका टॅक्सीचालकाबरोबर, लाबेनीबरोबर त्यांची चांगली दोस्ती होती. तो बस स्थानकाजवळ राहतो. तिथले सगळेच ओळखतात त्याला.”

“हे सांगितल्याबद्दल खूप खूप धन्यवाद.” तिचा निरोप घेऊन तो निघाला आणि त्याला उपाहारगृहाजवळच कुमालो दिसले.

"आणखी काही कळलं का तुला?" उतावीळ होऊन त्यांनी विचारलं.

"मुलांच्या एका टॅक्सीचालक मित्राबद्दल ऐकलं. मी आधी खाऊन घेतो, मग आपण त्याला शोधूया."

खाऊन झाल्यावर तिथल्याच एका माणसाला त्याने लाबेनीबद्दल विचारलं. तो काय तिथे कोपऱ्यात त्याच्या टॅक्सीत बसलाय, तो माणूस म्हणाला. सिमँगु चालत त्या टॅक्सीजवळ गेला आणि त्याने आत बसलेल्या माणसाला नमस्कार केला.

"मला टॅक्सी हवी आहे मित्रा, जोहान्सबर्गला जायला. माझे आणि माझ्या मित्राचे किती पैसे होतील?"

"तुमच्यासाठी म्हणून अकरा शिलिंग होतील ऊम्फुंडीस."

"खूप जास्त सांगतोयस तू ."

"ऊम्फुंडीस, बाकीचे टॅक्सीवाले तर पंधरा किंवा वीस शिलिंग पण घेतील."

"माझे मित्र वयस्कर आहेत आणि दमलेलेही आहेत. मी देईन तुला अकरा शिलिंग."

तो टॅक्सी सुरु करणार इतक्यात सिमँगुने त्याला थांबवलं. "मला असं कळलंय की तू अब्सालोम कुमालो ह्या तरुणाला शोधायला आम्हाला मदत करू शकशील."

आता हा माणूसही घाबरलेला दिसायला लागला.

"मी तुला त्रास द्यायला आलेलो नाही. मला तुझ्यासाठी आणि माझ्यासाठी कोणतही संकट नकोय." सिमँगुने लगेच स्पष्ट केलं. "पण माझ्याबरोबरचा वयस्कर माणूस खूप दमलाय आणि तो ह्या मुलाचा बाप आहे. ते नाताळहून त्याला शोधण्यासाठी इथे आलेत. आम्ही जिथे जातो तिथे आम्हाला दुसरीकडे जायला सांगतात. त्यामुळे ते अगदी अधीर झाले आहेत."

"हो, मी ओळखतो त्याला."

"तो आता कुठे आहे?"

"मी असं ऐकलय की तो ओरलँडोला गेला आणि शांती टाऊन मधल्या एका अनधिकृत वसाहतीत राहतो. मला एवढंच माहिती आहे."

“ओरलँडो तर खूप मोठं आहे.” सिमँगु म्हणाला.

“ती झोपडपट्टी तेवढीही काही मोठी नाही, ऊम्फुंडीस. त्याला शोधायला तुम्हाला फार त्रास पडणार नाही. महानगरपालिकेतली काही माणसं तिकडे असतात आणि ते सगळ्यांना ओळखतात.”

“तुझी खूप मदत झाली मित्रा. मी ओळखतो त्यातल्या काही जणांना. मी आलोच लगेच.”

तो बाहेर जाऊन कुमालोंना बोलावून घेऊन आला. दोघंही टॅक्सीत बसले आणि खडखड आवाज करत टॅक्सी अलेक्झांड्राहून प्रिटोरियामार्गे जोहान्सबर्गला जायला निघाली. दुपार टळत चालली होती आणि जोहान्सबर्ग येणारे आणि जाणारे असे दोन्ही रस्ते दुथडी भरून वाहत होते.

“तुम्ही या सायकली बघितल्यात. हजारो माणसं कामावरून अलेक्झांड्राला परतत आहेत. थोड्या वेळाने अशीच आणखी हजारो माणसं बसवरील बहिष्कारामुळे चालत येताना दिसतील.”

आणि खरंच थोडं पुढे गेल्यावर पदपथ माणसांनी फुलून गेलेले दिसले. इतकी माणसं चालत होती की त्यातली काहीजणं रस्त्यावरूनही चालत होती. त्यामुळे कारचालक अगदी काळजीपूर्वक आपली गाडी चालवत होते. त्यातले काही वृद्ध होते, काही दमलेले तर काही अपंगही होते. पण तरीही त्यातले बरेचजण गेल्या काही आठवड्यांपासून निग्रहाने चालत होते. बरीच गोरी लोकं त्यांच्या गाड्या थांबवून काळ्या लोकांना घेऊन पुढे जात होती. एका सिग्नलला वाहतूक नियंत्रक ह्या गाड्यांना थांबवून तुमच्याकडे काळ्या लोकांना घेऊन जायचा परवाना आहे का असं विचारत होते. “मी त्यांच्याकडून पैसे घेत नाहीये”, एक गोरा म्हणाला. “पण तुम्ही बसमार्गातले प्रवासी घेऊन चालला आहात”, तो पोलीस म्हणाला. “मग हिम्मत असेल तर न्या मला कोर्टात”, गोरा म्हणाला. पण पुढचं बोलणं ऐकेपर्यंत हिरवा दिवा लागला आणि त्यांना पुढे जावं लागलं.

“मी हे ऐकलं होतं,” सिमँगु म्हणाला. “गोऱ्या लोकांनी काळ्या लोकांना आपल्या गाडीत घेऊ नये यासाठी गरज पडली तर अशा गोऱ्यांना कोर्टात नेण्याची तयारी करतायत.”

काळोख वाढत चालला तरी रस्ता अजून गच्च भरला होता. अजून लोक चालत

अलेक्झांड्राला जात होते आणि अजून लोकांना, विशेष करून वयस्कर, महिला आणि अपंगांना गाडीत घेण्यासाठी गोरी लोकं थांबत होती. कुमालोंच्या चेहऱ्यावर मंद हसू होतं, इतर देशातल्या लोकांना कळणार नाही असं हसू. आपल्यातल्या माणसाला कोणी गोरा माणूस मदत करतोय ही अशक्य वाटणारी घटना बघताना येणारं काळ्या माणसाच्या चेहऱ्यावरचं हसू. विचारात गुंग असतानाच सिमँगु जोरात ओरडल्याने कुमालो एकदम चकितच झाले.

"मला त्रास होतोय, मित्रा, मला ह्याचा खूप त्रास होतोय."

"कशाचा त्रास होतोय तुला, गोऱ्यांच्या चांगुलपणाचा?"

"नाही, नाही. मला राग आलाय आणि कीवही वाटतेय स्वतःची."

तो टॅक्सीत झटकन उठून बसला आणि स्वतःच्याच छातीवर त्याने एक जोरदार गुद्दा लगावला.

रागाने कुमालोकडे बघत त्याने स्वतःच्याच छातीवर आणखी एक गुद्दा लगावला.

कुमालोंनी घाबरून त्याच्याकडे बघितलं.

"हिम्मत असेल तर न्या मला कोर्टात ह्या शब्दांचाच त्रास होतोय मला. ही हिंमत आपल्याला कधी दाखवता येईल? आपण कधी इतके स्वतंत्र होणार?" सिमँगु पुन्हा म्हणाला.

9

सगळे रस्ते जोहान्सबर्गला जातात. तुम्ही काळे असा वा गोरे शेवटी जोहान्सबर्गलाच जाता. पिकं करपली तरी तुम्हाला जोहान्सबर्गलाच जायला लागतं. कर भरायचाय? जोहान्सबर्गला जायला लागणार. शेती एवढी छोटी झालीये की आता तिच्या आणखी वाटण्या करणं शक्य नाही? तुमच्यातल्या काहींना जोहान्सबर्गलाच जायला लागणार. कोणाला कळू न देता बाळंतपण उरकायचंय? जोहान्सबर्गला होऊ शकेल.

जोहान्सबर्गला आलेली काळी लोकं अलेक्झांड्रा, सोफियाटाऊन किंवा ओरलँडोला जातात आणि घर भाड्याने घेण्याचा किंवा एखादी खोली विकत घेण्याचा प्रयत्न करतात.

“तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?”

“नाही आमच्याकडे एकही खोली नाही.”

“तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?”

“आधीच गेल्या आहेत.”

“तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?”

“आमच्याकडे एक खोली आहे जी आम्ही भाड्याने देऊ शकतो पण मला ती भाड्याने द्यायची इच्छा नाहीय. आमच्याकडे फक्त दोन खोल्या आहोत आणि आम्ही सहाजणं त्यात रहातो, शिवाय आमचा मुलगा आणि मुलगी आता मोठे व्हायला लागलेत. पण शाळेच्या पुस्तकांसाठी खूप पैसे लागतात आणि माझा नवरा आजारपणातून अजून बरा होतोय. तो बरा असतानाही आठवड्याला पस्तीस शिलिंगच कमवू शकायचा. त्यातले सहा भाड्यासाठी, तीन प्रवासासाठी आणि एक शिलिंग आमचे सर्वांचे अंत्यसंस्कार नीट व्हावेत म्हणून राखून ठेवावे लागतात. एक शिलिंग पुस्तकांसाठी, तीन शिलिंग कपड्यांसाठी, एक शिलिंग नवऱ्याच्या दारूसाठी, एक शिलिंग त्याच्या तंबाखूसाठी - नाही, माझा नवरा खूप चांगला माणूस आहे. इतरांसारखे तो जुगारात किंवा बायकांवर पैसे उधळत नाही. एक शिलिंग चर्चसाठी आणि एक शिलिंग आजारपणासाठी. ह्या सगळ्या खर्चातून फक्त सतरा शिलिंग उरतात जे आमच्या खाण्यावर खर्च होतात. आणि आम्ही सदा भुकेले असल्याने बरेचदा तेवढेही पुरत नाहीत. हो आमच्याकडे खोली आहे पण मला ती भाड्याने द्यायची इच्छा नाहीय. तुम्ही किती भाडं देऊ शकता?”

“मी आठवड्याला तीन शिलिंग देऊ शकतो.”

“तेवढयानं काय होणार ?.”

“तीन शिलिंग आणि सहा पेन्स?”

“तीन शिलिंग आणि सहा पेन्स? खासगीपणा जपत आपण पोट भरू शकत नाही. मुलं मोठी असताना खासगीपणा लागतो पण भूक भागवावी लागतेच. मी घेईन तीन शिलिंग आणि सहा पेन्स.”

घर माणसांनी भरून वाहतंय. दोन खोल्यांत दहा माणसं, आत शिरायला एकच दरवाजा. तुम्ही झोपलात तर तुम्हाला ओलांडून जाण्याशिवाय पर्याय नाही. पण मुलांना थोडं जास्त जेवण देता येतं आणि क्वचित कधीतरी एखादा सिनेमा दाखवता येतो. मला ती बाई अजिबात आवडत नाही, ती ज्या पद्धतीने माझ्या नवऱ्याकडे बघते ते सुद्धा मला अजिबात आवडत नाही. मला तो मुलगा अजिबात आवडत नाही, तो ज्या पद्धतीने माझ्या मुलीकडे बघतो ते सुद्धा मला अजिबात आवडत नाही. मला तो माणूस अजिबात आवडत नाही, तो ज्या पद्धतीने माझ्याकडे बघतो ते मला अजिबात आवडत नाही. तो ज्या पद्धतीने माझ्या मुलीकडे बघतो ते सुद्धा मला अजिबात आवडत नाही.

“माफ करा पण तुम्हाला जावं लागेल.”

“मी कुठे जाणार? मला जायला जागाच नाहीये.”

“तुमचंही बरोबर आहे, पण घरात जागाच नाहीये. इतके सगळे कसे मावणार ह्या खोलीत?”

“आम्ही आमचं नाव नोंदवलंय घरासाठी. तोपर्यंत पण तुम्ही थांबू शकणार नाही?”

“ओरलँडोमध्ये काही लोक पाच वर्षापासून घराची वाट बघतायत.”

“माझ्या एका मित्राला तर महिन्याभरातच खोली मिळाली.”

“मी पण ऐकलंय, पण त्यासाठी लाच द्यावी लागते.”

“आमच्याकडे लाच द्यायला पैसे नाहीत.”

“माफ करा, पण घरात जागाच नाहीये.”

हो, हे घर भरलंय आणि तेही घर भरलंय. कारण प्रत्येकजण जोहान्सबर्गला येतोय. ट्रान्स्केईमधून आणि फ्री स्टेटमधून, झुलूलँडमधून आणि सेकुकुनीलँडमधून. झुलू आणि स्वाझी, शांगान आणि बावेंडा, बापेडी आणि बासुतो, झोसा आणि टेंबू, पोंडो आणि फिंगो* सगळेजणं जोहान्सबर्गलाच येतायत.

"मला ती बाई अजिबात आवडत नाही. मला तो मुलगा अजिबात आवडत नाही. मला तो माणूस अजिबात आवडत नाही. माफ करा पण तुम्हाला जावं लागेल."

"फक्त एक आठवडा? फक्त एक आठवडा राहू द्याल?"

"बरं. पण फक्त एक आठवडाच."

**

"तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?"

"नाही, आमच्याकडे एकही खोली नाही."

"तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?"

"ती आधीच भाड्याने दिली आहे."

"तुमच्याकडे भाड्याने द्यायला एखादी खोली आहे का?"

"आमच्याकडे एक खोली आहे जी आम्ही भाड्याने देऊ शकतो पण मला ती भाड्याने द्यायची इच्छा नाहीय. कारण नवऱ्यांना फितवणाऱ्या बाया मी बघितल्यात आणि बायकांना पळवणारे पुरुष. मुलींना बिघडवणारे मुलगे मी बघितलेत आणि मुलांना फसवणाऱ्या मुली. पण माझ्या नवऱ्याला आठवड्याला फक्त चौतीस शिलिंगच मिळतात."

* स्वाझी...फिंगो: दक्षिण आफ्रिकेतील काळ्या लोकांच्या विविध जमाती

**

“घरं नसलेल्या आमच्यासारख्यांनी काय करायचं?”

“तुम्ही पाच वर्षं वाट बघा आणि तरीही घर मिळण्याच्या आसपासही कुठे तुम्ही नसाल.”

“आपल्यासारखे नुसत्या ओरलँडोमधेच दहा हजाराहून जास्त आहेत असं लोकं म्हणतात”

“ड्युबुलाने काय सांगितलंय, ऐकलं? ओरलँडोमधे आपण आपली घरं बांधली पाहिजेत.”

“आणि कुठे बांधायची ही घरं?”

“रेल्वेलाईनच्या आजूबाजूच्या मोकळ्या मैदानांवर.”

“आणि कशाची बांधायची ही घरं?”

“गोणी, फळ्या, माळरानावरचं गवत, काठ्या, जे काही मिळेल त्या सगळ्याची..”

“आणि पाऊस पडायला लागला की ?”

“सियाफा* आपण मरू.”

“हँ! पाऊस पडायला लागला की त्यांना आपल्याला घरं बांधून द्यावीच लागतील.”

“काहीही! कसं शक्य आहे? हा अगदीच मूर्खपणा आहे. थंडीत काय करणार आपण?”

सहा वर्षं घरासाठी थांबलं तरी घरं मिळणार नाहीयेत. ती तशीच भरलेली असतील. कारण जोहान्सबर्गला येणारा लोकांचा लोंढा कमी होत नाहीये. युरोप आणि उत्तर आफ्रिकेत युद्ध चालू असल्यामुळे नवीन घरंही बांधली जात नाहीयेत.

**सियाफा : आपण मरू या अर्थाचा झुलू भाषेतील शब्द*

“माझ्यासाठी आता तरी घर आहे का तुमच्याकडे?”

“नाही अजून तरी नाहीये.”

“माझं नाव नक्की आहे ना त्या यादीमध्ये?”

“हो, तुमचं नाव आहे यादीत.”

“आत्ता माझा कितवा नंबर आहे?”

“ते मला नाही सांगता येणार, पण तुमचा अंदाजे सहा हजारावा नंबर असेल.”

“सहा हजारावा? म्हणजे मला कधीच घर मिळणार नाही. मी आत्ता जिथे राहते आहे तिथेही मी जास्त दिवस राहू शकणार नाही. आमचं स्टोव्हवरून भांडण झालं आहे, आमचं मुलांवरून भांडण झालं आहे. तो माणूस माझ्याकडे ज्या पद्धतीने बघतो ते मला अजिबात आवडत नाही.

रेल्वेलाईनच्या आजूबाजूच्या मोकळी मैदानं आहेत पण पावसाळ्यात आणि थंडीत काय? लोकं म्हणतायत, अजून चौदा दिवसांनी आपण जायला पाहिजे तिकडे. एकत्र जायला पाहिजे. ते म्हणतात, सगळ्यांनी एकत्र गोणी आणि फळ्या आणि डबे आणि काठ्या गोळा करायला पाहिजेत. ते म्हणतात सगळ्यांनी दर आठवड्याला एक शिलिंग समितीला द्यावा आणि रोगराई पसरू नये म्हणून समिती आपला कचरा उचलण्याची आणि आपल्यासाठी संडास बांधण्याची सोय करेल. पण थंडीत आणि पावसाळ्यात काय करायचं ?”

“माझ्यासाठी आता तरी घर आहे का तुमच्याकडे?”

“नाही अजून तरी नाहीये.”

“मी तर गेले दोन वर्षं ह्या यादीवर आहे.”

“वाट बघून बघून म्हातारी झालेली भरपूर लोकं या यादीत आहेत.”

“हे खरं आहे का की पैसे दिले तर...”

पण त्या माणसाने माझं ऐकलंच नाही. तो दुसऱ्या माणसाबरोबर बोलायला लागला. पण एक दुसराच माणूस कोण जाणे कुठून आला, पण तो जे काही बोलला त्याने मी घाबरून गेले.

“त्यांच्याकडे तुम्हाला द्यायला घर नाही याचं वाईट वाटतं मला मिसेस सेमे. असो, माझ्या बायकोला तुमच्याशी समितीच्या कामाविषयी संध्याकाळी सात वाजता बोलायचय. तुम्हाला आमचं घर माहित आहे ना? १७८५२, डच रिफॉर्म्ड चर्च. हा घ्या मी तुमच्यासाठी पत्ता लिहिला आहे.”

पण मी काही बोलेपर्यंत तो माणूस गेलाच.

“बाप रे! ह्या माणसाने केवढं घाबरवलं मला. कोण आहे त्याची बायको? मी नाही ओळखत तिला. आणि कुठली समिती? मला कुठल्याही समितीबद्दल माहिती नाही.”

“अगं, कमाल आहे तुझी. अगदीच बावळट बाई आहेस. तुम्ही किती पैसे देऊ शकाल ह्याविषयी त्याला चर्चा करायची आहे.”

“बरं. मग मी जाईन त्याच्याकडे. त्याने खूप जास्त मागितले नाहीत म्हणजे मिळवलं. आठवड्याला सदतीस शिलिंग मिळवणारे किती देऊ शकणार? पण आपल्याला घर मात्र हवं. आत्ता राहतो त्या घराची मला भीतीच वाटते. सभ्य माणसं झोपलेली असतात तेव्हा किती लोक येतात आणि जातात. तरुण मुलं सारखी ये जा करत राहतात. ती ना कधी झोपताना दिसतात ना कधी काही काम करताना. पण त्याचे कपडेलत्ते मात्र चांगले, अगदी गोऱ्या माणसांसारखे असतात. एक दिवस नक्की गडबड होणार आहे. माझा नवरा आणि मला अजिबात गडबड नको आहे. म्हणूनच स्वतःचं घर हवंच.”

**

“पाच पाउंड म्हणजे खूप होतात हो, माझ्याकडे तेव्हढे पैसे नाहीयेत.”

“घरासाठी पाच पाउंड म्हणजे कुठे खूप आहेत, मिसेस सेमे?”

“यादीत नाव नुसतं जरा वर ढकलण्याचे एवढे पैसे?”

“तुम्हाला माहित नाही हे किती कठीण काम आहे. युरोपीय अधिकारी म्हणाला जो कोणी यादीत गडबड करेल त्याची खैर नाही.”

“माफ करा, पण मी पैसे भरू शकत नाही.”

पण मी जाण्याआधीच त्याची बायको दुसऱ्याच एका बाईला घेऊन आली.

“काहीतरी चुकलंय. मी यांना ओळखत नाही. त्या समितीवर ह्या नाहीत.”

“अरेच्चा! मिसेस सेमे, मला माफ करा. मला वाटलं तुम्ही समितीवर आहात. आरामात जा मिसेस सेमे.”

तुम्ही इतका त्रास दिल्यावर मी आरामात कशी असेन? मी आरामात राहो की त्रासात ह्याच्याशी त्यांना काही देणंघेणं नाही. मला खूप थकल्यासारखं आणि एकाकी वाटतंय. खरंच मी आणि माझा नवरा, आम्ही का आलो इकडे? आमचं गाव, आमची माणसं सोडून.. तिकडे खूप काही नाहीये पण इथल्यापेक्षा बरं आहे. तिथे खायला जास्त काही नाहीये पण जे मिळतं ते सगळेजण वाटून खातात. सगळेच जेव्हा गरीब असतात तेव्हा गरीबी तितकी वाईट नसते. आणि बाजूने वाहणाऱ्या नदीमुळे गरिबीही सुखकारक वाटते. कपडे धुताना नदीचं पाणी दगडांवरून झुळझुळत राहतं आणि वारा तुम्हाला खुश करून टाकतो. चल, आपण दोघं मिळून फळ्या आणि डबे आणि गोणी आणि काठ्या गोळा करूया. मला आपण आत्ता राहतो ती जागा अजिबात आवडत नाही.

बराग्वानाथ हॉस्पिटलच्या इथे बांधकाम करणाऱ्यांनी बऱ्याच फळ्या टाकल्या आहेत. चल, रात्री जाऊ आणि त्या घेऊन येऊ. सुधारगृहाच्या इथे विटा झाकण्यासाठी ठेवलेले बरेच पत्रेही पडले आहेत. चल, रात्री जाऊ आणि ते घेऊन येऊ. नॅन्सफिल्ड स्टेशन वर नीट बांधून ठेवलेल्या गोणी आहेत. चल, रात्री जाऊ आणि त्या घेऊन येऊ. खाणीच्या जवळ खूप झाडं आहेत. चल, रात्री जाऊ आणि त्यातली काही खांबांसाठी हळूच कापून आणू.

**

ओरलँडोमध्ये त्या रात्री खूप घाई गडबड सुरु होती. आजूबाजूच्या बऱ्याच घरात दिवे जळत होते. मी लोखंडाच्या वस्तू घेतो, तू बाळाला घे, पोरा, तू दोन खांब घे आणि बेटा, तुला जमतील तेवढया गोणी घे. रेल्वेलाईनजवळच्या मैदानाकडे बरीच लोकं चालली आहेत. तुला खणण्याचा आणि ठोकण्याचा आवाज ऐकू येतच असेल. तरी बरं आज

थंडीही नाहीये आणि पाऊसही. धन्यवाद, ड्युबुला, या जमिनीच्या तुकड्यामुळे आम्हाला आधार मिळाला. पुन्हा पुन्हा धन्यवाद. हा घ्या समितीसाठी आमचा एक शिलिंग.

रातोरात शांती टाऊन उभारलं गेलं. सकाळी उठून बघणाऱ्यांसाठी तर ते मोठं आश्चर्यच होतं. काही गोण्यांच्या छपरांमधून धूर येत होता. एक दोन झोपड्यांना तर चक्क धुरांडीही होती. क्लिपटाऊन पोलीस स्थानकाजवळ एक धुरांडं पडून होतं पण ते उचलून आणण्याएवढंही कोणी मूर्ख नव्हतं.

रातोरात शांती टाऊन उभारलं गेलं आणि सगळ्या पेपरांमध्ये आमच्याच बातम्या. ठळक शब्दात आणि फोटोंसकट. तो बघा, तो माझा नवरा. आमच्या घराच्या बाजूला उभा आहे. मला नेमका थोडा उशीर झाला. अतिक्रमण करणारे, त्यांनी आम्हाला दिलेलं नवीन नाव. होय, आम्ही अतिक्रमण करणारे आहोत. गोणी आणि फळ्या आणि पत्रे यांचं हे खेडं. इथे भाडं नाही. समितीला एक शिलिंग दिला की झालं.

रातोरात शांती टाऊन उभारलं गेलं. मुलगी भयंकर खोकते आहे आणि तिचं कपाळ आगीसारखं तापलंय. मला खरं तर तिला हलवायची भीती वाटत होती, पण तीच रात्र होती हलण्याची. गोणींमधून थंड वारा आत शिरतोय. आपण पावसाळ्यात काय करणार, आणि थंडीत? शांत हो माझ्या बाळा, तुझी आई आहे ना तुझ्याजवळ. शांत हो, नको खोकू. तुझी आई आहे ना तुझ्या जवळ.

मुलगी भयंकर खोकते आहे आणि तिचं कपाळ आगीपेक्षाही तापलंय. शांत हो माझ्या बाळा, तुझी आई आहे ना तुझ्याजवळ. बाहेर चेष्टा, मस्करी, हसणं, खणणं, ठोकणं, आणि वेगवेगळ्या भाषेत एकमेकांना बोलावणं चालू आहे. शांत हो माझ्या बाळा, तुझा जन्म एका सुंदर खोऱ्यात झाला जिथे दगडावरून जाताना पाणी झुळझुळ गीत गातं आणि वारा तुम्हाला खुश करून टाकतो. गुरं नदीकाठी येतात आणि झाडाखाली रवंथ करीत शांत उभी राहतात. शांत हो माझ्या बाळा, देवा हिला शांत कर. देवा आमच्यावर कृपा कर. येशू आमच्यावर कृपा कर. गोऱ्यांनो आमच्यावर कृपा करा.

**

"ड्युबुला डॉक्टर कुठे आहेत?"

"आपण सकाळी डॉक्टरांना आणूया. काळजी करू नका. त्यांचे पैसे समिती भरेल."

“पण मुलगी अगदी मरायला टेकली आहे.”

“आता थोड्या वेळातच सकाळ होईल.”

“जेव्हा मूल मरायला टेकलेलं असतं तेव्हा खूप भीती वाटायला लागते आणि तो थोडा वेळच खूप जास्त वाटायला लागतो. तुम्हाला डॉक्टरांना आत्ताच नाही का आणता येणार?”

“मी प्रयत्न करतो, मावशी. मी लगेच जातो आणि त्यांना आणायचा प्रयत्न करतो.”

“तुमचे खूप खूप उपकार आहेत, मि. ड्युबुला.”

**

बाहेर शेकोटीभोवती गाणी चालू आहेत. ते ‘इंकोस सिकेलेल आफ्रिका’* हे गाणं म्हणतायत का? देव आफ्रिकेचे रक्षण करो. देव आफ्रिकेच्या ह्या छोट्याशा अंशाचेही रक्षण करो जे प्रसूतिवेदना सहन करीत माझ्या शरीरातून जन्मले आहे, माझ्या स्तनातील दुधावर जोपासले गेले आहे, माझ्या हृदयातील प्रेमावर वाढले आहे. शांत हो बाळा, शांत हो. डॉक्टर, तुम्ही खरंच येऊ शकत नाही का?

“डॉक्टरांना आणायला पाठवलंय मी. समितीने डॉक्टरांना आणायला गाडी पाठवली आहे. आपल्यापैकीच काळ्या डॉक्टरांना.”

“तुमचे खूप खूप उपकार आहेत, मि. ड्युबुला.”

“बाहेर जे खूप गडबड करतायत त्यांना गप्प बसायला सांगू का?”

“त्याने काही फरक पडत नाही, तिला आता काहीच कळत नाहीये.”

गोरा डॉक्टर जास्त बरा पडला असता पण जो पहिला घरी येईल तो डॉक्टर आणा. अनोळखी प्रदेशातले हे आवाज गप्प झाले तर काही फरक पडेल का? माझ्या नवऱ्याला आणि मला खूप भीती वाटते आहे. माझे हात पोळतायत इतकी ती तापली आहे.

**इंकोस सिकेलेल आफ्रिका : [Nkosi Sikelel' iAfrika]- देवाचा आफ्रिकेवर आशीर्वाद असो/ देव आफ्रिकेचे रक्षण करो - काळ्या दक्षिणी आफ्रिकी लोकांचे एकेकाळचे लोकप्रिय स्फुर्तीगीत, आता दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्रगीत*

**

आम्हाला आता डॉक्टरची गरज नाही. काळा किंवा गोरा, कोणताच डॉक्टर आता काहीच करू शकणार नाही. माझ्या गर्भातून उमललेल्या फुला, माझ्या काळजाच्या तुकड्या, माझ्या अभिलाषेला आलेल्या फळा, तुझे इवलेसे गोबरे गाल खेचायला मिळायचे तेव्हा खूप छान वाटायचं, तुझी इवलीशी बोटं जेव्हा माझा हात घट्ट पकडायची तेव्हा खूप आनंद व्हायचा, तुझे इवले ओठ जेव्हा स्तनांना लुचायाचे तेव्हा कृतार्थ वाटायचं. हाच आईचा धर्म आहे. आईच्या नशिबात हेच असतं - जन्म देणं, वाढवणं, काळजी घेणं आणि पारखं होणं.

**

काही गोरी लोकं शांती टाऊनला आली. त्यांनी आमचे फोटो काढले आणि पिक्चरसाठी आमचे हलणारे फोटो पण काढले. आमची एवढी लोकं इथे आल्यामुळे त्यांना काय करावं हेच कळेना. हे गोरगरीब पावसाळ्यात काय करतील? हे बिचारे हिवाळ्यात कसे राहतील? माणसं आली, यंत्रं आली आणि आमच्यासाठी कच्ची घरं बांधायला सुरुवात झाली. ड्युबुला खरोखर हुशार माणूस. त्याने हेच सांगितलं होतं. त्यांनी आमच्यासाठी कच्ची घरं बांधायला सुरुवात केली न केली तो त्याच रात्री पिम्विले आणि अलेक्झांड्रा आणि सोफियाटाऊनहून आणखी खूप काळी लोकं आली आणि त्यांनीही गोणी, फळ्या, पत्रे, गवत वापरून घरं बनवली. गोरी लोकं पुन्हा आली पण या वेळेस दयेने न येता रागाने. पोलीस आले आणि लोकांना हाकलू लागले. त्यातल्या ज्या काही लोकांना त्यांनी हाकलले ते नेमके ओरलँडोचे होते. ते जी घरं सोडून आले होते तिथे पुन्हा गेले पण ती आधीच दुसऱ्या कोणीतरी घेतली होती आणि ती त्यांना आता परत कधीच मिळणार नाहीत.

शांती टाऊनमध्ये राहण्याची तुम्हाला लाज वाटण्याचे काहीच कारण नाही. वर्तमानपत्रात त्याचं नाव झळकलंय. फोटोत घराजवळ उभा असलेला माणूस आहे ना, तो माझा नवरा आहे. इथे डर्बनहून प्रसिद्ध होणारा पेपर येतो आणि त्या पेपरमध्येही घराजवळ उभा असलेला माणूस माझा नवरा आहे. तुम्ही तुमच्या पत्त्यात फक्त शांती टाऊन म्हणा. शांती टाऊन सगळ्यांना माहित आहे. शांती टाऊन आणि समितीने तुम्हाला दिलेला नंबर, बस्स! आपण पावसाळ्यात काय करणार? आणि हिवाळ्यात? काहीजणं

म्हणतायत तिकडे टेकडीवर आपल्यासाठी घरं बांधली जातायत. अजून पूर्ण नाही झाली पण आता छत घालायला सुरुवात झाली आहे. एका रात्री आपल्याला तिकडे हलवतील आणि मग पावसापाण्याची आणि थंडीची काही काळजी नाही.

10

शांती टाऊनमध्ये घेऊन जायला सिमँगु येणार होता. त्याची वाट बघता बघता गर्टरुड आणि विशेषतः तिचा मुलगा ह्यांचा विचार कुमालो करत होते. ते पंचवीस वर्षांचे झाल्यानंतर त्यांच्या बहिणीचा जन्म झाल्यामुळे त्यांच्यात विशेष असे काही अनुबंध नव्हते. त्यामुळे त्या छोट्याशा गंभीर मुलातच ते त्यांचे मनोरंजन शोधत होते. ते एक पाद्री होते, सौम्य, खरंतर नीरस स्वभावाचे! त्यांचे केस पांढरे होऊ लागले होते आणि ती अजूनही एक तरुण स्त्री होती. तिनं स्वीकारलेलं आयुष्य आणि तिचा व्यवसाय ह्या गोष्टी त्यांना वेदना देणाऱ्या आणि अस्वस्थ करणाऱ्या असल्या तरी जोहान्सबर्गमध्ये घेतलेल्या वाईट अनुभवांबद्दल ती त्याच्याशी काही बोलेल अशी त्यांची अपेक्षा नव्हती आणि इच्छाही नव्हती.

एखाद्या गावातल्या शाळेत फक्त पाचवीपर्यंत शिकलेल्या स्त्रीने त्याबद्दल बोलणं जरा कठीणच होतं. ते तिचा आदर करीत होते आणि तीही एक मोठा भाऊ आणि पाद्री ह्या नात्याने त्यांचा सन्मान करीत होती. त्यामुळे त्यांची अगदी वरवरची संभाषणं होत होती. ज्या गोष्टी बोलल्यामुळे ती जमिनीवर पडून जोरजोरात रडली होती त्या गोष्टी ते पुन्हा कधीच बोलले नव्हते.

मिसेस लिथेबेंच्या घरी ते रहात होते, ते एक प्रकारे बरं होतं. त्या आणि गर्टरुड उशिरा उशिरापर्यंत सर्वसाधारण बायकांच्या मनाला भिडणाऱ्या गोष्टी बोलत रहायच्या. काम करताना किंवा प्रार्थनेच्या वेळेला दोघी गाणीसुद्धा गायच्या.

आपल्या छोट्या भाच्याशी खेळताना मात्र त्यांना जरा बरं वाटायचं. त्यांनी त्या मुलासाठी स्वस्तातले लाकडी ठोकळे आणले होते. तो मुलगा त्या ठोकळ्यांबरोबर खेळताना तासंतास मग्न होत होता. मोठ्या माणसांना त्याचं वागणं जरी अगम्य वाटलं तरी तो मुलगा मात्र ह्या ठोकळ्यांमधे गढून गेला होता. कुमालो जेव्हा त्याला मधूनच उचलायचे, त्याच्या शर्टात हात घालून त्याला चापट मारायचे, गुदगुल्या करायचे; तेव्हा कुठे त्याच्या गंभीर चेहऱ्यावर हसू यायचं. कधीतरीच ते सौम्य हसू गडगडाटी हसण्यात बदलायचं. कधी कधी ते त्याला तो जन्मला होता त्या सुंदर खोऱ्याविषयी, तिथल्या नद्या आणि टेकड्यांच्या नावांविषयी, तो तिथे जाणार असलेल्या शाळेविषयी, न्दोत्शेनीला झाकून टाकणाऱ्या धुक्याविषयी सांगत रहायचे. ह्यातलं त्या मुलाला काही कळायचं नाही, पण

तरीही त्याच्यापर्यंत काहीतरी पोचायचंच. तिथली नादमय नावं तो गंभीरपणे ऐकत रहायचा आणि आपल्या मोठ्या गहन डोळ्यांनी आपल्या मामाकडे बघत रहायचा. मामाला ह्या महानगरात आता आपल्या घराची ओढ लागली होती. मुलाच्या अशा ऐकण्यानेसुद्धा त्यांना एक प्रकारचं सुख मिळत होतं. कधी कधी गर्टरुड त्यांचं बोलणं, गावाकडच्या गोष्टी दाराआड उभी राहून अगदी कान लावून ऐकत रहायची. तिच्या असं ऐकण्यानेही ते भरून पावायचे. कधी कधी भाच्याला काही सांगत असतांना ते तिला तुला आठवतं का असं विचारायचे, ती हो म्हणायची आणि त्यांनी आपल्याला काही विचारलं ह्यानेच खुश व्हायची.

पण ह्या आनंदी संभाषणातच कधीतरी अचानक त्यांना आपल्या मुलाची आठवण यायची. आणि मग एका क्षणात ह्या सगळ्या उत्फुल्ल आठवणी प्रखर सूर्याच्या तळपण्याने नाजूक फुलं कोमेजून जावीत तशा सुकून जायच्या. झरे वाहणं थांबवायचे, लालभडक आणि निकृष्ट जमिनीमुळे गुरं अशक्त, कुपोषित होऊन जायची आणि आता ते ठिकाण फक्त म्हातारे, लहान मुलं आणि आयांचं होऊन जायचं. त्यांचा आवाज कापायचा आणि एकदम क्षीण होऊन जायचा. ते एकदम अचानक मूक होऊन जायचे. मग कोणीतरी बोलल्यामुळे म्हणा किंवा कदाचित त्या मुलाने त्यांना घट्ट धरल्यामुळे, किंवा कदाचित मामाने पुन्हा खेळावं म्हणून त्याने चुळबूळ केल्यामुळे म्हणा, त्यांचे विचार थांबायचे. आता पुढे काय होईल ह्याची सतत चिंता करत असतानाच आपल्या बायकोचा, मित्रांचा, टेकड्यांवरुन धो धो धावणाऱ्या आणि धुक्यात किलबिलाट करत शाळेत जाणाऱ्या मुलांचा विचार एखाद्या वाऱ्याच्या झुळुकीसारखा त्यांच्या मनात यायचा. त्या झुळुकीने मनाला क्षणभर दिलासाही मिळायचा आणि लगेच अपराधीही वाटायचं.

खरंच, या आयुष्याच्या प्रवासाचं रहस्य कोणाला उलगडलय? सगळं रखरखीत झालेलं असताना, करपून गेलेलं असताना आशेचा ओलावा कसा काय शोधला जातो? सगळं उद्ध्वस्त झालेलं असतांना मनाला कुठून दिलासा मिळत राहतो? देवाचे आभार मानले पाहिजेत की ह्या वेदनादायी परिस्थितीतही कोणीतरी असा जिवलग आयुष्यात आहे की जो मनाला फुंकर घालतो आहे. देवाचे आभार मानले पाहिजेत की ह्या दुर्दशेमध्येही कोणी लहान मुलाशी खेळू शकतोय. देवाचे खरंच आभार मानले पाहिजेत की उजाड टेकड्यांबद्दल बोलतानाही कोणी आतून फुलून येतोय. नद्या, ज्या आता वाहतही नाहीयेत त्यांच्या नावानेही कोणी सुखावला जातोय!

खरंच, जगण्याच्या यातायातीतला अर्थ कुणाला समजलाय? आपण कशासाठी जगतो, संघर्ष करतो आणि मरतो? सगळं काही बिघडलेलं असतांना पेटून उठण्याची, संघर्ष करण्याची ताकद कोण देतो? स्वतःचं मूल हरवलेलं असताना, सापडण्याची खात्री नसताना दुसऱ्या एखाद्या मुलाच्या बाललीलांमध्ये कुणाला आनंद कसा मिळू शकतो? विद्वान मंडळी अगम्य भाषेत ह्यावर ग्रंथच्या ग्रंथ लिहितात. पण आयुष्याचा हेतू समजणं, सगळ्या संघर्षांचा शेवट कळणं मानवी बुद्धीच्या पलीकडलं आहे. हे देवा, परमेश्वरा, तू मला सोडून जाऊ नकोस. जरी मी मृत्युचे सावट असलेल्या खोऱ्यांतून चालत असेन तरीही! तू जोपर्यंत माझ्यासोबत आहेस तोपर्यंत मला कशाचेच भय नाही.....

तेवढयात दरवाज्यात सिमँगुचा आवाज त्यांनी ऐकला आणि ते उठले. अज्ञाताचा शोध घेत राहण्याची वेळ आली आहे.

**

हे बघा, हे शांती टाऊन. ह्या गलिच्छ वसाहतीतील अरुंद गल्ल्यांमध्येही मुलं खिदळत असतात. पत्रे, फळकुटं, गोणपाट, गवत, कुठल्यातरी जुनाट घराचं दार, कुठून तरी हुशारीने मिळवलेल्या धुरांडयांतून बाहेर पडणारा धूर, जेवण बनवताना येणारे वास, बोलण्याचे आवाज ह्या गल्ल्यांमधून येत राहतात. बोलणं ना रागाचं, ना वेदनांचं तर संसारातल्या अगदी साध्या साध्या गोष्टींबद्दलचं - हा मेला आणि ह्याला मुलगा झाला, हा शाळेत इतका हुशार आहे आणि हा सध्या तुरुंगात आहे. सध्या दुष्काळी वातावरण आहे आणि सूर्य निरभ्र आकाशात तळपतोय. पण पाऊस पडायला लागला की ते काय करतील? कडाक्याच्या थंडीत ते काय करतील?

“हे सगळं बघतांना मला खूप त्रास होतोय.”

“खरंय. पण तरीही त्यावर जे उभारलं जाणार आहे त्याकडे बघा. वर्षानुवर्षे असं कधी झालं नव्हतं. ह्यातून नक्कीच काहीतरी चांगलं घडेल. हेसुद्धा ड्युबुलाचच काम.”

“तो सगळीकडेच काम करतोय असं दिसतंय.”

“ती बघा आपल्यातली एक नर्स येते आहे. लाल आणि पांढऱ्या पोशाखात डोक्यावर हॅट घातल्यामुळे ती किती छान दिसते आहे ना?”

“हो खरंच छान दिसते आहे.”

“गोरी माणसं आपल्यापैकी बऱ्याच जणांना प्रशिक्षण देतायत. मला एक कळत नाही, काही बाबतीत आपण सुधारतोय, काही बाबतीत आधी जसे होतो तसेच आहोत आणि काही बाबतीत तर आपली आधीपेक्षाही वाईट परिस्थिती आहे. एक मात्र खरं, ह्या नर्सच्या व्यवसायामुळे अनेक गोरे आपल्या लोकांचे मित्र होऊ लागले आहेत. विटवॉटरस्रँडच्या युरोपीय विद्यालयात जेव्हा आपल्यातल्या काहींना डॉक्टरकीचे प्रशिक्षण द्यायचं ठरलं तेव्हा केवढा गहजब उडालेला. पण आपले मित्र ठाम राहिले आणि जोपर्यंत आपल्याकडे आपली विद्यालयं नाहीत तोपर्यंत ते त्यांना शिकवत राहतील अशी ठाम भूमिका घेतली.”

“सुप्रभात, नर्स ताई.”

“सुप्रभात, ऊम्फुंडीस.”

“तुम्ही कधीपासून इथे काम करताय?”

“ही वसाहत बनली तेव्हापासून.”

“तुम्ही अब्सालोम कुमालो ह्या तरुणाला ओळखता का?”

“हो, ओळखायचे, पण तो आता इथे रहात नाही. पण तो कुठे रहायचा ते मी सांगू शकते. तो मि. ल्हात्श्वायोंबरोबर रहायचा. ते अजून इथे राहतात. कातळ असल्यामुळे बांधकाम झालेलं नाही असं ठिकाण दिसतंय तुम्हाला? तो बघा, तिथे एक मुलगा उभा आहे.”

“हो दिसतोय.”

“त्याच्या पलीकडे एका घराच्या धुरांडयांतून धूर येताना दिसतोय?”

“हो दिसतोय. त्या गल्लीत उजवीकडच्या तिसऱ्या किंवा चौथ्या घरात मिसेस ल्हात्श्वायो राहतात.”

“धन्यवाद, नर्स ताई. आम्ही जाऊ आता.”

तिने सांगितलेल्या खुणा इतक्या व्यवस्थित होत्या की ते घर शोधायला त्यांना अजिबात अडचण आली नाही.

“सुप्रभात, मावशी.”

त्या बाई अगदी छान स्वच्छ आणि नीटनेटक्या होत्या. त्या त्यांच्याकडे बघून मोकळेपणाने हसल्या.

“सुप्रभात ऊम्फुंडीस.”

“मावशी, आम्ही अब्सालोम कुमालो नावाच्या मुलाला शोधतोय.”

“हो,हो. अब्सालोम ना? तो रहात होता ना आमच्याबरोबर. त्याला राहायला कुठे जागाच मिळत नव्हती. शेवटी आम्हाला त्याची दया आली आणि त्याला आम्ही आमच्याबरोबर राहू दिलं. पण काय सांगू तुम्हाला? पोलीस आले आणि त्याला घेऊन गेले. मागे असं ऐकलं की न्यायाधीशाने त्याला सुधारगृहात पाठवलंय.”

“सुधारगृह?”

“सैनिकांच्या दवाखान्याजवळची मोठी शाळा. चालत फार लांब नाहीये इथून.”

“तुमचे खूप खूप आभार, मावशी. चला, येतो आम्ही.”

“चला, दादा.”

बोलायला शब्द नसल्यासारखे ते शांत चालत राहिले. रस्ता जरी सरळ होता तरी कुमालो एके दोन वेळा पडता पडता राहिले आणि सिमँगुने त्यांचा हात धरला.

“धीर धरा.”

त्याने त्यांच्याकडे पाहिलं पण कुमालोंची नजर जमिनीला खिळून होती. सिमँगुला त्यांचा चेहरा दिसत नसला तरी जमिनीवर एक थेंब पडलेला त्याला दिसला आणि त्याने त्यांचे हात आणखी घट्ट धरले.

“धीर धरा, दादा.”

“कधी कधी मला असं वाटतं, माझ्यात आता अजिबात ताकद उरली नाहीये.”

“मला ह्या सुधारगृहाबद्दल माहित आहे. तुमचा तो इंग्लंडवाला पाद्री मित्र सुधारगृहाविषयी भरपूर बोलत असतो. मी असं ऐकलंय की एखाद्याच्या वागणुकीत चांगली सुधारणा दिसली तर ते त्या मुलाला मदत करतात. म्हणून म्हणतोय, धीर धरा.”

“मला ह्या गोष्टीचीच भीती वाटत होती.”

“मलाही ह्याची भीती वाटत होती.”

“तुला पाहिल्यांदा केव्हा भीती वाटली ते मला आठवतंय. अलेक्झांड्राला मला पुढे पाठवलंस आणि तू पुन्हा त्या बाईशी बोलायला गेलास त्या वेळी.”

“मला तुमच्यापासून काहीच लपवता येत नाहीये असं दिसतंय.”

“मी हुशार आहे म्हणून मला हे कळतंय असं नाही. फक्त तो माझा मुलगा आहे म्हणून.”

ते शांती टाऊन मधून ओरलँडोला आले आणि जोहान्सबर्गला जाणाऱ्या हमरस्त्याला जोडलेल्या डांबरी रस्त्यावरुन गोऱ्या माणसाच्या मोठ्या पेट्रोल पंपाजवळ आले. काळ्या लोकांना पेट्रोल पंप काढायची परवानगी नाही.

“त्या दिवशी ती बाई काय म्हणत होती?”

“ती दोन तरुण मुलं काहीतरी चुकीचं करत होती. गोऱ्या लोकांच्या बऱ्याच वस्तू घरी येत होत्या असं ती म्हणाली.”

“बापरे. बरं आणि त्या सुधारगृहात मुलं सुधारतात का?”

“नक्की माहित नाही. काहीजण एक बोलतात तर काही जण दुसरं. पण तुमचा मित्र मात्र चांगलं बोलतो त्याबद्दल.”

बऱ्याच वेळाने सिमँगु विचारात इकडे तिकडे भरकटलेला असतांना कुमालो म्हणाले,

“मला आशा आहे सुधारगृहात तो सुधारेल.”

“मलाही असंच वाटतंय.”

तासभर चालल्यानंतर ते सुधारगृहाच्या रस्त्यावर आले. ते येईपर्यंत दुपार झाली होती आणि वेगवेगळ्या दिशांनी मुलं संचलन करत सुधारगृहाच्या फाटकाकडे येत होती. सगळ्या बाजूंनी इतकी मुलं येत होती की हे संचलन संपणारच नाही असं वाटत होतं.

“किती मुलं आहेत नाही इथे?”

“हो, मलाही इतकी मुलं इथे असतील असं वाटलं नव्हतं."

इतक्यात तिथला एक उत्साही माणूस हसत त्यांच्याजवळ आला आणि त्यांची चौकशी करू लागला. त्यांनी आम्ही अब्सालोम कुमालोला शोधत आहोत हे त्याला सांगितलं. मग त्याने त्यांना ऑफिसमध्ये नेलं. तिथे एका गोऱ्या माणसाने त्यांना येण्याचं कारण आफ्रिकान भाषेत विचारलं.

“सर, आमच्या या मित्राच्या मुलाला, अब्सालोम कुमालोला आम्ही शोधत आहोत.” सिमँगुनेही त्याच भाषेत उत्तर दिलं.

“अब्सालोम कुमालो! हो मी ओळखतो त्याला. पण त्याने तर त्याला कोणीच नाही म्हणून सांगितलं होतं.”

“तो लाजला असेल सांगायला.” कुमालो सिमँगुशी झुलुत बोलले. “माफ करा मला आफ्रिकान येत नाही.”

त्यांनी असं ऐकलं होतं की आफ्रिकान भाषा न येणारे काळे गोऱ्यांना आवडत नाहीत.

“काही हरकत नाही. तुम्हाला जी भाषा येते त्या भाषेत तुम्ही बोला. तुमचा मुलगा इकडे चांगला वागत होता. तो आमच्या वरिष्ठ मुलांपैकी एक झाला होता. मला खूप आशा आहेत त्याच्याकडून.”

“म्हणजे? तो इथून गेला,सर?”

“हो, गेल्याच महिन्यात. आम्ही त्याच्या बाबतीत थोडा अपवाद केला. त्याच्या वागण्यामुळे, त्याच्या कोवळ्या वयामुळे आणि ह्या सगळ्याहून महत्वाचं म्हणजे त्याच्यापासून गर्भार राहिलेल्या मुलीमुळे आम्ही त्याला थोडी सवलत दिली. ती त्याला नेहमी भेटायला यायची. ती त्याला आवडत होती. तिलाही तो आवडत होता. होणाऱ्या बाळासाठी तो खूप उत्साही दिसत होता. म्हणून तो मुलीसाठी आणि होणाऱ्या बाळासाठी चांगलं काम करेल अशी हमी घेऊन मंत्र्यांकडून त्याला सोडण्याची आम्ही परवानगी घेतली. नेहमीच आम्हाला यश येतं असं नाही पण जेव्हा दोघंही प्रेमात पडलेले दिसतात तेव्हा काहीतरी चांगलं घडेल असा विचार करुन आम्ही अशी संधी घेतो. एक नक्की, ह्यात अपयश आलं तर मात्र यशाची कुठेही शक्यता नाही.”

“आणि त्यांचं लग्न झालं का, सर?”

“नाही ऊम्फुंडीस. पण लग्नाची सगळी तयारी झाली आहे. मुलीला कोणी नाही आणि तुमच्या मुलाने सांगितलेलं की त्यालाही कोणी नाही, म्हणून मी आणि आमचे स्थानिक सहकारी मिळून तयारी केली आहे.”

“तुम्ही खूप चांगले आहात, सर. तुमचे मनापासून आभार.”

“आमचं कामच आहे हे. तुम्ही त्यांचं लग्न झालंय की नाही ह्याची फारशी काळजी करू नका. त्यांचं लग्न झालंय की नाही हे महत्वाचं नाही. तो तिची काळजी घेणार आहे की नाही हे जास्त महत्वाचं आहे.” तरुणाने प्रेमळ सुरात कुमालोंना सांगितले.

“माझ्यासाठी हा धक्का असला तरी तुमचं म्हणणं बरोबर आहे.”

“मी समजू शकतो. मी तुम्हाला ह्या प्रकरणात मदत करीन. तुम्ही थोडा वेळ बाहेर थांबून माझी कामं पूर्ण करायला वेळ दिलात तर मी तुम्हाला अब्सालोम आणि ती मुलगी जिथे राहते त्या पिम्विलेला घेऊन जाईन. तो तिथे नसेल कारण मी त्याच्यासाठी शहरात काम शोधलंय आणि त्यांच्याकडून त्याच्याबद्दल चांगला प्रतिसाद आलाय. मी त्याला पोस्टाचं पुस्तकही काढायला लावलंय. त्याने आतापर्यंत तीन-चार पाउंड साठवलेतसुद्धा.”

“मी तुमचे आभार तरी कसे मानू, सर.”

“ते तर आमचं कामच आहे. मला थोडा वेळ द्या. माझं काम पूर्ण झालं की तुम्हाला मी पिम्विलेला घेऊन जाईन.”

बाहेर त्यांना तो हसऱ्या चेहऱ्याचा माणूस पुन्हा भेटला आणि त्यांच्याशी बोलायला लागला. तो त्यांना त्याच्या घरी घेऊन गेला. त्याने आणि त्याची बायकोने सुधारगृहातून सुटलेल्या बऱ्याच मुलांची जबाबदारी घेतली होती. ती मुलं आणि ते त्या मोठ्या घरात एकत्र रहात होते. त्याने त्यांना चहा आणि थोडं खायला दिलं. त्यानेही त्यांना अब्सालोमच्या चांगल्या वर्तणूकीबद्दल सांगितलं. तो तरुण त्याचं काम आटपून निघायला तयार झालाय हा निरोप येईपर्यंत ते एकूणच सुधारगृहाबद्दल, जोहान्सबर्गमध्ये घर, शाळा आणि रितीभातींशिवाय वाढणाऱ्या मुलांबद्दल, बिघडलेल्या समाजव्यवस्थेबद्दल, नापिक होत चाललेल्या जमिनीबद्दल बोलत राहिले.

थोड्या वेळातच कार पिम्विलेला पोहचली. तिथे टाक्यांचे अर्धगोल वापरून बऱ्याच वर्षापूर्वी काळ्या लोकांसाठी तात्पुरती घरं बनवली होती ज्यात अजूनही लोकं रहात होती. कारण जोहान्सबर्गला राहण्याइतकी पुरेशी घरच नव्हती. पिम्विलेला परवानगीशिवाय गोऱ्या माणसाला यायला मनाई असल्यामुळे परवानगी घेऊनच ते फाटकातून आत शिरले.

ते अशाच एका अर्धगोल घराजवळ थांबले आणि तो गोरा माणूस त्यांना त्या घरात घेऊन गेला. लहानशी मुलगी वाटणाऱ्या एका तरुण मुलीने त्यांचे स्वागत केले.

“आम्ही अब्सालोमची चौकशी करायला आलो आहोत.” तो गोरा माणूस म्हणाला. “हे ऊम्फुंडीस. त्याचे वडील आहेत.”

“तो शनिवारी स्प्रिंग्जला गेलाय आणि अजून परत आलेला नाही.” ती म्हणाली.

तो तरुण थोडा वेळ गप्प बसला आणि मग कपाळाला आठ्या घालत रागाने म्हणाला, ”आज मंगळवार आहे. तू त्याच्याबद्दल काहीच ऐकलं नाही इतक्या दिवसांत?”

“नाही. काहीच नाही.” ती म्हणाली.

“तो कधी परत येणार आहे?” त्याने विचारलं.

“मला माहित नाही” ती म्हणाली.

“येणारे आहे का तो परत कधी?” तिच्या थंड उत्तरांनी त्याचं डोकच फिरलं होतं.

“मला खरंच माहित नाही.” ती संथपणे, निराशपणे म्हणाली.

आपलं माणूस सोडून जाण्याची, त्याची वाट बघत बसण्याची जणू तिला सवयच होती. तिच्या चेहऱ्यावर संताप, बंडखोरी, तक्रार असं काहीही दिसत नव्हतं. सत्तर वर्षांच्या म्हातारीसारखी ती निरपेक्ष दिसत होती. देवा, हिला वापरणाऱ्या, वाऱ्यावर सोडणाऱ्या, विसरून जाणाऱ्या माझ्या मुलाला क्षमा कर! तिचं कृश शरीर, कोवळं वय आणि तिने भोगलेले भोग हे सगळं बघून कुमालोंचं मन हेलावलं.

“काय करायचं ठरवलं आहे तू?” त्यांनी हळुवारपणे विचारलं.

“माहित नाही.” ती म्हणाली.

“बहुतेक तू दुसरा पुरुष शोधशील.” सिमँगु कडवटपणे बोलला.

सिमँगुच्या बोलण्यातील कडवटपणा तिच्यापर्यंत पोहचू नये म्हणून कुमालो पटकन काही बोलणार एवढयात ती म्हणाली, “माहित नाही.”

कुमालो तिचा कैवार घेऊन काही बोलणार इतक्यात तिच्याकडे पाठ करून हळू आवाजात सिमँगु त्यांना म्हणाला,

“इथे तुम्हाला करण्यासारखं काही शिल्लक नाही. चला, आपण निघूया इथून.”

“मित्रा...”

“मी सांगतो दादा, तुम्ही काही करू शकणार नाही. तुम्हाला तुमचे काय कमी व्याप आहेत? हिच्यासारख्या हजारो बायका आहेत जोहान्सबर्गमध्ये. सगळ्यांची दुःखं वाहून नेण्याइतके तुमचे खांदे मजबूत आहेत? सगळ्यांना पोसता येईल इतका खजिना आहे तुमच्या पाकिटात? नरकात पोचलेल्या सगळ्यांना ओढून आणण्याइतकी तुमची करुणा ताकदवान आहे? तुम्ही इथे काहीही करू शकणार नाही.”

ते काही न बोलता बाहेर पडले. सगळेच निःशब्द होते. तो तरुण त्याच्या अपयशामुळे, कुमालो त्यांच्या दुःखामुळे आणि सिमँगु त्याच्या कडवट शब्दांमुळे! बाकीचे बसले तरी कुमालो अजून कारबाहेर उभे होते.

“तुला कळत नाहीये, ते मूल माझा नातू किंवा नात असेल.”

“ते सुद्धा आपल्याला धड माहित नाहीये.” सिमँगु रागाने बोलला. पुन्हा त्याच्या जिभेवर कडवटपणा आला. “आणि हे जरी असलं तरी अशी आणखी किती असतील? आपण काय दिवसेंदिवस, तासनतास एकेकाला शोधत फिरायचं? कधी संपेल का हे?”

फटका बसल्यासारखे कुमालो धुळीत उभे राहिले आणि मग निमूटपणे कारमधल्या आपल्या जागेवर जाऊन बसले.

ते पुन्हा गावाच्या फाटकापाशी थांबले. तो गोरा तरुण युरोपीय अधिकाऱ्याच्या कार्यालयात गेला. उतरलेल्या चेहऱ्याने तो थोड्या वेळाने परत आला.

“मी त्या कारखान्यात फोन केला. तो ह्या आठवड्यात कामावर आलाच नाही.”

ओरलँडोच्या वेशीजवळच्या पेट्रोल पंपाजवळ कार थांबली.

“तुम्ही इथे उतरू शकता.” तो तरुण म्हणाला.

ते उतरले आणि तो तरुण कुमालोंशी बोलू लागला.

"मला माफ करा, मला खूप राग आलाय. खूप चिडचिड होतेय माझी."

काय बोलावं ते कुमालोंना समजेना. धक्क्यातून सावरले नसल्यामुळे ह्या तरुणाशी झुलूतून बोलू नये हेही ते क्षणभर विसरले.

"तुमच्या कामाच्या अशा शेवटाने मला दुःख होतंय."

"त्यांना तुमच्या कामाच्या अशा शेवटाने दुःख होतंय," सिमँगु आफ्रिकान भाषेत बोलला.

"माझ्यासाठी ते काम होतं पण ह्यांचा तर तो मुलगा होता." तो कुमालोंकडे वळला आणि इंग्रजीत बोलला. "आपण इतके निराश नको होऊया. कधी कधी असंही होतं की मुलाला कुठेतरी अटक केलेली असते किंवा त्याला कुठेतरी लागलेलंही असतं. निराश होऊ नका, ऊम्फुंडीस. मी शोध थांबवणार नाही."

ते त्याला गाडी घेऊन जाताना बघत राहिले.

"तो खूप चांगला माणूस आहे." कुमालो म्हणाले. "चला आपण चालायला सुरुवात करूया."

पण सिमँगु हलला नाही.

"मला तुमच्याबरोबर यायला लाज वाटते आहे."

त्याचा चेहरा दुःखाने पिळवटून गेलेला दिसत होता. कुमालो चकित होऊन त्याच्याकडे पहातच राहिले.

"माझ्या घाणेरड्या शब्दांबद्दल मी तुमची माफी मागतो." सिमँगु म्हणाला.

"म्हणजे अब्सालोमचा शोध घ्यायला तू तयार आहेस ना ?"

"तुम्हाला कळलं?"

"हो."

"तुम्हाला कसं काय लगेच कळतं सगळं?"

"मी म्हातारा आहे आणि शिकलोय थोडंफार. तुला माफी मिळाली."

“मला कधीकधी वाटतं की मी पाद्री बनण्याच्या लायकीचा नाहीये. मी तुम्हाला सांगतो...”

“त्याने काही फरक पडत नाही. तू मागे बोलला होतास, तू कमकुवत आणि स्वार्थी आहेस, पण तुझ्यावर परमेश्वराचा वरदहस्त आहे. ते खरं आहे असं दिसतंय.”

“तुम्ही छान दिलासा दिलात मला.”

“पण मला तुझ्याकडे काही मागायचंय.”

सिमँगुने त्यांच्या चेहऱ्याकडे बघितलं आणि म्हणाला, “एकदम मान्य.”

“काय मान्य आहे?”

“मी तुम्हाला पुन्हा त्या मुलीला भेटायला आणीन.”

“तू तर एकदम हुशार आहेस.”

“हं, फक्त एकजणच हुशार असून कसं चालेल?”

एवढं बोलूनही दोघेहीजण चेष्टा मस्करी करण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ते ओरलँडोच्या तप्त रस्त्यांवरून शांतपणे चालत राहिले. दोघांच्याही मनात अनेक विचार चालू होते.

11

सोफियाटाऊनला जाणाऱ्या ट्रेनमध्ये बसल्यावर सिमँगु म्हणाला, “मला असं वाटतं की आता तुम्ही थोडी विश्रांती घ्यायला हवी.”

“विश्रांती? मी विश्रांती कशी काय घेऊ शकतो?” कुमालोंनी त्याच्याकडे बघत विचारलं .

“मला कळतंय तुम्हाला काय म्हणायचंय. तुमची अधीरता मी समजू शकतो, पण आपण दोघे मिळून जेवढी शोधाशोध करू शकतो त्यापेक्षा कितीतरी अधिक चांगल्या पद्धतीने सुधारगृहातील तो तरुण शोध घेऊ शकतो. आज मंगळवार आहे. परवा मला आपल्यातल्या अंधांची सेवा करायला आणि आपल्या इतर माणसांना भेटायला एझेन्झेलेनीला जावे लागणार आहे. त्या रात्री मी तिकडेच राहीन आणि दुसऱ्या दिवशी परत येईन. तिथल्या व्यवस्थापकांना फोन करुन तुम्हीही माझ्याबरोबर आलात तर चालेल का हे मी विचारतो. माझं काम चालू असताना तुम्ही आराम करू शकाल. खूप छान जागा आहे ती, छोटसं चर्च आहे तिथे आणि पुढे काही पावलांवरच सुंदर दरी खोरं आहे. गोरी लोकं आपल्यातल्या अंधांसाठी जे काही करतायत ते बघून तुमचा उत्साह नक्कीच वाढेल. आणखी ताजेतवाने होऊन आपण आपल्या कामाला लागू. “

“पण मित्रा, तुझ्या कामाचं काय?”

“मी बोललोय माझ्या वरिष्ठांशी. तुमचा मुलगा सापडेपर्यंत मी तुम्हाला मदत करावी असं त्यांचंही म्हणणं आहे.”

“ते खूपच दयाळू आहेत. चालेल मग आपण नक्की जाऊया.”

**

मिशन हाउसमधली ती प्रसन्न संध्याकाळ होती. फादर विन्सेंट आणि कुमालोंच्या गप्पा चांगल्याच रंगल्या. विषय अर्थातच जिव्हाळ्याचा. कुमालो त्यांना गावाकडच्या गोष्टी सांगत राहिले. खुललेल्या फादर विन्सेंटनीही त्यांच्या दूरवरच्या देशाबद्दल सांगायला सुरुवात केली. लांबवर पसरलेली शेतं आणि कुंरणं, वेस्टमिन्स्टर ॲबे, भलीथोरली

कॅथेड्रल... ह्या प्रसन्न संभाषणात दोघेहीजण रंगून गेलेले असतानाच शहरातून नुकताच आलेला एक गोरा पाद्री 'इविनिंग स्टार' हातात घेऊन आला आणि त्यातली ठळक बातमी त्याने त्यांना दाखवली.

'**पार्कवर्ल्डमध्ये खून. शहरातील सुविख्यात इंजिनिअरला गोळ्या घातल्या. खुनी काळा असल्याचा संशय.'**

"दक्षिण आफ्रिकेचे फार मोठे नुकसान झाले आहे." गोरा पाद्री म्हणाला. "हा आर्थर जार्विस अतिशय निर्भय आणि न्यायासाठी लढणारा तरुण होता. हे चर्चचेही मोठे नुकसान आहे. चर्चशी संबंधीत आत्ताच्या सगळ्यात चांगल्या तरुण माणसांपैकी तो एक होता."

"काय सांगता? जार्विस? बाप रे !" सिमँगु म्हणाला. "तो क्लेअरमाउंटमधल्या ग्लॅडिओलस स्ट्रीटवरील आफ्रिकन बॉइज क्लबचा अध्यक्ष होता."

"बहुतेक तुम्हालाही तो माहित असेल." फादर विन्सेंट कुमालोंना म्हणाले. "असं ऐकलंय की तो हाय प्लेस, कॅरिसब्रूकमधल्या मि. जेम्स जार्विस ह्यांचा एकुलता एक मुलगा होता."

"मी ओळखतो त्यांना." कुमालोंना गहिवरून आलं. "म्हणजे जरी आम्ही अजून कधी एकमेकांशी बोललो नसलो तरी मी त्यांना ओळखतो. त्यांचं शेत न्दोत्शेनीतल्या टेकाडाच्या वर आहे. त्यांना कधीकधी घोड्यावरून चर्चसमोरून जाताना पाहिलंय, पण मी त्यांच्या मुलाला कधीच पाहिलं नाही."

ते गप्प झाले आणि पुन्हा म्हणाले, "हं, आत्ता आठवलं एक हुशार मुलगा कधीतरी घोड्यावरून चर्चसमोरून जायचा. पण तो नीट आठवत नाहीये मला."

ते पुन्हा गप्प झाले. कोणीतरी अचानक मेलंय आणि तो एकेकाळचा लहान हुशार मुलगा आहे हे कळल्यावर कोण गप्प होणार नाही?

"मी ही बातमी वाचू का?" फादर विन्सेंट म्हणाले.

आज दुपारी १:३० च्या सुमारास पार्कवर्ल्ड, प्लॅंटेशन रोडवरील मि. आर्थर जार्विस यांचा त्यांच्या राहत्या घरी स्थानिक संशयित घुसखोरांकडून खून झाला. असे कळले की त्यांची पत्नी आणि दोन मुले छोट्या सहलीवर गेले होते आणि किंचित बरे नसल्याने आपण घरीच असणार आहोत असे त्यांनी आपल्या भागीदाराला सांगितले होते. घरात कोणीही

नाही असे समजून दोन किंवा तीन काळे तरुण स्वयंपाकघरातून आत शिरले असे वाटते आहे. काळा नोकर मार लागल्यामुळे बेशुद्ध झाला आणि तो आवाज ऐकून मि जार्विस काय झालं ते बघायला खाली आले असावे असा अंदाज आहे. जिन्यावरून उतरत असतांना त्यांना अगदी जवळून कुणीतरी गोळ्या झाडल्या. झटापटीच्या कोणत्याही खुणा घटनास्थळी आढळल्या नाहीत.

तीन देशी तरुण ह्या घटनेच्या काही काळ आधी प्लॅंटेशन रोडवर संशयास्पद रीतीने भटकताना पाहिले गेले होते. नामी गुप्तहेरांची फळी घटनास्थळी रवाना झाली आहे. प्लॅंटेशन रोड पार्कवर्ल्ड रिजच्या आजूबाजूच्या सर्वांची कसून तपासणी केली जात आहे. देशी नोकर रिचर्ड पिरिंग अजून गैरयुरोपिअनांच्या दवाखान्यात बेशुद्धावस्थेत आहे. अशी आशा आहे की तो शुद्धीवर आल्यावर पोलीसांना ह्याबद्दल आणखी माहिती मिळू शकेल. त्याची प्रकृती अद्यापही गंभीर आहे.

गोळीबाराचा आवाज त्यांचे शेजारी मि. मायकेल क्लार्क ह्यांनी ऐकला आणि त्यांनी तत्परतेने ह्या दारूण घटनेचा शोध घेतला. काही मिनिटांतच पोलीस त्या ठिकाणी पोचले. खून झालेल्या व्यक्तीच्या पलंगाशेजारील टेबलावरच 'काळ्या लोकांच्या गुन्हेगारीमागील तथ्य' हे अपूर्णावस्थेतील हस्तलिखित सापडले आहे. असे वाटते आहे की लिहिता लिहिता ते उठले आणि आपल्या मृत्यूकडे गेले. त्यांची चिलीम त्यानंतर कितीतरी वेळ गरम होती.

मि. जार्विस यांच्यामागे त्यांची पत्नी, नऊ वर्षांचा मुलगा आणि पाच वर्षांची मुलगी आहे. हाय प्लेस, कॅरिसब्रूक, नाताळ येथील मि. जेम्स जार्विस ह्यांचे ते एकुलते एक पुत्र होते. डेविस आणि वॉन डेर वॉल्ट अशा दोन भागीदारांसह ते शहरात एक इंजिनिअरिंग फर्म चालवत होते. मृत व्यक्ती ही सामाजिक प्रश्नांमधील रुचीसाठी आणि समाजातील गैर युरोपीय *समुदायाच्या कल्याणासाठी केलेल्या प्रयत्नांसाठी प्रसिद्ध होती.*

आता कोणीच काही बोलत नाहीये. सगळे सुन्न झाले आहेत. शेतं, पिकं, निसर्गसौंदर्य ह्यापैकी कशाहीबद्दल बोलण्याची आता कोणाचीच इच्छा नाहीये. विनाशाच्या ह्या बातमीने सगळ्यांना भरून आलंय. दुःखं, भीती आणि उद्विग्नता याशिवाय आणखी कोणतीही भावना कुणाच्याही मनात नाहीये.

दुभंगलेल्या समाजासाठी, नष्ट होत चाललेल्या समंजस रूढी परंपरांसाठी आकांत कर. मेलेल्या माणसासाठी आणि त्याच्या अनाथ झालेल्या बायको-मुलांसाठी धाय मोकलून रड. हे प्रिय मातृभूमी, ह्या दुःस्वप्नांचा शेवट होत नाहीये म्हणून आर्त आक्रोश कर.

सूर्य अगणित हातांनी पृथ्वीवर संजीवक प्रकाश ओततोय, पण माणूस त्याचा आनंद घेऊच शकणार नाही. त्याच्या हृदयात भीतीचा काळोख दाटलाय. भीती, फक्त भीती.

**

कुमालो उठले. “मला माझ्या खोलीकडे जायला हवं.” ते म्हणाले.

“मी येतो तुमच्यासोबत.”

मिसेस लिथेबेंच्या छोट्याशा घराच्या फाटकापर्यंत ते दोघे चालत आले. कुमालोंनी यातनांनी पिळवटलेला आपला चेहरा सिमँगुकडे वळवला.

“हीच ती, हीच ती गोष्ट. भीती, भीती, भीती आणि फक्त भीती. माझ्या हृदयात भितीशिवाय दुसरं काही नाही.”

“मला तुमची अवस्था समजते आहे... पण ह्या महानगरात हजारो लोकं रहात असताना फक्त एकाबद्दल भीती बाळगणं हा वेडेपणा नाही का ?”

“वेडेपणा? प्रश्न वेडेपणाचा किंवा शहाणपणाचा नाहीचे. प्रश्न फक्त भीतीचा आहे. बोल, या भीतीचं मी काय करू?”

“परवा आपण एझेन्झेलेनीला जाऊया. तुम्हाला तिकडे नक्कीच काहीतरी सापडेल.”

“नक्कीच, नक्कीच. मला नक्कीच कशाचीतरी गरज आहे.”

“चला प्रार्थना करूया.”

"माझ्यात आता अजिबात ताकद उरली नाहीये. मी आतून अगदी पूर्ण बधीर झालोय. प्रार्थना करण्यासाठी माझ्याकडे शब्दच नाहीयेत.”

“तुमच्यासाठी मी प्रार्थना करतो, दादा. शुभरात्री, काळजी घ्या.”

“शुभरात्री.”

कुमालोंना चालताना अगदी बघवत नव्हतं. ते खूपच म्हातारे दिसत होते. अशा काही वेळा येतात जेव्हा देव ह्या जगाचा कोणीतरी लागतो ह्यावरचा विश्वासच उडतो.

ह्या भूमीवर भीतीचं साम्राज्य आहे. इतके सगळेजण नियम पायदळी तुडवायला लागले तर माणसांनी करायचं तरी काय? ह्या प्रिय भूमीच्या सौंदर्याचा, संपन्नतेचा आस्वाद कुणी घ्यायचा? कुणी हे सत्तर वर्षांचं कृतार्थ आयुष्य जगायचं? माणसाच्या हृदयात फक्त भीती असताना सूर्य अगणित हातांनी पृथ्वीवर संजीवक प्रकाश ओततोय. समोरून धोका खुणावत असताना बहरलेल्या जॅकरांडाच्या निळ्याशार सावलीतून कोण निवांत फिरू शकेल? काळोखाच्या पोटात भयंकर गुपितं दडलेली असताना कोण निर्धास्त निजू शकेल? धमक्यांच्या आरोळ्यांनी आसमंत भरून गेलेला असताना कोणती प्रेमी युगुलं चांदण्यात बसून प्रियाराधन करू शकतील?

काय केलं पाहिजे हे सांगणारे शेकडो, हजारो आवाज कानावर आदळताहेत. पण नक्की करायचं तरी काय? एक आवाज हे म्हणतोय, दुसरा ते म्हणतोय आणि तिसरा हेही नाही आणि तेही नाही असं वेगळंच काहीतरी म्हणतोय.

**

सभ्य स्त्री-पुरुषहो, हे किती चीड आणणारं आहे की आपल्या सुरक्षेसाठी एवढे कमी पोलिस ठेवलेत. जोहान्सबर्गच्या सगळ्या उपनगरांपेक्षा आपलं उपनगर जास्त कर भरतं. आणि त्याबदल्यात आपल्याला काय मिळतं? एक पहाऱ्यावर आणि एक फोनवर असे दोन पोलीस असलेले एक भंगार पोलीस स्टेशन? गेल्या सहा महिन्यातली ही दुसरी दुर्घटना आहे आणि आपण जास्तीत जास्त संरक्षणाची मागणी करायला हवी.

(टाळ्यांचा गजर)

मि. मॅकलॉरेन, तुम्ही तुमचा ठराव वाचून दाखवाल?

**

मी म्हणतो, जोपर्यंत काळ्यांना जगण्याचं ध्येय सापडत नाहीत तोवर त्यांच्यातल्या गुन्हेगारांवर जरब बसवली पाहिजे. नजरेसमोर कोणतेही ध्येय नसल्यामुळेच ते दारू पिणे, गुन्हेगारी आणि वेश्यांकडे जाणे ह्याशिवाय दुसरं काही करत नाहीत. तुम्हाला कोणते काळे जास्त आवडतील? नियम पाळणारे, ध्येयाने प्रेरित होऊन मेहनत करणारे

की बेशिस्त, निरुद्योगी, ध्येयहीन? खरंतर आपल्याला नक्की सांगता येणार नाही, कारण आपण दोन्ही प्रकारच्या काळ्या लोकांना भितो. आणि जोपर्यंत आपली ही द्विधा अवस्था आहे, जोपर्यंत आपल्याला काय आवडेल हे आपण ठामपणे ठरवत नाही तोपर्यंत आपल्याला त्याची मोठी किंमत देत रहावी लागणार आहे. आणखी पोलीस संरक्षण हे तात्पुरतं उत्तर असू शकतं पण ते अंतिम उत्तर नाही.

**

"मि. डी व्हीलर्स तुम्हाला खरंच असं वाटतं की शाळांची संख्या वाढली की काळ्या मुलांमधली बालगुन्हेगारी कमी होईल?"

"अध्यक्ष महोदय, मला खात्रीच आहे तशी."

"तुमच्याकडे शाळा आणि मुलं ह्याचं गुणोत्तर दाखवणारी काही माहिती आहे?"

"जोहान्सबर्गमध्ये दहा काळ्या मुलांपैकी चारजण शाळेत जातात. पण त्या चारांपैकी एखादाच सहावीपर्यंत शिकतो. बाकीचे रस्त्यावरच आपले शिक्षण घेतात."

"अध्यक्ष महोदय, मि. डी व्हीलर्सना मी एक प्रश्न विचारू शकतो का?"

"बेलाशक विचारा, मि. स्कॉट."

"त्यांच्या शिक्षणाचा खर्च कोणी करावा असं तुम्हाला वाटतं, मि. डी व्हीलर्स?"

"आपणच करायला हवा मि. स्कॉट. जर काळ्या पालकांनी हा खर्च करेपर्यंत आपण वाट बघितली तर वेगळ्या प्रकारे आपल्याला किंमत मोजायला लागेल."

" मि. डी व्हीलर्स, जास्त शाळा म्हणजे जास्त शिकलेले गुन्हेगार असं नाही का वाटत तुम्हाला?"

"नाही, हे अजिबात खरं नाहीये."

"थांबा, मी तुम्हाला एक उदाहरणं देतो. माझ्याकडे एक सहावी पास झालेला मुलगा कामाला होता. अगदी सभ्य माणसासारखा बो-टाय, तिरकी ठेवलेली हॅट आणि नवनवीन सॉक्स वापरणारा. मी त्याला चांगलं वागवलं आणि चांगला पगारही दिला. आता तुम्हाला माहीत आहे का मि. डी व्हीलर्स, त्याच नालायक हरामखोराने...."

**

“जॅक्सन, सरकारने प्रवेश नियमन कायदा अमलात आणायला हवा.”

“पण मी सांगतो नुसता प्रवेश नियमन कायदा उपयोगी नाही.”

“कठोरपणे अमलात आणला तर खरंच त्याचा चांगला उपयोग होईल.”

“मला वाटतं तसं करणं शक्य नाही. तुम्हाला माहित आहे का आपण दरवर्षी एक लाख काळ्या लोकांना तुरुंगात डांबतो. तिथे त्यांची खऱ्या गुन्हेगारांशी भेट होते.”

“हे काही तितकसं बरोबर नाही, जॅक्सन. ते रोजगार हमी योजना, शेत मजुरांच्या योजना असं बरंच काही करतायत.”

“तुम्हाला बरोबर माहिती आहे. पण माझा युक्तिवाद अजून तसाच आहे- नुसता प्रवेश नियमन कायदा उपयोगी नाही. तुम्ही त्यांना रस्त्याच्या कामावर पाठवा किंवा शेतावर किंवा आणखी कुठे काम द्या. पण एक लाख लोकांना अपराधी ठरवणे ही काही चांगली गोष्ट नाही.”

“मग तुम्हाला काय करावसं वाटतं?”

“ते मला आत्ता नाही सांगता येणार, पण मला एक नक्की माहित्ये - नुसता प्रवेश नियमन कायदा उपयोगी नाही.”

**

“आम्ही प्राणिसंग्रहालयाजवळच्या तळ्याकडे गेलेलो गं. पण हल्ली अगदी अशक्य झालंय. मला कळत नाही, ते काळ्या लोकांसाठी वेगळे दिवस का ठेऊ शकत नाहीत?”

“मी हल्ली रविवारी तिकडे अजिबात जात नाही. जॉन आणि पेनेलोपला तिकडे न्यायचंच असेल तर आम्ही कुठल्यातरी इतर दिवशी नेतो.”

“त्यांच्यासाठी मनोरंजनाची वेगळी ठिकाणं का नाही बनवत?”

“डोंगरावरच्या गोल्फ मैदानाच्या थोड्या भागात त्यांच्यासाठी वेगळी बाग बनवायची ठरवली आणि एवढा गहजब झाला की ती कल्पना रद्द करावी लागली.”

“म्हणून त्यांनी फुटपाथवर आणि नाक्या नाक्यावर हुल्लड करायची का? आणि तुला सांगते त्यांचा आवाज इतका कर्कश्श असतो! तुम्हाला बरंय, तुम्हाला आवाजाचा काही त्रास नाही.”

“इतका मत्सर बरा नाही हं. मला एक कळत नाही, ते त्यांच्यासाठी लांब कुठेतरी मोठ्ठी मनोरंजनाची ठिकाणं का नाही बनवत? हवं तर बिनपैशाने बसने त्यांची जाण्यायेण्याची सोयही करता येईल.”

“म्हणजे नेमकं कुठं बनवायचं?”

“तू फारच तेच तेच धरून बसतेस. शहरातच का हवंय?”

“त्यांना तिकडे जायलाच किती वेळ लागेल? आणि परत यायला? तू तुझ्या नोकरांना रविवारी किती तास सुट्टी देतेस?”

“बरं बरं, बास झाला हा वादविवाद. तुझी रॅकेट घे. मिसेस हार्वे आणि थेल्मा बोलावतायत आपल्याला. तुला एकदम जोशात खेळायला लागेल, बरं का.”

**

आणि काहीजण दक्षिण आफ्रिकेचे ताबडतोब वेगवेगळे तुकडे करण्यासाठी आरडाओरड करतायत जिथे गोरे काळ्यांशिवाय आणि काळे गोऱ्यांशिवाय राहतील. जिथे काळे त्यांच्या स्वतःच्या शेतात खपतील, स्वतःच्या खाणीत काम करतील आणि स्वतःचे कायदे स्वतः अंमलात आणतील. आणि काहीजण कामगारांना डांबून ठेवणाऱ्या वेठबिगारीविरुद्ध आरडओरडा करतायत. ज्यात बायका पोरं सोडून पुरुष शहरात येतात आणि ज्यामुळे समाज आणि घर आणि माणूस तुटतो. खाणी आणि कारखान्याजवळ काळ्या मजुरांची नवी गावं वसवावीत असं काही जणांचं म्हणणं आहे.

चर्चसुद्धा त्यांचा आवाज उठवतायत. इंग्रजी बोलणाऱ्यांची चर्चेस अधिक शिक्षण, अधिक संधी दिली जावी, काळ्या मजुरांवरील आणि त्यांच्या उद्योगांवरील निर्बंध उठवावे ह्या बाजूने बोलतायत. आफ्रिकान भाषा बोलणाऱ्यांच्या चर्चेसचं मत पूर्ण वेगळं आहे. काळ्या लोकांना त्यांच्या पायरीप्रमाणे संधी द्यायला हरकत नाही, पण त्यांना फार जवळ येऊ देऊ नये असं त्यांना वाटतं. नोकरांना घरातलाच माणूस बनवल्यामुळे आपली उच्च

धर्म आणि कुटुंबपद्धती लयाला जाते. काळ्यांची नीतिमत्ताही त्यामुळे खालावते ह्याची जाणीव आपल्या लोकांना करुन दिली जावी असं त्यांचं म्हणणं आहे. राज्यकारभार आणि चर्च मध्ये समानता नसावी ह्यासाठी ते आग्रही आहेत.

**

हो, इकडे शेकडो, हजारो आवाजांचा गदारोळ माजलाय. प्रचंड कोलाहल. कल्लोळ दाटून आलाय. सगळेच तावातावाने बोलतायत. पण जेव्हा कोणी एक सांगतोय आणि त्याच वेळेस दुसरा कोणी तितक्याच पोटतिडकीने दुसरे काहीतरी मांडतोय तेव्हा लक्ष तरी कशा कशाकडे देणार? जिथे काळे गोऱ्यांच्या कितीतरी पटीने जास्त आहेत तिथे राज्य कशाप्रकारे चालवायचं हे कोण सांगणार? काहीजण म्हणतात पृथ्वीकडे सगळ्यांसाठी पुरेसं आहे. एकाकडे जास्त म्हणजे दुसऱ्याकडे कमी असं होत नाही, एकाची प्रगती म्हणजे दुसऱ्याची अधोगती नाही. ते म्हणतात कमी पगार मिळणारे मजूर म्हणजे गरीब देश आणि जास्त पगार मिळणारे मजूर म्हणजे मोठ्या बाजारपेठा, कारखान्यांना आणि उत्पादकांना अधिक संधी! काहीजण म्हणतात हे फारच धोकादायक आहे. कारण जास्त पगार मिळणारे मजूर फक्त जास्त खरेदीच करतील असे नाही तर जास्त वाचतील, जास्त विचार करतील, जास्त मागतील. मुख्य म्हणजे मग ते आजच्यासारखे नेहमीच निमुटपणे अन्याय सहन करत राहणार नाहीत.

राज्य कशा प्रकारे चालवायचं हे कोण सांगणार? आम्हाला फक्त आमच्या मालमत्ता जाण्याची भीती वाटत नाहीये, खरी भीती तर आमचं श्रेष्ठत्व, आमचं गोरेपण हरवण्याची आहे. काळ्यांची गुन्हेगारी भयंकर आहेच पण त्यांना सुधारण्याच्या नादात आपलं गोरेपण नष्ट झालं तर? जे आपल्याकडे आहे ते नेटाने टिकवणं आणि त्यासाठी किंमत मोजणं जास्त बरं नाही का? काहींना ही भीती असह्य वाटते आहे तर काहींना ह्या भीतीमुळेच काही विचारमंथन होऊ शकेल अशी आशा वाटते आहे.

**

काय करायचं आम्हाला माहित नाही, खरंच माहित नाही. फारसा पुढचा विचार न करता आम्ही एकेका दिवसांपुरतेच जगत राहू. घरांना जास्त मोठी कुलुपं लावत जाऊ, घराची राखण करण्यासाठी भयंकर कुत्रे पाळू, आमच्या मौल्यवान वस्तू सांभाळून ठेऊ. झाडांचं रात्रीतलं आगळं सौंदर्य, लुकलुकत्या चांदण्यात दिल्या घेतल्या जाणाऱ्या शपथा आम्ही

विसरून जाऊ. दारू पिऊन मध्यरात्री झुलत-डुलत घरी येणं सोडून देऊ, संध्याकाळी गवतात चांदणं पित मनमुराद भटकणं सोडून देऊ. जगण्यातल्या छोट्या छोट्या आनंदांना नकार देऊ, इवल्या इवल्या सुखांना हद्दपार करू. आम्ही आमच्याभोवती काळजी आणि सुरक्षिततेची तटबंदी घालून घेऊ. आमचं आयुष्य संकुचित असेल पण तरीही आमचं श्रेष्ठत्व अबाधित असेल. ते सगळ्यात महत्वाचं. आम्ही सतत सावध राहू. भीतीचं आस्तित्व आम्हाला मान्यच आहे पण ही भीती निदान कल्पनेच्या पलीकडील तरी नसावी. अपराधांची टोचणी विझवली जाऊ शकते पण आत्मगौरवाची ज्योत तेवती राहिली पाहिजे. येत्या पिढ्यांसाठी हे श्रेष्ठत्व जपून ठेवलं पाहिजे, म्हणजे एक दिवस आपण पुन्हा हवं तसं जगू शकू. अजून तो दिवस आला नाही, पण तो कधी आणि कसा येईल ह्याचा विचार आतापासून नको.

**

आज रात्री पार्कवर्ल्ड मध्ये सभा आयोजित केली आहे, काल टर्फोंटेनला होती आणि उद्या मेफेअरला असणार आहे. लोकं आणखी पोलिसांची, चोर-लुटारुंसाठी आणखी कडक शिक्षांची, हत्यारं घेऊन घरात घुसणाऱ्यांना फाशीची शिक्षा देण्याची मागणी करणार आहेत. काहीजण काळ्या लोकांना श्रेष्ठ कोण आहे हे दाखवून देणारा नवा कायदा आणून गैरयुरोपीय लोकांच्या हितचिंतकांच्या आणि साम्यवादी मंडळींच्या चळवळींना पायबंद घालावा अशी मागणी करणार आहेत.

डाव्या मंडळींनीही ‘काळ्यांच्या गुन्ह्याबाबतचे दीर्घकालीन धोरण’ हा विषय घेऊन परिसंवाद आयोजित केला आहे आणि या विषयाचे वेगवेगळे पैलू समोर यावेत म्हणून युरोपीय आणि गैर युरोपीय अशा दोन्ही बाजूंच्या वक्त्यांना आमंत्रित केलं आहे. प्रमुख चर्च संघाने देखील ‘काळ्यांच्या गुन्ह्यामागची खरी कारणे’ या विषयावर सभा आयोजित केली आहे, पण त्या सभेवर आता खिन्नतेचे सावट आहे. त्या सभेचे वक्ते मि. आर्थर जार्विस यांचा नुकताच त्यांच्या राहत्या घरी गोळ्या झाडून खून करण्यात आला आहे.

**

माझ्या प्रिय देशा, आर्त आकांत कर. वारसा म्हणून ज्याला आपल्या पूर्वजांकडून भीती भेट मिळणार आहे अशा अजून जन्माला न आलेल्या बाळासाठी हुंदका राखून ठेव.

ते बाळ ह्या भूमीवर जास्त खोलवर प्रेम करणार नाही ह्याची काळजी घे. पावसाचं पाणी हातावर झेलताना त्याला फार खिदळू देऊ नकोस, सूर्यास्ताच्या कातरक्षणी संपूर्ण माळरान तांबूस सोनेरी रंगानी न्हाऊन निघत असतांना त्याला फार काळ हरवून जाऊ देऊ नकोस. पक्ष्यांच्या आर्त स्वरांत त्याच्या अंतरात्म्याला फार भिजू देऊ नकोस. इथल्या नदी नाल्यांवर, दऱ्या खोऱ्यांवर, पर्वत रांगांवर त्याला फार प्रेम करू देऊ नकोस. जर तो तुझ्या प्रेमात पार बुडाला तर भीती त्याच्यावर संपूर्ण घाला घालेल.

**

"मि. सिमँगु?"

"मिसेस न्देला, तुम्ही? या."

"मि. सिमँगु, माझ्याकडे पोलीस येऊन गेले."

"पोलीस?"

"हो. त्यांनी त्या म्हाताऱ्या ऊम्फुंडीसच्या मुलाची चौकशी केली. ते शोधतायत त्याला."

"कशासाठी ?"

"ते त्यांनी सांगितलं नाही, मि. सिमँगु."

"बातमी वाईट आहे का?"

"हो, वाईटच असावी."

"आणि? मग काय झालं?"

"मी घाबरून गेले, ऊम्फुंडीस. घाबरून मी त्यांना मिसेस म्काईझ, ७९, ट्वेंटी थर्ड अव्हेन्यू, अलेक्झांड्रा हा पत्ता देऊन टाकला. ते म्हणाले, हो अनेक गैरव्यवहारात ह्या बाईचं नाव गोवलेलं आहे."

"तुम्ही त्यांना पत्ता दिलात?"

ते दरवाज्यात स्तब्ध उभे राहिले.

"माझं काही चुकलं का, ऊम्फुंडीस?"

“तुम्ही काहीच चुकीचं केलं नाहीत.”

“मी घाबरले होते.”

“कायदा मानायलाच हवा, ताई. कायदा सगळ्यात जास्त महत्वाचा.”

“आता मला जरा बरं वाटलं, ऊम्फुंडीस.”

त्यांनी त्या भोळ्या बाईला धन्यवाद दिले आणि सावकाश घरी परत जायला सांगितलं. क्षणभर थांबून ते गर्रकन वळले आणि त्यांच्या खोलीत गेले. टेबलाच्या खणातून त्यांनी लिफाफ्यात ठेवेलेले पैसे आणि कागद काढले आणि काहीतरी महत्वाचा निर्णय घेतल्यासारखे ते आपल्या पाकिटात ठेवले. बाहेर जायचे कपडे घातले आणि त्यांनी मिसेस लिथेबेंच्या घराकडे खिडकीतून पाहत द्‌विधा मनस्थितीत मान डोलावली. पण त्यांना निघायला तसा उशीरच झाला कारण जाण्यासाठी त्यांनी दरवाजा उघडला तर समोर कुमालो उभे होते.

“कुठे बाहेर जातोयस का, मित्रा?”

सिमँगु गप्प राहिला. “हो, बाहेर जात होतो." शेवटी तो बोललाच.

“पण आज तर तू खोलीतच काम करणार आहेस असं म्हणाला होतास.”

मला माझ्या मनाप्रमाणे काहीच करता येणार नाही का? असं काहीतरी बोलावं असं त्याला वाटलं पण कोणीतरी थांबवल्यासारखं तो म्हणाला, “या.”

“मी नंतर येतो हवं असलं तर.”

“या ना, आत या.” असं म्हणत सिमँगुने दरवाजा बंद केला. “दादा, आताच इस्ट स्ट्रीटवरील मिसेस न्देला येऊन गेल्या.”

सिमँगुचा काळजीचा स्वर लपून राहू शकला नाही. कुमालो ते कळकळीच्या सुरातलं बोलणं ऐकायला लागले. “काही कळलं का?” त्यांच्या प्रश्नात उत्सुकता नव्हती, भीती होती.

“एवढंच की त्यांच्याकडे आपल्या मुलाला शोधायला पोलीस येऊन गेले. त्यांनी पोलिसांना मिसेस म्काईझ, ७९, ट्वेंटी थर्ड अव्हेन्यू, अलेक्झांड्रा हा पत्ता देऊन टाकला.”

“ते अब्सालोमला का शोधत होते?” कुमालोंनी हलक्या आणि थरथरत्या आवाजात विचारलं.

“माहित नाही. मी आत्ता तिकडेच जायला निघत होतो, तेवढयात तुम्ही आलात.”

कुमालोंनी कृतज्ञतेने आणि कातर नजरेने त्याच्याकडे पाहिलं. “तू एकटाच चालला आहेस?”

“हो, तुम्हाला दगदग नको म्हणून मी एकटाच जाणार होतो पण आता तुम्हाला कळलंय तर तुम्हीही बरोबर येऊ शकता.”

“तू कसा जाणार आहेस मित्रा? अजूनही बस नाहीयेत.”

“मी टॅक्सीने जाणार होतो. माझ्याकडे पैसे आहेत.”

“माझ्याकडेही आहेत.”

“खूप पैसे लागतील.”

कुमालोंनी आपल्या कोटातून घाईघाईने पाकीट काढलं आणि ते म्हणाले, “हे बघ, आहेत पैसे.”

“बरं. चला आता निघूया.”

**

“मिसेस म्काईझ!”

त्यांनी संशयाने दोघांकडे बघितलं.

“पोलीस येऊन गेले का?”

“हो, थोड्याच वेळापूर्वी .”

“त्यांना काय हवं होतं?”

“अब्सालोम.”

“मग तुम्ही काय सांगितलंत?”

“मी सांगितलं, तो वर्षभरापूर्वीच इथून निघून गेलाय.”

“मग ते नंतर कुठे गेले?”

“शांती टाऊन.” आधीचं आठवून जीभ चावत त्या म्हणाल्या.

“म्हणजे तुम्हाला माहित नसलेल्या पत्त्यावर.” तो थंडपणे म्हणाला.

त्यांनी चिडून त्याच्याकडे बघितलं. “मग काय करणार? ते पोलीस होते.”

“बरं, पत्ता काय?”

“मला पत्ता माहित नाही. शांती टाऊन, एवढंच सांगितलं मी त्यांना.”

डोळ्यात चमक आल्यासारख्या त्या म्हणाल्या, “मी म्हटलं नव्हतं, मला पत्ता माहित नाहीये.”

**

“नमस्कार, मिसेस ल्हात्श्वायो.”

प्रसन्न चेहऱ्याची बाई त्यांच्याकडे बघून हसली आणि झोपडीत त्यांनी शिरावं म्हणून थोडीशी बाजूला सरकली.

“आत येत नाही आम्ही. पोलीस येऊन गेले का?”

“हो, येऊन गेले, ऊम्फुंडीस.”

“त्यांना काय हवं होतं?”

“ते अब्सालोमला शोधत होते.”

“कशासाठी, मावशी?”

“मला माहित नाही, ऊम्फुंडीस.”

“ते पुढे कुठे गेले?”

“ते इथनं शाळेत गेले असावेत.”

हलक्या आवाजात त्याने विचारलं, “काही गंभीर वाटत होतं का?”

“तसं काही सांगता नाही येणार.”

“येतो, मिसेस ल्हात्श्वायो.”

“सांभाळून जा, ऊम्फुंडीस.”

**

“सुप्रभात, मित्रा.”

“सुप्रभात, ऊम्फुंडीस.” काळा सहाय्यक म्हणाला.

“तो गोरा तरुण कुठे गेला?”

“ते नुकतेच शहरात गेले.”

“पोलीस आलेले का इकडे?”

“हो आलेले. तेही नुकतेच गेले.

“त्यांना काय हवं होतं?”

“अब्सालोम कुमालो, ते टॅक्सीत बसलेत ना, त्यांचा मुलगा हवा होता.”

“त्यांना का हवा होता तो?”

“मला नेमकं माही नाही. मी दुसऱ्या कामात होतो. ते गोऱ्या माणसाबरोबर आत आले आणि मी तिथून बाहेर आलो.”

“त्यामुळे तुम्हाला माहित नाही ते का आलेले?”

“मला खरंच नाही माहित, ऊम्फुंडीस.”

सिमँगु काही वेळ गप्प झाला आणि मग त्याने शेवटी विचारलंच, “काही गंभीर वाटत होतं का?”

“मला माहित नाही. मला खरंच काही सांगता येणार नाही.”

“गोरा माणूस अस्वस्थ वगैरे झाल्यासारखा वाटत होता का?”

“हो, ते अस्वस्थ वाटत होते.”

“तुम्हाला कसं कळलं?”

तो सहाय्यक हसला. “मी ओळखतो त्यांना.” तो म्हणाला.

“ते पुढे कुठे गेले?”

“पिम्विलेला, ऊम्फुंडीस. त्या मुलीच्या घरी.”

“कधी गेले?”

“आत्ताच, तुम्ही यायच्या अगदी थोडा वेळ आधी.”

“मग आम्हीही जातो. चला, येतो आम्ही. आणि त्या गोऱ्या माणसाला सांगा, आम्ही येऊन गेलो असं.”

“सांभाळून जा. मी सांगतो त्यांना.”

**

“पोरी!”

“ऊम्फुंडीस!”

“पोलीस येऊन गेले का इकडे?”

“हो, आताच येऊन गेले.”

“त्यांना काय हवं होतं?”

“त्यांना अब्सालोम हवा होता, ऊम्फुंडीस.”

“तू काय सांगितलस त्यांना?”

“मी शनिवारपासून त्याला बघितलं नाहीये असं त्यांना सांगितलं.”

“त्यांना तो कशासाठी हवा होता?” सिमँगुने जरा ओरडूनच विचारलं.

ती दचकून मागे सरकली. “मला माहित नाही.”

"मग तू विचारलं का नाहीस?"

तिचे डोळे भरले. "मी घाबरले होते" ती म्हणाली.

"कोणीच विचारलं नाही?"

"बायका विचारणार होत्या. कदाचित त्यांच्यापैकी कोणीतरी विचारलं असेल."

"कुठल्या बायका? मला दाखव त्या." सिमँगु म्हणाला.

तिने त्या बायका दाखवल्या. पण त्यांनाही काही माहित नव्हतं.

"त्यांनी आम्हाला काही सांगितलं नाही." एक बाई म्हणाली.

"काही गंभीर वाटत होतं का?" सिमँगुने हलक्या आवाजात विचारलं.

"हो, जरा गंभीरच वाटत होतं. काय झालंय?" तिने विचारलं.

"आम्हालाही माहित नाही, ताई"

तो टॅक्सीकडे गेला आणि कुमालोही त्याच्या मागोमाग निघाले. तेवढयात ती मुलगी पोटुशी बाईने धावावं तशी धावत आली.

"तो घरी आला की मला त्यांनी लगेच कळवायला सांगितले आहे."

तिच्या डोळ्यात प्रश्नचिन्ह दिसत होते. "मी काय करू?" तिने विचारलं.

"तू त्यांना फोन करून कळव आणि लगेच आम्हालाही सांग. व्यवस्थापकाच्या कार्यालयात जाऊन तू त्यांना मिशन हाउस, सोफिया टाऊनला फोन करायला सांगशील. मी तुला नंबर लिहून देतो. ४९-३०४१".

"मी फोन करीन."

"पोलीस काही म्हणाले का, ते कुठे जाणार आहेत."

"ते काही म्हणाले नाहीत. पण मी त्यांना सगळी मेहनत वाया गेली असं बोलताना ऐकलं."

"बरं, येतो आम्ही."

“सावकाश या, ऊम्फुंडीस.” ती कुमालोनाही निरोप द्यायला जाणार होती पण तितक्यात ते टॅक्सीत जाऊन बसले होते.

“किती पैसे झाले, मित्रा?” सिमँगुने विचारले.

“दोन पाउंड आणि दहा शिलिंग.”

कुमालोंनी थरथरत्या हातात त्यांचे पाकीट घेतले.

“मला यात तुम्हाला मदत करायची इच्छा आहे,” सिमँगु म्हणाला. “मला तुम्हाला मदत करायला खूप आनंद होईल.”

“पूर्ण वेळ तुझीच तर मदत आहे मित्रा. मला निदान पैसे तरी खर्च करू देत.” कापऱ्या आवाजात पाकिटातून पैसे काढत कुमालो म्हणाले.

“तुम्ही थरथरत आहात, दादा.”

“मला थंडी भरली आहे, खूप थंडी.”

सिमँगुने निरभ्र आकाशाकडे आणि पृथ्वीवर तेज ओतणाऱ्या आफ्रिकेच्या तळपत्या सूर्याकडे बघितलं. “माझ्या खोलीत या, शेकोटीभोवती बसुया म्हणजे तुम्हाला जरा बरं वाटेल.”

13

एझेन्झेलेनीला जातानाचा प्रवास नि:शब्द होता. स्टेशनपासून अंधांच्या आश्रमापर्यंत चालत जात असताना संवाद साधण्याचा प्रयत्न सिमँगुने करून पहिला पण कुमालोंनी त्याला फारसा प्रतिसाद दिला नाही.

“मी इथे काम करत असतांना तुम्ही काय कराल?”

“तू सांगितलेल्या जागांपैकी एखाद्या ठिकाणी मी शांतपणे बसेन आणि जेव्हा तुझं काम आटपेल तेव्हा तू मला एझेन्झेलेनीचा एक फेरफटका मारून आण.”

“तुम्ही म्हणाल तसं.”

“माझ्यामुळे तू निराश तर झाला नाहीस ना?”

“अजिबात नाही, दादा. तुमची अवस्था मला अगदी समजतेय.”

सिमँगुने त्यांची ओळख युरोपीय व्यवस्थापकाशी करून दिली. तो त्यांना मि. कुमालो म्हणाला, जे खरं तर जनरीतीत बसत नव्हतं. सिमँगुने व्यवस्थापकांना त्यांच्याविषयी आधीच थोडं सांगितलेलं असावं. त्यामुळेच सिमँगु काम करीत असताना जेवायची वेळ होईपर्यंत त्यांनी कुमालोंना एका निवांत, मोकळ्या जागी फिरायला पाठवलं.

थोडा वेळ फिरून झाल्यावर कुमालो उन्हात जाऊन बसले. तिथल्या आश्वासक वातावरणामुळे किंवा नजर पोहचेल इतक्या लांबपर्यंत असणाऱ्या मोकळ्या मैदानांमुळे, लांबवर दिसणाऱ्या निळ्याशार पर्वतांमुळे, जरा निवांतपणा मिळाल्यामुळे किंवा कदाचित यातनांनी थकलेल्या आत्म्यावर झालेल्या ईश्वरी कृपेमुळे त्यांच्या मनःस्थितीत किंचित सुधारणा झाली. भीतीचा भार थोडा हलका झाला.

सिमँगुने म्हटलं ते खरंच आहे की. शहरात लाखो लोक असताना आपणच भीती कशाला बाळगायची? ह्या मायावी नगरीत आपला मुलगा बहकलाय हे खरं, पण त्याच्या आधीही कितीतरी लोकं इथे बहकली आहेत आणि जोपर्यंत त्या महागुपिताचा छडा लागत नाही तोपर्यंत त्याच्यानंतरही कितीतरी लोकं बहकणार आहेत. पण त्याने माणसाला मारावं? तेही गोऱ्या माणसाला? कुठल्या कारणामुळे हे घडलं असेल याची कोणतीही, अगदी कोणतीही शक्यता त्यांच्या लक्षात येत नव्हती.

त्यांच्या मनात आता त्या मुलीचा आणि अजून न जन्मलेल्या बाळाचा - त्यांच्या नातवंडाचा विचार आला. त्यांच्यासारख्या पाद्र्याचा नातू अशा पद्धतीने जन्माला यावा हे त्यांना लाजीरवाणं वाटलं. त्यांचं लग्न झालं तर किती बरं होईल. झालेल्या चुकीची थोडीशी तरी भरपाई होईल. शक्य झालं तर त्यांचा मुलगा आणि त्या मुलीला त्यांना न्दोत्शेनीला घेऊन जाता येईल. कदाचित ते आणि त्यांची बायको ह्या बाळाला ते देण्याचा प्रयत्न करतील जे आपल्या मुलाला देण्यात ते कमी पडले. पण ते कुठे चुकले? त्यांनी असं काय केलं किंवा त्यांचं काय चुकलं की ज्यामुळे त्यांचा मुलगा चोर बनून उडाणटप्पू असल्यासारखा ह्या ठिकाणाहून त्या ठिकाणी पळतोय. अजूनही अजाण असलेल्या मुलीसोबत राहतोय, ज्याला त्याचं नाव देता येणार नाही अशा मुलाचा बाप होतोय. तरीही जोहान्सबर्गमध्ये असं चालायचंच असं म्हणत त्यांनी स्वतःचं सांत्वन केलं. पण जरा बरं वाटत नाही तोच त्यांच्या मनातली भीती पुन्हा उफाळून वर आली. त्यांच्या मुलाने त्या मुलीला आणि अजून न जन्मलेल्या बाळाला वाऱ्यावर सोडलं, गोऱ्या माणसाने दिलेलं काम सोडलं आणि पुन्हा उडाणटप्पू असल्यासारखा तो ह्या ठिकाणाहून त्या ठिकाणी फिरतोय. उडाणटप्पू लोक काय करतात? निरुद्देश फिरत असतांना ते कायदे आणि रूढी मोडत नाहीत का? त्यांच्या क्षुल्लक फायद्याच्या आड येणाऱ्यांवर त्यांचा हात उठत नाही का?

दुसऱ्याला ठार मारण्यासाठी एक सत्शील माणूस स्वतःला कसा काय तयार करू शकतो? दुसऱ्याच्या गरम शरीरात सुरी भोसकण्यासाठी किंवा जिवंत डोक्यावर कुऱ्हाड घालण्यासाठी, आपल्याला बघत असलेल्या दोन डोळ्यांना मधोमध चिरण्यासाठी, धडधडणाऱ्या हृदयाला गपगार करणाऱ्या बंदुकीतून गोळी झाडण्यासाठी माणूस स्वतःच्या मनाला कसा काय तयार करू शकतो?

त्यांच्या अंगाचा थरकाप झाला आणि इतका भयंकर विचार करण्यापासून त्यांनी स्वतःला थांबवलं. पुन्हा आत्मचिंतनानेच त्यांना आश्वस्त केले. न्दोत्शेनीतल्या इतक्या वर्षात, आपल्या मुलाच्या संपूर्ण बालपणाच्या जडणघडणीत त्यांना एकही, अगदी एकही गोष्ट अशी आढळली नाही की जी तो इतकं भयंकर कृत्य करू शकतो याला दुजोरा देईल. सिमँगु बरोबर आहे. अनिश्चिततेमुळे आपल्या मनात ही भीती आहे. नाहीतर खरं म्हणजे या शहरात लाखो लोक आहेत.

सुटकेचा निश्वास सोडत ते जाणीवपूर्वक आशादायी विचार करायला लागले. ह्या सरत्या वयात आपल्या बायकोबरोबर गर्टरुड आणि तिचा मुलगा, आपला मुलगा, ती मुलगी आणि बाळ ह्यांच्यासाठी पुन्हा घर उभारण्याची स्वप्नं ते रंगवायला लागले. जोहान्सबर्ग बघितल्यानंतर आता जगण्याविषयीच्या अधिक खोल समजुतीने ते न्दोत्शेनीला परततील. वेश्या बहीण, चोर मुलगा आणि नाव नसलेला नातू ह्यांना स्वीकारल्यामुळे सगळ्यांकडे ते अधिक विनयाने आणि सहृदयतेने बघू शकतील. त्रास होत असूनही मनात कडवटपणा न ठेवता त्यांनी हा विचार केला. विरोध केलेल्या गोष्टींबद्दलची समज वाढल्याने, कोणत्या गोष्टींची नव्याने रचना करणे आवश्यक आहे हे कळल्याने ते अधिक समजूतदार होऊन परत जाऊ शकतील. शाळा म्हणजे केवळ लेखन, वाचन, गणित शिकण्याची जागा नाही. शाळा म्हणजे मुलांना जगाच्या पाठीवर कुठेही सन्मानाचे आयुष्य जगायला तयार करणारं ठिकाण आहे. आपल्या निष्प्राण समाजात नव्याने चैतन्य निर्माण करण्यासाठी शाळा ही सगळ्यात महत्वाची आणि तातडीची गरज आहे हे समजून घेत ते गावी परत जातील. शाळा - माणसांना खरे शिक्षण देणाऱ्या, जुने कायदे आणि रीतीभाती ह्यांची जागा घेऊ शकणाऱ्या, सगळीकडे पसरलेल्या शाळा. बाहेरच्या जगात कुठेही गेलं तरी शाळा मुलांना उपयोगी पडतील. क्षणभरासाठी राख आणि विनाशाच्या ढिगाऱ्यावर बसूनही ते अशा सुखद मनोराज्यात गुंतले .

हो, हे खरं आहे की आपला समाज आता पुन्हा न जोडला जाण्याइतका दुभंगलाय. आतापर्यंत पहिल्यांदाच त्यांनी स्वतःशी हे संपूर्णपणे मान्य केलं. हवेत तरंगणाऱ्या माणसाचे जादुई पंख गळून पडले की तो जसा भीतीने धास्तावून जमिनीकडे बघेल तसंच त्यांचंही झालं. आपला समाज आता पुन्हा न जोडला जाण्याइतका दुभंगलाय. ज्याने त्यांचं, त्यांच्या बापाचं, बापाच्या बापाचं पोषण केलं तो समाज आता दुभंगलाय. पुरुष दूरदेशी गेले, तरुण मुलं आणि मुली दूरदेशी गेल्या आणि मका आता जेमतेम पुरुषभर उंचीचा होतोय.

“जेवण तयार आहे, दादा.”

“अरे! एवढ्या लवकर?”

“तुम्ही इथे येऊन बराच वेळ झाला.”

“मला कळलंच नाही.”

“इथे आल्यापासून काही सापडलं का तुम्हाला?”

“नाही, काहीच नाही.”

“काहीच नाही?”

“जास्त भीती आणि जास्त दुःखं! जगात भीती आणि दुःखं ह्याशिवाय दुसरं काहीच नाही.

“दादा..”

“काय?”

“मला तुमच्याशी बोलताना संकोच वाटतो.”

“तुला अधिकार आहे मला बोलण्याचा. तुला वाटेल ते बोलू शकतोस तू मला.”

“तुमच्यापेक्षा वयाने लहान आहे मी. पण तरीही धर्मगुरू ह्या नात्याने सांगतो. आता हे नकारात्मक विचार झटकून टाकण्याची वेळ आली आहे. त्याच त्या विचारात गुंतून राहणं वाईट आहेच. पण ते पापही आहे.”

कुमालोंनी मान तुकवली. “तुम्ही बरोबर बोलताय, फादर. आणखी जास्त वेळ इथे बसायला नको.”

**

एझेन्झेलेनी हे एक आश्चर्यकारक ठिकाण आहे. कसेबसे दिवस ढकलणाऱ्या अंधांना इथे नवी दृष्टी दिली जाते. इथे ते अशा वस्तू बनवतात ज्या बनवण्याचा डोळस माणूसही विचार करू शकत नाही. वेगवेगळ्या रंगांच्या काठ्यांनी विणलेल्या भल्या मोठ्ठ्या आणि मजबूत टोपल्या. कुठल्या जादूने त्या कामट्या एकमेकांत गुंतवल्या जातात ते कळतच नाही. एकत्र येताना, लालजवळ लाल आणि निळ्याजवळ निळी अशी एखादी रचना होत त्या आपल्या डोळ्यांसमोर दृष्टिहीन हातांच्या जादूने साकार होतात. ते तिथल्या लोकांशी बोलले. त्यांच्या दृष्टी नसलेल्या डोळ्यात इतकी चमक होती की स्फुल्लिंग म्हणजे काय ते त्यांना तेव्हा समजलं. गोऱ्या लोकांनी दयेपोटी हा व्यवसाय चालू केला होता. इंग्रजी

बोलणारे आणि आफ्रिकान बोलणारे इथे काम करत होते. हो, इंग्रजी बोलणारे आणि आफ्रिकान बोलणारे एकत्र येऊन काळ्या माणसांना नवी दृष्टी देत होते.

सिमँगु चॅपेलमध्ये संध्याकाळी प्रवचन देणार होता, पण इथे असणारे सगळे एकाच चर्चचे नसल्यामुळे चर्चमध्ये असतं तसं उंच आसन आणि क्रूस इथं नव्हतं. क्रूस भिंतीवरच बसवला होता. भिंतीवर पडलेल्या दोन फटी न सांधता तशाच उघड्या ठेवल्या होत्या. सोफिया टाऊनला तो वापरतो ते पाद्र्याचे वस्त्रही सिमँगु नेसला नव्हता. दुसऱ्या दिवशी सकाळी आपल्या लोकांना चर्चच्या कामासाठी नेमताना ते वस्त्र तो नेसणार होता.

**

सिमँगुने ग्रंथ उघडला आणि ग्रंथातील पहिली काही वाक्यं वाचून दाखवली. कुमालोंना माहित नव्हतं की त्यांच्या मित्राचा आवाज इतका सुरेल आहे. त्याच्या आवाजात गोडवा होताच पण मुख्य म्हणजे पुस्तकातील शब्दांवर नितांत श्रद्धा होती. त्या आवाजाला एक नाद होता, लय होती, ताल होता. त्या आवाजात गहन गंभीर आश्वासकता होती. तो आवाज ऐकून मनात काहीतरी हलायचं. चर्चसमोरच्या घंटेचा आवाज ऐकून हलतं तसं! केवळ तो आवाजच अमृतासारखा नव्हता तर तो अशा माणसाचा आवाज होता, ज्याच्या हृदयात देखील अमृतच होते आणि तो जे शब्द वाचत होता तेही अमृताचेच होते. लोकं शांत होती, कुमालो शांत होते कारण असा अमृताचा तिहेरी संगम त्यांना आणखी कुठे अनुभवायला मिळाला असता?

मी, ईश्वर, तुम्हाला सन्मार्गावर बोलवतो आहे

तुमचे बोट धरून तुम्हाला चालवीन, तुमचा सांभाळ करीन

तुमच्या उन्नतीचा करार करतो मी,

मी नास्तिकांना प्रकाश दाखवीन,

अंधांना दृष्टी देईन

बंदिवानांना मुक्त करेन

काळोखात बसून राहिलेल्यांना उजेडात नेईन.

आवाज वाढला आणि झुलू बोलणारे स्वर आनंदमय आणि दिव्य होत होते, तो माणूसही आनंदमय होत चालला होता. जणू इतरांपेक्षा स्वतःसाठी अधिक काही मिळवायला तो आला होता. दृष्टिहीन लोकं स्तब्ध होती कारण त्यांना दृष्टी हवी होती. कुमालोही स्तब्ध होते कारण अंधांप्रमाणे त्यांनाही नवी दृष्टी हवी होती.

अंधांना मी गूढ मार्गावरून अलगद नेईन

सोबत करीन, वाटाड्या होईन

अंधारलेली वाट उजळवून टाकीन

वेड्यावाकड्या गोष्टी सरळ करीन

पाठीवर हात ठेवीन

फसवून कधी सोडून नाही जाणार

हो, तो माझ्याशी बोलला. नक्कीच. मला अजिबात शंका नाही. तो म्हणाला, त्याने मला सोडून दिलेलं नाही. काही वेळापूर्वीच मी विचार करत होतो, कशासाठी आपण जगतो, संघर्ष करतो आणि मरतो. काही वेळापूर्वीच मी विचार करत होतो, ते काय असतं जे आपल्याला जगवतं, लढायला ताकद देतं. गोऱ्यांना काळ्या अंधांची सेवा करायला पाठवलं जातं. माझ्यामध्ये भरून आलेला काळोख उजळवणारा मित्र मला कोण देतं? एका तरुणाकडे एका म्हाताऱ्याचे सांत्वन करण्याइतका शहाणपणा कोण देतं? माझ्या मुलाने सोडून दिलेल्या मुलीबद्दल माझ्या मनात अनुकंपा कोण निर्माण करतं? हो, तो माझ्याशी बोलतोय. अगदी साध्या आणि हळुवार शब्दांत. तो म्हणतो त्या संतांप्रती आम्ही कृतज्ञ आहोत. तेच ह्या यातनामय दिवसात आपली उमेद वाढवतात. मग आपण का मागे रहायचं? आपणच जर आपली उमेद टिकवली नाही तर संत तरी आपल्याला कसे सांभाळू शकतील? जर स्वर्गाचा खरा मालक, मानवजातीचा राजा येशू ख्रिस्त मरणप्राय यातना सहन करू शकतो तर आपलं दुःखं असं किती मोठं आहे की जे आपण सहन करू शकत नाही?

मी ऐकतोय, भावा. तुझा शब्द न शब्द मी ऐकतोय.

त्याचं वाचन आता संपत आलंय. आश्वस्त करणाऱ्या आवाजातून ते कळतंय. तो आवाज दृढपणे पुन्हा पुन्हा सागतोय की मी योग्य तेच म्हटलंय. तेच अंतिम सत्य आहे. त्याने पुस्तक उघडून पुन्हा एकदा वाचलं. माझ्यासाठी पुन्हा एकदा वाचलं:

हे माहित नव्हतं, हे ऐकलं नव्हतं?

ईश्वर अंतिम सत्य आहे, ईश्वर अनंत आहे,

हे विश्व त्याच्यातून निर्माण होतं आणि त्याच्यातच विलय पावतं

तो सर्वशक्तिमान आहे, आनंदनिधान आहे.

आणि आवाज पुन्हा चढला. झुलू भाषा बोलणारे स्वर आणखी आनंदमय आणि दिव्य होत गेले, तो माणूसही आणखी आनंदमय होत गेला...

एकवेळ तरुण लोकही दमतील, थकून जातील

क्वचित कधी गळून जातील

पण जे त्याला शरण गेलेत

अक्षय्य उर्जेने भरून राहतील

गरुडासारखी अस्मानभरारी घेतील

न दमता न थकता पुढेच जात राहतील

सदैव पुढेच राहतील

लोकांनी उसासा टाकला. काहीतरी अद्भुत ऐकल्यासारखा कुमालोंनी उसासा टाकला. सिमँगु खरोखर अद्भुत प्रवचक होता. जोहान्सबर्गमध्ये लोकं म्हणतात की प्रशासनासाठी हे बरंय की सिमँगु भौतिक जगाबद्दल प्रवचन देत नाही. तो लोकांच्या हृदयाला स्पर्श करतो, लोकांना प्रिटोरिया* ऐवजी स्वर्गाकडे पाठवतो. गोरी लोकं त्याची प्रशंसा करताना म्हणतात जे आता आतापर्यंत हजारोंनी कत्तल केले गेले आणि नागविले गेले,

**प्रिटोरिया - दक्षिण आफ्रिकेच्या तीन राजधान्यांपैकी एक राजधानी*

अशा मागास जमातीच्या मुलाच्या तोंडून अशी देववाणी ऐकायला मिळते आहे.

तरीही काहीजण त्याला तुच्छ लेखायचे. हा स्वर्गीय आवाज देशाला जागृत करण्यासाठी वापरला गेला असता तर त्याचा काहीतरी उपयोग झाला असता असं लोक म्हणायचे. जर हा आवाज लोकांमध्ये हिंमत निर्माण करू शकला, चांगल्या कामासाठी त्यांना एकत्र आणू शकला, तर या यातनामय परिस्थितीतून लोकांची सुटका होऊ शकते. लोक म्हणतात सिमँगु भौतिक जगाबद्दल बोलत नाही. त्याच्या बाजूच्या रस्त्यावरच माणसं दुःख सहन करतात, भांडतात आणि मरतात. हा काय मूर्खपणा आहे की त्याची बडबड एवढया सगळ्या लोकांच्या अकलेचा ताबा घेते, जेणेकरून भुकेला, आजारी माणूस समाधानाने सहन करतो आणि शांतपणे मरतो. मूर्ख लोक त्याचं शांतपणे ऐकतात, स्वर्गीय आनंद घेतात, त्याचं बोलून संपलं की उसासे टाकतात आणि त्याच्या पोकळ शब्दांनी आपली रिकामी पोटं भरतात.

कुमालो त्याच्याकडे गेले.

“भावा, मला आता खूप शांत वाटते आहे.”

सिमँगुचा चेहरा उजळला, पण तो विनयाने म्हणाला,“ह्यात माझा काहीच मोठेपणा नाही. ह्यात मला गर्व किंवा अभिमान वाटण्यासारखे काही नाही. मी अनेक प्रकारे तुमच्यापर्यंत येण्याचा प्रयत्न केला, पण जवळपासही येऊ शकलो नाही. म्हणून त्याचे आभार माना आणि सुखी व्हा.”

14

एझेन्झेलेनीहून परत आल्यानंतर कुमालोंनी मिशनमध्ये दुपारचं जेवण घेतलं आणि ते मिसेस लिथेबेंच्या घरी आपल्या भाच्याबरोबर खेळायला आले. मिसेस लिथेबेंनी गर्टरुडच्या टेबल, खुर्च्या आणि भांडीकुंडी ह्यासाठी गिऱ्हाईक शोधलं होतं आणि त्यांची त्याच्याबरोबर मोठी घासाघीस चालू होती. सगळ्या गोष्टी तीन पाउंडला विकल्या गेल्या. टेबल ज्या तऱ्हेने घासलं आणि डागाळलेलं होतं - कशामुळे ते कुमालोंनी विचारलं नाही- त्या मानाने तीन पाउंड ही रक्कम वाईट नव्हती. खुर्च्याही अगदीच कमकुवत झाल्या होत्या, इतक्या की बसणाऱ्याला जपून त्यावर बसावे लागे. पैसे खरेतर भांडयाकुंड्यांचे आले होते कारण ती ॲल्युमिनियमची होती. काळी माणसं अशी भांडीकुंडी वापरत नाहीत. पण त्यांची बहिण म्हणाली की तिला तिच्या मैत्रिणीने ती भांडी दिली होती. ह्याबद्दलही कुमालोंनी कधी काही चौकशी केली नाही.

गर्टरुडचा जुना कोट आणि बूट त्यांनी तिला घेतलेल्या नवीन लाल ड्रेस आणि पांढऱ्या हॅटवर अगदीच खराब दिसत होता. म्हणूनच त्या पैशातून बूट आणि पावसाळ्यात घालायचा कोट घेण्याची तिची इच्छा कुमालोंना अगदी मान्य होती.

जेव्हा सगळ्या वस्तू विकल्या गेल्या तेव्हा घर थोडं शांत झालं. छोट्या मुलाशी थोडा वेळ खेळूया असं ते म्हणत होते तेव्हढ्यात त्यांना समोरून सिमँगु आणि तो गोरा तरुण रस्त्यावरून त्यांच्या घराकडे चालत येताना दिसले आणि भितीने त्यांच्या पोटात गोळा आला. कसेबसे स्वतःला सावरत ते फाटकाजवळ गेले. आलेल्या माणसांचे उतरलेले चेहरे पाहून काहीतरी अघटित घडले आहे हे त्यांच्या लगेच लक्षात आले.

“नमस्कार, ऊम्फुंडीस. आपल्याला बसून बोलता येईल अशी एखादी जागा आहे का?” त्या तरुणाने विचारलं.

“माझ्या खोलीत जाऊया.”ते म्हणाले.

खोलीत त्यांनी दरवाजा बंद केला आणि दोघांकडे न बघता ते उभे राहिले.

“तुम्हाला ज्याची भीती वाटत होती, तेच मी ऐकलं” तरुण म्हणाला.

कुमालो सुन्न झाले. ते मटकन त्यांच्या खुर्चीत बसले आणि त्यांची नजर जमिनीला खिळली .

आता एखाद्याने काय बोलावं. त्यांच्या खांद्यावर हात ठेवावा, की हात हातात घ्यावा? अशा वेळेस कसं बोलावं हे माहित नसल्यामुळे सिमँगु आणि तो तरुण सुतकी घरात बोलतात तसे हळू आवाजात एकमेकांशी बोलत राहिले.

“सुधारगृहासाठी ही खूपच वाईट बातमी आहे.” खांदे उडवत तो तरुण मोठ्याने बोलला.

कुमालोंनी एकदा, दोनदा नव्हे तर तीन चार वेळा मान हलवली. जणू त्यांनाही हेच म्हणायचं होतं - सुधारगृहासाठी ही खूपच वाईट बातमी आहे.

“आमच्यासाठी हे खूपच धक्कादायक आहे. ते म्हणतील आम्ही ह्याला खूप लवकर सोडलं. अर्थात एक बरं आहे, बाकीचे दोघं सुधारगृहातले नाहीत. पण गोळी त्याने झाडली आहे.”

“दादा,” शक्य तितक्या सामान्य आवाजात सिमँगु म्हणाला, “दुसऱ्या दोघांपैकी एक तुमच्या भावाचा मुलगा आहे.”

कुमालोंची मान पुन्हा लटलट हलली. इथल्या कुणाशीच संबंध नसल्यासारखे ते उठले आणि खोलीत इकडे तिकडे पाहू लागले. त्यांनी खुंटीवरुन त्यांचा कोट काढला, घातला. डोक्यावर हॅट घातली आणि हातात काठी घेतली. तयार झाल्यावर त्यांचं लक्ष त्या दोघांकडे गेलं आणि त्यांची मान पुन्हा कापू लागली. त्यांच्या ह्या लगबगीचा अर्थ कुणालाच कळला नाही .

“तुम्ही बाहेर चालला आहात का?”

“तुम्हाला तुरुंगात जायचं आहे का? मी परवानगी घेऊन ठेवली आहे.”

कुमालोंनी मान हलवली. ते वळले आणि खोलीत पुन्हा एकदा इकडे तिकडे पहायला लागले. मग त्यांना लक्षात आलं की कोट त्यांच्या अंगावर आहे. त्यांनी कोट आणि हॅट चाचपून बघितली आणि नंतर त्यांनी खाली त्यांच्या हातातच असलेल्या काठीकडे बघितलं. भानावर आल्यासारखे ते म्हणाले, “आधी माझ्या भावाकडे जायचंय, तू मला घेऊन जाशील का?”

“हो, हो. मी येतो न तुमच्या बरोबर.”

“मी तुमची मिशनमध्ये वाट बघीन” तो तरुण म्हणाला.

सिमँगु दरवाजा उघडणार इतक्यात त्यांनी त्याला सांगितलं, मी हळूहळू रस्त्यापर्यंत चालत जातो तोपर्यंत तू त्यांना सांगून ये. हाताने त्या बाजूला दाखवत ते म्हणाले.

“मी सांगतो त्यांना, दादा.”

सिमँगुने आत जाऊन त्यांना सांगितलं. ते ऐकल्यावर बायकांनी गळा काढून मोठयाने रडायला सुरुवात केली. त्याने दरवाजा बंद केला आणि सर्वस्व हरपलेल्या, मोडून गेलेल्या कुमालोंच्या मागोमाग तो जाऊ लागला. त्यांची मान अजूनही लटलट कापत होती. काही दिवसांतच ते इतके म्हातारे दिसू लागले आहेत की लवकरच ते जख्ख म्हातारे तर होणार नाहीत ना? पुन्हा कधीतरी ते ताठ मानेने जगू शकतील? जे झालंय ते त्यांना विसरता येईल? पण सिमँगुला पक्कं ठाऊक होतं, हा धक्का ते कधीच विसरू शकणार नाहीत.

सिमँगुने त्यांना टेकडीच्या माथ्यावर गाठलं. छोट्या मुलाला किंवा आजारी माणसाला आधार द्यावा तसा त्याने त्यांचा हात घट्ट धरला. ते दुकानाजवळ आले. डोळे मिटून ते काहीतरी पुटपुटले. थोड्या वेळाने त्यांनी डोळे उघडले आणि ते सिमँगुला म्हणाले,

“तू आत येऊ नकोस. हे मलाच केलं पाहिजे.”

आणि ते एकटेच दुकानात शिरले.

दुकानात शिरल्या शिरल्या त्यांना तो आत्मविश्वासाने भरलेला भरदार पहाडी आवाज ऐकू आलाच. त्यांचा भाऊ जॉन मुखियासारखा रुबाबात खुर्चीत बसला होता आणि दोन माणसांशी बोलत होता.

बाहेरून येणारा उजेड त्या दोन माणसांच्या पाठीवर पडत असल्यामुळे त्या अंधुक प्रकाशात जॉनने कुमालोंना ओळखलंच नाही.

“गुड मॉर्निंग, जॉन.”

“गुड मॉर्निंग, सर.”

“गुड मॉर्निंग जॉन, मी आलोय.”

“अरे दादा, तू आहेस होय. वा,वा आनंद झाला तुला बघून. ये ना इकडे बसायला.”

कुमालोंनी पाहुण्यांकडे बघितलं. “मला माफ कर, पण मी पुन्हा कामासाठी आलोय, तातडीच्या कामासाठी.”

“माफ करा मित्रांनो, माझा भाऊ आलाय. आपण नंतर बोलूया का?”

मग ते दोन्ही पाहुणे निरोप घेऊन गेले.

“वा वा, आनंद झाला तुला बघून. तुझं काम कसं चाललंय? सापडला का तुझा परागंदा झालेला मुलगा? तुला कळेलच की मी माझी आधीची शिकवणूक पूर्णपणे विसरलो नाही.” तो गडगडाट करत हसला. पण आधी आपण चहा घ्यायला हवा असं म्हणत तो दरवाज्याच्या मागच्या बाजूला गेला.

“अजून तीच बाई आहे. हे बघ, माझीही काही तत्व आहेत. तुम्ही इंग्रजीत काय म्हणता त्याला?” आणि तो पुन्हा जोरजोरात हसला. तो आपल्या भावाच्या भावनांशी खेळत होता.

“नैतिकता! हाच शब्द होता ना? चांगला शब्द आहे. सहजासहजी विसरणार नाही मी. आपले मि. सिमँगु फार हुशार आहेत. आणि तुझा तो परागंदा मुलगा. सापडला का तुला तो?”

“सापडला. पण तो जसा पूर्वी होता तसा सापडला नाही. तो तुरुंगात आहे. गोऱ्या माणसाच्या खुनाच्या आरोपाखाली त्याला अटक झाली आहे.”

“खून?” आता त्याची चेष्टा मस्करी बंद झाली. खुनाबद्दल कळल्यावर कोणी चेष्टा करत नाही. गोऱ्या माणसाच्या खुनाबद्दल तर जराही नाही.

“हो, खून! तो पार्कवर्ल्ड मधील एका घरात घुसला आणि त्याला विरोध करणाऱ्या गोऱ्या माणसाचा त्याने खून केला.”

“काय? हो, मला आठवतंय. एक किंवा दोन दिवसांपूर्वी ना? मंगळवारी?”

“हो.”

“हो, मला आठवतंय बातमी वाचल्याचं.”

त्याला आठवलं. बातमीत दोन तीन जणांचा उल्लेख होता. त्याला हेही आठवलं की त्याचा मुलगा आणि त्याच्या भावाचा मुलगा सतत एकत्र असायचे. त्याच्या कपाळावर घाम जमा झाला. त्याच्या डोळ्यात भीती दिसायला लागली. रुमालाने त्याने कपाळावरचा घाम पुसला. त्याला अनेक प्रश्न विचारायचे होते. आत्तापर्यंत तो फक्त हो मला आठवतंय, मला आठवलं एव्हढंच काय ते पुटपुटत होता. कुमालोंना आपल्या भावाची दया आली. ते हळुवारपणे बोलले.

“मला खूप वाईट वाटतंय, जॉन.”

आता मात्र जॉन पुरता ढेपाळला. आधीचा माज, गुर्मी क्षणात उतरली.

“तुला असं म्हणायचंय...?" जॉनने विचारलं’.

“हो. तोही होता तिथे.”

जॉन कुमालो पुटपुटला, अरे देवा! .

कुमालो त्याच्याजवळ आले आणि त्यांनी त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

“तुझ्याशी खूप काही बोलायचंय.” ते म्हणाले.

“बोल, दादा .”

“आत्ता नको. आत्ता तुला काय त्रास होतोय ते मला अगदी समजतंय.”

“खरंय, तुझ्या इतकं अजून कोणाला समजेल?”

“अगदी. एक गोरा माणूस मिशन हाउस मध्ये मला तुरुंगात घेऊन जाण्यासाठी थांबलाय. कदाचित तो तुलाही घेऊन जाऊ शकेल.”

“थांब, मी कोट व हॅट घालून आलोच.”

ते चहासाठी न थांबता मिशन हाउसच्या रस्त्याला लागले. सिमँगुने परत येताना त्यांना बघितलं, म्हातारा माणूस निग्रहाने चालत होता, दुसरा माणूस वाकलेला आणि खचलेला दिसत होता.

इंग्लंडचे गोबऱ्या गालाचे पाद्री, फादर विन्सेंट जवळ आले आणि त्यांनी कुमालोंचे हात हातात घेतले. “तुमच्यासाठी काहीही, काहीही करीन मी. तुम्ही फक्त सांगा, मी काहीही करीन.” ते मनापासून म्हणाले.

**

बघूनच थरकाप उडवणाऱ्या उंच भिंतीमधल्या मोठ्ठ्या फाटकामधून ते पुढे गेले. तो गोरा तरुण पुढे जाऊन त्यांच्याशी बोलला आणि त्यांना परवानगी मिळाली. जॉन कुमालोला एकीकडे पाठवलं आणि तो तरुण स्टीफन कुमालोंबरोबर दुसरीकडे गेला. मुलाला त्यांच्यासमोर आणलं गेलं.

म्हाताऱ्याने मुलाचे दोन्ही हात आपल्या हातात घेतले आणि त्याच्या हातांवर त्यांच्या डोळ्यांतून गरम थेंब पडू लागले. मुलगा अस्वस्थपणे उभा होता, त्याच्या चेहऱ्यावर वडिलांना भेटल्याचा आनंद नव्हता. तो अस्वस्थपणे चुळबूळ करत होता, जणू ते ढगळ कपडे त्याला खूप घट्ट होत होते.

“माझ्या बाळा, माझ्या बाळा.”

“बाबा.”

“शेवटी मी तुला शोधून काढलंच.”

“हो.”

“पण आता त्याला खूप उशीर झालाय.”

मुलाने ह्यावर काहीच म्हटलं नाही. त्यातल्या त्यात काही तरी बरं ऐकायला मिळेल ह्या हेतूने बापाने मुलाला मिठी मारली. खरंच सांग ना, तुला शोधायला मला खूप उशीर झाला ना ? त्यांनी विचारलं. पण काहीच उत्तर आलं नाही. त्यांनी चिकाटीने पुन्हा विचारलं, खूप उशीर नाही ना झालेला? तो मुलगा उगाच इकडे तिकडे बघू लागला. गोरा माणूस आपल्याला बघतोय हे त्याला कळलं आणि झटकन माघार घेत तो म्हणाला. काय सांगू बाबा, जसं तुम्ही म्हणाल तसं.

“मी तुला सगळी सगळीकडे शोधलं.”

ह्याला सुद्धा काहीच उत्तर आलं नाही. म्हाताऱ्या माणसाने आपली हाताची पकड सैल केली आणि जीव नसल्यासारखे मुलाचे हात त्यांच्या हातातून सटकले. कोठडीत आत शिरून आपल्या माणसाला अगदी घट्ट मिठीत घेतलं तरी एक अदृश्य भिंत आडवी येतेच. तिथलं वातावरणच एका माणसाला दुसऱ्या माणसापासून तोडणारं असतं.

“माझ्या बाळा, इतकी भयंकर गोष्ट तू कशी काय केलीस, रे?”

आतापर्यंत ह्या दोघांकडे तटस्थपणे बघणारा गोरा तरुण लक्ष देऊन ऐकू लागला. गोऱ्या पहारेकऱ्याच्या चेहऱ्यावर काहीच हावभाव नव्हते. कदाचित त्याला ह्यांची भाषा समजत नसावी. मुलाचे डोळे पाणावले. काहीही न बोलता तो इकडे तिकडे बघत राहिला.

“सांग ना मला.”

“मला माहित नाही, बाबा” तो म्हणाला.

“तू पिस्तूल घेऊन का गेला होतास?”

पिस्तूलसारखे झुलूमधले काही शब्द इंग्रजी आणि आफ्रिकान दोन्ही भाषेत सारखेच असल्याने गोरा पहारेकरीही चमकला. मुलाच्या चेहऱ्यावर जिवंतपणाची कोणतीही लक्षणं दिसत नव्हती.

“बचावासाठी, बाबा. जोहान्सबर्ग अतिशय भयंकर ठिकाण आहे. इथे आपल्यावर कधी हल्ला होईल हे कोणाला कळणारसुद्धा नाही.”

“पण दुसऱ्याच्या घरात ते कशाला न्यायचं?”

ह्या प्रश्नाचंही उत्तर आलं नाही.

“त्यांना ते मिळालं का?”

“हो, बाबा.”

“आणि त्यांना हे तूच केलंयस ह्याची खात्री आहे?”

“मीच सांगितलं ते त्यांना.”

“काय सांगितलंस तू त्यांना?”

“मी त्यांना सांगितलं, तो गोरा माणूस अचानक आला आणि मी घाबरून गोळी झाडली. मला त्याला मारायचं नव्हतं.”

“आणि तुझा चुलत भाऊ? आणि दुसरा?”

“हो, मी त्यांना सांगितलं, गोऱ्या माणसावर गोळी मी झाडली तेव्हा ते माझ्याबरोबर होते.”

“तू चोरी करायला तिकडे गेला होतास का?”

ह्यावरही उत्तर आलं नाही.

“तू सुधारगृहात होतास ना?”

मुलाने खाली मान घातली आणि बूट घासत तो म्हणाला, “हो, मी सुधारगृहात होतो.”

“त्यांनी तुला चांगलं वागवलं?”

पुन्हा त्याचे डोळे ओलावले. पुन्हा तो इकडे तिकडे बघू लागला. पुन्हा आपली नजर खाली बुटांकडे वळवली. अस्वस्थपणे तो बूट जमिनीवर घासत राहिला. “हो, त्यांनी मला चांगलं वागवलं.”

“आणि त्याची तू अशी परतफेड केलीस?”

ह्यावरही उत्तर आलं नाही. ह्या सगळ्या बोलण्याचा आता काहीच उपयोग नाही हे माहित असल्यासारखा त्यांना थांबवण्यासाठी तो गोरा तरुण पुढे आला. कदाचित ते त्याला डिवचत होते हेही त्याला आवडलं नसावं.

“अरे अब्सालोम?”

“सर?”

“मी तुझ्यासाठी शोधलेलं काम तू का सोडलंस?”

गोऱ्या माणसा, तुलाही उत्तर मिळणार नाही. अशा प्रश्नांना आता उत्तर नाही.

“तू का सोडलंस ते काम?”

अशा प्रश्नांना आता उत्तर नाही.

“आणि ती मुलगी? तुला तिची किती काळजी असायची. तिची दया येऊनच तिच्याकडे जाण्यासाठी, तिची काळजी घेण्यासाठी आम्ही तुला सोडलं.

पुन्हा त्याचे डोळे पाण्याने भरले. त्या मुलीच्या आठवणींनी तो रडत होता का ? तिला दिलेलं वचन मोडलं म्हणून तो रडत होता का? कोण जाणे! की आपल्यातल्याच पराभूत झालेल्या चांगल्या माणसासाठी तो रडत होता? चांगला माणूस - जो आपल्या बायको- मुलांवर प्रेम करेल. त्यांच्यासाठी कष्ट करेल, बचत करेल, कर भरेल, नियम पाळेल. त्याच्यातल्याच वाईट माणसाच्या हातून सतत हरत राहणं ज्याला भाग पडलं होतं अशा चांगल्या माणसासाठी त्याचे डोळे झरत होते का, कुणास ठाऊक.

तो दुसऱ्या कुणासाठी रडत होता की फक्त स्वतःसाठी रडत होता ? जे झालं ते झालं, आता मला एकटं सोडा. मला मी जसा आहे तसा राहू द्या. ह्या जीवघेण्या, निष्ठूर प्रश्नांच्या सरबत्तीपासून मला वाचवा असं म्हणून तो रडत होता? ते त्याची विचारपूस करत नाहीत. ते त्याची चेष्टा मस्करी करत नाहीत. ते त्याच्याजवळ बसत नाहीत किंवा त्याला मोकळंही सोडत नाहीत. ते फक्त विचारत राहतात - का, का, का? त्याचे वडील, तो गोरा माणूस, तुरुंगातला अधिकारी, पोलीस, मॅजिस्ट्रेट - का, का, का?

त्या गोऱ्या तरुणाने खांदे उडवले, बेपर्वाईने तो हसला. पण खरं तर त्याच्या डोळ्यात बेपर्वाई नव्हती, वेदनेची झाक होती. “आता बोलण्यात काहीच अर्थ नाही.” तो म्हणाला.

“मला फक्त एका प्रश्नाचं उत्तर दे. देशील?”

“हो, बाबा.”

“तू पत्र पाठवलं नाहीस, निरोप पाठवला नाहीस, तू वाईट मुलांच्या संगतीला लागलास, तू चोरी केलीस, घरफोडी केलीस आणि हो, आता ही भयंकर गोष्ट केलीस. मला सांगशील, का? का केलंस तू असं?”

वडिलांकडून ऐकल्यापैकी एक शब्द पकडून तो म्हणाला, “वाईट मुलांच्या संगतीमुळे.”

“मी तुला सांगायला नको की हे पुरेसं उत्तर नाहीये.” कडक भाषेत बोलण्याची कुमालोंना इच्छा झाली. पण त्यांना माहित होतं की तसं बोललं तर त्यांना पुढे आणखी काहीच उत्तर मिळणार नाही.

“अच्छा, वाईट मुलांच्या संगतीमुळे. समजलं. पण तुला, तुला स्वतःला हे का करावसं वाटलं?” मनावर ताबा ठेवत त्यांनी विचारलं.

ते दोघंही एकमेकांना दुखावत होते. दुखावल्या गेलेल्या मुलामध्ये एका क्षणासाठी जिवंतपणाची चमक आली.

“हे सैतानाचं काम आहे.” तो म्हणाला.

“सैतानाचं काम? तुझ्या अंगात शिरलेल्या सैतानाचं? असेल, पण पोरा, तू असं का म्हणत नाहीस की तू त्या सैतानाशी भांडलास, मारामारी केलीस, घामाने न्हाहून निघेपर्यंत आणि अंगातली शक्ती संपेपर्यंत दिवसरात्र झगडलास? तू असं का म्हणत नाहीस की तुझ्या हातून जे घडलं त्याची तुला लाज वाटली. तू रडलास, पश्चात्ताप केलास, क्षमा मागितलीस, प्रार्थना केलीस, संपूर्ण ताकद लावून ताठ उभा राहिलास, धडपडलास आणि पुन्हा कोसळलास. बोल ना. ह्या थकून गेलेल्या म्हाताऱ्या माणसाला जरा बरं वाटेल रे. सांग, तू सैतानाशी झगडा का केला नाहीस?”

मुलाने आपली नजर पुन्हा खाली वळवली आणि तो म्हणाला, “माहित नाही.”

म्हातारा दमून गेला, मुलगा दमून गेला आणि वेळही संपत आली. तो गोरा तरुण पुन्हा त्यांच्याजवळ आला. त्याला अजून त्या मुलीशी लग्न करायची इच्छा आहे का? त्याने कुमालोंना विचारले.

“तुला त्या मुलीबरोबर लग्न करायचंय का, पोरा?”

“हो, बाबा.”

“मी बघतो काही करता येईल का” तो गोरा तरुण म्हणाला. “आता आपल्याला जावं लागेल.”

“मला परत कधी येता येईल? मला परत येता येईल ना?”

“हो, नक्की येता येईल. आपण फाटकाजवळ वेळ विचारून घेऊ.”

“मी परत येईन. नीट रहा, माझ्या बाळा.”

“सांभाळून जा, बाबा.”

“पोरा, तुला इथून पत्रं पाठवता येत असतील. पण मी पुन्हा येईपर्यंत तुझ्या आईला पत्र लिहू नकोस. पहिल्यांदा मला तिला लिहू दे.”

“चालेल, बाबा.”

फाटकाच्या बाहेर त्यांना जॉन कुमालो भेटला. जॉन आधीपेक्षा बराच सावरलेला आणि चेहरा पुन्हा आधीसारखाच मग्रूर दिसायला लागला होता. “आपण लवकरात लवकर जाऊन वकील शोधला पाहिजे.”

“वकील? कशाला तो? सगळ्यांना सगळं माहिती असताना आणि कोणाला काही शंका नसताना वकिलाकडे कशाला पैसे घालवायचे?”

“काय माहिती आहे सगळ्यांना?” जॉनने विचारले.

“हेच, की तीन मुलं घर रिकामं आहे असं समजून त्या घरात घुसली. त्यांनी नोकराला तडाखा देऊन पाडलं. गोऱ्या माणसाने आवाज ऐकला आणि काय झालं ते बघायला तो खाली आला. आणि मग ... आणि मग माझ्या मुलाने... तुझ्या नाही, माझ्या मुलाने त्याला गोळी घातली. तो घाबरला होता असं तो म्हणतोय.”

“बरं, बरं असं आहे काय?” जॉन कुमालो म्हणाला. त्याला बरं वाटलं. “आणि त्याने हे तुला सगळ्यांसमोर सांगितलं?”

“हो, खरं आहे ते सांगायला काय?”

जॉन कुमालोच्या डोक्यावरचा भार उतरला. “म्हणजे तुला कदाचित वकिलाची गरज नाही. त्याने गोऱ्या माणसाला मारलं. आणखी वेगळं काही सांगायची गरज नाही.”

“तुला लागणार आहे का वकील?”

जॉन कुमालो भावाकडे बघून हसला. “मला वकिलाची गरज लागू शकते. वकील माझ्या मुलाशी एकांतात बोलू शकेल.”

जरा वेळ विचार करून तो म्हणाला, “बघ दादा, असा कोणताही पुरावा नाही की माझा मुलगा आणि तो दुसरा माणूस तिथे होते.”

जॉन कुमालो जोरात हसला. तो आता चांगलाच सुटला होता.

“ते नव्हतेच तिथे? पण माझा मुलगा तर..”

“हो, हो.” त्याला अडवत आणि त्याच्याकडे हसून बघत जॉन कुमालो म्हणाला, “तुझ्या मुलावर कोण विश्वास ठेवेल?”

त्याच्या बोलण्यात मोठया भावाला नामोहरम करण्याचा क्रूर हेतू होता. कुमालो गलितगात्र अवस्थेत उभे राहिले आणि तो गोरा तरुण झटकन कारमध्ये जाऊन बसला. कुमालोंनी त्याच्याकडे सल्ला मिळेल ह्या आशेने बघितलं. पण त्या तरुणाने खांदे उडवले. तुम्हाला काय करायचंय ते तुम्ही करा. तो बेपर्वाईने म्हणाला. वकील आणणं हे माझं काम नाही. तुम्हाला सोफियाटाऊनला यायचं असेल तर मी नेऊ शकतो.

ह्या बेपर्वाईमुळे आणखी निराश झालेले कुमालो डळमळीत अवस्थेत तसेच उभे राहिले. त्यांना नुसते उभे राहिलेले पाहून तो तरुण आणखी चिडला आणि खिडकीतून वाकून मोठ्याने बोलला.

“वकील आणणं हे माझं काम नाही. लोकांना मदतीचा हात देणं, त्यांच्यात सुधारणा करणं, त्यांचा विकास साधणं हे माझं काम आहे.”

बोलता बोलता त्याने डोकं आत घेतलं आणि गाडी चालू करायला घेतली. आपला इरादा बदलून पुन्हा खिडकीतून वाकून तो कुमालोंना बोलला.

“हे खूप महत्वाचं काम आहे.” तो म्हणाला, “खूपच महत्वाचं.”

त्याने डोकं आत घेतलं आणि पुन्हा बाहेर काढलं.

“तुम्ही असं समजू नका की फक्त चर्चमधली लोकंच चांगली कामं करतात.”

आपण जरा जास्तच मोठयाने बोलत आहोत असं लक्षात आल्यावर तो थोडया हळू आवाजात पण तेवढयाच रागात बोलत राहीला.

“आम्ही भाविकांच्या आत्म्याचं रक्षण करतो असं तुम्ही म्हणता. खरंतर आत्म्याचं रक्षण करतो म्हणणं म्हणजे क्रूर चेष्टाच आहे. मीही जीव वाचवतो. माणूस ह्या जगात येतो आणि ह्या जगातून निघून जातो हे तुम्ही बघता. मीही बघतो. मी अब्सालोमला

ह्या नवीन जगात जन्म घेताना पाहिलं आहे आता ह्या जगातून जातानाही पाहणार आहे.”

त्याने कुमालोंकडे संतापाने बघितलं. “आम्ही त्याला ह्या जगातून जातानाही पाहणार आहोत.”

त्याने डोकं आत घेतलं आणि गाडीचं चाक इतकं घट्ट पकडलं की जणू काही तो ते आत्ता तोडणारच आहे.

“तुम्ही सोफियाटाऊनला येणार आहात?” त्याने विचारलं.

कुमालोंनी मान हलवली. एका अनोळखी माणसाबरोबर ते कसे जाणार? तरुणाने जॉन कुमालोकडे बघितलं आणि डोकं बाहेर काढून तो त्याला म्हणाला, “तुम्ही खूप हुशार आहात. पण मी देवाचे आभार मानतो की तुम्ही माझे भाऊ नाही.”

त्याने मोठा आवाज करत गाडी सुरु केली आणि कर्कश्श आवाज करत गाडी निघून गेली.

कुमालोंनी आपल्या भावाकडे बघितले पण भावाने त्यांच्याकडे बघितले नाही. तो तिथून निघून गेला. ते कसेबसे थरकाप उडवणाऱ्या उंच भिंतीमधल्या मोठ्या फाटकामधून रस्त्यावर आले. देवा, देवा तू तरी मला सोडू नकोस. ते पुटपुटले. तेवढयात त्यांना फादर विन्सेंट यांचे शब्द आठवले. तुमच्यासाठी काहीही, काहीही करीन मी. तुम्ही फक्त सांगा. आता मला फादर विन्सेंटकडे जायला हवं, कुमालो स्वतःशीच बोलले.

15

कुमालो दमून भागून, अवसान गळालेल्या अवस्थेत मिसेस लिथेबेंच्या घरी आले. घरातील दोन्ही बायका गप्प होत्या. त्यांना त्यांच्याशी बोलायची किंवा त्यांच्या भाच्याबरोबर खेळायची अजिबात इच्छा नव्हती. ते त्यांच्या खोलीत शिरले. थोडा वेळ शांत बसावं आणि मग मिशन हाउसला जावं असा विचार करत ते बसत नाहीत इतक्यात दरवाजा वाजला आणि मिसेस लिथेबे त्या गोऱ्या तरुणाबरोबर आत आल्या. काही वेळापूर्वी झालेल्या दुखऱ्या प्रसंगामुळे त्या तरुणाला बघून त्यांचा चेहरा वेदनेने झाकोळला. त्या गोऱ्या तरुणाच्या ते लगेच लक्षात आलं. थोडसं चिडून तो मिसेस लिथेबेंशी सेसुटो भाषेत काहीतरी बोलला आणि त्या खोलीतून बाहेर पडल्या.

वृद्ध कुमालो उभे राहिले. गोरा तरुण अजून शांत झाला नव्हता. त्या तरुणाकडे बघणं त्यांना अवघड वाटत असल्यामुळे त्यांनी आपली नजर जमिनीकडे खिळवली.

“ऊम्फुंडीस.”

“सर?”

“मी मघाशी इतक्या रागाने बोललो त्याबद्दल मला माफ करा. मी तुमच्याशी वकीलासंदर्भात बोलायला आलो आहे.”

“बोला सर.”

ताठ्यात उभा ठाकलेल्या गोऱ्या माणसाशी बोलणं त्यांना कठीण जात होतं.

“ऊम्फुंडीस, तुम्हाला अजूनही माझ्याशी बोलायची इच्छा नाही का?”

कुमालोंनी क्षणभर स्वतःशी संघर्ष केला. काळ्या लोकांशी नम्रपणाने बोलायची सवय नसलेले पण तसा प्रयत्न करणारे गोरे असंच बोलतात हे त्यांना माहित होतं.

रागावर नियंत्रण मिळवणं अजूनही त्या गोऱ्या तरुणाला जमलं नव्हतं.

“मी मघाशी चिडून बोललो कारण जीव तोडून केलेलं काम बिघडल्यामुळे मला खूप वाईट वाटलं होतं. काम बिघडलं की मी स्वतःला आणि इतरांनाही त्रास देतो. पण नंतर मला त्याची लाज वाटते, म्हणूनच मी इथे आलोय.”

आपल्या रागाची कबुली रागानेच देणाऱ्या तरुणाकडे त्यांनी निर्मळपणे बघितलं. आता त्यांच्या मनात काही किल्मिष नव्हतं. तरुणाच्या कपाळावरील आठ्या निवळल्या.

“वकिलाबद्दल बोलायचं म्हटलं तर आता मलाही वाटतं की तुम्हीही वकील नेमायला हवा. खरं न सांगण्यासाठी म्हणून नाही तर तुमचा भाऊ विश्वास ठेवण्याजोगा नाही म्हणून. त्याच्या मनात काय आहे ते तुम्ही बघितलंच. तुमच्या भावाचा असा बेत आहे की त्याचा मुलगा आणि तो तिसरा माणूस तुमच्या मुलाबरोबर होता हेच नाकारायचं. आता ह्यातून आपल्यासाठी परिस्थिती आणखी बिघडेल की नाही ते आपल्याला कळणार नाही. वकिलाला ते समजेल. आणखी एक. अब्सालोम म्हणतोय तो घाबरला आणि त्याने गोळी झाडली. गोऱ्या माणसाला मारण्याचा त्याचा हेतू नव्हता. न्यायालयाला हे पटवून देण्यासाठी वकिलाची गरज आहे.”

“बरोबर आहे तुमचं.”

“तुमच्या चर्चचा वगैरे कोणी वकील तुमच्या ओळखीचा आहे का?”

“नाही सर. माझ्या ओळखीचं कोणी नाही. पण थोडी विश्रांती घेतल्यावर मिशन हाउस मधल्या फादर विन्सेंट यांना भेटायचं मी ठरवलं होतं.”

“तुमची विश्रांती झाली का?”

“सर, तुमच्या भेटीने नवीन उमेद मिळाली मला. तुम्ही खूप चांगले आहात...”

ओशाळून तो स्वतःशीच पुटपुटला “मगाशी माझ्याकडून खरंच मोठी चूक झाली. आता निघायचं?”

मग ते मिशन हाउसला आले आणि फादर विन्सेंट यांच्या खोलीत आले. तिथे ते बराच वेळ बोलत बसले.

“मला वाटतं, मी कोणी तरी चांगला माणूस शोधू शकेन ह्या कामासाठी. आपल्या सगळ्यांनाच हे मान्य आहे की खरं तेच आणि तेवढंच बोलायचं. गोळीबार भीतीपोटी केला गेला, कुणाला मारण्यासाठी नाही हे आपण बचावात सांगू शकतो. आपले वकील आपल्याला ह्या प्रकरणात काय करायला हवं ते सांगतील. शक्यता ही आहे की तुमचा पुतण्या आणि तो दुसरा माणूस आम्ही तिथे होतो हे मान्य करणार नाहीत. असं दिसतंय की फक्त तुमचा मुलगा बोलतोय की ते त्याच्यासोबत होते. आपल्याला तो खरं बोलतोय

याची पूर्ण खात्री आहे. आपली बाजू खरी आहे याची खात्री पटली तरच मी म्हणतोय ते वकील आपला खटला चालवायला घेतील. मी लवकरात लवकर त्यांना भेटायला जातो.”

“आणि लग्नाबद्दल काय करायचं?” तो तरुण बोलला.

“ते सुद्धा आपण त्यांना विचारूया. तुरुंगात असतांना लग्न करता येतं की नाही हे मला माहित नाही, पण करता येत असेल तर मला हे लग्न लावायला नक्कीच आवडेल.”

ते निघण्यासाठी उठले आणि तेव्हाच फादर विन्सेंट यांनी त्यांच्या खांद्यावर आपला हात ठेवला. “हिम्मत बाळगा”, ते म्हणाले. “काहीही झालं तरी तुमच्या मुलाला शिक्षा होणार आहे. त्याचा बचाव मान्य झाला तर थोडी कमी शिक्षा होईल. जोपर्यंत आयुष्य आहे तोपर्यंत ते सुधारण्याची संधी आहे.”

“सध्या माझ्या मनात सतत हाच विचार असतो. पण काहीतरी चांगलं होईल असा विश्वासच आता माझ्यात राहिला नाहीये .”

“बसा, आपण बोलूयात.” फादर विन्सेंट म्हणाले.

“मला आता निघायला हवं.” गोरा तरुण म्हणाला. “पण ऊम्फुंडीस, तुम्हाला लागेल ती मदत करायला मी तयार आहे.”

तो गोरा तरुण गेला आणि कुमालो म्हणाले, “तुम्हाला समजतच असेल हा प्रवास माझ्यासाठी किती कठीण आहे

“मला समजतंय ते, मित्रा.”

“मी माझ्या घरच्यांना भेटायला इकडे आलो होतो. त्यामुळे आधी त्यांना शोधायला मी खूप उत्सुक होतो. पण जसा जसा हा शोध पुढे जात राहिला तशी तशी उत्सुकतेची जागा हळूहळू भितीने घ्यायला सुरुवात केली. काही काळानंतर उत्सुकता संपली आणि ही भीती आणखी आणखी गडद होत गेली. अलेक्झांड्राला मिसेस म्काईझ ह्यांच्या चेहऱ्यावरचे भाव पाहून मी नक्कीच थोडा घाबरलो, पण इकडे मिशन हाउस मध्ये जेव्हा मी त्या खुनाबद्दल ऐकलं तेव्हा माझ्या मनातली भीती सहन करण्याच्या पलीकडे गेली.”

आठवता आठवता आपण मधल्या बऱ्याच गोष्टी विसरलोय हे लक्षात येऊन ते क्षणभर थांबले आणि खाली जमिनीकडे पाहू लागले. बराच वेळ एकटक बघून झाल्यावर ते म्हणाले, “सिमँगुने मला सांगितले होते, ह्या महानगरात हजारो, लाखो लोक रहात

असताना फक्त एकाविषयी कशाला भीती बाळगायची? ह्या त्याच्या सांगण्याने तेव्हा मला जरा धीर आला होता.”

हे सगळं ऐकताना फादर विन्सेंट जवळजवळ श्वास रोखून स्तब्ध बसले होते पण ज्या पद्धतीने कुमालोंनी मला धीर आला हे सांगितलं त्याने ते जरासे सैलावले.

“ह्या त्याच्या सांगण्याने मला थोडा धीर आला. पण खरंतर मला स्वस्थता आली नव्हती. जी गोष्ट हजारात एखाद्याच्या बाबतीत घडते ती माझ्याबरोबर घडली आहे. क्षण, दोन क्षण मला असंही वाटतं की मी झोपेतून उठेन आणि माझ्या लक्षात येईल की हे एक स्वप्न आहे, प्रत्यक्षात असं काहीच घडलेलं नाहीये. पण फक्त तेवढेच क्षण.

विचार करायला गेलो तर मी आणि माझी बायको न्दोत्शेनीमध्ये एक साधंसुधं आयुष्य जगत होतो. आम्हाला माहीतही नव्हतं की एक एक करीत आमच्यासमोर काय उभं राहणार आहे.

जे घडलं त्याची पुसटशी कल्पना, अगदी हलकासा इशारा आम्हाला मिळाला असता तर? असं घडलंय आणि असं घडणार आहे याची किंचितही कल्पना नियतीने आम्हाला दिली नाही.” कुमालो पुढे म्हणाले.

“आता मला दिसतंय, पण तेव्हा आम्हाला काहीच दिसत नव्हतं. इतरांना मात्र थोडं थोडं का होईना ते आधीपासून दिसत होतं. ज्यांना त्याची पर्वा नव्हती त्यांच्यापुढे हे उघड झालं होतं. ते म्हणतात, हे जोहान्सबर्ग आहे. हा मुलगा वाईट मार्गाला लागलाय, पण जोहान्सबर्गमध्ये अशी कितीतरी मुलं वाईट मार्गाला लागतात. ज्यांना कळून काही देणंघेणं नव्हतं त्यांना माझा मुलगा वाया जाताना दिसत होता, पण आम्हाला, ज्यांच्यासाठी हे जीवन मरणाहूनही महत्वाचं आहे त्यांना मात्र काहीही माहित नव्हतं.”

फादर विन्सेंट ह्यांनी डोळ्यावर ऊन येऊ नये म्हणून आणि बोलणाऱ्याच्या नजरेला नजर द्यावी लागू नये म्हणून आपल्या डोळ्यांवर हात ठेवला. स्वतःभोवती दुःखाचा कोष विणणारे हे कुमालोंचे भाषण थांबवण्यासाठी आपण काहीतरी बोलावं असं त्यांना वाटत होतं, पण आपल्याजवळ बोलायला शब्द नाहीत हेही त्यांना कळत होतं.

“माणूस गवतात निवांत झोपलाय आणि त्याच्या आयुष्यातील सगळ्यात भयंकर वादळ त्याच्याभोवती गोळा होतंय. कधी पाहिलं नसेल असं मृत्युचं तांडव घडवणारं. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट होणार आहे. ह्या संकटातून वाचण्यासाठी

सगळी लोकं घाईघाईने आपल्या घरी जातायत. गवतात असल्याने लोकांनी त्याला बघितलं नसेल किंवा आता आणखी एक क्षणही थांबणं त्यांना धोक्याचं वाटलं असेल, पण त्याला कोणी उठवत नाहीये. त्याला तिथं तसंच सोडून ते निघून गेले आहेत.”

त्यानंतर ते बराच वेळ गप्प बसून राहिले. फादर विन्सेंट यांनी डझनभर वाक्यांची जुळवाजुळव केली पण एकही वाक्य त्यांना समर्पक वाटेना. कुमालोंना थांबवण्यासाठी ते म्हणाले, “मित्रा..”

“बोला, फादर.”

“तुमच्या उत्सुकतेतून भीती आली आणि भीतीतून दुःख. पण भीतीपेक्षा दुःख बरं कारण भीतीमुळे माणूस खंगून जातो आणि दुःख जगणं समृद्ध करतं.”

ज्यांच्याशी कधीच वाद होणार नाहीत अशा ह्या दयाळू माणसाकडे कुमालोंनी तीव्रपणे टक लावून पाहिलं.

“मी समृद्ध झालोय? मला हे माहित नव्हतं.”

“भीतीपेक्षा दुःख बरं.” फादर विन्सेंट ठामपणे म्हणाले. “भीती हा एक प्रवास आहे, न संपणारा भयंकर प्रवास. पण दुःख हे निदान कुठेतरी पोचणं आहे.”

“मग मी कुठे पोचलोय?” कुमालोंनी विचारलं.

“जेव्हा वादळ येतं तेव्हा माणसाला त्याच्या घराचं काय होईल अशी भीती वाटते.” झुलू भाषेतल्या सांकेतिक खुणांसारखं फादर विन्सेंट बोलत होते. “पण जेव्हा घर तुटून फुटून जातं तेव्हा काहीतरी करण्यासारखं असतं. वादळाला तर तो रोखू शकत नाही पण तो आपलं घर पुन्हा बांधू शकतो.”

“या वयात?” कुमालोंनी विचारलं. “मी तरुण आणि धडधाकट असतांना जे घर बांधलं त्याचं काय झालं ते तुम्ही बघताय. आता मी कुठल्या प्रकारचं घर बांधू?”

“देवाची इच्छा आजवर कोणाला कळली आहे?” फादर विन्सेंट आवेगाने म्हणाले.

कडवटपणा, आरोप वा तिरस्कार अशा कोणत्याच नकारात्मक भावना मनात न आणता कुमालोंनी त्यांच्याकडे बघितलं.

“देवाने माझ्याकडे दुर्लक्ष केलंय असं वाटतंय मला.”

“तुम्हाला वाटत असेल. पण तसं कधीच, कधीच होत नसतं.

“मला बरं वाटलं हे ऐकून” कुमालो नम्रपणे बोलले.

“मगाशी आपण तुमच्या मुलाच्या आयुष्याच्या सुधारणेबद्दल बोललो. तुम्ही स्वतः पाद्री असल्यामुळे तुमच्या आणि तुमच्या पत्नीच्या त्रासापेक्षा तुम्हाला हे जास्त महत्वाचं वाटत असणार.”

“हो, बरोबर आहे. पण तरीही मला कळत नाही की त्याच्या आयुष्यात सुधारणा कशी करायची?”

“त्याची काळजी नको. तुम्ही ख्रिश्चन आहात. येशूसोबत क्रुसावर चोरसुद्धा* होता हे तुम्हाला माहित आहे.”

“माझा मुलगा नुसता साधा चोर नाहीये,” ते कठोरपणे बोलले. “एक गोरा माणूस होता, चांगला माणूस. आपल्या कुटुंबासाठी खपणारा, सगळ्यात महत्वाचं म्हणजे आमच्या लोकांसाठी खपणारा. त्याच्या बायको-मुलांचं आयुष्य माझ्या मुलामुळे उध्वस्त झालंय. ह्यापेक्षा मोठं पाप मला नाहीत नाही.”

“माणूस कोणत्याही पापाबद्दल पश्चात्ताप करू शकतो.”

“तो पश्चात्तापही करेल,” कुमालो कडवटपणे बोलले. “जर मी त्याला विचारलं, तुला पश्चात्ताप होतोय का? तर तो म्हणेल, जसं माझे वडील म्हणतील तसं. मी म्हटलं, हा दुष्टपणा नाही का? तर तो म्हणेल, हो, हा दुष्टपणा आहे. पण जर मी त्याच्या तोंडात कोणतेही शब्द न देता जरा वेगळ्या पद्धतीने विचारलं, तू आता काय करशील? तर तो म्हणेल, मला माहित नाही. किंवा तो म्हणेल, जसं माझे वडील म्हणतील तसं.”

**क्रुसावर चोर: येशू ख्रिस्त आणि एक चोर ह्यांना एकत्र वधस्तंभावर खिळले जाण्याची शिक्षा देण्यात आली होती अशी आख्यायिका आहे.*

राग अनावर झाल्यामुळे कुमालोंचा आवाज चढला.

“तो माझ्यासाठी एकदम परका होऊन गेलाय. मी त्याला ओळखत नाही, मी त्याला स्पर्श करू शकत नाही, मी त्याच्यापर्यंत पोहचू शकत नाही. मला त्याच्या मनात

त्याने केलेल्या कृतीबद्दल लाज दिसली नाही. ज्यांचे त्याच्यामुळे नुकसान झाले आहे त्यांच्याबद्दल दया दिसली नाही. त्याच्या डोळ्यातून अश्रू येतात, पण असं वाटतं की ते फक्त त्याच्या स्वतःसाठी असतात. तो रडतो ते स्वतःच्या दुष्टपणासाठी नाही तर त्याच्यावर आलेल्या संकटांसाठी."

ते किंचाळले. "माणूस त्याच्या सगळ्या संवेदना विसरू शकतो? त्याच्यासारखा प्रेमानं, समजुतीनं ज्याला वाढवलंय असा माणूसही सगळं विसरू शकतो? त्याची दया फक्त स्वतःसाठी, ज्याने दोन मुलांना बापाविना पोरकं केलं त्या स्वतःसाठी आहे. मी सांगतो, जो कोणी लहान मुलांविरुद्ध असा भयंकर वागेल त्याला..."

"बास, थांबा." फादर विन्सेंट जोरात म्हणाले. "तुम्ही फक्त तुमच्या बाजूने बोलत आहात. जा, प्रार्थना करा. जा, आराम करा. आणि तुमच्या मुलाबद्दल इतके वाईट मत लगेच बनवू नका. तो धक्क्यामुळे निःशब्द झाला असेल. म्हणून तो 'जसं माझे वडील म्हणतील तसं' असं म्हणत असेल. जे काही घडलंय त्यामुळे तो सुन्न झाला असेल. म्हणूनही तो 'मला माहित नाही' असं म्हणत असेल."

कुमालो उठले. "तसं असेल तर ठीकच आहे, पण मला आता कोणत्याही आशा नाहीत. तुम्ही काय म्हणालात, मी काय करावं? हो, प्रार्थना आणि आराम."

त्यांच्या आवाजात उपहास नव्हता. फादर विन्सेंटना हा माणूस उपहासाने बोलत नाही हे माहीतही होतं. पण त्यांचा सूर इतका निराशेचा होता की त्यांनीत्यांचे हात पकडले आणि ते घाईने म्हणाले, बसा, मला आता धर्मगुरू ह्या नात्याने तुमच्याशी बोलायचंय.

कुमालो खाली बसल्यावर फादर विन्सेंट म्हणाले, "हो, मी म्हणालो प्रार्थना आणि आराम करा. जरी प्रार्थना म्हणजे फक्त शब्दांचा खेळ असेल आणि जरी तुमचा आराम म्हणजे फक्त पलंगावर आडवं होणं असेल, तरी. तुमच्यासाठी प्रार्थना करा, देवाची इच्छा समजण्यासाठी प्रार्थना करू नका. कारण ते एक रहस्य आहे. आयुष्य म्हणजे काय हे कोणाला माहित आहे? आयुष्य हेच एक रहस्य आहे. तुम्हाला कुठूनही दया मिळाली नसताना तुम्हाला त्या मुलीबद्दल एवढी दया का वाटते? मरणं जास्त सोपं असताना तुम्ही पुढे पुढे का जात राहता ह्या गोष्टी समजून घेण्यासाठी आत्ता प्रार्थना करू नका किंवा त्याचा विचारही करू नका. नंतर कधीतरी त्यावर विचार करता येईल. गर्टरुड आणि

तिच्या मुलासाठी प्रार्थना करा. तुमच्या मुलाची बायको होणार आहे त्या मुलीसाठी आणि तुमच्या होणाऱ्या नातवंडासाठी प्रार्थना करा. तुमच्या बायकोसाठी आणि न्दोत्शेनीतल्या सगळ्यांसाठी प्रार्थना करा. अनाथ झालेल्या बाई आणि मुलांसाठी प्रार्थना करा. ज्याचा जीव घेतला गेला आहे त्याच्या आत्म्यासाठी प्रार्थना करा. मिशन हाउसमधल्या आमच्यासाठी आणि एझेन्झेलेनीला जे डोळ्यापुढे अंधार असूनही पुन्हा काही उभारू बघतायत त्यांच्यासाठी प्रार्थना करा. तुमच्या सांत्वनासाठी प्रार्थना करा. सगळ्या गोऱ्या लोकांसाठी, जे न्याय देणार आहेत त्यांच्यासाठी आणि जे घाबरले नाहीत तर योग्य न्याय देऊ शकतील अशांसाठी प्रार्थना करा. आणि हो, तुमच्या मुलासाठी आणि त्याच्या सुधारणेसाठी प्रार्थना करायला घाबरू नका."

"मला पटतंय तुमचं," कुमालो नम्रपणे म्हणाले.

"आणि जिथे धन्यवाद देता येतील तिथे धन्यवाद देत चला. त्याच्या इतकं चांगलं दुसरं काहीच नाही. तुमची बायको, मिसेस लिथेबे, सिमँगु आणि तो सुधारगृहातील गोरा तरुण माणूस हे धन्यवादास पात्र नाहीत?

देवाची इच्छा समजून घेण्यात जर तुमचा गोंधळ होत असेल तर तुमच्या मुलाच्या सुधारणेचं काम माझ्यावर आणि सिमँगुवर सोडा. आणि माझ्या मुला, आता जा आणि प्रार्थना कर. जा आणि आराम कर."

त्यांनी त्या म्हाताऱ्या माणसाला त्यांचे बूट घालायला मदत केली आणि त्यांना त्याची हॅट दिली. जेव्हा कुमालो त्यांना धन्यवाद देऊ लागले तेव्हा ते म्हणाले आपल्याकडे जे असतं तेच आपण दुसऱ्यांना देतो आणि आपल्याकडे तेच का असतं हेही एक रहस्य आहे. जरी ख्रिस्ताचा लोकांनी छळ केला होता तरी आपल्यामध्ये एक ख्रिस्त असतो जो ओरडून सांगत असतो की माणसांना अडचणीच्या वेळी मदत करायला हवी आणि माफही करायला हवं.

ते त्या म्हाताऱ्या माणसाला मिशनच्या दरवाज्यापर्यंत घेऊन आले आणि त्यांचा निरोप घेताना म्हणाले,

"मी तुमच्यासाठी रात्रंदिवस प्रार्थना करीनच. आणि आणखी तुम्ही जे सांगाल तेही करीन."

दुसऱ्या दिवशी या महानगरीमध्ये आपला रस्ता स्वतः शोधण्यासाठी कुमालो एकटेच निघाले. त्यांनी आपल्या नातवाची आई होणार असलेल्या मुलीला भेटण्यासाठी पिम्विलेची ट्रेन पकडली. हे काम ते एकटे जास्त चांगलं करू शकतात अशा विश्वासाने त्यांनी सिमँगु सोबत येऊ शकणार नाही अशी वेळ मुद्दाम निवडली होती. ते संथपणे विचार करतात आणि संथपणे कृती करतात याचं कारण त्यांचं आयुष्य त्यांच्या जमातीच्या संथ लयीत गेलं होतं. ते त्यांच्यासोबत असणाऱ्या माणसाला त्रासदायक ठरतं हे त्यांना समजून चुकलं होतं. आणि त्याबरोबरच त्यांना हेही कळलं होतं की त्यांच्या उद्दिष्टांपर्यंत इतर कोणी नसतानाच ते जास्त खात्रीपूर्वक पोहचू शकतात.

त्यांनी बऱ्याच अडचणींवर मात करत ते घर शोधलं आणि घराचा दरवाजा ठोठावला. त्या मुलीने दरवाजा उघडला. थोडसं अचानक आल्यामुळे, थोडसं भीतीमुळे आणि थोडसं बालसुलभ स्वागत करण्याच्या सवयीमुळे ती त्यांच्याकडे बघून हसली.

“तू कशी आहेस, बाळ?”

“मी बरी आहे, ऊम्फुंडीस.”

खोलीतल्या एकमेव खुर्चीवर ते जपून बसले आणि त्यांनी त्यांचे कपाळ पुसले.

“तू तुझ्या नवऱ्याबद्दल काही ऐकलंस का?” नवरा म्हणणं खरं तर तितकसं बरोबर नाही हे त्यांना ठाऊक होतं.

तिच्या चेहऱ्यावरचं हसू हरवलं. “मी काही नाही ऐकलं.” ती म्हणाली.

“मला जे म्हणायचंय ते खूप गंभीर आहे.” ते म्हणाले. “तो तुरुंगात आहे.”

“तुरुंगात?” ती म्हणाली.

“माणूस करू शकतो अशा सगळ्यात भयंकर गुन्ह्यासाठी तो तुरुंगात आहे.”

पण त्या मुलीला काहीच कळलं नाही. ती संयमाने ते पुढे काय बोलतील ह्याची वाट बघू लागली. ती नक्कीच अजून खूप लहान मुलगी होती.

“त्याने एका गोऱ्या माणसाला ठार मारलं आहे.”

“अरे देवा!” दुःखद आश्चर्याचा उद्गार तिच्या तोंडातून बाहेर पडला. तिने हाताने आपला चेहरा झाकून घेतला. कुमालो स्वतःही लगेच पुढे बोलू शकले नाहीत. ते शब्दच ओली जखम आणखी कापणाऱ्या धारदार सुरीसारखे होते. ती एका खोक्यावर बसली आणि खाली जमिनीकडे पाहू लागली. तिच्या गालावरून अश्रू ओघळू लागले.

“मला त्याबद्दल आणखी बोलायची इच्छा नाहीय बेटा. गोऱ्या माणसांचे वर्तमानपत्र तू वाचू शकशील ?”

“हो थोडंसं.”

“मग मी ते तुझ्यासाठी इकडेच ठेवतो. पण तू ते बाकीच्यांना दाखवू नकोस.”

“मी ते बाकीच्यांना दाखवणार नाही, ऊम्फुंडीस.”

“मला आता त्याबद्दल आणखी काही बोलायचे नाही. मी इकडे वेगळ्याच विषयावर बोलायला आलो आहे. तुला माझ्या मुलाबरोबर लग्न करायची इच्छा आहे का?”

“तुम्ही जसं म्हणाल तसं, ऊम्फुंडीस.”

“पोरी, मी तुला विचारतोय.”

“माझी तयारी आहे.”

“आणि तू का तयार आहेस ?”

प्रश्नच लक्षात न आल्यामुळे तिने त्यांच्याकडे बघितलं.

“तुला त्याच्याबरोबर लग्न करायची इच्छा का आहे?” त्यांनी चिकाटीने विचारलं.

खोक्यातील अब्सालोम्ने दिलेली लाकडी बांगडी तिने हातात घेतली. “तो माझा नवरा आहे,” थोडसं हसून, थोडसं बावरून ती म्हणाली. ती म्हणाली त्या नवरा शब्दाला लग्न होईपर्यंत तसा काही अर्थ नव्हता.

“पण तुला आधी त्याच्याशी लग्न करायची इच्छा नव्हती का?”

ह्या प्रश्नाने तिला पेचात टाकले. ती उभी राहिली आणि काहीच करायला नसल्यासारखी पुन्हा खाली बसली आणि वाकून खोक्यातील सामान उचकटत राहिली.

“बोल, मुली.”

“मला कळत नाहीये मी काय बोलू, ऊम्फुंडीस.”

“त्याच्याशी लग्न करायची तुझी खरोखर इच्छा आहे?”

“हो, माझी खरोखर इच्छा आहे, ऊम्फुंडीस.”

“पूर्ण विचार करून तू होकार दिला आहेस ना? तुझ्या इच्छेविरुद्ध मी तुला आमच्या कुटुंबात घेऊ इच्छित नाही.”

त्याचं हे वाक्य ऐकून उतावीळपणे त्यांच्याकडे बघत ती म्हणाली, मी तयार आहे.

“आम्ही खूप लांब राहतो. आमच्या इथे रस्ते, बस, वीज असे काही नाही. तिथे फक्त मी आणि माझी बायको राहतो आणि ती जागा खूपच शांत आहे. तू झुलू आहेस का?”

“हो, ऊम्फुंडीस.”

“तुझा जन्म कुठे झालेला?”

“अलेक्झांड्राला.”

“आणि तुझे आई बाबा?”

“माझे वडील माझ्या आईला सोडून गेलेत आणि माझ्या नवीन वडिलांशी माझं फारसं जमलं नाही.”

“तुझे वडील का सोडून गेले?”

“माझी आई खूप दारू प्यायची. त्यामुळे त्यांची सारखी भांडणं व्हायची.”

“अच्छा, म्हणून तुझे वडील सोडून गेले. ते तुलाही सोडून गेले?”

“मला आणि माझ्या दोन धाकट्या भावांना”.

“तुझे भाऊ कुठे असतात?”

“एकजण शाळेत असतो, ऊम्फुंडीस. अब्सालोम होता त्याच शाळेत. दुसरा अलेक्झांड्राला असतो. पण तो कुणाचंही अजिबात ऐकत नाही. मी ऐकलंय की तोही लवकरच त्या शाळेत जाईल.”

“पण तुझे वडील असे तुम्हाला सोडून कसे जाऊ शकतात?”

तिने काहीच न कळल्यासारखं त्यांच्याकडे पाहिलं. माहित नाही, ती म्हणाली.

“आणि तुझ्या नवीन वडिलांशी तुझं फारसं जमलं नाही. मग तू काय केलंस?”

“मी ती जागा सोडली.”

“आणि काय केलंस?”

“सोफियाटाऊनला जाऊन राहिले.”

“एकटी?”

“नाही, एकटी नाही.”

“तुझ्या पहिल्या नवऱ्याबरोबर?” त्यांनी उपहासाने विचारलं.

“हो माझ्या पहिल्या नवऱ्याबरोबर”. उपहास समजण्याइतकी ती मोठी नसल्यामुळे तिने अगदी निरागसपणे ते मान्य केलं.

“आणखी असे किती आहेत?”

ती खिन्नपणे हसली. त्यांचे लक्ष तिच्याकडे आहे हे कळताच गोंधळून म्हणाली, फक्त तीन.

“पहिल्याला काय झालं?”

“तो पकडला गेला, ऊम्फुंडीस.”

“आणि दुसरा?”

“तोही पकडला गेला.”

“आणि आता तिसराही पकडला गेला.”

ते उभे राहिले आणि तिला दुखवायची इच्छा त्यांच्या मनात येऊन गेली. ती इच्छा योग्य नाही हे कळूनही ते तिला बळी पडले आणि तिला म्हणाले, हो, तिसराही पकडला गेला, पण खुनासाठी. तुला खुनी भेटलेला का ह्यापूर्वी कधी?

ते एक पाउल तिच्याकडे आले आणि ती खोक्यावर बसून आक्रसून नाही नाही म्हणत रडत राहिली. आजूबाजूचे ऐकतील ह्या भितीने ते तिच्याशी घाबरू नकोस असं हळू आवाजात बोलले आणि थोडे मागे सरकले. ती थोडी सावरताच पुन्हा त्यांना तिला दुखवायची इच्छा झाली आणि ते म्हणाले, आता तू चौथा नवरा करशील?

आणि ती निकराने नाही, नाही मला आता नवरा नको असं म्हणत राहिली.

एक किळसवाणा विचार त्यांच्या मनात आला आणि ते क्रूरपणे तिला म्हणाले,

“मी तुझी इच्छा धरली, तरीही?”

“तुम्ही?” पुन्हा घाबरून आक्रसून जात ती म्हणाली.

“हो, मी.” ते म्हणाले.

भयंकर पेचात अडकलं असल्यासारखं तिने स्वतःकडे आणि सभोवताली पाहिलं. नाही, नाही, हे बरोबर नाही, ती म्हणाली.

“आधीचं बरोबर होतं का?”

“नाही, आधीही बरोबर नव्हतं.

“मग तू तयार आहेस ना?”

खोक्यात ठेवलेल्या लाकडी बांगडीकडे तिचं पुन्हा लक्ष गेलं. स्वतःचीच कीव आल्यासारखी ती खिन्नपणे हसली. पण त्यांची नजर अजूनही आपल्यावर रोखलेली आहे हे लक्षात येऊन ती अगदी असहाय्यपणे पुटपुटली- मी तयार होऊ शकते.

ते खाली बसले आणि त्यांनी त्यांचा चेहरा हाताने झाकून घेतला. त्यांना बघून ती गांजलेली आणि शरमेने चूर झालेली कठपुतळी हुंदके देऊ लागली. ते तिच्याकडे आणि तिच्या अशक्त, हडकुळ्या शरीराकडे बघून शरमून गेले. पण ती लाज तिच्या होकारासाठी नव्हती तर त्यांच्या क्रूरपणासाठी होती.

ते तिच्याजवळ आले आणि म्हणाले, तू किती वर्षांची आहेस बाळ?

“नक्की माहित नाही.”, हुंदके देत ती म्हणाली, “पण सोळा वर्षाची असावी.”

त्यांच्या मनात खोलवर दया भरून आली आणि त्यांनी तिच्या डोक्यावर हात ठेवला. तो एक धर्मगुरूचा स्पर्श होता म्हणून की त्यांच्या मनातली दया वाहत बोटं आणि तळव्यापर्यंत पोचली होती म्हणून, की आणखी काही कारण होते कोण जाणे, पण तिचे हुंदके हलके होत गेले. त्यांच्या हाताखालचं डोकं शांत झाल्याचं त्यांना जाणवलं. त्यांनी त्यांच्या दुसऱ्या हाताने तिचा हात उचलला आणि कामं करून करून तिच्या हातावर आलेले घट्टे त्यांना जाणवले.

“मला माफ कर,मुली. असा प्रश्न मी तुला विचारला ह्याची मला लाज वाटते आहे.”

“मला काय बोलावं तेच कळत नव्हतं.”

“तुला कळणार नाही हे लक्षात आलं माझ्या, म्हणूनच मला लाज वाटते आहे. तुझी खरोखरच माझ्या मुलाशी लग्न करायची इच्छा आहे?”

तिने त्यांचा हात घट्ट धरला आणि ती म्हणाली, माझी खूप इच्छा आहे.

“आणि दूरच्या शांत जागी आमची मुलगी बनून राहण्याची?

तिच्या आवाजातला आनंद लपून राहिला नाही, माझी इच्छा आहे.

“मनापासून?”

“अगदी मनापासून”, ती म्हणाली.

“पोरी?”

“ऊम्फुंडीस?”

“आणखी एक अवघड गोष्ट मला तुला विचारायची आहे. त्या शांत जागी तुझ्या मनात पुन्हा इच्छा उफाळून आली तर तू काय करशील? मी पाद्री आहे आणि चर्चमध्ये राहतो. आमचं आयुष्य संथ आणि एका साच्यातलं आहे. जी गोष्ट तू करू शकणार नाहीस ती करायला लावायची माझी इच्छा नाही.”

“मला समजतंय ऊम्फुंडीस, मला सगळं समजतंय.” डबडबल्या डोळ्यांनी तिने त्यांच्याकडे बघितलं. “तुम्हाला माझी लाज वाटेल असं मी काही करणार नाही. तुम्हाला

माझी भीती बाळगायची गरज नाही. तिथे शांतता आहे ह्याची काळजी करण्याची गरज नाही. मला आता शांततेचीच अभिलाषा आहे.”

अभिलाषा हा शब्द तिच्या हुशारीची चुणूक दाखवून गेला.

“ही शांततेची अभिलाषा माझ्या मनात सतत उफाळून येत असते”. तिच्या भाषेने त्यांना थक्क केलं.

“मला समजतंय तुझं म्हणणं. मला वाटलेलं त्याहून तू जरा जास्तच हुशार आहेस.”

“मी शाळेत हुशार होते.” ती पटकन म्हणाली.

ते एकदम जोरात हसले आणि आपण किती दिवसांनी हसलो ह्या विचारानेच त्यांना आश्चर्य वाटलं.

“कुठल्या चर्चची आहेस तू?”

“इंग्लंडच्या, ऊम्फुंडीस.” हेही तिने पटकन सांगितलं.

तिच्या साधेपणामुळे ते पुन्हा हसले आणि गंभीर झाले. मला तुझ्याकडून एक वचन हवं आहे, सगळ्यात महत्वाचं वाचन.

तीही गंभीर झाली, काय ऊम्फुंडीस?

“तुला ह्या निर्णयाचा कधी पश्चात्ताप झालाच तर त्याला तू आपल्या आत दडवून ठेवणार नाहीस किंवा आपल्या आईच्या घरून पळालीस तशी पळूनही जाणार नाहीस. तुला पश्चात्ताप होतोय, तुझा निर्णय तुला बदलावासा वाटतोय हे तू मला सांगशील असं वचन मला हवंय.”

“मी वचन देते.”, ती निग्रहाने बोलली आणि लगेच पुढे म्हणाली, “आणि मला कधी पश्चात्तापही होणार नाही.”

ते पुन्हा हसले. त्यांनी तिचे हात सोडले आणि आपली हॅट घेतली. लग्नाची सगळी तयारी झाली की तुला न्यायला मी येईन. तुझ्याकडे कपडे आहेत?

“हो आहेत, ऊम्फुंडीस. मी ते छान स्वच्छ धुवून ठेवीन.”

“या अशा घरात तू राहू नयेस असं मला वाटतं. मी तुझ्यासाठी माझ्याजवळ दुसरी जागा बघू का?”

“किती छान होईल!” लहान मुलासारखी टाळी वाजवत ती म्हणाली. “हे घर, ही खोली जितक्या लवकर सोडता येईल तितकं बरं.

“मग आता मी येतो, मुली.”

“सांभाळून जा, ऊम्फुंडीस.”

ते घरातून बाहेर पडले आणि ती छोट्याशा फाटकापर्यंत त्यांना सोडायला आली. तिच्याकडे जेव्हा त्यांनी वळून बघितलं तेव्हा त्यांना ती त्यांच्याकडे बघून हसताना दिसली. वेदनांचा भार किंचित का होईना उतरल्यामुळे त्यांना हायसं वाटलं. आज किंचित हसल्यामुळे त्यांना एकाच वेळेस बरंही वाटलं आणि अपराधीही. फादर विन्सेंट रात्रंदिवस त्यांच्यासाठी प्रार्थना करणार होते हे त्यांना एकदम आठवलं आणि त्यांच्या मनात कृतज्ञता दाटून आली. कोपऱ्यात वळताना त्यांनी मागे बघितलं तर ती मुलगी अजून त्यांच्याकडे बघत होती.

17

काही लोक त्यांच्या खोल्या भाड्याने देत नाहीत. मिसेस लिथेबे त्यांच्यापैकी एक होत्या. त्यांचा नवरा इमारतींचे बांधकाम करायचा. तो एक चांगला आणि प्रामाणिक माणूस होता. पण त्यांना मूलबाळ नव्हते. त्यांनी हे टुमदार घर बांधले होते ज्यात जेवण्यासाठी एक, राहण्यासाठी एक आणि झोपण्यासाठीच्या तीन खोल्या होत्या. एका खोलीत त्या स्वतः रहात होत्या. घरात धर्मगुरू असणं आणि प्रार्थनेचे सूर घरात घुमणं ही भाग्याची गोष्ट असल्यामुळे दुसरी खोली त्यांनी आनंदाने धर्मगुरूंना दिली होती. पाद्र्यांची बहिण असलेल्या गर्टरुडला आणि तिच्या मुलालाही त्यांनी अगदी सहजपणे तिसरी खोली दिली. पैशाची फारशी गरज नसल्यामुळे अनोळखी लोकांना त्यांनी कधी आपली खोली दिली नव्हती.

पाद्र्यांसाठी त्यांच्या मनात नितांत आदर होता. गर्टरुड आणि तिच्या मुलासाठी त्यांच्या मनात करुणा होती. पाद्र्यांच्या मुलावरच्या प्रसंगाने तर त्यांना अपार दुःख झालं होतं. पाद्र्यांच्या चांगुलपणाविषयी त्यांना अजिबात शंका नव्हती. ते दयाळू आणि प्रेमळ होते, त्यांना आदराने आणि सभ्यपणे वागवायचे आणि आपलं स्वतःचं घर असल्यासारखे खोली काळजीपूर्वक वापरायचे. गर्टरुड आणि तिच्या मुलाला त्या दलदलीतून बाहेर काढल्याबद्दल, तिच्यासाठी आणि तिच्या मुलासाठी नवीन कपडे आणल्याबद्दल पाद्र्यांविषयीचा आदर आणखी वाढला होता.

गर्टरुड आणि तिचा मुलगा इथे आल्यामुळे घराला एक प्रसन्नपणा आला होता. गर्टरुडचं वागणं जरा स्वैर होतं. अनोळखी लोकांशी, विशेषतः पुरुषांशी ती अघळपघळ बोलायची हे मिसेस लिथेबेंच्या लगेच लक्षात आलं होतं. पण तिच्यावर ओढवलेल्या प्रसंगांमुळे त्यांच्या मनात तिच्याबद्दल सहानुभूती होती. कामसू आणि समजूतदार असणं, नीटनेटकं राहणं, आज्ञाधारक असणं हे तिच्यातले गुणही त्यांच्या दृष्टीने महत्वाचे होते. गर्टरुडलाही जुन्या बायका जरा शिस्तीच्या असल्याची कल्पना होती. एकूणच दोघी एकमेकींना ओळखून होत्या.

पाद्र्यांच्या मुलासाठी तर त्यांना फारच वाईट वाटत होतं, त्यांच्या रुढीप्रमाणे त्यांनी त्याच्यासाठी आक्रोशही केला होता. त्या आणि गर्टरुड सतत त्याविषयी बोलत असायच्या, खरंतर हल्ली त्या फक्त त्या एकाच विषयावर बोलायच्या. तो म्हातारा माणूस वरकरणी शांत असायचा आणि आपल्या वेदनांना त्याने बांध घातलेला असायचा. पण प्रार्थना

करताना त्यांच्या आवाजातून त्यांना त्यांचं दुःख झिरपताना जाणवायचं. जरी तासनतास खुर्चीत बसून करूण नजरेने शून्यात ते बघत रहायचे तरी बोलताना त्यांच्यातला जिवंतपणा आणि वेदनेच्या कोषातून बाहेर आलेलं स्मितहास्य त्यांच्यातल्या कनवाळू आणि सभ्यपणाची साक्ष द्यायचे. जेव्हा ते त्या छोट्या मुलाशी खेळायचे तेव्हा त्यांच्यातील रसरशीतपणा बाहेर यायचा. पण तरीही तो मुलगा काहीतरी बोलतोय, विचारतोय आणि ते काहीही उत्तर न देता आपल्याच विचारांत आपल्या वेदनांच्या कोषात हरवून गेलेत असे दृश्य त्यांनी बरेचदा पाहिले होते.

**

"मिसेस लिथेबे?"

"बोला, ऊम्फुंडीस?"

"तुम्ही आमच्यावर इतके उपकार केले आहेत तरी मी आणखी एका उपकाराची अपेक्षा करतोय."

"शक्य असेल ते सर्व मी जरूर करेन ."

"मिसेस लिथेबे, तुम्ही माझ्या मुलाचे मूल वाढवत असणाऱ्या मुलीबद्दल ऐकलंय ना?"

"हो, मी ऐकलंय तिच्याबद्दल."

"ती पिम्विलेला दुसऱ्या कुठल्यातरी लोकांच्या खोलीत राहते. तिला माझ्या मुलाशी लग्न करण्याची इच्छा आहे आणि मला वाटतं असं लग्न करता येऊ शकेल. त्यानंतर - काहीही झालं - तरी ती माझ्याबरोबर न्दोत्शेनीला येईल आणि एका स्वच्छ आणि सभ्य घरात तिच्या बाळाचा जन्म होईल. पण आता ती जिथे आहे तिथून तिला लवकरात लवकर बाहेर काढावं असं मला वाटतं. आणि मला वाटतं... खरंतर तुम्हाला आणखी त्रास देण्याची माझी इच्छा नाही..."

"तिला इकडे आणावं असं तुम्हाला वाटतंय का, ऊम्फुंडीस?"

"तुमचे खूप उपकार होतील."

“मला काही हरकत नाही, ती आपण जेवतो तिकडे झोपू शकेल. पण माझ्याकडे तिच्यासाठी पलंग नाही.”

“त्याने काहीच फरक पडत नाही. तशा घरात राहण्यापेक्षा चांगल्या घराच्या लादीवर झोपणं कधीही चांगलं.”

“अगदी,अगदी.”

“तुम्ही खरंच खूप करताय आमच्यासाठी. तुम्ही आईसारख्याच आहात आम्हाला.”

“आपण एकमेकांसाठी एवढंही करणार नसू तर मग आपला उपयोगच काय?” त्या हसून म्हणाल्या.

ते एकदम खूष झाले आणि आनंदाच्या भरात त्या छोट्या मुलाला बोलवून आपल्या गुडघ्यावर बसवून ते घोडा घोडा खेळलेही. पण हा काही फार चांगला खेळ नव्हता, कारण थोड्याच वेळात ते दमले, पण मुलगा काही दमला नाही. म्हणून मग मुलाने ठोकळे आणले आणि दोघं मिळून जोहान्सबर्गसारख्या उंच इमारती बांधू लागले आणि मोठयाने आवाज करत आणि हसत खिदळत ते त्या मोडूही लागले.

“आणि आता मला जायला हवं. मला तुझ्यासाठी नवीन बहिण आणायची आहे.” कुमालो म्हणाले.

त्यांनी त्यांच्याकडचे पैसे मोजले. आता त्यात फक्त एक दोन नोटा शिल्लक होत्या. लवकरच पोस्ट ऑफिसच्या पुस्तकातले पैसे त्यांना काढावे लागणार होते. त्यांनी एक छोटासा सुस्कारा सोडला आणि कोट, हॅट घालून आणि हातात काठी घेऊन ते निघाले. त्यांच्या बायकोला स्टोव्हसाठी तर त्यांना त्यांच्या नवीन काळ्या कोटासाठी आणि पाद्री घालतात तशा कॉलरसाठी आणखी थोडं थांबायला लागणार होतं.

**

ती मुलगी गर्टरुडसारखी नव्हती. तिने अशा घरात आल्याचा आनंद लपवला नाही. तिच्याकडे थोडेच पण स्वच्छ कपडे होते कारण तिने ते छान तयार करून आणले होते. त्याशिवाय तिच्याकडे तिचं असं काहीच नव्हतं. ती प्रत्येक खोलीचा दरवाजा उघडून खोल्या बघत रहायची आणि आधी कधीच अशा घरी न राहिल्यामुळे खूष होऊन जायची. मिसेस लिथेबेंना ती मदर म्हणायची. त्यांना ते खूप आवडायचं. ती मुलगी फारशी न

बोलली जाणारी त्यांची सेसुटो भाषा बोलू शकायची हेही त्यांना आवडायचं. गर्टरुडनेही आनंदाने तिचं स्वागत केलं कारण तिलाही ह्या घरात कधीकधी कंटाळवाणं वाटत रहायचं. आता आपण खूप बोलू असं त्या म्हणत राहायच्या.

त्या दोघी जेव्हा खूप हसायच्या तेव्हा मिसेस लिथेबे त्यांच्यावर घसरायच्या. गर्टरुड मिश्कील हसून आणि ती मुलगी गोंधळून गप्प बसायची. मिसेस लिथेबेंना हे त्यांचं बेपर्वा हसणं अजिबात आवडायचं नाही स्वयंपाक घरात मदत करायला बोलावून मला असं वागणं अजिबात आवडत नाही हे त्या स्पष्टपणे सांगत राहायच्या.

“तू एका चांगल्या घरात आली आहेस, मुली.”

“हो, मदर.” ती मुलगी खाली मान घालून म्हणाली.

“एका दयाळू माणसाने तुला इकडे आणली आहे. तो इतका चांगला आहे की त्याने केलेल्या उपकाराबद्दल तो एक शब्दही बोलत नाही.”

“हो, मला ते माहित आहे.” ती मुलगी लगेच म्हणाली.

“मग जर तू त्याच्या तुला इकडे आणण्याने समाधानी असशील तर तू असे बेपर्वाईने हसणार नाहीस.”

“हो, मदर.”

“तू लहान आहेस आणि लहान मुलांनी हसणं चांगलं असतं, पण ते हसणं वेगळं आणि हे हसणं वेगळं.”

“हो, मदर.”

"तुला समजतय ना मला काय म्हणायचंय?”

“हो, मला पूर्ण समजतंय.”

“त्या म्हाताऱ्या माणसाला खूप काही भोगावं लागलंय. तुला कळतंय ना मला काय म्हणायचंय?

“हो, मला कळतंय सगळं”.

“त्यांना माझ्या घरात आणखी सहन करायला लागू नये.”

“हो, मदर. मी ह्यापुढे नीट वागीन.”

“मग जा आता तू बाहेर, पण मी काय बोलले ते कुणाला सांगू नकोस.”

“हो.”

“कसं वाटतंय तुला इथे आल्यापासून? समाधानी आहेस ना?”

त्या मुलीने डोळे भरून त्यांच्याकडे पाहिलं. आपला आनंद व्यक्त करण्यासाठी तिने आपले हात पसरवले. मी खूप समाधानी आहे, ती म्हणाली. मला जे मिळालंय त्यापेक्षा जास्त मला काहीच नकोय. मला वडील नव्हते तर मला ऊम्फुंडीस मिळाले. जे मिळावं असं वाटत होतं त्याहूनही खूप जास्त मिळालंय मला.

“मला दिसतंय, तू खूप समाधानी आहेस. अगं, आणखी एक गोष्ट तुला सांगायला मी सारखी विसरते. जेव्हा छोटा मुलगा तुझ्याशी खेळत असेल तेव्हा त्याला तुला जास्त जोरात आवळू देऊ नकोस. तुला आता जपून राहायला हवं.”

“हो, मी लक्षात ठेवीन.”

त्यामुळे त्यानंतर तिथे कोणी बेपर्वाईने हसले नाही. ती मुलगी शांत आणि आज्ञाधारक होती. गर्टरुडला समजलं ती अजून छोटी मुलगी आहे. तिने तिला एकटं सोडलं आणि आपणच एवढे वेगळे कसे आहोत ह्याचा ती विचार करत बसली.

**

बघूनच थरकाप उडवणाऱ्या उंच भिंतीमधल्या मोठ्ठ्या फाटकामधून ते पुन्हा पुढे गेले आणि त्यांचा मुलगा पुन्हा त्यांच्यासमोर आणला गेला. जिवंतपणाचे कोणतेही लक्षण नसलेले हात त्यांनी पुन्हा आपल्या हातात घेतले आणि ह्यावेळेस मुलाविषयीच्या अनुकंपेने त्यांच्या डोळ्यात पाणी आले.

“तुझी तब्येत बरी आहे का, बाळा?”

मुलगा उभा राहिला आणि अस्वस्थपणे इकडे तिकडे नजर वळवू लागला. वडिलांकडे बघण्याची त्याची अजून हिम्मत होत नव्हती.

“हो, मी बरा आहे, बाबा.”

“मला तुझ्याशी थोडं काम आहे. तुला नक्की त्या मुलीशी लग्न करायचं आहे ना?”

“हो, बाबा. मला तिच्याशी लग्न करायचं आहे.”

“माझे एक मित्र गोरे धर्मगुरू आहेत. तुमचं लग्न लावायला त्यांना आवडेल. तुमचं लग्न लवकरात लवकर व्हावं म्हणून ते बिशपना भेटणार आहेत. ते तुझ्यासाठी वकीलही आणणार आहेत.”

वकील शब्द ऐकताच जिवंतपणाची एक खुण त्याच्या डोळ्यात दिसली. आशेचा एक किरण चमकला.

“तुला वकील हवा आहे?”

“वकील मिळेल आपल्याला? इथले अधिकारी म्हणतात की वकिलाची तुला मदत होईल.”

“ते दोघं तुझ्याबरोबर होते हे तू पोलिसांना सांगितलंस”?

“मी तेव्हाही सांगितलं होतं आणि आता पुन्हा सांगितलं.”

“मग?”

“ते त्यांना त्यांच्या कोठडीतून माझ्याकडे ओळखीसाठी घेऊन आले.”

“हो,का? मग?”

“मग ते माझ्यावर खूप चिडले आणि पोलिसांसमोरच मला शिव्या देऊ लागले. मी त्यांना उगाच अडकवलंय असं म्हणू लागले.”

“आणखी काय म्हणाले ते?”

“तुझ्याकडे काय पुरावा आहे आम्ही असल्याचा असंही ते म्हणाले. मी म्हटलं, मी खरं बोलतोय हाच एक पुरावा आहे. मी पोलिसांनाही सांगितलं हे दोघेही माझ्याबरोबर त्या घरी होते. गोळी झाडण्याच्या वेळी मी हा इथे होतो आणि ते तिथे होते हेही मी परत परत सांगितलं.”

त्याने आपल्या वडिलांना हाताने खुणा करून दाखवलं आणि त्याच्या डोळ्यात पाणी आलं. त्यानंतर त्यांनी मला पुन्हा शिव्या दिल्या आणि ते रागारागाने माझ्याकडे बघत उभे राहिले. मी खूप खोटारडा आहे असं ते पोलिसांना सांगत होते.

“ते तुझे मित्र होते?”

“हो, मित्र होते.”

“आणि ते आता तुला एकटं पडतायत?”

“आता असंच दिसतंय.”

“आणि हे होईपर्यंत तू विश्वास ठेऊ शकशील असे ते मित्र होते?”

“माझा त्यांच्यावर पूर्ण विश्वास होता.”

“अच्छा, म्हणजे ज्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवावा असे ते सरळमार्गी, कष्टाळू, नियम पाळणारे मित्र होते. बरोबर ना?”

म्हातारबुवा, त्याला जरा एकटं सोडा. तुम्ही त्याला लांबपर्यंत घेऊन जाता आणि मग त्याच्यावर जोरदार बरसता. तो तुमच्याकडे खिन्नपणे बघतोय, थोड्या वेळाने तो उत्तरच देणार नाही.

“बोल ना, ते तसे मित्र होते?”

पण त्या मुलाने काही उत्तर दिले नाही.

“आणि आता त्यांनी तुला एकटे सोडले आहे.”

आधी शांतता आणि मग तो म्हणाला. “हो मला तसंच दिसतंय.”

“तुला आधी ते दिसलं नव्हतं?”

पटकन मुलगा म्हणाला, हो दिसलं होतं. कुमालोंना मग का, का तू त्यांच्याबरोबर जात राहिलास असं विचारवसं वाटत होतं, पण मुलाचे पाण्याने भरलेले डोळे बघून करुणेने इच्छेवर मात केली. त्यांनी पुन्हा मुलाचे हात हातात घेतले. आता ते पूर्वीपेक्षा थोडे जिवंत वाटत होते. त्यांनी त्याचे हात प्रेमाने घट्ट धरले.

“धीर धर, पोरा. तुझ्या बाजूने तुझे वकील असणार आहेत, पण तू त्यांना फक्त खरं आणि खरं तेवढंच सांगशील.”

“हो, बाबा. मी त्यांना फक्त खरं आणि खरंच सांगीन.”

त्याने काहीतरी बोलण्यासाठी तोंड उघडलं पण तो बोलला नाही.

“घाबरू नकोस. तुला काय बोलायचंय ते मोकळेपणाने बोल.”

“त्यांना लवकर बोलवा, बाबा.”

त्याने खिडकीकडे पहिले आणि त्याचे डोळे पुन्हा भरले. आत्ता बोललं नाही तर खूप उशीर होईल असं वाटून त्याने मनात येईल ते बोलण्याचा प्रयत्न केला.

“त्याची काळजी करू नकोस, ते लवकरच येतील. ते कधी येतील ते बघायला मी आता निघू का?”

“हो, जा बाबा, पुन्हा लवकर या.”

“आणि फादर विन्सेंट तुला भेटायला येतील म्हणजे तुला पापांची कबुली देता येईल, दोषमुक्त होऊन तुला तुझ्या आयुष्यात सुधारणा करता येईल.”

“चालेल.”

“शक्य झालं तर लवकरच तुझं लग्न लावायचा आम्ही प्रयत्न करतो आहोत. मी तुला बोलायला विसरलो, ती मुलगी आता माझ्याबरोबर सोफियाटाऊनला राहते आहे. ती माझ्याबरोबर न्दोत्शेनीला येईल आणि तिथेच बाळाला जन्म देईल.”

“किती करताय तुम्ही, बाबा.”

“आतापर्यंत तुला मी आईला पत्र लिहू नको म्हणून सांगितलं होतं. आता मात्र तुला जमेल तेव्हा तू लिही.”

“मी लिहीन, बाबा.”

“शांत रहा. तुझ्या डोळ्यातले अश्रू पूस.”

मुलाने वडिलांनी दिलेल्या रुमालाने आपले डोळे पुसले. त्यांनी हस्तांदोलन केले आणि त्यांना मुलाच्या हातात जरा जिवंतपणा आल्याचे जाणवले. पहारेकरी आला आणि

त्याला म्हणाला, तू इकडेच थांब, तुला भेटायला तुझा वकील येत आहे. तुम्ही आता निघा.

कुमालो निघाले आणि त्यांनी दरवाज्यात एक गोरा माणूस आत येण्यासाठी थांबलेला बघितला. तो माणूस उंच, रुबाबदार आणि अशा गंभीर प्रकरणांचा अनुभव असलेला दिसत होता. पहारेकरी त्याला ओळखत असावा कारण तो त्याला आदरपूर्वक वागवीत होता. तो काळ्या मुलाने गोऱ्या माणसाला ठार मारण्यापेक्षाही जास्त गुंतागुंतीच्या प्रकरणांची सवय असलेला दिसत होता. एखाद्या जाणकाराने आत शिरावं अशा गंभीरपणे तो आत शिरला.

**

कुमालो मिशन हाउसला परत आले आणि त्यांनी फादर विन्सेंट ह्यांच्याबरोबर चहा घेतला. त्यांचा चहा घेऊन झाला आणि तेवढ्यातच दारावर टकटक करून तो उंच गंभीर माणूस खोलीत शिरला. फादर विन्सेंटनी त्याचे सन्मानाने सर आणि मि. कारमिशेल अशा नावाने हाक मारत स्वागत केले. त्यांनी त्यांची कुमालोंशी ओळख करून दिली आणि मि. कारमिशेलनी त्यांच्याशी तशी पद्धत नसतानाही मि. कुमालो असे म्हणत हस्तांदोलन केले. त्यांनी पुन्हा चहा घेतला आणि त्या प्रकरणाच्या चर्चेला सुरुवात झाली.

"मी हा खटला तुमच्यासाठी म्हणून घेईन, मि. कुमालो. मी प्रो डिओ* म्हणून तो घेईन. अगदी साधा खटला आहे हा. मुलगा सरळ म्हणतोय की तो घाबरला म्हणून त्याने गोळी झाडली आणि कोणाला मारायचा त्याचा हेतू नव्हता. पूर्णपणे न्यायाधीश आणि त्याचे सल्लागार ह्यांच्यावर ह्या खटल्याचा निकाल अवलंबून आहे. आणि मला वाटतं आपण पंचांची मागणी करण्यापेक्षा तो न्यायाधीशांकडे चालू द्यावा. त्या बाकीच्या दोन मुलांबद्दल काय बोलावं मला माहित नाही. मि. कुमालो, मी असं ऐकलंय की तुमच्या भावाने त्या दोघांसाठी वेगळा वकील नेमला आहे. अर्थात मला त्यांचा बचाव करण्याची इच्छाही नाही. मला असं कळलंय की आम्ही तिथे नव्हतोच आणि तुमचा मुलगा काहीतरी कारणामुळे ह्यांना गुंतवायचा प्रयत्न करतो आहे असा मुद्दा घेऊन ते बोलणार आहेत. हे खरे आहे की नाही ते कोर्ट ठरवेल पण मला तुमचा मुलगा खरं बोलतोय आणि त्याला ह्यांना गुंतवण्याचं काही कारण नाही हे जास्त पटतय. मला कोर्टाला हे पटवून द्यायचंय

जेव्हा हा मुलगा म्हणतो की तो घाबरला म्हणून त्याने गोळी झाडली आणि कोणाला मारायचा त्याचा हेतू नव्हता तेव्हा तो अगदी खरं खरं बोलतोय. समजलं तुम्हाला, मि. कुमालो?”

**प्रो डिओ : धर्मादायी, मोफत चालवला जाणारा खटला*

“हो सर, मला समजलं.”

“मि. कुमालो, आता मला तुमच्या मुलाबद्दलची सगळी माहिती हवी आहे. म्हणजे तो कधी आणि कुठे जन्मला, तो कसा मुलगा होता, आज्ञाधारक आणि खरं बोलणारा होता का, त्याने कधी आणि का घर सोडलं, जोहान्सबर्गला आल्यापासून त्याने काय काय केलं वगैरे वगैरे. आलं तुमच्या लक्षात?”

“माझ्या लक्षात आलं, सर. मी सगळी माहिती देईन तुम्हाला.”

“मला जेवढं लवकर हे सगळं मिळेल तेवढं हवं आहे. बहुतेक पुढल्या सत्रात खटल्याची सुनावणी सुरु होईल. त्याने काय काय केलं ते फक्त त्याच्याकडूनच नाही तर इतरांकडूनही तुम्हाला माहित करून घ्यावं लागेल. तुम्हाला एकाचं बोलणं दुसऱ्याशी पडताळून बघावं लागेल आणि त्यांत जर फरक आढळला तर तेही मला सांगावं लागेल. मी स्वतः सुद्धा हे सगळं करणार आहे. समजलं तुम्हाला, मि. कुमालो?”

“हो सर, मला समजलं.”

“फादर विन्सेंट, तुम्ही माझ्याबरोबर सुधारगृहात याल का?”

“अगदी आनंदाने, सर. लगेच निघायचं? कुमालो, जरा इकडे येता का?”

कुमालोंना त्यांनी दरवाजाकडे घेतले आणि त्यांना ते म्हणाले,

“तुम्हाला हा माणूस मिळाला म्हणून तुम्ही देवाचे आभार माना. हा खूप मोठा माणूस आहे आणि दक्षिण आफ्रिकेतील नामांकित वकील तसेच तुमच्या लोकांचा मित्र आहे.”

“मी देवाचे आणि तुमचे ह्यासाठी आभार मानतो, पण मला उत्सुकता आहे की ह्याचा खर्च किती येईल? माझ्याकडची थोडीशी पुंजी जवळजवळ संपत आली आहे.”

“हा खटला ते प्रो डिओ म्हणून घेणार आहेत हे तुम्ही ऐकलं नाही का? अच्छा, तुम्ही कदाचित प्रो डिओ हा लॅटिन शब्द ऐकला नसेल. त्याचा अर्थ आहे धर्मादायी. म्हणजे तुम्हाला ह्या खटल्याचा काहीच खर्च होणार नाही किंवा अगदी मामुली खर्च येईल.”

“त्यांनी हा खटला देवासाठी घेतला?”

“जुन्या धारणांप्रमाणे त्याचा तसाच अर्थ होतो. आता त्याचा अर्थ बराचसा बदलला आहे. पण तरीही हा खटला काही पैसे न घेता चालवण्यात येईल हे खरं.”

एवढा दयाळूपणा मी कधी अनुभवला नव्हता, कुमालो चाचरत म्हणाले. हल्ली त्यांना सारखे सारखे रडू येत असल्यामुळे त्यांनी त्यांचे तोंड दुसरीकडे वळवले. फादर विन्सेंट त्यांच्याकडे बघून हसले. सावकाश जा, ते कुमालोंना म्हणाले आणि स्वतः धर्मादायी खटला घेणाऱ्या वकिलाबरोबर जायला निघाले.

प्रकरण २

1

एक सुंदर रस्ता इकोपोकडून टेकडयांकडे जातो. टेकड्या सुमधूर आवाजात सळसळणाऱ्या भरगच्च गवतांनी आच्छादलेल्या. रस्ता तिथून सात मैल चढत कॅरिसब्रूकला जातो. धुकं नसेल तर तिथून विस्तीर्ण पसरलेलं आफ्रिकेतील सुंदर खोरं तुमच्या सहज नजरेत भरेल. तिथल्या हिरव्यापिवळ्या माळरानातून टिटवीचे आर्त स्वर तुमच्या कानी पडू शकतील. तुमच्या अगदी खाली उम्झीकुलूचं खोरं, नदीच्या पार पलीकडे मोठ्या टेकड्या, आणखी मोठ्या टेकड्या. त्याच्या पुढे आणि मागे इंगायली आणि ग्रीकलँडमधील पर्वत.

गवत इतकं रसरशीत आणि दाट की तुम्हाला माती दिसणारच नाही. ह्या गवतानं घट्ट धरून ठेवलेलं पावसाचं पाणी आणि दव जमिनीत झिरपतं आणि दऱ्याखोऱ्यातून वाहणाऱ्या झऱ्यांना रसद पुरवतं. वणव्यांनी होरपळणं, गाईगुरांनी ओरबाडलं जाणं अशा संकटांना सामोरं न जावं लागल्यामुळे ते गवत जणू कुणीतरी प्रेमाने सांभाळलेलं वाटतं.

इथं वर, माथ्यावर दोन टेकड्यांच्या मध्ये विसावलेलं सुंदर, छोटसं खोरं आहे. तिथं एक घर आणि सपाट नांगरलेली शेतं आहेत. लोकं सांगतील की ही बहुतेक ह्या पंचक्रोशीतील सगळ्यात चांगली शेतं आहेत. जेम्स जार्विस इस्क़्वायर* यांचं टुमदार घर आणि शेतं असलेल्या ह्या भागाला हाय प्लेस असं म्हणतात. आणि ते खरोखरच नावाला साजेसं म्हणजे न्दोत्शेनी आणि उम्झीकुलूचं खोरं ह्यांच्या वरल्या बाजूस आहे.

**

जार्विस नांगरलेल्या जमिनीकडे खिन्नपणे बघत होते. ऑक्टोबरच्या तळपत्या दुपारचा सूर्य शेतांवर आग ओकत होता. आकाशात एकही ढग दिसत नव्हता. पावसाचा एक थेंबही अजून पडला नव्हता. मातीची ढेकळं तुटता तुटणार नाहीत एवढी कडक झाली

**इस्क़्वायर: आडनावानंतर लावायची पदवी*

होती. जमिनीत न घुसता नांगर तापलेल्या ढेकळांवरून इकडे तिकडे घसरला जात होता. नांगर चालवणारा माणूस शेताच्या टोकाला एकदाचा थांबला आणि घामाने भिजलेले बैल उन्हात धपापत उभे राहिले.

"या नांगरण्याचा काहीच उपयोग नाही, उम्नूमझान**."

"ठीक आहे, थॉमस. मी जरा वर जाऊन ढग दिसतायत का ते बघून येतो."

"तुम्हाला काहीही दिसणार नाही उम्नूमझान. मला माहित्ये कारण मी आधीच बघून आलोय."

जार्विसनी खाकरून आपला निषेध नोंदवला आणि कुत्र्याला घेऊन ते पायवाटेने टेकडीवर जायला निघाले. गवत अजून ओलाव्यावर पोसलं जात असल्याने आणि घामेजल्या चेहऱ्याला थंडगार झुळूक गार करत असल्यामुळे तिथे अजून तरी दुष्काळाचं सावट नव्हतं. पण ह्या डोंगरमाथ्याच्या खालचं सुकलेलं गवत, न्दोत्शेनीतल्या उघड्या बोडक्या आणि लालसर टेकड्या बघून वरच्या टप्प्यातल्या शेतकऱ्यांना भीती वाटत असे.

गोऱ्या शेतकऱ्यांना भीती वाटत होती की हे उद्ध्वस्तपण हळूहळू एकेक वर्षी मैल दर मैल करीत पुढे पुढे येत आहे आणि एक दिवस ते त्यांनाही खाऊन टाकणार आहे.

जेव्हा एकमेकांना भेटून लांबलचक ओसरीवर बसून चहा पिताना त्यांच्या नजरेस समोर पसरलेल्या खोऱ्यातील उजाड जमिनी आणि उघडे बोडके डोंगर दिसतात, तेव्हा ते बरेचदा ह्या विषयावर बोलतात. त्यांच्याकडे कामाला येणारे काही शेतमजूर न्दोत्शेनीतले आहेत आणि त्यामुळे त्या भागात वर्षागणिक पीक कसं कमी होत चाललंय ह्याची त्यांना कल्पना आहे. तिथं खूप जास्त गुरं आहेत आणि शेतं उजाड झाली आहेत. एकेक शेत नापिक होत चाललं आहे. शेतीची धूप कशी टाळायची हे ही लोकं शिकली असती, जमिनीला बांध घालून माती धुवून जाऊ नये म्हणून प्रयत्न केले गेले असते, कंटूर पद्धत वापरून त्यांनी डोंगरावर शेती केली असती तर काहीतरी उपयोग झाला असता.

**उम्नूमझान: झुलू भाषेत सर, साहेब*

पण इथले डोंगर खूप मोठ्या चढाचे होते आणि त्यातले बरेचसे शेती करण्यालायकीचे नव्हते. त्यांचे बैलही दुबळे होते. त्यामुळे फक्त खालच्या भागात कशीबशी शेती केली जायची. लोक बेपर्वा तर होतेच पण त्यांना शेती कशी करायची ह्याची धड माहितीही नव्हती.

हा प्रश्न जवळजवळ न सुटण्यासारखा होता. काही लोक म्हणायचे की त्यांना जास्त शिक्षण द्यायला हवं. पण शिकलेला मुलगा शेतात काम करायला तयार नसायचा. त्याला शहरात जाऊन कमी मेहनतीचं काम करायचं असायचं. फक्त म्हातारी माणसं आणि बायका शेतीची कामं करायचे. शहरातून आणि खाणींवरुन परत आलेले पुरुष दारू पीत आणि लंब्याचौड्या बाता मारीत बसायचे. काहीजण म्हणायचे की आता एवढी कमी जमीन शिल्लक आहे की शेतीतली कितीही आधुनिक तंत्रं आणली तरी ती काळ्या शेतकऱ्यांची पोटं भरायला पुरेशी पडणार नाहीत. पण ह्या प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत. जर त्यांना जास्त जमीन मिळाली आणि आधीच्या जमिनीसारखंच ह्या जमिनीकडेही त्यांनी दुर्लक्ष केलं तर आख्खा देश वाळवंट होऊन जाईल. आणि त्यांना द्यायला जमीन येणार कुठून? आणि त्याचे पैसे तरी कोण देणार? आणखीही दुसरा मुद्दा होता. समजा त्यांना जास्तीची जमीन मिळाली आणि समजा त्यात कष्ट करून त्यांचं भागायला लागलं तर मग गोऱ्या लोकांच्या जमिनीवर कोण काम करणार? एक पद्धत अशी होती की न्दोत्शेनीत राहून काळे शेतकरी आपल्या शेतीबरोबर आजूबाजूच्या गोऱ्या लोकांच्या शेतावर काम करायचे. आणखी एक पद्धत अशी होती की गोऱ्या शेतकऱ्याकडून काळ्या शेतमजुराला जमीन दिली जायची. तिकडेच झोपड्या बांधून त्यांनी राहायचं. त्याच्या घरातल्या सगळ्यांनी त्या जमिनीवर राबायचं. त्या बदल्यात त्यांना थोडी जमीन वापरायला दिली जायची. पण ह्या पद्धतीतही अडचणी होत्या. काहीजणांची मुलं शहराकडे जायची आणि शेतात राबायला नसायची, काहींनी त्यांना मिळालेल्या जमिनीची नासाडी केलेली असायची, काहीजण गुरं आणि मेंढ्या मटणासाठी पळवायचे, काहीजण आळशी आणि बिनकामाचे असायचे. पण जरी त्यांना हाकललं तरी पुढचे येणारे चांगले असतीलच ह्याची खात्री नसायची.

वर चढताच हे जुन्या दिवसांचे विचार जार्विसनी बाजूला सारले. ते एका दगडावर टेकले. हॅट काढली आणि थंड हवेच्या झुळुकीने त्यांना बरं वाटलं. ह्या दगडावरून कोणाचेही भान हरपून जाईल असे ह्या अद्भुत उम्झीकुलू खोऱ्याचं सुंदर दृश्य दिसायचे. ते त्यांना त्यांच्या वडिलांकडून वारसा म्हणून मिळालेल्या हिरव्यागार समृद्ध डोंगरांकडे

तसेच त्यांनी मेहनतीने समृद्ध केलेल्या खोऱ्याकडे पाहत होते. त्यांची इच्छा होती की त्यांच्या एकुलत्या एक मुलाने इथे यावं आणि त्यांच्यानंतर हा वारसा चालवावा. पण त्याच्या आयुष्याच्या काही वेगळ्याच कल्पना होत्या. तो इंजिनिअरिंगला गेला. त्याने एका चांगल्या मुलीशी लग्न केलं आणि आपल्या आई बाबांना दोन गोड नातवंडांची भेट दिली. त्याने हाय प्लेस सोडून शहरात जायचे ठरवलं तेव्हा त्यांना मोठा धक्का बसला होता. पण त्याचं आयुष्य त्याचं स्वतःचं आहे, दुसऱ्या कोणाचाही त्यावर अधिकार नाही याविषयी त्यांना शंका नव्हती.

खाली खोऱ्यामध्ये एक कार त्यांना त्यांच्या घराकडे येताना दिसली. ती इकोपोमधल्या पोलिसांची गाडी आहे हे त्यांनी ओळखले, कदाचित बिनेडीक, एक चांगला आफ्रिकानर गस्तीसाठी म्हणून फिरत असेल. इकोपोमध्ये हल्ली आफ्रिकानरांची संख्या बरीच वाढली आहे. एकेकाळी त्यांच्यापैकी कोणीही तिथे नव्हते. पोलीस आणि पोस्ट ऑफिसमधले क्लार्क आणि रेल्वे स्टेशन मधील मास्तर आफ्रिकानर होते. गावातल्या लोकांशी त्यांनी चांगले संबंध प्रस्थापित केले होते. त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी इंग्रजी बोलणाऱ्या मुलींशी लग्न केलं होतं आणि हे आता सगळ्या देशभरात होत होतं. त्यांच्या तरुणपणी त्यांच्या वडिलांनी आपल्या सगळ्या मुलांना ताकीद दिली होती की त्यांच्यापैकी कुणी जर आफ्रिकानरशी लग्न केलं तर ते त्याला बेवारस करून टाकतील. पण आता दिवस बदलले आहेत. इंग्लंड आणि जर्मन यांना एकमेकांशी झुंजवणाऱ्या युद्धाने हे बदल जरा मंदावले. इंग्रज आणि आफ्रिकानर ह्यांच्यातली दरी जरा आणखी रुंदावली. काही आफ्रिकानर सैन्यात दाखल झाले, काही युद्धाच्या बाजूने होते पण सैन्यात दाखल झाले नव्हते, काहीजण तटस्थतेवर विश्वास ठेवणारे होते, काहींनी आपल्या भावना लपवून ठेवल्या होत्या तर काही जर्मनीच्या बाजूचे होते पण तसे बोलणे शहाणपणाचे नाही हे जाणून होते.

त्यांची बायको घरातून कारमध्ये बसलेल्यांना भेटायला बाहेर आली. कारमधून दोन पोलीस बाहेर आले. त्यातला एकजण कॅप्टन जास्र्वेल्ड ह्यांच्यासारखा दिसत होता. जास्र्वेल्ड गावातल्या प्रसिद्ध व्यक्तींपैकी एक होता. तो एकेकाळचा रग्बीचा माहीर खेळाडू आणि महायुद्धातला सैनिक होता. त्यांचं असं मत होतं की इंग्रजी बोलणाऱ्या इकोपो जिल्ह्यात त्याला मुद्दाम नेमलं होतं. ते खास त्यांनाच भेटायला आले होते असं दिसत होतं कारण त्यांच्या बायकोने माथ्याकडे बोट दाखवलं होतं. त्यांनी खाली जाण्याची तयारी केली, पण त्याआधी त्यांनी पुन्हा एकदा खोऱ्यावर नजर फिरवली. पावसाची चिन्हं नव्हती

आणि तो कधीतरी पडेल असंही वाटत नव्हतं. त्यांनी कुत्र्याला हाक मारली आणि दगडातून तीव्र उतारावरच्या पायवाटेने जायला त्यांनी सुरुवात केली. अर्ध्या अंतरावरच्या थोड्या सपाट मैदानावर पोचेपर्यंत जार्स्वेल्ड आणि बिनेडीक चढण चढून वरती येताना त्यांना दिसले. त्यांनी त्यांची कार नांगरलेल्या शेतापर्यंत आणून ठेवलेलीही त्यांनी पहिली. ते दिसले तसे जार्विसनी त्यांना हात दाखवला आणि ते तिथल्या एका दगडावर त्यांची वाट बघत बसले. बिनेडीक खालीच थांबले आणि जार्स्वेल्ड त्यांना भेटायला वर आले.

"कॅप्टन, तुम्ही आमच्यासाठी पाउस आणला की नाही?"

कॅप्टन थांबले आणि त्यांनी लांबपर्यंत पसरलेल्या खोरं आणि पर्वतांकडे पाहिलं.

"मला तर एकही ढग दिसत नाही, मि. जार्विस." ते म्हणाले.

"मलापण दिसत नाहीये. पण तुम्ही आज अचानक इकडे कसे काय?"

कॅप्टननी त्यांच्याकडे बघितलं.

"मि. जार्विस."

"बोला."

"मला एक वाईट बातमी सांगायची आहे."

"वाईट बातमी?"

जार्विस खाली बसले. त्यांचं हृदय जोरात धडधडू लागलं.

"माझ्या मुलाबद्दल?" त्यांनी विचारले.

"हो, मि. जार्विस."

"तो मेला का?"

"हो, मि. जार्विस." कॅप्टन क्षणभर थांबले. "दुपारी दीड वाजता जोहान्सबर्गमध्ये त्याचा गोळी घालून खून करण्यात आला."

जार्विस उठून उभे राहिले. त्यांचे ओठ थरथरत होते. "गोळी घालून खून? कोणी?"

"काळ्या घरफोडयांनी केला असावा असा संशय आहे. त्याची बायको आज बाहेर गेली होती हे तुम्हाला माहित होतं का?"

“हो, मला माहित होतं.”

“सर्दी झाल्यामुळे ते घरी होते. मला असं वाटतं, घरफोडयांनी असा विचार केला असेल की घरात कोणी नाही. असं दिसतंय की तुमच्या मुलाने आवाज ऐकला आणि तो कसला आवाज आहे ते बघायला तो खाली आला. काळ्या लुटारूने त्याला लगेच गोळी घातली. झटापटीच्या कोणत्याही खुणा नाहीत.”

“अरे देवा!”

“मला माफ करा, मि. जार्विस. अशी बातमी देताना मला खूप वाईट वाटतंय.”

त्यांना आधार देण्यासाठी त्याने हात पुढे केला पण जार्विसनी ते बघितलं नाही आणि ते पुन्हा दगडावर बसले. अरे देवा! ते पुन्हा म्हणाले.

तो म्हातारा माणूस स्वतःला सावरेपर्यंत कॅप्टन जार्स्वेल्ड शांत उभे राहिले.

“तुम्ही माझ्या बायकोला सांगितले नाही ना कॅप्टन?”

“नाही, मि. जार्विस.“

हे कठीण काम आपल्याला करायला लागणार आहे ह्या विचाराने जार्विस यांच्या कपाळावर घाम आला.

“ती हळवी आहे,” ते म्हणाले. “मला माहित नाही, ती हे कसं पेलू शकेल.”

“मि. जार्विस, तुम्हाला लागणारी सर्व मदत करण्याच्या मला सूचना आहेत. तुमची इच्छा असेल तर बिनेडीक तुमची कार चालवत तुम्हाला पिटरमॅरिट्झबर्गला सोडू शकेल. तुम्ही नऊ वाजताची फास्ट मेल पकडू शकाल. तुम्ही उद्या सकाळी अकरापर्यंत जोहान्सबर्गला पोचलेले असाल. ट्रेनमधील खाजगी कंपार्टमेंटमध्ये तुमचे आणि मिसेस जार्विस यांचे आरक्षण केले आहे.”

“खूप खूप धन्यवाद.”

“तुम्हाला जी हवी ती मदत मी करू शकेन. मि. जार्विस.”

“आता किती वाजलेत?”

“साडेतीन.”

“दोन तासांपूर्वी?”

“हो, मि. जार्विस.”

“तीन तासांपूर्वी तो जिवंत होता?”

“हो, मि. जार्विस.”

“अरे, देवा!”

“तुम्हाला ती ट्रेन पकडायची असेल तर सहा वाजता निघायला लागेल. किंवा तुमची इच्छा असेल तर तुम्ही विमानानेही जाऊ शकता. पिटरमॅरिट्झबर्गला एक विमान थांबलेले आहे. पण त्यांना आपल्याला चार वाजेपर्यंत कळवावे लागेल. तुम्ही रात्रीपर्यंत जोहान्सबर्गला पोचू शकता.”

“हो, हो. खरं तर मला काय करावं सुचत नाहीये.”

“मी समजू शकतो.”

“काय जास्त बरं पडेल?”

“मला वाटतं, विमान.”

“चालेल, आम्ही विमानाने जाऊ. त्यांना कळवावे लागेल असं तुम्ही म्हणालात ना? “

“मी कळवतो त्यांना. मिसेस जार्विसना ऐकू येणार नाही अशा ठिकाणाहून मला फोन करता येईल का? आपल्याला घाई करायला लागेल.”

“हो, आमच्या दिवाणखानातल्या फोनवरून बोलता येईल.”

“चला, आपण आता निघायला हवं.”

पण जार्विस बसल्या जागेवरून हलले नाहीत.

“तुम्ही उठाल का मि. जार्विस? मी तुम्हाला उठायला मदत करू शकत नाही. तुमची बायको बघते आहे.

“तिला आश्चर्य वाटलंय, कॅप्टन. एवढ्या अंतरावरूनही तिला कळलंय, काहीतरी गडबड आहे म्हणून.

“शक्य आहे. मी लपवायचा प्रयत्न केला तरी माझ्या चेहऱ्यावरून त्यांना काहीतरी कळलं असेल.”

जार्विस उठले. अरे देवा! अजून ते काम बाकीच आहे.

खोल उतारावरून उतरताना बिनेडीक त्यांच्या पुढे गेला. जार्विस अंगात ताकद नसल्यासारखे एकेक पाऊल टाकत उतरत होते.

“गोळ्या घालून मारले?”

“हो, मि. जार्विस.”

“त्यांनी चोराला पकडलं का?”

“अजून नाही, मि. जार्विस.”

त्यांचे डोळे पाण्याने भरले, ते दाताने ओठ चावू लागले. “त्याने काय फरक पडतो?” ते म्हणाले. ते टेकडीवरून खाली उतरले आणि शेतांपर्यंत येऊन पोचले. भिजलेल्या डोळ्यांनी त्यांनी कडक ढेकळांवरुन नांगर निसटताना पहिला.

“जाऊ दे, थॉमस.” ते म्हणाले.

“तो आमचा एकुलता एक मुलगा होता.”

“मला माहित्ये ते, मि. जार्विस.”

ते कारमध्ये चढले आणि काही मिनिटांतच घरी पोचले.

“जेम्स, काय झालं?”

“थोडी गडबड झाल्ये गं. माझ्याबरोबर ऑफिसमध्ये येतेस? कॅप्टन, तुम्हाला फोन करायचा होता ना? तुम्हाला माहित आहे न फोन कुठे आहे?”

“हो, मि. जार्विस.”

कॅप्टन फोन करायला गेले. फोनलाईन वर आधीच कोणीतरी दोन शेजारी गप्पा मारत होते.

“कृपया तुमचे रिसीव्हर खाली ठेवा. हा पोलिसांचा तातडीचा फोन कॉल आहे. कृपया तुमचे रिसीव्हर खाली ठेवा.”

ते एक्स्चेंजला घाईघाईने फोन करत राहिले पण कोणी फोन उचलत नव्हतं. पोलिसांसाठी एक खास फोन लाईन असायला हवी. त्यासाठी काही करता येईल का असा विचार करत ते सारखा फोन लावत राहिले. त्यांनी जास्त रागारागाने फोन लावला.

“एक्स्चेंज, पिटरमॅरिट्झबर्ग पोलीस.” ते म्हणाले. “एक खूपच तातडीचा फोन लावून हवा आहे.”

“लगेच लावून देतो.” एक्स्चेंजकडून उत्तर आलं.

उतावीळपणे ते फोन मधून येणारी खरखर आणि आणखी वेगवेगळे आवाज ऐकत राहिले. पिटरमॅरिट्झबर्ग पोलीसांशी तुमचा फोन जोडला आहे, एक्स्चेंजकडून सांगण्यात आलं.

त्यांनी विमानाबद्दलचा निरोप सांगायला सुरुवात केली. त्यांच्या आवाजात मिसेस जार्विसच्या रडण्याचा आणि हुंदक्यांचा आवाजही मिसळला होता.

2

एक तरुण त्यांना विमानतळावर घ्यायला आला होता.

“मि. आणि मिसेस जार्विस.”

“हो.”

“मी जॉन हॅरिसन. मेरीचा भाऊ. मला वाटतं तुम्ही मला ओळखलं नसेल. तुम्ही मला बघितलेलंत तेव्हा मी खूप छोटा होतो. थांबा, मी तुमचं सामान घेतो. तुमच्यासाठी मी कार घेऊन आलोय. “

ते कंट्रोल बिल्डिंगकडे जात असताना तो तरुण म्हणाला, आम्हाला किती दु:ख झालंय ते काय सांगणार, मि. जार्विस. आर्थर हा मी बघितलेला सगळ्यात चांगला माणूस होता.

कारमध्ये तो पुन्हा एकदा बोलला. मेरी आणि मुलं इकडेच माझ्या आईच्या घरी आहेत आणि तुम्हीही इथे आमच्याबरोबर रहावं अशी आमची इच्छा आहे.”

“मेरी कशी आहे?”

“धक्क्यातून सावरते आहे, मि.जार्विस. पण तुम्हाला सांगतो ती खूप धीराची आहे.”

“आणि मुलं?”

“त्यांना खूप त्रास झालाय सगळ्याचा. मेरी सतत त्यांना कशात तरी गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न करत असते.”

त्यानंतर ते काही बोलले नाहीत. जार्विसनी त्यांच्या बायकोचा हात हातात घेतला. पण सगळेच शांत आणि आपापल्या विचारांत मग्न होते. उपनगरातल्या अजून दिवे चालू असलेल्या एका घराच्या फाटकातून ते आत शिरले. एक तरुण बाई गाडीचा आवाज ऐकून बाहेर आली, तिने मिसेस जार्विसना मिठी मारली आणि दोघीही रडल्या. नंतर ती जार्विसांकडे वळली, त्यांना मिठी मारली आणि त्यांनी एकमेकांचे सांत्वन केले. मि. आणि मिसेस हॅरिसनही बाहेर आले होते. त्यांनी त्यांचे स्वागत केले आणि अशा वेळी बोलायच्या गोष्टी बोलून ते घरात शिरले.

हॅरिसन जार्विसना म्हणाले, “थोडं ड्रिंक घेणार का?”

“हो चालेल.”

“चला, आपण माझ्या अभ्यासिकेत जाऊया.”

“जार्विस, तुम्ही अगदी निवांत रहा इथे. तुम्हाला काहीही हवं असेल तर आम्हाला नक्की सांगा. तुम्हाला जर आत्ता शवागारात जावसं वाटत असेल तर जॉन तुम्हाला घेऊन जाऊ शकतो. तुम्हाला सकाळी जावंसं वाटत असेल तर तसंही करता येईल. पोलिसांना तुमच्याशी बोलायचं आहे, पण ते आता रात्रीत तुम्हाला त्रास देणार नाहीत.”

“हॅरिसन, मी बायकोला विचारतो. खरं सांगू का, ह्या विषयावर आम्ही अजून नीट बोललेलोच नाहीयोत. मी विचारून येतो तिला. तुम्ही नका परत माझ्याबरोबर येण्याचा त्रास घेऊ”.

“बरं, मी तुमची इथेच वाट बघतो.”

नातवंडं ज्या खोलीत झोपली होती त्या खोलीच्या आत बाहेर त्यांची बायको आणि सून येरझाऱ्या घालतांना दिसल्या. ते त्यांच्याशी बोलले आणि त्या पुन्हा रडू लागल्या. आत्ताच, त्या म्हणाल्या. ते हॅरिसनकडे गेले आणि ओतलेले ड्रिंक त्यांनी पटकन गिळून टाकले. मग त्यांची बायको, सून आणि ते जॉन वाट बघत बसला होता त्या कारमध्ये बसले.

पोलीस लॅबोरेटरीजमध्ये जात असताना जॉनने त्यांना गुन्ह्याबद्दल त्याला माहित असलेली सगळी माहिती दिली. पोलीस कसे त्यांच्या घरातील नोकर बरा होण्याची वाट बघतायत, पोलिसांनी पार्कवर्ल्ड रिजचा सगळा भाग कसा पिंजून काढला आहे तेही त्याने सांगितलं. मारले जाण्याच्या अगदी आधी आर्थर जार्विस लिहित असलेल्या ‘काळ्या लोकांच्या गुन्हेगारीमागील तथ्य’ ह्या लेखाबद्दलही त्याने त्यांना सांगितले.

“मला वाचायला आवडेल तो लेख.” जार्विस म्हणाले.

“उद्या आणीन मी तो तुमच्यासाठी.”

“काळ्या लोकांच्याबद्दलची त्याची आणि माझी मतं बरेच वेळा वेगळी असायची, जॉन. बरेच वेळा तर आमची गरमागरम बाचाबाची व्हायची. पण त्याने काय लिहिलंय ते बघायला आवडेल मला.”

“माझे आणि माझ्या वडिलांचेही खूप मतभेद आहेत ह्या विषयावर. पण तुम्हाला सांगतो, ह्या विषयावर दक्षिण आफ्रिकेमध्ये आर्थरइतका खोल विचार क्वचितच आणखी कोणी केला असेल. तो म्हणायचा की दक्षिण आफ्रिकेमध्ये ह्या विषयाइतका दुसरा कुठला महत्वाचा विषय आहे?”

मग ते लॅबोरेटरीजमध्ये गेले, जॉन गाडीत बसून राहिला आणि बाकीचे करायलाच हवी अशी कठीण गोष्ट करायला आत गेले. रडणाऱ्या दोन बायकांसह ते पुन्हा शांतपणे गाडीत आले आणि तसेच शांतपणे घरी परत आले. मेरीच्या वडिलांनी दरवाजा उघडला.

“जार्विस, अजून थोडसं ड्रिंक घेणार? की आराम करावासा वाटतोय तुम्हाला?”

“मार्गारेट, मी येऊ का तुझ्याबरोबर वरती?”

“नको, घे तू ड्रिंक.”

“तु झोप वर जाऊन, मी आलोच.”

“हो, जेम्स.”

जेम्सनी तिचे चुंबन घेतले आणि त्याही क्षणभर त्यांना चिकटल्या. तू किती करतोयस माझ्यासाठी, त्या म्हणाल्या आणि दोघांच्याही डोळ्यात पुन्हा पाणी आले. सुनेसोबत जिना चढून जाणाऱ्या आपल्या बायकोकडे ते बघत राहिले आणि दरवाजा बंद झाल्यावर ते हॅरिसन ह्यांच्या अभ्यासिकेकडे जायला वळले.

“आईसाठी हे सगळ्यात कठीण असतं, जार्विस.”

“हो.”

“माझा मुलगा माझा खूप लाडका होता आणि त्याचा मला नेहमीच अभिमान वाटायचा.”

ड्रिंक घ्यायला बसल्यावर हॅरिसननी ह्या खुनामुळे पार्कवर्ल्डमधील लोकांना कसा धक्का बसला आहे आणि किती लोक भरभरून शोकसंदेश पाठवीत आहेत ते सांगितलं.

“कल्पनाही करता येणार नाही इतक्या ठिकाणांहून वेगवेगळ्या लोकांचे संदेश आले आहेत. जार्विस, उद्या दुपारी चर्चमधील सेवेनंतर अंत्यसंस्कार विधी करायचे आम्ही जाहीर केले आहे. चर्चमधील सेवा तीन वाजता सुरु होईल. चालेल ना?”

जार्विसनी मान डोलावली. “धन्यवाद”, ते म्हणाले.

“सगळ्यांकडून आलेले शोकसंदेश आम्ही तुमच्यासाठी ठेवले आहेत. बिशप, प्रभारी पंतप्रधान, महापौर आणि आणखी डझनभर तरी संदेश आले आहेत. काळ्या लोकांच्या संस्थांकडून, ’डॉटर ऑफ आफ्रिका’ ह्या संस्थेकडून, आणि इतर अनेक संस्थांकडून तसेच निमगोरे, भारतीय आणि ज्यू अशा समाजांकडूनही संदेश आले आहेत.”

ह्या दुःखद प्रसंगातही गर्वाने आपली छाती भरून आल्याचं त्यांना जाणवलं. “तो हुशार होता...त्याच्या आईसारखाच”, ते म्हणाले.

“तो खरंच खूप हुशार होता. तुम्ही जॉनकडून त्याच्याबद्दल ऐकलं पाहिजे. सगळ्या प्रकारच्या लोकांना तो आवडायचा. तुम्हाला माहीतच असेल तो आफ्रिकानर लोकांसारखा आफ्रिकान्स बोलायचा.”

“हो, तो ती भाषा शिकला हे मला माहित होतं.”

“माझ्यासाठी तर ती एक अपरिचित भाषा आहे. मला त्यातला एक शब्दही कळत नाही. पण आपण ही भाषा शिकायलाच हवी असा विचार करून त्याने त्या भाषेतले धडे गिरवले आणि आणखी शिकायला तो एका आफ्रिकानरच्या शेतावरही गेला. तो झुलू चांगली बोलायचं हे तर तुम्हाला माहीतच असेल पण आता सेसुटो भाषाही शिकायला हवी असं तो बोलत होता. काळ्या लोकांचे खासदार तर त्याला पुढच्या निवडणुकीत उभे होण्यासाठी आग्रह करत होते.”

“हे मला माहित नव्हतं.”

“हो, तो इकडेच जास्त बोलत रहायचा ना. कुठल्या विषयावर माहित्ये? अशिक्षित लोक करत असलेले गुन्हे, काळ्या लोकांसाठीच्या शाळा... त्याच्या गैरयुरोपीय लोकांच्या दवाखान्याच्या अवस्थेवरील लेखाने तर गदारोळ उठवला होता. खाणकामगारांच्या कुटुंबाशिवाय राहण्याच्या व्यवस्थेवर तो सडकून टीका करायचा. खाणीच्या व्यवस्थापनाने कामगारांच्या संपूर्ण कुटुंबाच्या राहण्याची सोय करायला हवी असं त्याचं ठाम मत होतं.”

चिरूट शिलगावत जार्विस आपल्या मुलाच्या, आपल्या अनोळखी मुलाच्या गोष्टी मन लावून ऐकत होते.

“खाण व्यवस्थापकांच्या संस्थेने तर याविषयी माझ्याजवळ नाराजी व्यक्त केली होती. आर्थरच्या संस्थेला खाणीच्या व्यवस्थापनाने बरेच काम दिलं होतं. जर त्यानं आपली भाषा मवाळ केली नाही तर त्यांच्या आर्थिक व्यवहारावर याचे परिणाम होऊ शकतील हे मी त्याला समजावून सांगावं असं त्यांनी मला सुचवलं होतं. म्हणून एकदा मी त्याच्याशी बोललो, की मी तुझ्या भावना समजू शकतो. पण तू थोडा शांतपणे ह्याचा विचार कर. मेरी आणि मुलांचाही तू विचार करावास. अर्थातच मी हे मेरीच्या वतीने बोलत नव्हतो. लग्न झालेल्या जोडप्यांच्या गोष्टीत नाक खुपसायला मला आवडत नाही. बरोबर ना?”

“अगदी बरोबर.”

“तो म्हणाला, माझं मेरीशी ह्या विषयावर बोलणं झालं आहे. तिला आणि मला हे मान्य आहे की आमच्यासाठी पैशापेक्षा सत्य सांगणं जास्त गरजेचं आहे.”

यावर हॅरिसन जोरात हसणार होते पण परिस्थितीचं गांभीर्य त्यांना लक्षात आलं. “माझा जॉन तिथे होता आणि आर्थरकडे देवदूत असल्यासारखा पाहत होता. मग मी पुढे काय बोलणार?”

ते थोडा वेळ शांतपणे धुम्रपान करत राहिले. “मी त्याला त्याच्या भागीदारांविषयी विचारलं कारण शेवटी त्यांचा खाणींना यंत्र विकण्याचा व्यवसाय होता. मी त्यांच्याशीही बोललो आहे असं तो मला म्हणाला. जर माझ्यामुळे व्यवसायात काही अडचण येणार असेल तर मी त्यातून बाहेर पडेन असं त्याने त्याच्या भागीदारांना सांगितलं होतं. पण मग तू नंतर काय करणार असं मी त्याला विचारलं तर किती किती गोष्टी आहेत करण्यासारख्या असं म्हणत तो उत्साहाने फुलून गेला होता. आता मी यावर पुढे काय बोलणार?”

जर्विसकडे याचं उत्तर नव्हतं. त्यांचा स्वतःचा मुलगा त्यांना अपरिचित असलेल्या निबिडात शिरला होता. त्यांना ह्यातलं काहीच माहित नव्हतं. कदाचित त्याच्या आईला माहित असेल. पण ते स्वतः कधी ह्या वाटेने गेलेच नसल्यामुळे त्याबद्दल ते काही बोलूही शकत नव्हते.

“माझ्या बोलण्याने तुम्हाला त्रास तर होत नाहीये ना? की आपण दुसरं काहीतरी बोलूया? की तुम्हाला झोपायला जायचंय?”

“नाही, नाही. बोला. तुमच्या बोलण्याने बरंच वाटतंय मला. ”

“हो, जरा वेगळाच होता तो. ह्या विषयांवर आम्ही जास्त बोलायचो नाही. कारण मला त्यातलं फार काही कळायचं नाही. मी काळ्या लोकांना चांगल्या प्रकारे वागवतो पण उठता बसता फक्त त्यांचा विचार करत नाही. आणि खरं सांगू का जार्विस, ह्या गुन्हेगारीने आम्ही भेदरलोय. जोहान्सबर्गमधले आम्ही सगळे खूप घाबरून गेलोय.”

“कुठली गुन्हेगारी?”

“काळ्या लोकांची गुन्हेगारी. खून, दरोडे, हल्ले यांचं प्रमाण भयंकर वाढलंय. तुम्हाला सांगू का रात्री घराचा कडेकोट बंदोबस्त केल्याशिवाय आम्ही झोपतच नाही. फिलीप्सनच्या घरी तीन दरवाजे फोडून चोरांची टोळी घरात शिरली. फिलीप्सनना त्यांनी बेशुद्ध होईपर्यंत मारलं आणि मिसेस फिलीप्सनना सुद्धा मारहाण केली. तरी बरं त्यांची मुलगी बाहेर गेली होती, नाहीतर काय झालं असतं ह्याचा विचारही करवत नाही. आर्थरला मी ह्याबद्दल विचारलं तर तो म्हणाला आपल्या चुकांचा हिशोब द्यावा लागतोय. मला त्याचं सगळंच पटत होतं असं नाही पण तो अतिशय संवेदनशील होता हे मात्र खरं. तुम्हाला वाटत असेल ना हे सगळं समजून घ्यायला तुम्हाला वेळ मिळायला हवा होता?”

“मला एक गोष्ट कळत नाहीये, हे का घडलं असावं?”

“त्याच्याबाबतीत?”

“हो.”

“सगळ्यात पहिल्यांदा आमच्याही मनात हेच आलं. दिवसरात्र एक ध्यास घेतल्यासारखा तो हे काम करत होता. आणि त्याच्याबाबतीत हे घडावं?”

“पण हे या आधीही घडलंय. मिशनरींनाही मारलय लोकांनी.” जार्विस म्हणाले.

हॅरिसनकडे ह्या प्रश्नाचं उत्तर नव्हतं आणि ते दोघंही शांतपणे धुम्रपान करत राहिले. जार्विस विचार करत होते. मिशनरी, आपल्या मुलाला आपण मिशनरी म्हटलं ह्याचं त्यांना आश्चर्य वाटलं. कारण त्यांनी आत्तापर्यंत कधी मिशनरींचा विचारही केला नव्हता. चर्चने बरेचदा आवाहन केल्यावर त्यांनी कधीमधी मिशनरींसाठी काही दिलं होतं, पण त्यांचा मिशनरींवर काही फारसा विश्वास नव्हता. त्यांच्याजवळच न्दोत्शेनीला एक चर्चचं काम चालू होतं. पण त्यांना आठवत होतं त्याप्रमाणे ती एक उदास जागा होती.

एक लाकूड आणि लोखंडाचं तुटकं फुटकं दुर्लक्षित चर्च, एक गावंढळ म्हातारा पाद्री आणि जिथे धड गवतही उगवत नाही असं रखरखीत खोरं. कधीतरी घोड्यावरून जाताजाता त्यांच्या जुनाट शाळेतून काहीतरी पोपटासारखं मुलांनी घोकताना त्यांनी ऐकलं होतं.

“झोपायचं, जार्विस? की आणखी एकदा ड्रिंक?”

“झोपूया आता. पोलीस येणार आहेत असं काही म्हणाला होतात का तुम्ही?”

“ते नऊ वाजता येणार आहेत. “

“मला ते घरही बघायचंय.”

“मला वाटलेलंच की तुम्हाला घर बघायचं असेल. ते घेऊन जातील तुम्हाला तिकडे.”

“बरं. मग मी आता झोपतो. तुमच्या बायकोला माझ्याकडून गुड नाईट सांगाल का?”

“नक्की सांगतो. तुम्हाला तुमची खोली माहित आहे ना? आणि नाश्ता सकाळी साडेआठला?”

“हो साडेआठला. गुड नाईट, हॅरिसन. आणि तुम्ही आमच्यासाठी जे जे करताय त्यासाठी धन्यवाद.”

“कृपया धन्यवाद म्हणून नका. आम्हाला काहीच त्रास नाही. गुड नाईट, जार्विस. तुम्हाला आणि मार्गारेटना थोडी तरी झोप मिळायला हवी.”

जिना चढून जार्विस खोलीत गेले. खोलीतला दिवा न लावता त्यांनी हळूच दरवाजा बंद केला. खिडकीतून चंद्र चमकत होता. बाहेर नजर टाकत ते उभे राहिले. खाली जे काही ऐकलं ते पुन्हा एकदा त्यांच्या मनाला स्पर्शून गेलं. त्यांची बायको कुशीवर वळली आणि तिने हाक मारली, जेम्स.”

“जागीच आहेस का तू?”

“कसला विचार करतोयस?”

उत्तराची जुळवाजुळव करत ते शांत उभे राहिले. “ह्याच सगळ्याचा.”

“मला वाटलं तू कधीच येणार नाहीस.”

ते चटकन तिच्याजवळ गेले आणि तिने त्यांचे हात धरून ठेवले. आम्ही त्याच्याविषयीच बोलत होतो, ते म्हणाले. त्याने जे केलं आणि जे त्याला करायचं होतं त्याबद्दल. त्याच्या अचानक जाण्याने शोकाकुल झालेल्या लोकांबद्दल.”

“मला सांग ना सगळं.”

मग हळू आवाजात त्यांनी तिला जे ऐकलं होतं ते सगळं सांगितलं. क्षणभर ती फुलून गेली कारण इतकं भरभरून तिचा नवरा फारसं कधी बोलत नसे. पण आज मात्र त्यांनी तिला हॅरिसनने सांगितलेलं सगळं सगळं सांगितलं.

“मला अभिमान वाटतोय त्याचा.” ती कुजबुजली.

“पण तो असा आहे हे तुला तर माहीतच होतं.”

“हो, मला माहित होतं.”

“तो एक चांगला माणूस आहे हे मला माहित होतं, पण तो नेहमीच माझ्यापेक्षा तुझ्या जवळ होता.”

“आईला ते जास्त सोपं असतं, जेम्स. “

“असेल. पण मला आता असं वाटतंय की मला त्याच्याविषयी आणखी माहित असायला हवं होतं. तो जे करत होता त्याविषयी मला कधीच फारसं काही देणं घेणं नव्हतं.”

“मलाही नव्हतं. त्याचं जगणं आपल्यापेक्षा खूपच वेगळं होतं. “

“सगळ्या बाजूंनी विचार केला तर त्याचं जगणं आपल्यापेक्षा कितीतरी चांगलं होतं.”

“हो, जेम्स.”

“मी त्याला समजून घेतलं नाही ह्याचं आता वाईट वाटतंय. ते इतकं महत्वाचं होऊन बसेल असं वाटलं नव्हतं.” ते पुटपुटले.

“हो नं, काय झालं हे!” तिचे हात त्यांच्याजवळ आले आणि ती पुन्हा रडायला लागली. एक गोष्ट मला समजत नाहीये त्याच्याबाबतीत असं का व्हावं, ते सारखे पुटपुटत राहिले.

ती आडवी पडून विचार करत राहिली. वेदना खोल, अगदी आत आत रुतल्या होत्या आणि आता त्या सोसणं अटळ होतं. तिने त्यांना आपल्या जवळ घेऊन थोपटलं. “जेम्स, आता झोपायचा प्रयत्न करूया” ती म्हणाली.

3

त्यांची बायको आणि मेरी हॅरिसनच्या घरी परतले आणि जार्विस त्यांच्या मुलाच्या खुर्चीत बसले. सगळीकडे पुस्तकं, पुस्तकं, पुस्तकं आणि खूप सारी पुस्तकं! एका घरात एवढी पुस्तकं त्यांनी कधीच बघितली नव्हती. टेबलावर कागद, पत्रं आणि आणखी पुस्तकं. मि. जार्विस, तुम्ही पार्कवर्ल्ड मेथडिस्ट गिल्डच्या सभेत बोलाल का? मि. जार्विस, तुम्ही यंग पिपल असोसिएशन, सोफिया टाऊनच्या सभेत बोलाल का? मि. जार्विस, तुम्ही विद्यापीठाच्या परिसंवादात बोलाल का? नाही, मि. जार्विस ह्यापैकी कुठेही बोलू शकणार नाहीत.

मि. जार्विस, तुम्हाला ज्यू आणि ख्रिश्चन सोसायटीच्या वार्षिक सभेसाठी आमंत्रित करीत आहोत. मि. जार्विस, तुम्हाला आणि तुमच्या पत्नीला मि. आणि मिसेस एच. बी. सिंग त्यांच्या ज्येष्ठ कन्येच्या विवाहासाठी आमंत्रित करीत आहेत. मि. जार्विस, तुम्हाला आणि तुमच्या पत्नीला वॅन विक व्हॅली येथील टॉक एच गेस्ट नाईटला येण्यासाठी आम्ही आमंत्रित करीत आहोत. नाही, मि. जार्विस ह्यातील कोणतेही आमंत्रण स्वीकारू शकणार नाहीत.

भिंतीवरील पुस्तकांच्या कपाटांच्यामध्ये वधस्तंभावरील ख्रिस्त, अब्राहम लिंकन, व्हरजॅलिजनमधील उतरत्या छपरांचं पांढरं घर आणि हिवाळ्यातले नदीकाठचे निष्पर्ण वाळुंज वृक्ष अशी चार चित्रं लावलेली होती.

ते खुर्चीतून उठले आणि पुस्तकं बघू लागले. अब्राहम लिंकन ह्यांचाविषयीची शेकडो पुस्तकं तिथे होती. एका माणसावर इतकी पुस्तकं लिहिलेली हे बघून त्यांना मोठंच आश्चर्य वाटलं. एक कपाट ह्याच पुस्तकांनी भरलं होतं. आणि दुसरं कपाट दक्षिण आफ्रिकेवरील पुस्तकांचं होतं. सारा गर्टरुड मिलिन यांचं 'लाइफ ऑफ रोडेस' हे पुस्तक, 'स्मट्स' ह्यांच्यावरील पुस्तक, इंजेलेनबर्ग ह्यांचं 'लाईफ ऑफ लुईस बोथा', तसेच आफ्रिकन वंशाचे प्रश्न हे पुस्तक, दक्षिण आफ्रिकन पक्षी, क्रुगर पार्क आणि आणखी असंख्य पुस्तकं तिथे होती. एक कप्पा आफ्रिकान भाषेतल्या पुस्तकांनी भरलेला होता पण त्यांना त्या पुस्तकांच्या नावावरून काहीच अर्थबोध होत नव्हता. तिथे वेगेवेगळे धर्म, सोविएत रशिया, गुन्हे आणि गुन्हेगार अशा अनेक विषयांवरची तसेच कवितांची पुस्तकंसुद्धा होती. त्यांनी शेक्सपिअरची पुस्तकं शोधली आणि त्यांना तिथे शेक्सपिअरसुद्धा दिसला.

ते पुन्हा खुर्चीत बसले आणि त्यांनी लांबून पुन्हा वधस्तंभावरील ख्रिस्त, अब्राहम लिंकन, व्हरजॅलिजनमधील उतरत्या छपरांचं पांढरं घर आणि हिवाळ्यातले नदीकाठचे निष्पर्ण वाळुंज वृक्ष ह्यांची चित्रं बघितली. नंतर त्यांनी तिथे ठेवलेल्या कागदांपैकी काही कागद आपल्याजवळ ओढले.

त्यातलं पाहिलं पत्र क्लेअरमाउंटमधल्या ग्लॅडिओलस स्ट्रीटवरील आफ्रिकन बॉइज क्लबच्या सचिवाचं होतं. त्यात त्याने त्यांच्या मुलाला वार्षिक सभेला हजर न राहिल्याबद्दल खेद व्यक्त करत सर्व सभासदांनी त्यांना पुन्हा अध्यक्ष म्हणून निवडल्याचं कळवलं होतं. त्या पत्राचा शेवट अतिशय आकर्षक होता.

तुम्ही आमच्यासाठी देत असलेला मौल्यवान वेळ आणि त्यातून संस्थेला मिळत असलेले तुमचे अमूल्य मार्गदर्शन यासाठी तुमच्याप्रती धन्यवाद प्रदर्शित करण्याचे आणि तुमच्याविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करण्याचे काम वार्षिक सभेने माझ्यावर सोपवले आहे. तुमच्याशिवाय हा क्लब कसा उभारला गेला असतां अशी बऱ्याच जणांना शंका आहे. या तुमच्या योगदानामुळेच तुम्हाला पुन्हा क्लबच्या अध्यक्षपदी निवडताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

काही अपरिहार्य कारणांमुळे आपल्या क्लबचे कागद हरवल्यामुळे हे पत्र साध्या कागदावर लिहित आहे ह्यास्तव माफी चाहतो.

तुमचा विश्वासू चाकर,

वॉशिंग्टन लेफिफी.

बाकीची कागदं त्यांच्या मुलाच्या हस्ताक्षरातली होती. अर्थातच ती कुठल्यातरी मोठ्या लेखातली पानं होती कारण वाक्याची सुरुवात आधीच्या वाक्याच्या शेवटाने झालेली होती. त्यांनी आधीचे पान शोधायचा प्रयत्न केला, पण ते न सापडल्यामुळे मिळालं आहे तिथूनच वाचायला सुरुवात केली.

...समजून घेता येईल. आपण दक्षिण आफ्रिकेला आल्यानंतर जे केले ते एकवेळ मान्य करता येईल. संसाधनं विकसित करण्यासाठी आपल्याला मिळाल्या त्या मजुरांकडून काम करून घेणे एकवेळ मान्य करता येईल. कष्टाची कामं करण्यासाठी विशेष कौशल्य नसलेल्या मजुरांना त्यावेळी आपण कामाला लावलं हे एकवेळ समजता येण्यासारखं आहे,

पण आजही त्यांनी तशीच कष्टाची कामं करावीत म्हणून त्यांना जाणूनबुजून अकुशल ठेवणे मात्र योग्य ठरणार नाही.

जेव्हा आपण सोन्याचा शोध लावला तेव्हा विविध मार्गांनी मजुरांना खाणींकडे घेऊन जाणे कदाचित अपरिहार्य असेल. मजुरांना मुलं आणि बायकांपासून दूर करीत बंदिस्त आवारात डांबून ठेवण्याला कदाचित तेव्हा काही पर्याय नसेल. आपल्या त्यावेळच्या तोकड्या ज्ञानाच्या पार्श्वभूमीवर एकवेळ प्रयोग म्हणून ते समजून घेता येईल. पण आता मात्र एखाद्याचे कौटुंबिक आयुष्य आपण उद्ध्वस्त करीत आहोत हे समजत असताना तसे करत राहणे अगदीच अमानुषपणाचे ठरेल.

जर सगळ्यांची प्रगती होईल असा ठाम विश्वास असेल तर एकवेळ साधनसंपत्तीचा विनिमय मान्य करता येईल. पण मजुरांच्या जीवावर उठलेला विकास कधीही मान्य करता येणार नाही. खाणीतून सोने खणून काढणे असो की नवीन उत्पादन तयार करणे असो की एखादी जमीन लागवडीखाली आणणे असो, जर ते खाणकाम, उत्पादन किंवा लागवड मजुरांना गरीब ठेऊनच फायद्यात राहू शकणार असेल तर तसे करणे योग्य ठरणार नाही. एकाची मालमत्ता वाढवण्यासाठी दुसऱ्याला किंमत मोजावी लागणार असेल तर तसे करणे मान्य करता येणार नाही. अशा विकासाला एकच शब्द योग्य ठरेल, तो म्हणजे पिळवणूक. अगदी सुरुवातीच्या काळात, जेव्हा ह्याचे परिणाम माहित नव्हते तेव्हा ते एकवेळ ठीक म्हणता येईल. पण आता, जेव्हा यातून काळ्या लोकांचे सामाजिक जीवन उद्ध्वस्त होते आहे, कौटुंबिक जीवनाचा ऱ्हास होतो आहे, गरिबी, झोपडपट्टी आणि गुन्हेगारी यात वाढ होते आहे हे आपल्या लक्षात आले आहे तेव्हातरी ते मान्य करता येणार नाही.

जेव्हा एकूणच शिक्षणाचे प्रमाण कमी होते अशा काळी काळ्या लोकांच्या शिक्षणाविषयी बेपर्वाई दाखवणे, त्यांच्या शिक्षणाच्या फायद्याविषयी साशंक असणे हे कदाचित माफ होण्याजोगे असेल. पण आजही त्यांच्या शिक्षणात चालढकल करणे माफ होण्याजोगे नाही. काळ्या लोकांना साक्षर करणे सामाजिक कार्यकर्त्यांवर सोडून देणे पूर्वी मान्य करता येण्यासारखे होते. त्यांच्या शिक्षणाच्या फायद्याविषयी तेव्हा शंका घेणे कदाचित मान्य करता येण्यासारखे असेल. या शिक्षणामुळेच आपण मदत न करताही त्यांचा औद्योगिक विकास होऊ लागलेला आहे आणि शहरी काळ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. आता त्या समाजाने स्वतःच्या फायद्यासाठी का होईना

पण आपल्या मुलाबाळांना शिक्षण देऊन नियम पाळणारे सामाजिक हेतू आणि ध्येय मानणारे बनवण्याचा प्रयत्न चालविला आहे. शिक्षणाचा त्यांच्यावर होत असलेला उत्साहवर्धक परिणाम माहित असूनही जुनेच धोरण राबविणे, त्यांच्या शिक्षणासाठी खर्च करण्यास विरोध करणे माफ करता येणार नाही. किमान आपल्या स्वार्थासाठी तरी ते मान्य करता येणार नाही. कारण ते फारच धोकादायक असेल.

त्यांची पूर्वापार चालत आलेली समाजव्यवस्था सदोष होती, काळाला अनुरूप नव्हती आणि देशाच्या एकूण विकासाला बाधक होती ही आपली समजूत एकवेळ मान्य करता येईल. त्यामुळेच ती मूल्यव्यवस्था ढासळत असताना आपण अलिप्त राहिलो हे त्यावेळी एकवेळ क्षम्य मानता येईलही. काळाच्या ओघात असं होणारच अशी स्वतःची सोयीस्कर समजूत देखील करून घेता येईल. पण त्यांना पर्यायी व्यवस्था देण्यात आपण जी कुचराई करतो आहोत आणि त्यामुळे त्यांचा वेगाने होणारा भौतिक आणि नैतिक ऱ्हास ज्या निर्विकारपणे बघत आहोत ते मात्र अजिबात माफ करण्याजोगं ठरणार नाही.

त्यांची जुनी समाज व्यवस्था कितीही रानटी आणि हिंसक मानली, जादूटोणा आणि अंधश्रध्दा पसरवणारी मानली तरी तिला काही नैतिक मुल्ये होती. आज आपले काळे लोक गुन्हेगार, वेश्या व्यवसाय करणारे आणि दारुडे झाले आहेत याचं कारण तसेच राहण्याची त्यांची प्रवृत्ती असते हे नाही तर त्यांचे साधे राहणीमान जपणारी त्यांची परंपरा, मूल्यव्यवस्था, संकेत नष्टप्राय झाले आहेत हे आहे. आमच्या संस्कृतीने त्यांच्यावर घातलेल्या घावांनी त्यांची संस्कृती नष्ट झाली आहे. म्हणूनच त्यांच्यासाठी एक चांगली परंपरा, मूल्य आणि संकेत असलेली समाजव्यवस्था निर्माण करणे हे आपल्या समाजाचे अपरिहार्य कर्तव्य आहे.

काळ्या लोकांची समाजव्यवस्था टिकून रहावी म्हणून आपण आणि ते अशी विभागणी करण्याचा आपण प्रयत्न केला होता हे खरं आहे. क्षणभरासाठी ते मान्य होण्याजोगं होतं असं समजूया. पण आपण तेही कधी व्यवस्थित आणि प्रामाणिकपणे केलं नाही. आपण चार पंचमांश लोकांसाठी एक दशांश जमीन ठेवली. त्यामुळे काहीजण म्हणतात तसं जाणूनबुजून ते मजूर म्हणून शहरात यावेत यासाठी आपण तरतूद करून ठेवली. त्यामुळे आपण आपणच विणलेल्या स्वार्थीपणाच्या जाळ्यात अडकलो.

कोणालाही हा प्रश्न आहे त्यापेक्षा थोडा सोपा व्हावा असे वाटत नाहीये. कोणालाही ह्याचे उत्तर शोधावे असं वाटत नाहीये. आपल्याला घेरून टाकणाऱ्या भीतीवर प्रकाश

टाकावा असं कोणालाही वाटत नाहीये. आपण घाबरलेले असू किंवा नसू पण आपण ख्रिश्चन असल्यामुळे ह्या नैतिक समस्यांपासून आपण दूर पळून जाऊ शकत नाही. आता वेळ आली आहे...

आणि तिथे त्या हस्तलिखिताचे पान संपले. वाचनात गुंगून गेलेल्या जार्विसनी टेबलावरच्या कागदांमध्ये पुन्हा पुन्हा पुढचे पान आहे का ते शोधण्याचा प्रयत्न केला. पण ह्यापुढे काही लिहिले आहे असे त्यांना आढळले नाही. आपली चिरूट पेटवून त्यांनी पुन्हा ती कागदं वाचायला सुरुवात केली.

दुसऱ्यांदा वाचून झाल्यानंतर ते बराच वेळ चिरूट ओढीत आपल्याच विचारात हरवून गेले. नंतर ते खुर्चीतून उठले, लिंकनची पुस्तकं ठेवली होती त्या कपाटाजवळ गेले आणि ज्या माणसाने त्यांच्या मुलावर एवढा प्रभाव टाकला होता अशा माणसाच्या चित्राकडे पाहत राहिले. तिथल्या शेकडो पुस्तकांकडे पाहत काच बाजूला सरकवून त्यांनी एक पुस्तक काढले. मग ते पुन्हा खुर्चीत येऊ बसले आणि पुस्तक चाळू लागले. पुस्तकातील एका प्रकरणाचं नाव होतं 'गेटीसबर्ग येथील प्रसिद्ध भाषणे'. वरवर पाहता ती फसलेली भाषणं वाटत होती पण तरीही जगातली उत्तम भाषणांपैकी एक होऊन बसली होती. त्यांनी ती भाषणं काळजीपूर्वक वाचली आणि पुन्हा चिरूटाच्या धुरात काहीतरी गूढ विचारांत हरवून गेले. थोड्या वेळाने उठून त्यांनी हे पुस्तक ठेवून कपाटातले दुसरे पुस्तक काढले पण लगेचच त्यांनी पुन्हा तेच पुस्तक उचलून आपल्या पिशवीत ठेवले. त्यांनी घड्याळात बघितले, आपल्या चिरूटातली राख फायरप्लेसमध्ये झटकली आणि हॅट घालून, हातात काठी घेऊन ते निघाले. ते सावकाश जिना उतरले आणि दरवाजा उघडून त्या जागी- जिथे आपल्या मुलाचा प्राण घेतला गेला त्या जागेजवळ आले. त्यांनी डोक्यावरची हॅट काढली आणि भिंतीवर पडलेल्या एका गडद डागाकडे ते पाहत राहिले. अचानक त्या हाय प्लेस मधल्या लाकडी बंदूक घेतलेल्या त्या छोट्याशा मुलाचे दृष्य त्यांच्या डोळ्यासमोर आले. मुलाच्या मृत्युच्या जागेजवळून चालत येत त्यांनी दरवाजा उघडला. पोलिसाने त्यांना सलाम केला. स्वतःच्याच तंद्रीत काहीतरी पुटपुटत ते फाटकापाशी गेले. विमनस्कपणे त्यांनी रस्त्याकडे पहिले आणि मोठ्या प्रयासाने चालायला सुरुवात केली. एक सुस्कारा सोडत पोलीस जरा निवांत झाला.

4

पार्कवर्ल्ड चर्चमधले विधी सुरु झाले आणि येणाऱ्या लोकांसाठी चर्च अपुरे पडू लागले. गोरी माणसं, काळी माणसं, मिश्रवर्णीय माणसं, भारतीय..... पहिल्यांदाच मिसेस आणि मि. जार्विस गोरे नसलेल्या लोकांसोबत चर्चमध्ये बसले होते. बिशपनी करुण आणि सांत्वनपर शब्दांनी सर्वांना संबोधित केले. एक तरुण आपल्या तारुण्यातच आपल्यापासून का हिरावला गेला, एका स्त्रीला विधवा आणि मुलांना अनाथ का केले गेले, जो देशाची मोठी सेवा करू शकला असता अशा माणसाला देशापासून का तोडले गेले हे एक कोडे आहे असं ते म्हणाले. दक्षिण आफ्रिकेविषयी बोलताना त्यांचा आवाज जरा उंचावला आणि त्यांच्या भाषेत इतकी नजाकत होती की क्षणभर जार्विसही आपलं दुःख विसरून त्यांचं बोलणं ऐकायला लागले. बिशप म्हणाले की हे एक असं व्यक्तिमत्व होतं ज्याने दक्षिण आफ्रिकेसाठी स्वतःला वाहून घेतलं होतं. बुद्धी आणि धैर्य यांचा संगम असलेल्या, भीतीला हद्दपार करू शकणारं प्रेम असलेल्या व्यक्तीसाठी त्यांच्या मनात अभिमान उफाळून आला. कारण ती व्यक्ती त्यांचा मुलगा होती, त्यांना अपरिचित असलेला त्यांचा मुलगा.

अंत्यविधी आटोपले. निःशब्दपणे पितळी दरवाजे उघडले गेले, जिथे त्याची काही क्षणातच राख होणार होती अशा शवदाहिनीवर निःशब्दपणे कॉफिन ठेवले गेले. कित्येक अनोळखी लोकांनीही त्यांच्याशी हात मिळवले, त्यांचे सांत्वन केले, सहानुभूती दर्शवली, त्यांच्या मुलाविषयी गौरवास्पद बोलणे केले. काळ्या लोकांनी, हो, काळ्या लोकांनीसुद्धा त्यांच्याशी चर्चा केली. आज आयुष्यात पहिल्यांदा त्यांनी काळ्या लोकांबरोबर हस्तांदोलन केले होते.

ते हॅरिसन यांच्या घरी परतले. ती रात्र त्यांच्यासाठी आयुष्यातली सगळ्यात जीवघेणी रात्र होती. मार्गारेट यांची अवस्था तर फारच बिकट होती आणि जार्विस आज त्यांना एकट्यांना सोडून कुठेही गेले नाही. आता त्यांच्यासाठी मात्र ते सगळे संपले होते. आता ते हॅरिसन यांच्या अभ्यासिकेत बसून विस्कीचे घुटके घेत आणि चिरूट ओढत शांत बसू शकत होते. हॅरिसनशी ते कोणत्याही विषयावर, अगदी त्यांच्या मुलाबद्दलही बोलू शकत होते.

“तुम्ही साधारण कधीपर्यंत इथे राहणार आहात जार्विस? तुम्हाला राहायचंय तितके दिवस तुम्ही अगदी निश्चिंतपणे राहू शकता.”

“धन्यवाद, हॅरिसन. मला वाटतं मार्गारेट, मेरी आणि मुलं घरी परत जातील. मी आमच्या शेजारच्या मुलाला त्यांच्यासोबत रहायला सांगणार आहे. तो नुकताच सैन्यातून आला आहे आणि अतिशय सालस मुलगा आहे. पण मी मात्र अजून काही दिवस आर्थरच्या राहिलेल्या कामांची थोडीफार उस्तवार करेपर्यंत रहायचं म्हणतोय.”

“पोलीस काय म्हणतायत?”

“ते अजून तो नोकर शुद्धीवर येण्याची वाट बघतायत. त्यांच्यापैकी एखाद्याला तो ओळखेल अशी त्यांना आशा आहे. तसं झालं नाही तर मात्र सगळं अवघड होऊन बसेल. सगळं इतक्या झटकन झालं, पण जाता येता कोणीतरी त्यांना बघितलं असेल अशी त्यांना आशा आहे. ते खूप घाबरले किंवा उत्तेजित झाले असावेत आणि त्यामुळे जाताना कोणाला न कोणाला तरी त्याचा संशय आला असला पाहिजे.”

“देवाजवळ माझी प्रार्थना आहे की खुनी लवकरच पकडले जावेत आणि त्यांना ताबडतोब फासावर लटकावलं जावं. माझ्या कडक भाषेबद्दल मला माफ करा, जार्विस.”

“मला अगदी समजतंय तुम्हाला काय म्हणायचंय.”

“जार्विस, आम्ही आता अगदीच असुरक्षित झालो आहोत. गुन्हेगारांना फासावर लटकावलं तरी आम्ही सुरक्षित असू की नाही शंका आहे. कधी कधी वाटतं हे सगळं आपल्या हाताबाहेर गेलंय.”

“मला समजतंय तुम्हाला काय म्हणायचंय. पण मला असं वाटतं - खरं तर मी अजून त्याचा नीट विचारच केलेला नाहीये.”

“तुमचं अगदी बरोबर आहे. मला अगदी समजते आहे तुमची मनःस्थिती. ह्या घटनेच्या दुसऱ्या बाजूचाही कदाचित तुम्ही विचार करत असाल. माहित नाही, पण तुम्ही त्या बाजूचे नाही असं मला नक्की वाटतंय. माझ्या मते आपण दोघेही एकाच बाजूचे आहोत.”

“मलाही माहित नाहीये मला काय वाटतंय. दुसरी बाजू अजून तरी मला महत्वाची वाटत नाहीये, पण ह्या सगळ्याला एक काहीतरी दुसरी बाजूही आहे असं आता जाणवू लागलंय.”

“पोलिसांची संख्या वाढवावी यासाठी आम्ही आता आंदोलन करत आहोत, जार्विस. पार्कवर्ल्डला उद्या रात्री एक मोठी सभा होणार आहे. पार्कवर्ल्ड सध्या संतापाने पेटून उठलंय. तुम्हाला सांगू का जार्विस, ह्या उपनगरात राहणाऱ्यांपैकी अगदी थोड्यांना त्यांच्या नोकरांच्या घरात कोण राहतं ते माहित असेल. म्हणूनच मी असे नोकरांसाठीचे घर वगैरे बांधलंच नाही. मी माझ्या नोकरांना सांगितलंय की मला माझ्या घराजवळ अनोळखी लोकं आलेली चालणार नाहीत. त्याला एकट्याला आमच्या घरी झोपण्याची परवानगी मी दिली आहे. आमच्याकडे काम करत असलेल्या मुलीचा नवरा कधीतरी तो जिथे काम करतो तिथून म्हणजे बेनोनो किंवा स्प्रिंग्ज किंवा आणखी कुठून तरी तिला भेटायला येतो. ती त्याला येताना आपल्या घरात शोभेल असं व्यवस्थित तयार होऊन यायला सांगते. फक्त त्यालाच येण्याची मी परवानगी देतो. दुसऱ्या कोणालाही नाही. तशी परवानगी दिली असती तर आमच्या घरी तिच्या भावांचा, चुलत भावांचा आणि चुलत्यांचा सुळसुळाट झाला असता. कोण सांगणार, त्यातलं कोण चांगलं आहे आणि कोण वाईट?

“बरोबर आहे, जोहान्सबर्गमध्ये असंच करायला लागणार.”

“आमच्या घरांच्या मागे जी गटारं आहेत ना, त्यांची काहीतरी नीट व्यवस्था करा म्हणून आम्ही मागणी करत आहोत. ती खूप काळोखी आणि भीतीदायक आहेत. गुंड लोकं त्यांचा लपण्यासाठी उपयोग करतात. आपल्या देशाचं काय होणार देवाला माहित. मला तर काहीच समजेनासं झालंय. मी वर्णद्वेषी नाही, जार्विस. मी त्यांना चांगला पगार, स्वच्छ खोली आणि पुरेशा सुट्ट्या वगैरे देतो. आमचे नोकर चांगले आहेत आणि वर्षानुवर्षे आमच्याबरोबर राहतात. पण एकूणच काळी मंडळी हाताबाहेर जायला लागली आहेत. त्यांनी आता त्यांची संघटना काढली आहे हे तुम्हाला माहित आहे?”

“संघटना? नाही, हे मला नव्हतं माहित.”

“हो, संघटना. आणि ते आता दिवसाला दहा शिलिंग मिळावे म्हणून खाणींचा संप करणार म्हणून धमकी द्यायला लागले आहेत. सध्या त्यांना दिवसाला तीन शिलिंग मिळतात आणि बऱ्याचशा खाणी तर बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यातल्या बहुतेक जणांना चांगल्या वसाहतीत राहायला मिळतं, त्यातल्या काही वसाहती तर इतक्या चांगल्या असतात की मला स्वतःलाही तिथे राहायला काही वाटणार नाही. त्यांना त्यांच्या घरी मिळतं त्यापेक्षा कितीतरी चांगलं सकस जेवण, मोफत वैद्यकीय सुविधा आणि आणखी बरंच काही मिळत असतं. तुम्हाला सांगतो जार्विस, खाणींचा खर्च आणखी वाढला

ना, तर हळूहळू सगळ्या खाणीच बंद होऊन जातील. खाणीच बंद झाल्या तर दक्षिण आफ्रिकेची काय अवस्था होईल? आणि मग या काळ्या लोकांची स्वतःची काय अवस्था होईल? ते हजारोंच्या संख्येने भुकेनी मरायला लागतील."

"मी मधेच आलोय का तुमच्या गप्पा चालू असताना?" जॉन हॅरिसन आपल्या वडिलांच्या अभ्यासिकेत येताना म्हणाला.

"अरे ये, बस जॉन." हॅरिसन म्हणाले.

तो तरुण मुलगा त्यांच्याबरोबर बसला आणि तावातावाने आपली भूमिका मांडणाऱ्या त्याच्या वडिलांनी आपलं बोलणं पुढे सुरु केलं.

"आणि मग शेतकरी तरी कुठे जातील, जार्विस? तुमचा माल तुम्ही कुठे विकाल आणि कोणाला तो घ्यायला परवडेल? तुम्हाला मिळणाऱ्या सगळ्या सवलती बंद होतील. खाणीतून मिळणाऱ्या पैशातून लोकं वस्तू विकत घेतात. जर खाणीच राहिल्या नाहीत तर कारखान्यांकडे तरी वस्तू बनवायला पैसे राहतील का? आपलं सरकार खाणींना मिळणारा सत्तर टक्के नफा निवांतपणे शोषून घेतं. जर खाणीच राहिल्या नाहीत तर त्यांचं काय होईल? सरकारी नोकऱ्या राहणार नाहीत. त्यांच्यातल्या अर्ध्या लोकांना काम शोधत फिरावे लागेल आफ्रिकेतल्या अर्ध्या लोकांना पण देशाबाहेर कामासाठी वणवण फिरावे लागेल."

त्यांनी आणखी थोडी व्हिस्की दोघांच्याही ग्लासात ओतली आणि पुन्हा बोलायला सुरुवात केली.

"मी तुम्हाला सांगतो, जर खाणी नसतील ना, तर दक्षिण आफ्रिकाच शिल्लक राहणार नाही. इथले सगळे उद्योगधंदे बंद करून आणि त्या जमिनी काळ्या लोकांना परत करून चालतं होण्याशिवाय दुसरा काही पर्याय राहणार नाही. खाणींवर लोक जेव्हा टीका करतात तेव्हा मला त्यांचा प्रचंड राग येतो. मुख्य म्हणजे आफ्रिकानर लोकांचा. खाणी चालवणारे लोक बाहेरून, दुसऱ्या देशातून आले आहेत, ते ह्या देशाचं सगळं सत्व शोषून घेणार आहेत आणि जेव्हा बदक अंडं देणं थांबवेल तेव्हा इथून सटकणार आहेत, अशी त्यांची काहीतरी मूर्खपणाची धारणा आहे. मी तुम्हाला सांगतो, खाणींचे जास्तीत जास्त शेअर देशातच आहेत. त्या आपल्या खाणी आहेत. असं कोणी बोलायला लागलं

की माझं डोकं उठतं. म्हणे प्रजासत्ताक! दक्षिण आफ्रिका प्रजासत्ताक झाली तर आपण कुठे जाऊ याचा काही विचार केलाय?”

“हॅरिसन, मी झोपायला जातोय. मार्गारेटला जास्त वेळ एकटं ठेवणं मला बरोबर वाटत नाहीये.”

“हो, हो. माफ करा, ह्या बोलण्याच्या नादात मी विसरूनच गेलो.”

“अहो, त्यात माफी मागण्यासारखं काहीच नाही. तुमचं बोलणं ऐकताना मला बरंच वाटतं. मला तुमचं बोलणं आवडत नाहीये म्हणून मी बोलत नाहीये असं नाही. मला खात्री आहे तुम्ही मला समजून घ्याल. “

“माफ करा, मला खरंच माफ करा.” हॅरिसन ओशाळले. “मी स्वतःला अगदी पार विसरून गेलो.“

“माझ्यावर विश्वास ठेवा. मी अगदी मनापासून बोलतोय की तुमचं बोलणं ऐकताना मला बरंच वाटतं.” जार्विस म्हणाले. “ह्या क्षणी मृत्यूविषयी बोलण्यापेक्षा मला हे बरं वाटतंय”, दोघांकडे बघत जार्विस पुढे म्हणाले.

हॅरिसनना ह्यावर काय बोलावं कळेना.

“आज तोही इथे असतां तर तुमच्या बरोबर चर्चा करताना त्याला ऐकायला मला आवडलं असतं.” जार्विस म्हणाले.

“त्याला ऐकताना तुम्हाला खूप मजा आली असती मि. जार्विस.” नुकत्याच गेलेल्या माणसाविषयी बोलण्याची संधी घेत जॉन झटकन बोलला. “ह्या विषयावर दुसऱ्या कोणाला त्याच्याइतक्या पोटतिडकीने चर्चा करताना मी आजपर्यंत पाहिलं नाही.”

“मला त्याचं म्हणणं बरेचदा मान्य नसायचं”, आपली नाराजी न लपवता हॅरिसन म्हणाले. “पण तरीही तो जे बोलायचा त्याबद्दल मला आदर होता.”

“तो एक चांगला माणूस होता. तो आमचा मुलगा असल्याचा मला अभिमान वाटतो. चला, मी जातो आता. शुभरात्री.”

“शुभरात्री, जार्विस. तुम्हाला काल रात्री झोप लागली का? आणि मार्गारेटला?”

“आम्हाला दोघांनाही थोडा वेळ झोप लागली.”

“आज तुम्हाला आणखी जास्त आराम मिळावा. आम्ही सगळे तुमच्या सेवेसाठी तयार आहोत हे लक्षात असू द्या.”

“धन्यवाद. शुभरात्री. जॉन?”

“बोला मि. जार्विस.”

“तुला क्लेअरमाउंटमधल्या ग्लॅडिओलस स्ट्रीटवरील आफ्रिकन बॉइज क्लब माहित आहे का?”

“हो, अगदी व्यवस्थित. तो आमचा क्लब होता, माझा आणि आर्थरचा.”

“मला तो कधीतरी बघायला जायची इच्छा आहे.”

“मला तुम्हाला घेऊन जायला नक्की आवडेल, मि. जार्विस. आणि मि. जार्विस…”

“बोल, जॉन.”

“मला तुम्हाला फक्त एवढंच सांगायचं होतं की माझे बाबा जेव्हा आफ्रिकानर म्हणत होते तेव्हा त्यांना खरंतर राष्ट्रवादी म्हणायचं होतं. आर्थर त्यांना नेहमी सांगायचा. बाबानाही ते पटायचं पण ते परत विसरले असतील.”

जार्विस एकदा मुलाकडे आणि एकदा वडिलांकडे बघून हसले. चांगला मुद्दा काढलास, ते म्हणाले. शुभरात्री, हॅरिसन. शुभरात्री, जॉन.

**

दुसऱ्या दिवशी सकाळी हॅरिसन पायऱ्यांवर पाहुण्यांची वाट बघत थांबले होते.

“माझ्या अभ्यासिकेत या.” ते म्हणाले. ते दोघे खोलीत शिरले आणि हॅरिसननी खोलीचे दार लावून घेतले.

“जार्विस, पोलिसांचा आत्ताच फोन येऊन गेला. आर्थरकडचा मुलगा काही वेळापूर्वीच शुद्धीवर आला आहे. त्याने सांगितलं की एकूण तीन माणसं आली होती. त्यांनी त्यांचा चेहरा झाकला होता. पण त्याला खात्री आहे की ज्याने त्याला मारलं तो मेरीच्या घरी पूर्वी माळीकाम करणारा मुलगा होता. मेरीनं काही कारणांमुळे त्याला हाकललं होतं. त्याच्या डोळा फडफडण्यावरून त्याने त्याला नक्की ओळखलं. मेरीकडचं काम गेल्यावर

त्याला डूरंफोंटेनला कुठल्यातरी कापडाच्या कारखान्यात नोकरी लागली होती. नंतर त्याने ती नोकरी सोडली खरी पण त्यानंतर तो कुठे गेला हे कोणाला फारसं माहित नाही. पण त्याच्या बरोबर असणाऱ्या त्याच्या काही उडाणटप्पू मित्रांबद्दल त्यांना माहिती मिळाली आहे. पोलिसांना असं वाटतंय की ही मुलं त्या माळीकाम करणाऱ्या मुलाबद्दल काहीतरी सांगू शकतील. एकूणच तपास चांगला चाललाय असं वाटतंय."

"असं वाटतंय खरं."

"आर्थर काळ्या स्थानिकांच्या गुन्ह्यावर जे लिहित होता, त्याची प्रत तुम्ही मागितलेली ना? आणलीये. इथे टेबलावर ठेऊ का? नाश्ता करून झाल्यावर निवांतपणे तुम्हाला ती वाचता येईल."

"धन्यवाद, हो ठेवा तिथे."

"नीट झोप लागली का तुम्हाला? आणि मार्गारेटला?"

"तिला आज चांगली झोप लागली. तिला गरजच होती झोपेची."

"खरंय. चला, नाश्ता करूया."

**

नाश्ता झाल्यावर जार्विस पुन्हा अभ्यासिकेत आले आणि आर्थरचं लिखाण वाचू लागले. सगळ्यात आधी ते शेवटच्या पानाकडे गेले आणि त्यानं लिहिलेला तो शेवटचा परिच्छेद त्यांनी काळजावर दगड ठेऊन वाचला. हे त्यानं केलेलं जवळजवळ शेवटचं काम होतं. ते करताना तो जिवंत होता. नंतर एका क्षणी पुढचा शब्द पेनातच राहिला असतांना तो उठला आणि पायऱ्या उतरून त्याच्या मृत्यूकडे गेला. तेव्हा त्याला कोणी जोरात ओरडून खाली जाऊन नकोस असं सांगितलं असतं तर? थांब! खाली धोका आहे असं त्याला कोणी सांगितलं असतं तर? पण त्याला तसं सांगायला तिथे कोणीच नव्हतं. आता जे सगळ्यांना माहित आहे ते तेव्हा कोणालाच माहित नव्हतं. पण खरंतर आता असा विचार करत बसण्यात काही अर्थ नव्हता. जे कधीच होऊ शकणार नाही त्याचा पुन्हा पुन्हा विचार करत बसण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्याला थांबवणारं कोणी असतं तर ही घटना घडली नसती असा विचार आता करून काही उपयोग नव्हता. जीवाची घालमेल

आणखी वाढवणारा तो व्यर्थ विचार त्यांनी तो निग्रहाने बाजूला सरला. त्यांना त्यांच्या मुलाला समजून घेण्याची इच्छा होती. जी इच्छा पूर्ण होऊच शकत नाही ती करण्यात त्यांना आता वेळ वाया घालवायचा नव्हता. म्हणून त्यांनी धीर करून तो शेवटचा परिच्छेद शांत मनाने काळजावर दगड ठेऊन वाचला कारण त्याने शेवटी काय लिहिलंय ते त्यांना समजून घ्यायचं होतं.

सत्य हे आहे की आपली ख्रिश्चन संस्कृती नेहमीच कुठल्या ना कुठल्यातरी पेचप्रसंगात अडकली जाते. माणसांमध्ये बंधुभाव असावा असे आपण मानतो, पण तो दक्षिण आफ्रिका सोडून इतर सर्व ठिकाणी. देव प्रत्येकाला कोणत्या ना कोणत्यातरी गुणांनी समृद्ध करत असतो यावर आपला विश्वास आहे. त्या गुणांच्या आधारावर समरसून जगत आपलं आयुष्य परिपूर्ण करणं आपल्या हातात असतं. पण आपण मात्र आपलं स्वत्व अधिकाधिक खोलात जाऊन शोधायला घाबरतो. उपेक्षितांना मदत करायला आपल्याला आवडतं पण त्यांनी सतत आपल्यापेक्षा खालच्या पायरीवरच असावं असंही आपल्याला वाटत असतं. आपण ख्रिश्चन आहोत ह्यावरचा आपला विश्वास कायम ठेवण्यासाठी परमेश्वराच्या, ह्या सृष्टीच्या निर्मात्याच्या कृतींचा आपण आधार घेतो आणि विधात्यानेच काळे आणि गोरे निर्माण केले आहेत असं म्हणत विषमतेला पाठींबा देण्यासाठी स्वतःला भाग पाडतो. काळ्या लोकांना प्रगतीपासून रोखण्याचा त्याने जणू आपल्याला दैवी आदेश दिला आहे असं आपण समजून चालतो. गोऱ्या लोकांसाठी सरपण गोळा करायला आणि पाणी भरायला देवाने काळ्यांची निर्मिती केली आहे असा समज करून घ्यायलाही आपण मागेपुढे पाहत नाही. काळ्या लोकांना देवाकडून ज्या देणग्या मिळाल्या आहेत त्याचा उपयोग करून त्यांनी पुढे जाऊ नये यासाठी काहीही करून त्यांना अडवण्याच्या आपल्या कृतींना देवाचा आशीर्वाद आहे असाही समज आपण करून घेतला आहे. ह्या समजापुढे आपण आपल्यावर दडपशाहीचे आणि पिळवणूकीचे आरोप करणाऱ्या बाकी सगळ्या चर्चांना फिजूल ठरवून टाकतो. काळ्या मुलांकडे आधुनिक शिक्षणातून स्वतःचा विकास करून घेण्याइतकी बुद्धिमत्ताच नसते असं म्हणत काळ्यांना शिक्षण घेण्यापासून आपण रोखतो. काळ्या लोकांमध्ये कोणतेही गुणच नसतात असे म्हणत त्यांच्यातल्या गुणांचा विकास करण्याची संधीच आपण त्यांना देत नाही. आपल्याला प्रगती करायला हजारो वर्षं लागली असा युक्तिवाद करत एवढ्या कमी वेळात काळ्यांचा विकास होऊ शकेल असे मानणे मूर्खपणाचे आहे असे आपल्याला वाटते. म्हणूनच त्यांच्या विकासासाठी फार घाई करायची गरज नाही असे म्हणण्यात आपल्याला काहीच चुकीचे वाटत नाही. काळ्या

लोकांमधील एखाद्याने जर स्वतःचा विकास करत आपली पातळी गाठली तर आपण आणखी उंचावर जाऊन बसतो आणि त्याला एकटे पाडून त्याच्या कर्तृत्वाची कीव करत राहतो. काळ्यांना लक्षणीय न होऊ देणे हे जणूकाही ख्रिश्चन असल्यामुळे आपले कर्तव्यच आहे अशी आपली धारणा झाली आहे. त्यामुळेच त्यांना गुण बहाल करणारा पण त्या गुणांचा उपयोग न होऊ देणारा आपला देवही गोंधळलेला आणि विसंगत वाटायला लागतो. मग आपली ख्रिश्चन संस्कृती नेहमीच कुठल्या ना कुठल्यातरी पेचप्रसंगात अडकली जाते ह्यात आश्चर्य वाटण्यासारखे काय आहे? सत्य हे आहे की आपली संस्कृती ही खरी ख्रिश्चन संस्कृती नाही. ती थोर आदर्शवाद आणि भीतीपोटी केले जाणारे व्यवहार, विश्वास आणि चिंता, विशाल सहृदयता आणि घाबरट अधिकारी वृत्ती ह्यांचे एक विचित्र मिश्रण आहे. आज ह्या क्षणी...

तो त्यांचा मुलगा होता म्हणून की ती त्यांच्या मुलाची सगळ्यात शेवटची कृती होती म्हणून ते सांगता येणार नाही पण आतून हलल्यासारखे जार्विस स्तब्ध बसून राहिले. आयुष्यात कधीही त्यांनी मनापासून लिखाणाचा आस्वाद घेतला नव्हता किंवा बारकाईने पारख केली नव्हती. त्यामुळे त्यांचं हे हलून जाणं आर्थरच्या प्रभावी शब्दांमुळे झालं होतं का हेही त्यांना सांगता आलं नसतं. ह्या विषयाचा उभ्या आयुष्यात त्यांनी कधी विचारच केला नव्हता. त्यामुळे त्याने मांडलेल्या मतांशी सहमत झाल्यामुळे ते भारावून गेले होते का हेही त्यांना सांगता आलं नसतं. ते उठले आणि जिना चढून खोलीत गेले. त्यांची बायको तिथे नसल्याने त्यांना एक प्रकारे बरंच वाटलं. कारण त्यामुळे त्यांच्या चिंतनात अडथळा येणार नव्हता. अब्राहम लिंकन यांचे पुस्तक त्यांनी उचलले आणि ते पुन्हा अभ्यासिकेत गेले. पुस्तक उघडून त्यांनी त्यांचे दुसरे राष्ट्राध्यक्षपदावेळचे सुप्रसिद्ध भाषण वाचायला सुरुवात केली. सखोल वाचन करताना त्यांना अचानक जाणवले की काहीतरी गुपित त्यांच्यासमोर उलगडते आहे, एक पाउलवाट दिसते आहे. त्या जाणिवेनेच त्यांचं मनोधैर्य उंचावलं गेलं. अनोळखी माणसाबद्दलची त्यांची जाण वाढत जाते आहे. ह्या माणसाचं चित्रं आणि त्याची एवढया मोठ्या संख्येने असलेली पुस्तकं त्यांच्या मुलाच्या खोलीत असण्यामागचं कारण आता त्यांच्या लक्षात आलं.

लिखाणासाठी किंवा विचारांसाठी नाही तर फक्त त्यांच्या मुलासाठी त्यांनी त्याने लिहिलेलं पान पुन्हा उचललं आणि त्या शब्दांकडे पुन्हा एकदा बघितलं.

आज ह्या क्षणी ...

पुढे काही नाही.. ती बोटं यापुढे काही लिहू शकणार नाहीत. आज ह्या क्षणी - मला स्वयंपाकखोलीतून आवाज ऐकू येतोय. आज ह्या क्षणी - मी जिवंत आहे पण खाली स्वयंपाकखोलीत मला मृत्यु भेटायला आला आहे. ह्या क्षणी, पुढल्या क्षणी, पुढल्या हजारो - लाखो क्षणी, क्षणोक्षणी तुम्ही माझी वाट पाहत रहा.... मी आता कधीच परत येणार नाही....

जार्विसने तो विचार झटकला आणि त्यांचा चिरूट पुन्हा शिलगावला. त्याचं पान पुन्हा एकदा नीट वाचलं आणि नंतर धूर सोडत ते आपल्याच तंद्रीत बसून राहिले.

“जेम्स.”

ते दचकले. बोल, मार्गारेट, ते म्हणाले.

“नको असा एकटा बसत जाऊस.” त्या म्हणाल्या.

ते त्यांच्याकडे बघून हसले. मला कुढत बसायला आवडत नाही.

“मग आता काय करत होतास?”

“विचार करत होतो. कुढत नव्हतो, विचार करत होतो आणि वाचत होतो. हे बघ मी काय वाचत होतो.”

त्यांनी तो लेख हातात घेतला आणि त्यांच्याकडे बघत आपल्या छातीशी धरला.

“अगदी वाचण्यासारखं आहे, नक्की वाच.” ते शांतपणे म्हणाले.

म्हणून त्या वाचायला बसल्या आणि ते त्यांच्या चेहऱ्यावरील भाव वाचत बसले.

त्या शेवटच्या पानाशी, शेवटच्या काही शब्दांपाशी पोचल्या, आज ह्या क्षणी... ह्या क्षणी त्या शब्दाकडे त्या पहातच राहिल्या. त्यांनी जार्विसकडे पाहिलं. काहीतरी बोलायचा निष्फळ प्रयत्न केला आणि वेदना इतक्या सहजासहजी मिटत नाहीत हे त्यांना जाणवलं.

5

न्यायालयातील मुख्य जागी उच्चासनावर न्यायाधीश बसतात. त्याच्या खाली न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांचं टेबल आहे आणि त्या टेबलाच्या डावीकडे आणि उजवीकडे बाकीच्यांना बसायच्या खुर्च्या आहेत. त्यातल्या काही खुर्च्यांचा मिळून एक बंद खोलीसारखा भाग होतो. पंच जर न्याय देणार असतील तर ते तिथे बसतात. टेबलाच्या समोर अर्धवर्तुळाकार आकारात वकिलांसाठी खुर्च्या मांडलेल्या असतात. त्यांच्या मागे आरोपीचा पिंजरा असतो. तिथून एक रस्ता जमिनीखालच्या खोल्यांकडे जातो. त्या रस्त्यावरून आरोपीला ह्या पिंजऱ्यात आणलं जातं. न्यायालयाच्या मागच्या भागात उतरंडीने ठेवलेल्या खुर्च्या असतात. रिवाजाप्रमाणे त्यातल्या उजवीकडच्या युरोपीय लोकांसाठी आणि डावीकडच्या गैरयुरोपीय लोकांसाठी असतात.

तुम्ही न्यायालयात बसून धुम्रपान करू शकत नाही, कुजबूजू शकत नाही, मोठ्यानं बोलू किंवा हसूही शकत नाही. तुम्हाला सभ्य पोशाख करावा लागतो. तुम्ही पुरुष असाल आणि जर तुमच्या धर्माप्रमाणे बंधनकारक नसेल तर तुम्हाला हॅट घालता येत नाही. न्यायाधीशाचा आणि न्यायाधीश ज्याचा प्रतिनिधी असतो त्या राजाचा, कायद्याच्या आणि ते कायदे बनवणाऱ्या माणसांचा सन्मान म्हणून हे सारं करावं लागतं. न्यायाधीश जेव्हा न्यायालयात शिरतात तेव्हा तुम्हाला उभं राहावं लागतं आणि ते बसेपर्यंत तुम्ही बसायचं नसतं. जेव्हा न्यायाधीश निघतात तेव्हा ते जाईपर्यंत आपण न हलता उभं राहायचं असतं. हे त्या न्यायाधीशाच्या आणि त्याच्यामागील साऱ्या यंत्रणेच्या सन्मानासाठी असतं.

असा सन्मान त्यांना दिला जातो कारण न्यायाधीशाकडे न्याय देण्याचे, शिक्षा, अगदी देहदंडासारखी कठोर शिक्षाही फर्मावण्याचं अतिशय महत्वाचं काम दिलेलं असतं. त्यांच्या उच्च स्थानामुळे त्यांना सन्माननीय असं म्हटलं जातं आणि महत्वाच्या प्रसंगी त्यांचा मान इतर बऱ्याच जणांपेक्षा जास्त मानला जातो. काळे आणि गोरे अशा सगळ्याच लोकांकडून त्यांना सन्मान दिला जातो. ही भूमी भयग्रस्त झाली असल्यानं न्यायाधीशानं निर्भय असलं पाहिजे. कायद्याला धरून न्याय देण्यासाठी अतिशय प्रामाणिक असलं पाहिजे.

न्यायाधीश कायदे बनवत नाहीत. कायदे लोकं बनवतात. म्हणून जर कायदे अन्यायकारक असतील तर त्या कायद्यांना धरून केलेला निवाडा अन्यायकारक असू शकतो.

न्यायाधीशाचे काम निवाडा करण्याचे आहे, पण न्यायी फक्त लोकंच असू शकतात. म्हणूनच जर निवाडा जर कायद्याला धरून असेल, पण न्याय देणारा नसेल तर त्याची जबाबदारी न्यायाधीशांवर टाकता येणार नाही, तर ती लोकांवर म्हणजेच गोऱ्या लोकांवर टाकावी लागेल. शेवटी, गोरी लोकंच कायदे बनवत असतात.

दक्षिण आफ्रिकेत लोकांना त्यांच्या न्यायाधीशांचा अभिमान आहे. कारण ते अतिशय प्रामाणिक असतात असा त्यांना विश्वास आहे. काळ्या लोकांचाही त्यांच्यावर विश्वास असतो पण त्यांचा कायद्यावर नेहमीच विश्वास असतो असे नाही. ह्या भयग्रस्त प्रदेशात असा प्रामाणिकपणा घरातील सर्वांना प्रकाश देण्यासाठी उंचावर ठेवलेल्या दिव्यासारखा असतो.

**

'शांतता, शांतता' असा पुकारा झाला आणि सगळे लोक उभे राहिले. न्यायाधीशापेक्षा श्रेष्ठ व्यक्ती तिथे असती तरी तीही उभी राहिली असती कारण हे त्याच्यामागील साऱ्या यंत्रणेच्या सन्मानासाठी असतं. आपल्या दोन सल्लागारांच्या बरोबर न्यायाधीश आत शिरले आणि आपल्या जागी बसले, आणि लोकंही बसली. न्यायालय सुरु झालं.

ज्यांचा निवाडा होणार होता असे तिघेजण जमिनीखालच्या खोलीतून वर आणले गेले आणि सगळ्या लोकांनी त्यांना पाहिलं. काही लोकांना ते खुनी आहेत असं लगेच वाटलं आणि कुजबुजणं धोक्याचं असूनही ते एकमेकांच्या कानात बोलले. काहींना ते अजिबात खुनी वाटले नाहीत आणि काहींना त्यातला एकजण खुनी वाटत होता पण दुसरा नाही.

एक गोरा माणूस उठला आणि म्हणाला की ह्या तिघांवर 'आर्थर ट्रेवेल्यान जार्विस' ह्याचा प्लँटेशन रोड, पार्कवर्ल्ड, जोहान्सबर्ग इथल्या त्याच्या राहत्या घरी मंगळवार

दिनांक ८ ऑक्टोबर १९४६ रोजी दुपारच्या सुमारास खून करण्याचा आरोप आहे. पहिला आरोपी आहे अब्सालोम कुमालो, दुसरा मॅथ्यू कुमालो आणि तिसरा जोहान्नेस पाफुरी. ते दोषी आहेत की नाही हे सिद्ध करण्यासाठी इथे आणले गेले आहेत. पहिला म्हणतोय मी त्याला मारलं हे खरंय पण माझा त्याला मारण्याचा हेतू नव्हता, दुसरा म्हणतोय मी निर्दोष आहे आणि तिसराही तसंच म्हणतोय. जोहान्नेस पाफुरी झुलू नसला तरी त्याला झुलू भाषा व्यवस्थित कळते असं तो म्हणाला होता म्हणून त्या तिघांनाही कळावं या उद्देशाने सगळं काही इंग्रजी आणि झुलू अशा दोन्ही भाषेत सांगितलं गेलं.

देवासाठी खटला हाती घेतलेल्या गोऱ्या वकिलाने प्रतिवाद केला की त्या माणसाला मारण्याचा अब्सालोम कुमालोचा हेतू नसल्याने त्याला खुनासाठी नव्हे तर मनुष्यवधाच्या दोषासाठी आरोपित केले जावे. पण सरकारी वकिलाने मात्र त्याच्यावर मनुष्यवधाचा नाही तर खूनाचा आणि खूनाचाच आरोप लावला जावा असं सांगितलं. म्हणून मग अब्सालोम कुमालोनेही इतर दोघांसारखी निर्दोष असल्याची याचना केली.

मग सरकारी वकील बराच वेळ बोलला आणि त्याने न्यायालयाला सगळी गोष्ट सांगितली. ही गोष्ट ऐकताना अब्सालोम कुमालो स्तब्ध आणि शांत दिसत होता तर इतर दोन आरोपी धक्का बसलेले आणि दुःखात बुडालेले दिसत होते.

**

“म्हणून तुम्ही आठ ऑक्टोबरला तुमचा बेत पूर्ण करायचं ठरवलंत?”

“हो.”

“पण तोच दिवस तुम्ही का निवडलात?”

“कारण जोहान्नेस म्हणाला त्या दिवशी त्या घरी कोणी नसेल.”

“हाच तो जोहान्नेस पाफुरी का?”

“हो हाच जोहान्नेस पाफुरी ज्याच्यावर माझ्याबरोबर आरोप ठेवलेले आहेत.”

“आणि तुम्ही दुपारी दीडची वेळ ठरवलीत?”

“हो.”

“ती वेळ चुकीची वाटत नाही का? गोरी लोकं त्यावेळेस जेवायला घरी येत असतात.”

यावर आरोपी काही बोलला नाही.

“तुम्ही ही वेळ का निवडलीत?”

“वेळ जोहान्नेसने निवडली होती. तो म्हणाला की त्याला ती वेळ आवाजाने सांगितली होती.”

“कुठल्या आवाजाने?”

“नाही, ते मला माहित नाही.”

“सैतानाच्या आवाजाने?”

ह्या प्रश्नालाही उत्तर आले नाही.

“मग तुम्ही तिघे त्या घराच्या मागच्या दरवाज्याजवळ गेलात?”

“हो.”

“तू आणि तुझ्याबरोबर इथे उभे आहेत ते दोघं?”

“हो हेच दोघं.”

“आणि मग?”

“नंतर आम्ही आमच्या तोंडाला रुमाल बांधले.”

“आणि मग?”

“मग आम्ही स्वयंपाकघरात गेलो.”

“तिथे कोण होतं?”

“त्या घरातला नोकर तिथे होता.”

“रिचर्ड स्प्रिंग?”

“मला त्याचं नाव माहित नाही.”

"इथे बसलाय तो माणूस का?"

"हो, तोच माणूस."

"आणि मग? काय झालं ते सगळं नीट न्यायालयाला सांग."

"हा माणूस घाबरला. त्याने माझ्या हातातली पिस्तूल बघितली. हा मोरीत जिथे काम करत होता तिथेच जरासा मागे सरकला आणि म्हणाला, तुम्हाला काय पाहिजे? जोहान्नेस म्हणाला, कपडे आणि पैसे. हा म्हणाला, तुम्ही असं करू शकत नाही. जोहान्नेस म्हणाला, तुला मरायचंय का? हा माणूस घाबरला आणि काही बोलला नाही. जोहान्नेस म्हणाला, मी बोललो की लोकं थरथर कापली पाहिजेत. मग तो परत म्हणाला, तुला मरायचंय का? हा काहीच बोलला नाही पण मग अचानक साहेब, साहेब म्हणून ओरडला. मग जोहान्नेसने पाठीमागे लपवलेला लोखंडी गज ह्याच्या डोक्यात मारला."

"किती वेळा मारला?"

"एकदाच."

"मग तो पुन्हा ओरडला?"

"नाही, तो शांतच झाला."

"तुम्ही काय केलंत?"

"आम्ही गप्प उभे होतो. जोहान्नेसने गप्प बसायला सांगितलं होतं."

"तुम्ही काही ऐकलंत का?"

"आम्हाला काही ऐकू आलं नाही."

"तुझं पिस्तूल कुठे होतं?"

"माझ्या हातात."

"आणि मग?"

"मग तो गोरा माणूस जिन्यातून खाली आला."

"आणि मग?"

“मी घाबरलो आणि गोळी झाडली.”

“आणि मग?”

आरोपीने मान खाली घातली. तो गोरा माणूस खाली पडला, तो म्हणाला.

“आणि मग?”

“जोहान्नेस पटकन म्हणाला, चला आपल्याला निघायला हवं. म्हणून मग आम्ही पटकन पळालो.”

“मागच्या दरवाजाकडे?”

“हो.”

“आणि नंतर प्लँटेशन रोडकडे?”

“हो.”

“तुम्ही एकत्रच होता का?”

“नाही, मी एकटाच होतो.”

“आणि ह्या दोघांना तू पुन्हा कधी भेटलास?”

“बेबी म्काईझ हिच्या घरी.”

पण न्यायाधीशांनी त्यांना मधेच थांबवलं. वकील, तुम्ही तुमची तपासणी चालू ठेऊ शकता पण त्याआधी मला ह्या पहिल्या आरोपीला एक दोन प्रश्न विचारायचे आहेत.

“जशी तुमची इच्छा मिलॉर्ड.”

“तू हे पिस्तूल घेऊन का गेला होतास?”

“त्या घरातल्या नोकराला घाबरवायला.”

“पण पिस्तूल बाळगण्याची तुला गरजच काय?”

तो गप्प राहिला.

“माझ्या प्रश्नाचं उत्तर तू दिलंच पाहिजेस.”

“त्या लोकांनी मला ते घ्यायला सांगितलं होतं.”

“त्या लोकांनी म्हणजे कोणी? कोणी सांगितलं होतं?”

“लोकं म्हणतात, जोहान्सबर्ग अतिशय धोकादायक आहे.”

“कोणी सांगितलं होतं?”

मुलगा पुन्हा गप्प बसला.

“म्हणजे चोरी- घरफोडी करणाऱ्या माणसांपैकी कुणी तुला तसं सांगितलं होतं का?”

“नाही मला तसं म्हणायचं नव्हतं.”

“बरं, मग सांग, तुला कोणी सांगितलं होतं?”

“आत्ता मला काही आठवत नाहीये. मी कुठेतरी गेलो होतो तेव्हा तिथली लोकं बोलत होती.”

“म्हणजे तुला असं म्हणायचंय की तुम्ही कुठेतरी बसला होतात आणि तिथला कोणीतरी माणूस म्हणाला की जोहान्सबर्ग धोकादायक असल्यामुळे आपल्याकडे पिस्तूल असायला पाहिजे?”

“हो मला असंच म्हणायचं होतं.”

“आणि हे पिस्तूल भरलेलं आहे हे तुला माहित होतं?”

“हो.”

“जर हे पिस्तूल कोणालातरी फक्त घाबरवण्यासाठी असेल तर ते भरण्याची गरज काय?”

ह्यावर त्या मुलाने काही उत्तर दिले नाही.

“म्हणजे कोणावर तरी गोळी झाडण्याची तुझी तयारी होती. बरोबर ना?”

“नाही, मी कोणत्याही सभ्य माणसावर कधी गोळी झाडली नसती. कोणी माझ्यावर गोळी झाडली असती तरच मी त्याच्यावर गोळी झाडली असती.”

“जर पोलिसाने त्याचे कर्तव्य बजावताना तुझ्यावर गोळी झाडली असती तर तू त्याच्यावर गोळी झाडली असतीस का?”

“नाही पोलिसावर मी कधीच गोळी झाडली नसती.”

न्यायाधीश एक क्षण थांबले. सगळीकडे शांतता होती. गंभीर आवाजात ते पुढे म्हणाले, त्या गोऱ्या माणसाला तर तू गोळी मारलीस. तो तुला सभ्य वाटला नाही काय?

आरोपीने पुन्हा आपली मान खाली घातली. मग हळू आवाजात तो बोलला, ते अचानक समोर आल्यामुळे मी एकदम घाबरून गेलो, मला त्यांना गोळी मारायची अजिबात इच्छा नव्हती.

“हे पिस्तूल तुला कुठे मिळालं?”

“मी एका माणसाकडून ते विकत घेतलं.”

“कुठे?”

“अलेक्झांड्राला.”

“कोण आहे तो माणूस? काय नाव आहे त्याचं?”

“मला त्याचं नाव माहित नाही.”

“तो कुठे राहतो?”

“तो कुठे राहतो हे मला माहित नाही.”

“तू त्याला शोधू शकशील?”

“मी त्याला शोधण्याचा प्रयत्न करीन.”

“तू जेव्हा हे पिस्तूल घेतलंस तेव्हा ते भरलेलं होतं का?”

“त्यात दोन गोळ्या होत्या.”

“ह्या घरात तू गेलास तेव्हा त्यात किती गोळ्या होत्या?”

“तेव्हा त्यात एक गोळी होती.”

“दुसऱ्या गोळीचं काय झालं?”

“मी अलेक्झांड्राच्या पलीकडच्या डोंगरात जी झाडं लावली आहेत ना तिथे गेलो आणि तिथे त्यातली एक गोळी झाडली.”

“कशावर झाडलीस गोळी?”

“तिथल्या एका झाडावर.”

“झाडाला लागली का?”

“हो, लागली.”

“तेव्हा तुला कळलं की तुला गोळी झाडता येते.”

“हो, बरोबर.”

“लोखंडी गज कोणी घेतला होता?”

“जोहान्नेसनी.”

“त्याने गज घेतलाय हे तुला माहिती होतं का?”

“हो, मला माहित होतं.”

“ते एक भयानक हत्यार आहे आणि त्याने माणूस मरू शकतो हे तुला माहित नव्हतं का?“

मुलगा जोराने म्हणाला, “ते कुणाला मारायला नव्हतं, फक्त घाबरवायला.”

“पण तुझ्याकडे पिस्तूल तर होतं ना घाबरवायला?”

“हो पण जोहान्नेस म्हणाला की तो तो गज घेईल कारण तो मंतरलेला आहे.”

“मंतरलेला?”

“हो, त्याने तरी तसंच सांगितलेलं.”

”गज मंतरलेला आहे असं जेव्हा जोहान्नेस म्हणालेला तेव्हा त्याला नेमकं काय म्हणायचं होतं?”

”मला माहित नाही.”

”कोण्या धर्मगुरूने तो मंतरून दिला होता?”

"मला माहित नाही."

"तू विचारलं नाहीस?"

"नाही, मी विचारलं नाही."

"तुझे वडील पाद्री आहेत?"

मुलाने पुन्हा एकदा मान खाली घातली आणि तो हळू आवाजात म्हणाला, हो.

"असं काही ते मंत्रून देतात का?"

"नाही."

"हा गज घेता येणार नाही असं तू जोहान्नेसला म्हणाला नाहीस?"

"नाही."

"तू असं काही मंतरता येतं का असं त्याला विचारलं नाहीस?"

"नाही."

"वकील, तुम्ही तुमची तपासणी पुन्हा सुरु करू शकता."

**

"आणि जर हे दोघं बोलले की बेबी म्काईझ ह्यांच्या घरी खुनाबद्दल काही बोलणं झालं नाही, तर ते खोटं बोलतायत?"

"हो, ते खोटं बोलतायत."

"आणि जर ते बोलले की त्यांना तिकडे भेटल्यावर तू ही कहाणी रचली आहेस, तर ते खोटं बोलतायत?"

"हो, ते खोटं बोलतायत."

"आणि जर बेबी म्काईझ म्हणाल्या की त्यांच्या घरी खुनाबद्दल काही बोलणं झालं नाही, तर त्या खोटं बोलतायत?"

”हो, त्या खोटं बोलतायत. त्या घाबरल्या होत्या आणि त्यांनी ताबडतोब आपलं घर आम्हाला सोडायला सांगितलं आणि परत कधीही इकडे येऊ नये असं बजावलं.”

”मग तुम्ही एकत्रच बाहेर पडलात?”

”नाही, मी पहिल्यांदा बाहेर आलो.”

”आणि मग तू कुठे गेलास?”

”मी त्या झाडांच्या इथे गेलो. “

”आणि तू तिथे काय केलंस?”

”मी ते पिस्तूल पुरलं.”

”आमच्यासमोर सादर केलं गेलंय ते हेच का ते पिस्तूल?”

आरोपीकडे ते पिस्तूल देण्यात आलं, त्याने ते बघितलं आणि तो म्हणाला, हो, हेच ते पिस्तूल.

”त्यांना कसं सापडलं ते?”

”त्यांना सापडलं नाही, मीच त्यांना सांगितलं ते कुठे असेल ते.”

”आणि त्यानंतर तू काय केलंस?”

”मी तिथे बसून प्रार्थना केली.”

वकील क्षणभर अचंबित झाला, पण न्यायाधीशाने पुढे विचारलं, तू तिथे काय प्रार्थना केलीस?

”मी मला माफी मिळावी म्हणून प्रार्थना केली.”

”आणि आणखी तू कशासाठी प्रार्थना केलीस?”

”आणखी कशासाठी प्रार्थना करावी असं मला वाटलं नाही.”

**

”आणि दुसऱ्या दिवशी तू पुन्हा जोहान्सबर्गला गेलास?”

”हो.”

"आणि बसवर बहिष्कार घालणाऱ्या लोकांबरोबर तू चालायलाही गेलास?"

"हो."

"आणि मग?"

"आणि मग मी घाबरलो."

"मग तू काय केलंस?"

"त्या रात्री मी जर्मिस्टनला गेलो."

"पण तो संपूर्ण दिवस तू काय केलंस? तू लपून राहिलास?"

"मी एक शर्ट विकत घेतला आणि ती पिशवी घेऊन मी सगळीकडे फिरलो."

"का बरं? तू असं का केलंस?"

"मला वाटलं ते मला निरोप्या समजतील."

"आणखीही काही तू केलंस का?"

"नाही, आणखी काही नाही."

"मग तू जर्मिस्टनला गेलास? कोणाकडे?"

"हो, 12, मसेरू स्ट्रीटवरच्या जोसेफ भेन्गु च्या घरी."

"आणि मग?"

"मी तिथे होतो, तेवढयात पोलीस तिथे आले."

"मग पुढे काय झालं?"

"त्यांनी मला मी अब्सालोम कुमालो आहे का असं विचारलं. मी हो म्हटलं, मी खूप घाबरलो होतो, मी त्याच दिवशी पोलिसांकडे जाऊन गुन्ह्याची कबुली द्यायचं ठरवलं होतं, पण मुर्खपणाने ते पुढे ढकलत राहिलो."

"त्यांनी तुला अटक केलं का?"

"नाही. त्यांनी मला जोहान्नेसला कुठे शोधता येईल ते विचारलं. मी म्हणालो जोहान्नेस आत्ता कुठे आहे मला माहित नाही, गोऱ्या माणसाला जोहान्नेसने नाही तर

मी गोळी झाडली आहे आणि जोहान्नेसनं त्यांच्या घरातल्या नोकराला गजानं मारलं आहे. आणि आमच्याबरोबर मॅथ्यू पण होता हेही मी त्यांना सांगितलं. मी पिस्तूल कुठे लपवून ठेवलंय तेही मी तुम्हाला दाखवतो असंही मी त्यांना सांगितलं. आणि मी गुन्ह्याची कबुली द्यायचं ठरवलं होतं, पण मुर्खपणाने ते पुढे ढकलत राहिलो हेही त्यांना सांगितलं."

"आणि तू जोहान्सबर्गचे अतिरिक्त दंडाधिकारी अँड्रिज कोएट्झी इस्क्वायर ह्यांच्यासमोर असा जबाब लिहून दिला आहेस का?"

"मला त्यांचं नाव माहित नाही."

"हाच आहे का तो जबाब?"

तो जबाब मुलाच्या हातात दिला गेला. तो जबाब पाहून मुलगा म्हणाला, हो हा तोच जबाब आहे.

"आणि त्यात लिहिलेला प्रत्येक शब्द खरा आहे?"

"हो, प्रत्येक शब्द खरा आहे."

"त्यात काहीही खोटं नाहीये?"

"त्यात काहीही खोटं नाहीये. कारण मी आता स्वतःशीच ठरवलंय की यापुढे खोटं बोलायचं नाही. कोणतीही वाईट गोष्ट करायची नाही."

"म्हणजे तुला पश्चात्ताप होतोय?"

"हो, मला पश्चात्ताप होतोय."

"तू संकटात सापडलास म्हणून?"

"हो, मी संकटात सापडलो म्हणून."

"तुला आणखीही कशाचा पश्चात्ताप होतोय?"

"मला आणखी कशाचाही पश्चात्ताप होत नाहीये."

न्यायालय तहकूब झाल्यावर न्यायाधीश आणि त्यांचे सल्लागार न्यायालयातून बाहेर पडेपर्यंत लोक उभं राहिले. आणि मग रिवाजाप्रमाणे युरोपीय आणि गैर युरोपीय लोकं खुर्च्यांच्या रांगांच्या मागे असलेल्या आपापल्या दरवाज्यातून बाहेर पडू लागले.

कुमालो आणि सिमँगु आणि गर्टरुड आणि मिसेस लिथेबे एकत्र बाहेर आले. ते बघा मरण पावलेल्या गोऱ्या माणसाचे वडील असं त्यांनी लोकांना बोलताना ऐकलं. कुमालोंनी त्या दिशेला बघितलं. हो ते खरंच ज्याचा खून झालाय त्या गोऱ्या माणसाचे वडील होते. ज्यांचं न्दोत्शेनीजवळच्या डोंगरमाथ्यावर शेत होतं आणि जे कधीमधी त्यांना घोड्यावरून चर्च समोरून जाताना दिसायचे, ते तेच होते. कुमालो थरथर कापू लागले आणि त्यांनी पुन्हा त्यांच्याकडे बघितलं नाही. अशा माणसाकडे कोणी कसं काय बघू शकतो?

6

पार्कवर्ल्डच्या आर्थर जार्विसच्या खुनाच्या खटल्याकडे लोकांचं फारसं लक्ष नव्हतं. कारण नवीन सोन्याच्या खाणीचा शोध लागला होता. सोनं, आणखी सोनं, समृद्ध करणारं सोनं. ऑरेंज फ्री स्टेट प्रांतातलं ओडेंडालस्रस्ट* हे एक छोटसं ठिकाण होतं. कालपर्यंत कुणाला फारसं माहित नसलेलं आणि आज जगात सगळ्यात जास्त प्रसिद्ध झालेलं.

ही खाण दक्षिण आफ्रिकेत आत्तापर्यंत सापडलेल्या सगळ्यात समृद्ध खाणीइतकीच समृद्ध असणार होती. इथलं सोनं जोहान्सबर्गमधली सगळ्यात मौल्यवान चीजेइतकंच मौल्यवान असणार होतं. उंच थोरल्या इमारती आणि गजबजलेले रस्ते असलेल्या नवीन जोहान्सबर्गच्या निर्मितीची भविष्यवाणी करायला लोकांनी सुरुवात केली होती. जोहान्सबर्गमधील सोनं सदासर्वकाळ राहणार नाही ह्या भितीने ज्यांचे चेहरे पडलेले असत असे लोक आनंदोत्सव साजरा करू लागले होते. दक्षिण आफ्रिकेला नव्याने जगण्याची संधी मिळाली आहे असं लोक म्हणू लागले.

संपूर्ण जोहान्सबर्गमध्ये सनसनाटी पसरली होती. शेअरबाजारात लोकं वेडी झाली होती, ते आनंदाने जोरजोरात ओरडत आणि किंचाळत होते आणि आपल्या हॅट हवेत उडवत होते. काहीतरी आशा ठेऊन आस्तित्वात नसलेल्या खाणींचे त्यांनी विकत घेतलेले शेअर्स त्यांच्या अपेक्षांच्या कितीतरी पट वर उसळले होते.

ऑरेंज फ्री स्टेटमधल्या गवताळ माळरानाशिवाय तिथे दुसरं काही नव्हतं. चरणाऱ्या मेंढ्या, गाई गुरं आणि मेंढपाळ ह्याशिवाय तिथे दुसरं काही नव्हतं. गवत आणि झुडुपं आणि इकडे तिकडे उगवलेल्या मक्याशिवाय तिथे दुसरं काही नव्हतं. ड्रिलिंग मशीन आणि पृथ्वीच्या पोटातली अद्भुत रहस्य चिकाटीने शोधून काढणाऱ्या अभियंत्यांशिवाय तिथे खाणी आहेत असं कोणालाही वाटत नव्हतं. त्या बाजूने जाणारी गावठी लोकं, गुराखी, घोड्यावरून जात असताना त्याच्या मनस्थितीप्रमाणे तिरस्काराने, भितीने किंवा आशेने बघणारा आफ्रिकान भाषा बोलणारा म्हातारा ह्यांच्याशिवाय त्यांच्याकडे कोणी ढुंकूनही बघत नव्हतं.

**ओडेंडालस्रस्ट - सोन्याच्या खाणी मिळालेलं आणखी एक ठिकाण*

ट्वीड व्लेईच्या अद्भुत शेअरने तर शेअर बाजारात धमाल उडवून दिली आहे. कारण तो आधी वीस शिलिंग, मग चाळीस शिलिंग, मग साठ शिलिंग आणि तुमचा विश्वास बसणार नाही, पण दिवस संपता संपता चक्क ऐंशी शिलिंग झाला. कोणी दुपारी दोनच्या ऐवजी बारा वाजता शेअर विकले म्हणून रडला तर कोणी बाराच्या ऐवजी दुपारी दोन वाजता शेअर विकत घेतले म्हणून रडला. ज्याने शेअर विकले त्याला उद्या सकाळी आणखी वाईट वाटेल कारण उद्या शेअरची किंमत शंभर शिलिंग होईल.

पण हे खरोखर आश्चर्यकारक आहे. दक्षिण आफ्रिका खरोखर अद्भुत आहे. परदेशात फिरताना आपली मान ताठ ठेवा कारण लोकं म्हणतील, अरे वा! तुम्ही श्रीमंत समजल्या जाणाऱ्या दक्षिण आफ्रिकेहून आला आहात!

ओडेंडालस्रस्ट, काय जादुई नाव आहे. आफ्रिकानर लोकांना आश्चर्य वाटणार नाही, पण शेअर बाजारातील काहीजणं आत्ताच बोलायला लागलेत की काहीतरी सोपं नाव असायला पाहिजे होतं. स्मट्स किंवा स्मट्सव्हिला कसं बोलायला सोपं वाटतं! त्यातल्या त्यात हॉफमेयरही ठीक आहे. पण आपण तरी काय करणार? आधीच एक हॉफमेयर आहे. आणि त्या सगळ्यापेक्षा खरं सांगायचं तर नावात असं काय असतं?

ह्या सगळ्या खाणींची त्रासदायक गोष्ट हीच की त्यांची नावं उच्चारणं महाकठीण काम असतं. बुद्धिमान लोकांनी सुरु केलेला आणि थोर उद्योजकांनी विकसित केलेला हा महान उपक्रम अवघड नावामुळे मार खातो: ब्लायव्हूरिझिस्ट, वेल्गेडॅश्ट, लँगलाग्ट आणि आता हे ओडेंडालस्रस्ट.

पण ह्या गोष्टी कोणाला कळणार नाही इतक्या तोंडातल्या तोंडात किंवा आपल्या समविचारी लोकांच्या क्लब मध्ये बसल्यावर कुजबुजल्यागत बोला. कारण आपल्यापैकी बरेच जण एकीकडे सहकार्य, समाजप्रेम, बंधुता, परस्परांबद्दलची सहानुभूती ह्यांच्या ठाम बाजूने असणाऱ्या युनायटेड पार्टीचे सभासद आहेत आणि दुसरीकडे पैसा नावाच्या सैतानाला वश करण्याच्या प्रयत्नात आहेत. आफ्रीकानरना कधीतरी नक्की कळेल की ही दोन्ही बाजूंनी बोलणारी लोकं म्हणजे नुसताच वेळेचा अपव्यय करत असतात.

सोनं, सोनं, सोनं... देश पुन्हा एकदा भरपूर श्रीमंत होणार आहे. शेअरची किंमत वीस शिलिंग वरून शंभर शिलिंग झाली आहे. त्याचा आनंद घ्या आणि देवाचे आभार

माना. हेही खरंय की बऱ्याच लोकांना देवाचे आभार मानण्याची गरज लागणार नाही. कारण त्यांच्याकडे फारसे शेअरच नसतील. काहीजणांकडे तर अजिबात शेअर नसतील. त्यांच्यापैकी काहीजण उघडपणे वैतागतात. काही जण नुसतेच धुमसत, धुसफुसत राहतात. काही जण खिल्ली उडवत राहतात. शेअर नसणाऱ्या काहीजणांना नशीब, विधिलिखित, नियंत्याची इच्छा असे लबाडीचे शब्द सांत्वन देतात. स्वतःला ते अलिप्ततावादी, निष्काम कर्मयोगी किंवा निर्लेप मनाचे म्हणवून घेतात. पण खरंतर ज्यांच्याकडे दुर्लक्ष केलं तरी चालेल अशी ही मंडळी असतात. असे कफल्लक, बोजड भाषेत बोलत राहणारे लोक लेफ्ट क्लब, चर्च महासंघ किंवा प्रेम आणि बंधुभाव पसरविणाऱ्या संस्थांमध्ये काहीतरी गहन गंभीर चर्चा करत राहतात. ते न्यू सोसायटी, मॅनकाइंड ईज मार्चिंग सारख्या छोट्या प्रकाशनांमध्ये किंवा आठवडाभर न जेवल्यासारखे दिसणाऱ्या अद्वितीय फादर बेरेस्फोर्ड यांच्या ‘क्रॉस ॲट द क्रॉसरोड्स’ सारख्या कोणालाही न समजणाऱ्या आठ पानी साप्ताहिक पुस्तिकेत लिहितातसुद्धा. फादर बेरेस्फोर्ड अगदी ऑक्सफर्डमध्ये बोलतात तसं अस्खलित आणि हॉड्स व स्टेलेनबोशपेक्षा सुंदर इंग्रजी बोलतात. त्यामुळे गबाळे रहात असले तरी त्यांना सगळीकडे मान मिळतो. सगळं जग भयंकर आहे अशा दृष्टिकोनातून ते स्फोटक लेख लिहितात. ते मिशनरी आहेत, देवावर त्यांचा विश्वास आहे पण हे जग बनण्यासाठी सगळ्या प्रकारची लोकं लागतात ह्यावर त्यांचा बिलकुल विश्वास नाही.

तर ह्या अशा लोकांपैकी काहीजण म्हणतात की शेअरची किंमत वीस शिलिंगच ठेऊन उरलेले ऐंशी शिलिंग जमिनीची जी मोठ्या प्रमाणावर धूप होत आहे त्या कामी लावले तर किती चांगलं होईल. मुलांच्या आणि मुलींच्या क्लबना सवलती देणे, सामाजिक केंद्र उभारणे आणि आणखी इस्पितळं बांधणे ह्यासाठी हे पैसे वापरले तर चांगलं होईल. मजुरांना चांगला पगार देण्यासाठी हे पैसे वापरले तर चांगलं होईल.

हे विचार मूर्खपणाचे आहेत हे कोणाच्याही लक्षात येईल कारण शेअरच्या किंमतींचा मजुरांच्या पगाराशी काही संबंध नसतो. असलाच तर फक्त खाणीचा खर्च आणि सोन्याची किंमतीशी असतो. बरं, असंही सांगितलं जातं की खाणींमधल्या काही दिग्गजांकडे एकही शेअर नाही. त्यांना मात्र मानायला हवं. कारण एवढ्या भुरळ पाडणाऱ्या गोष्टीपासून ते स्वतःला दूर ठेवू शकले आहेत.

शेअर ऐंशी शिलिंगला गेल्यानंतरची आणि जाण्याआधीची परिस्थिती ह्यांची व्यवस्थित मांडणी केली तर कोणत्याही परिस्थितीत आपल्याला फार उदास होण्याची

गरज नाही हे आपल्या लक्षात येईल. ह्या सगळ्याकडे दुसऱ्या बाजूनेही बघूया. जेव्हा शेअर वीस शिलिंगवरून शंभर शिलिंगला जातो तेव्हा कोणाला तरी ऐंशी शिलिंग मिळतात. अगदी एखाद्यावेळची परिस्थिती सोडून द्या, पण एरवी ते पैसे कुण्या एका व्यक्तीला मिळत नाहीत. जर ते तसे मिळाले असते तर तो माणूस धनदांडगा किंवा सरकार चालवणारा झाला असता. शक्यतो बऱ्याच लोकांमध्ये ते ऐंशी शिलिंग वाटले जातील. कारण शेअरची किंमत वाढू शकत असताना सुद्धा घाबरून कितीतरी जण तो शेअर विकत असतील. हे अगदी बरोबर आहे की ह्या लोकांनी हा पैसा मिळवताना प्रत्यक्षात काही काम केलेलं नाहीये, घाम गाळलेला नाहीये किंवा आपले हातही काळे केले नाहीयेत. पण त्यांची हिम्मत, दूरदृष्टी आणि त्यासोबत येणारा मानसिक ताण - ह्या सगळ्यासाठी त्यांना थोडा तरी पैसा नक्कीच मिळायला हवा. आता हे लोक हे ऐंशी शिलिंग खर्च करून इतरांसाठी जास्तीच्या कामाची निर्मिती करतील आणि त्यामुळे अर्थातच देश ऐंशी शिलिंगने आणखी श्रीमंत होईल. आणि त्यांच्यापैकी बरेच जण दानशूर होऊन मुला-मुलींच्या क्लबना सवलती देणे, सामाजिक केंद्र उभारणे आणि आणखी इस्पितळं बांधणे ह्यासाठी निधी देतील. ब्लोएमफोंटेन, ग्रॅहाम्सटाऊन आणि ब्युओफोर्टसारख्या लांबच्या ठिकाणाचे लोक जोहान्सबर्ग फक्त पैशाचा विचार करते असं म्हणतात ते चुकीचं आहे. आमच्याकडे कोणत्याही शहरात किंवा उपनगरात असतात तेवढेच चांगले पती आणि वडील असतात. काही दिग्गज अभिजात कलावस्तूंचा संग्रह करतात, त्यामुळे कलाकारांना काम मिळते आणि कला मरण्यापासून वाचवली जाते. काही जणांनी उत्तरेला भली थोरली जंगलं विकत घेतलेली आहेत. तिथे ते शिकारी करतात आणि काही वेळासाठी निसर्गाचा भाग बनतात.

अर्थातच शंभर शिलिंगला शेअर विकणारा त्यातले काही शिलिंग पुन्हा शेअर विकत घेण्यासाठी राखून ठेवेल आणि बाकीचे पैसे खर्च करेल. त्यातून जेव्हा बाकीच्या लोकांकडे चांगले काम येईल तेव्हा ते ऐंशी शिलिंगचा काही भाग खर्च करायला सुरुवात करतील. मग शेतकऱ्यांना जास्त धान्य पिकवता येईल आणि कारखाने आणखी वस्तू बनवू शकतील आणि गरज नसतानाही सरकार आणखी सरकारी नोकरदारांची भरती करू शकेल. काळे गरीब भुकेने मरणार नाहीत. ते मोठ्या संख्येने खाणीकडे येऊ शकतील आणि त्यांच्यासाठी मोठी आकर्षक कुंपणं आणि चांगल्या भिंती आणि वसाहती बांधता येतील. त्यांना अधिक जीवनसत्वयुक्त जेवण देता येईल. पण जेवणाच्या बाबतीत जरा काळजी घ्यायला लागेल कारण काही विद्वानांनी मजुरांना गरजेपेक्षा जास्त जीवनसत्वयुक्त

जेवण दिलं जातंय असा शोध लावला आहे. काहीजण ह्याला झिरपणारी अर्थव्यवस्था म्हणतात.

कदाचित आणखी एक महानगर, दुसरं जोहान्सबर्ग, दुसरं पार्कटाऊन, दुसरं हॉटन, दुसरं पार्कवर्ल्ड आणि दुसरं कैंसिंग्टन, दुसरं जेप्पे आणि दुसरं व्रेडेडोर्प, दुसरं पिम्विले आणि दुसरं शांतीटाऊन उभारलं जाईल. ओडेंडालस्रस्टचा अभिमान असलेलं एक महानगर. पण हे नाव जरा जास्तच कठीण नाही का वाटत?

**

पण असेही काही लोक आहेत ज्यांना दुसरं जोहान्सबर्ग होऊ नये असं वाटतंय. बरेच समाजसेवक, ते फादर बेरेस्फोर्ड आणि लोककल्याणासाठी झटणारे इतर सगळेजणं म्हणतायत की असं व्हायला नको. मान्य आहे की त्यांच्यापैकी कोणाकडे एकही शेअर नाहीये. खाणींमधले नावाजलेले तज्ञ असलेल्या सर अर्नेस्ट ओप्पेनहायमर हेही म्हणतायत की असं व्हायला नको. त्यांच्या मते बंदिस्त आवारातल्या निकृष्ट वसाहती ऐवजी खाणकामगारांची गावातच त्यांच्या बायको मुलांसकट राहण्याची सोय होऊ शकेल अशी वसाहत आखण्याची ही संधी आहे. सरकारासोबत टेनेसी व्हॅली ऑथॉरिटी सारखी फ्री स्टेट खाणक्षेत्र विकास नियंत्रण समिती नेमून ह्या विकासाला योग्य दिशा देण्यासाठी चर्चाही चालू आहे.

सर अर्नेस्ट ओप्पेनहायमर, तुमचं बोलणं त्यांना पुन्हा ऐकायचंय. काहीजण टाळ्यांच्या कडकडाटाने तुमचं समर्थन करतायत, काहीजण तुमच्यासाठी परमेश्वराजवळ दुवा मागतायत, काही जणांनी तुम्हाला त्यांच्या हृदयात जागा दिली आहे. खाणी ह्या माणसांसाठी आहेत, पैशासाठी नाहीत. पैसा काही वेडं होण्यासाठी आणि किंचाळत आपली हॅट हवेत भिरकावण्यासाठी नसतो. पैसा अन्न, कपडे, आराम मिळवण्यासाठी आणि कधीतरी चित्रपट बघण्यासाठी असतो. पैसा मुलांचं आयुष्य आनंदी करण्यासाठी असतो. पैसा सुरक्षितता, स्वप्न, आशा आणि ध्येय यांच्या पूर्ततेसाठी असतो. पैसा तुम्ही जिथे जन्मलात तिथल्या आनंदांचा आस्वाद घेण्यासाठी असतो.

**

पृथ्वीवर दुसऱ्या जोहान्सबर्गची आवश्यकता नाही. एक आहे तेवढं पुरेसं आहे.

7

जार्विसनी पुन्हा त्या घरी जायचं ठरवलं. स्वयंपाकघरातून आत शिरून जिन्यावरून जाताना डाग पडलेल्या जमिनीजवळून जाणं खरं तर अवघड होतं, पण ते त्याच पद्धतीने गेले. बेडरूममध्ये न जाता ते पुस्तकं खच्चून भरलेल्या त्याच्या अभ्यासिकेत गेले. अब्राहम लिंकन, दक्षिण आफ्रिका ह्यांच्या कप्प्यांवरून आफ्रिकान भाषेतली पुस्तकं, धर्मचिकित्सा आणि समाजशास्त्र, गुन्हे आणि गुन्हेगार, कविता, कादंबऱ्या, शेक्सपिअर अशा सगळ्या विषयांच्या पुस्तकांवर त्यांनी पुन्हा नजर टाकली. वधस्तंभावरील ख्रिस्त, अब्राहम लिंकन, व्हरजॅलिजनमधील उतरत्या छपरांचं पांढरं घर आणि हिवाळ्यातले नदीकाठचे निष्पर्ण वाळुंज वृक्ष अशा भिंतीवरील चार चित्रांकडे त्यांनी पुन्हा एकदा बघितलं. काही आवाहन करणारी पत्रं, काही आमंत्रण देणाऱ्या पत्रिका आणि दक्षिण आफ्रिकेत काय करणं योग्य आहे आणि काय नाही हे सांगणारा लेख असं बरंच काही ठेवलेल्या टेबलाजवळ ते बसले.

त्यांनी त्यांच्या मुलाच्या टेबलाचा खण उघडला. त्यात बँकांची खातेपुस्तकं, कागदं, काही लिफाफे, पेन आणि पेन्सिली तसेच जुने चेक होते. खालच्या खणात टाईप केलेले आणि पिन लावून एकमेकांवर व्यवस्थित ठेवलेले लेख होते. त्यात 'समाजभवनांची गरज', 'पार्कवर्ल्डच्या बागेतील पक्षी', 'भारत आणि दक्षिण आफ्रिका' असे वेगवेगळ्या विषयांवरचे लेख होते. त्यातल्या एका लेखावर 'दक्षिण आफ्रिकेच्या उत्क्रांतीवरील खाजगी लेख' असे लिहिले होते. त्यांनी तो लेख वाचायला घेतला:

इथं दक्षिण आफ्रिकी म्हणून जन्माला येणं कठीण आहे. एखादा माणूस आफ्रिकानर म्हणून किंवा इंग्रजी भाषिक दक्षिण आफ्रिकी, किंवा काळा किंवा झुलू म्हणून जन्माला येऊ शकतो. एखादा माणूस मी लहानपणी जशी रपेट मारायचो तशी हिरव्यागार टेकड्या आणि समृद्ध खोऱ्यांमधून रपेट मारू शकतो. मी जसं लहानपणी बघितलंय तसं एखादा माणूस बंटू आदिवासींचे राखीव क्षेत्र बाहेरून बघू शकतो, पण तिथे काय चाललंय ते मात्र तो अजिबात बघू शकत नाही. दक्षिण आफ्रिकेत इंग्रजी भाषा बोलणाऱ्या लोकांपेक्षा आफ्रिकान भाषा बोलणारे लोक कितीतरी जास्त आहेत हे मी जसं लहानपणी ऐकलंय तसंच एखादा माणूस ऐकू शकतो, पण तरीही त्याला त्यांच्याबद्दल काहीही समजणार नाही, दिसणार नाही. जगभरच्या वावटळीतून सुखरूप निसटलेलं सौंदर्य जिथे विसावलंय अशी सूर्याची आवडती भूमी, आपली प्रिय दक्षिण आफ्रिका हिच्या सौंदर्याबद्दलची पुस्तकं

मी जशी लहानपणी वाचली तशी आताही एखादा वाचू शकेल. तिच्या प्रेमात पडू शकेल, तिचा अभिमान बाळगू शकेल. पण तरीही त्याला तिच्याबद्दल काहीही माहित नसेल. जेव्हा कोणी मोठा व्हायला लागतो तेव्हा त्याला कळतं की इथे सूर्य, सोनं आणि संत्री ह्याशिवायही अनेक गोष्टी आहेत. तेव्हाच तो देशातल्या द्वेषाच्या आणि भीतीच्या वातावरणाविषयी शिकतो. सौंदर्याच्या निर्जीव पुतळ्याचं कौतुक वाटतं पण म्हणून पुतळ्यावर कोणी प्रेम करत नाही. पुरूषांचं जसं खऱ्या, खोट्या, थंड, प्रेमळ, क्रूर, भित्र्या स्त्रीवर तिला जाणून घेतल्यावरच खरं प्रेम जडू शकतं, तसं दक्षिण आफ्रिकेतल्या चांगल्या आणि वाईट गोष्टी कळू लागल्यावरच म्हणजेच खरी दक्षिण आफ्रिका समजू लागल्यावरच त्याचं इथल्या भूमीवर खरं प्रेम जडू शकतं.

मी शेतकरी घरात जन्माला आलो, समाजात मान असलेल्या आई वडिलांनी माझं पालनपोषण केलं. एखाद्या मुलाच्या ज्या गरजा असतात आणि ज्या इच्छा असतात त्या सगळ्या त्यांनी पूर्ण केल्या. ते सरळमार्गी, दयाळू आणि नियम पाळणारे होते. त्यांनी मला प्रार्थना करायला शिकवलं आणि ते मला नियमितपणे चर्चमध्ये नेत असत. ते नोकरांशी व्यवस्थित वागत आणि आमच्याकडे नोकरांची कधीच कमी नव्हती. आदर, कनवाळूपणा, औदार्य यासारख्या अनेक गुणांविषयी लहान मुलांनी जे शिकायला हवं ते सगळं मी त्यांच्याकडून शिकलो. पण दक्षिण आफ्रिकेविषयी मात्र मी त्यांच्याकडून काहीच शिकलो नाही.

धक्का बसलेल्या आणि दुखावलं गेलेल्या जार्विसनी कागद खाली ठेवले. क्षणभर त्यांच्या मनात रागासारखी भावना उमटली आणि त्यांनी उद्विग्नपणे डोळे पुसले. त्यांचे शरीर थरथर कापत होते. ते पुढचं वाचू शकत नव्हते. त्यांनी उभे राहून हॅट घातली आणि ते जिन्याने डाग पडलेल्या लादीपासून शक्य तितक्या दुरून खाली उतरले. पोलीस त्यांना सलाम करणार इतक्यात ते पुन्हा वळले आणि जिना चढून पुन्हा त्या टेबलाजवळ येऊन बसले. त्यांनी तो लेख पुन्हा काढला आणि शेवटपर्यंत नीट वाचला. लेखाचा शेवटचा परिच्छेद त्यांना हलवून गेला. त्यामुळेच कदाचित ते त्यातल्या कल्पनांवर आणि विचारांवर चिंतन करू शकले.

म्हणूनच मी माझा वेळ, उर्जा, कौशल्यं आणि स्वतःला दक्षिण आफ्रिकेच्या सेवेसाठी अर्पण करणार आहे. यापुढे मी स्वतःला एखादी कृती करणं जरुरीचं आहे का ह्यापेक्षा ती करणं योग्य आहे का एवढंच विचारीन. मी फार उदात्त आणि निःस्वार्थी

आहे म्हणून नाही तर आयुष्य फार लवकर निसटून जात आहे, माझ्या उरलेल्या प्रवासासाठी ध्येयाचा न ढळणारा ध्रुव तारा आणि न चुकवणारा दिशादर्शक हवा आहे म्हणून हे करणार आहे. मी निग्रो समर्थक किंवा स्वजनांचा टीकाकार आहे म्हणून नाही तर दुसरे काही करणे मला जमण्यासारखे नाही म्हणून हे करणार आहे. जेव्हा मी फक्त तुलना करीत बसतो तेव्हा मी हरलेला असतो, जेव्हा हे करणं सुरक्षित आहे ना असं विचारत राहतो तेव्हा मी हरलेला असतो, जेव्हा माणसं- गोरी किंवा काळी किंवा इंग्लिश किंवा आफ्रिकानर किंवा ज्यू किंवा भारतीय माझं म्हणणं मानतील का असा विचार मी करतो तेव्हा मी हरलेला असतो. म्हणूनच जे योग्य आहे तेच करण्याचा आणि जे सत्य आहे तेच बोलण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

मी हे सगळं खूप शूर आणि प्रामाणिक माणूस आहे म्हणून नाही तर माझ्या अंतरात्म्यातील कोलाहल शमविण्याचा तो फक्त एकच मार्ग मला दिसतो आहे म्हणून करणार आहे. एका बाजूने मोठ्या महत्वाकांक्षा बाळगणं आणि दुसऱ्या बाजूने त्या नाकारत राहणं यापुढे तरी मला जमणार नाही. मला असं जगायची इच्छा नाही, त्यापेक्षा मला मरण आलं तरी चालेल. तथाकथित गुन्ह्याची सजा म्हणून ज्यांना मरावे लागते त्यांच्या भावना मी समजू शकतो. पण मी मृत्यूला हवाहवासा, थोर, उदात्त वगैरे मानत नाही. मला मृत्यूचे नाही तर चांगल्या जगण्याचे आकर्षण आहे.

चांगलं जगणं म्हणजे काय हे माझं मलाच समजलं, जगण्यातील प्राधान्यक्रम बदलण्यासाठी मीच मला प्रोत्साहन दिलं असं अजिबात नाही. कोणतीही किंमत देऊन योग्य तेच करण्याची उर्मी नेहमीच फक्त माझ्यात आहे असंही नाही. या बाबतीत मी खरोखर नशीबवान आहे कारण माझी बायकोही माझ्याच विचाराची आहे. तिने स्वतःतील भीती आणि द्वेष यावर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच अशी महत्वाकांक्षा जोपासणं मला शक्य होत आहे. माझी मुलं आत्ता हे सगळं कळण्याच्या वयाची नाहीत. मोठे झाल्यावर त्यांनी माझा द्वेष केला, किंवा ते मला घाबरले किंवा मी जी माझी कमाई समजतो तेच त्यांनी माझे अपयश समजले तर मला वाईट वाटेल. पण तेही आमच्यासारखाच विचार करणारे झाले तर त्यासारखा दुसरा आनंद नसेल. ते मला उल्हासित करणारे, भरून पावणारे, कृतार्थ करणारे असेल. पण ही काही सौदा करण्याची, घासाघीस करण्याची गोष्ट नाही. काहीही होवो, ठरवलेला मार्ग आता बदलता येणार नाही.

जार्विस बराच वेळ धूर सोडीत बसले. त्यांनी आणखी काही वाचले नाही. त्यांनी सगळे कागद पुन्हा खणात टाकले आणि खण बंद केला. चिलीमीतला तंबाखू संपेपर्यंत ते बसून राहिले. धुम्रपान झाल्यावर ते उठले आणि हॅट घालून जिन्याने खाली आले. शेवटच्या पायरीवरून ते वळले आणि मुख्य दरवाजाकडे आले. त्यांना त्या मार्गिकेची किंवा लादीवरच्या डागांची भीती वाटत नव्हती. त्या बाजूने ते जात नव्हते इतकंच.

मुख्य दरवाजा लोटून ते बाहेर आले. शेतकरी असल्याने त्यांनी सवयीने आकाशाकडे बघितलं पण ह्या अनोळखी शहरातील आकाशानं त्यांना काही सांगितलं नाही. फाटकाबाहेरचा रस्ता ते चालू लागले. दरवाजा बंद होत असतानाचा आवाज मागच्या दरवाज्याच्या इथे असलेल्या पोलिसाने ऐकला आणि त्याने समजुतीने मान हलवली. ते आता आणखी सहन करू शकणार नाहीत, तो स्वतःशीच बोलला. हे वृद्ध गृहस्थ आता आणखी सहन करू शकणार नाहीत.

8

मार्गारेट जार्विस ह्यांची लाडकी भाची बार्बरा स्मिथ आपल्या नवऱ्याबरोबर स्प्रिंग्जला रहायची. न्यायालयात सुनावणी होणार नव्हती त्या दिवशी जार्विस आणि त्यांची बायको एक दिवसासाठी तिच्याकडे गेले. त्यांना वाटलं की मुलाच्या मृत्यूने पार खचून गेलेल्या त्यांच्या बायकोसाठी हा चांगला बदल ठरेल. दोघी बायका इकोपो आणि लुफाफा आणि हायफ्लॅट्स आणि उम्झीकुलूतल्या लोकांबद्दल बोलत असताना जार्विस मातीवरील प्रेमामुळे तिच्या बागेत गेले. थोड्या वेळाने बायकांनी त्यांना हाक मारून त्या शहरात जात आहेत आणि तुम्हालाही यायचंय का असं विचारलं. पण जार्विस म्हणाले की शहरात जाण्यापेक्षा त्यांना घरात बसून निवांतपणे वर्तमानपत्र वाचायला जास्त आवडेल. त्या गेल्यावर त्यांनी संपूर्ण वर्तमानपत्र वाचून काढलं.

ओडेंडालस्रस्ट इथं मिळणार असलेल्या सोन्याच्या आणि त्यामुळे शेअर बाजारात अजून टिकून असलेल्या उत्साहाच्या बातम्यांनी वर्तमानपत्र खच्चून भरलेलं होतं. एका जाणकारानी लोकांना एवढ्या जास्त किंमतीला शेअर विकत घेऊ नये असे बजावलं होतं. ही शेअरची खरी किंमत नसून तो फुगा आहे आणि तो फुटला की मोठे नुकसान होईल असं मत मांडलं होतं. काही बातम्या गुन्ह्यांच्या होत्या. त्यातले बरेचसे गुन्हे हे काळ्यांनी युरोपीय लोकांविरुद्ध केले होते पण त्यात वर्तमानपत्र उघडायलाच भीती वाटेल इतकं भयंकर असं काही नव्हतं.

ते वाचत असताना स्वयंपाकघराच्या दरवाज्यावर टकटक झाली. त्यांना दिसलं की एक काळा पाद्री स्वयंपाकघराकडे येणाऱ्या तीन पायऱ्यांच्या जवळ उभा आहे. पाद्री अगदी म्हातारा होता. त्याचे कपडे जुनाट दिसत होते आणि त्यांची कॉलर तपकिरी रंगाची दिसत होती. त्यांना येताना बघून त्याने त्याची हॅट काढली. तो माणूस कावराबावरा दिसत होता आणि घाबरून थोडा थरथरत सुद्धा होता.

“सुप्रभात, ऊम्फुंडीस.” जार्विस अस्खलित झुलूमध्ये बोलले.

“उम्नूमझान!” अचानक धक्का बसल्याने पाद्री त्राण नसल्यासारखे मटकन खालच्या पायरीवर बसले. जर्विसना आश्चर्य वाटले. हे रिवाजाला धरून नसलं तरी हा म्हातारा विनयशील आणि सभ्य आहे आणि त्यांची ही कृती म्हणजे उद्धटपणा नाही हे

जार्विसना लगेच समजलं. म्हणूनच पायरीजवळ जाऊन त्यांनी त्या माणसाला हळुवारपणे विचारलं, तुम्ही आजारी आहात का ऊम्फुंडीस? म्हाताऱ्या माणसाने उत्तर दिलं नाही. ते थरथरत मान खाली घालून जमिनीकडे बघत राहिले. त्यामुळे जार्विस त्यांचा चेहरा बघू शकले नाहीत. त्यांची हनुवटी त्यांनी हातानी उचलली असती तर त्यांचा चेहरा दिसला असता. पण त्यांनी तसं केलं नाही कारण सहसा तसं कोणी करत नसे.

"तुम्ही आजारी आहात का ऊम्फुंडीस?"

"थोड्या वेळानी मला बरं वाटेल, उम्नूमझान."

"तुम्हाला पाणी हवं आहे का? की काही खायला हवंय? तुम्हाला भूक लागली आहे का?"

"नाही उम्नूमझान, मी बरा आहे आता."

जार्विस सगळ्यात शेवटच्या पायरीच्या खालच्या फरशीजवळ थांबले पण त्या वृद्धाला अजून बरं वाटलं नव्हतं.

तो वृद्ध थरथरत मान खाली घालून जमिनीकडे बघत राहिला. गोऱ्या माणसाने वाट बघत बसण्याची पद्धत नसतानाही जार्विस वाट बघत थांबले कारण तो म्हातारा माणूस खूपच आजारी आणि अशक्त दिसत होता. त्या म्हाताऱ्या माणसाने काठीचा आधार घेत उठायचा प्रयत्न केला पण त्यांची काठी फरशीवरून सटकली आणि आवाज करत खाली पडली. जार्विसनी काठी उचलली आणि त्या म्हाताऱ्या माणसाकडे दिली. त्यांनी ती काठी खाली ठेवली, आपली हॅट काढली आणि हाताने स्वतःला वर उचलण्याचा प्रयत्न केला. पण त्यांचा तो पहिला प्रयत्न फसला आणि ते थरथरत पुन्हा खाली बसले. जार्विसनी त्यांना मदत केली असती पण काठी उचलण्याइतकं सहजपणे ते केलं जात नसे. मग त्यांनी पुन्हा आपले हात पायरीवर दाबले आणि जोर करूनच ते उठले. मग त्यांनी आपली मान वर करून जार्विसकडे बघितलं. त्यांचा चेहरा आजारपणामुळे किंवा भुकेमुळे व्याकूळ झालेला नाहीये तर सहन करण्यापलीकडच्या वेदना त्या चेहऱ्यावर आहेत हे जार्विस ह्यांच्या लक्षात आलं. जार्विस खाली वाकले आणि त्यांनी त्या दुःखी माणसाची काठी आणि हॅट उचलली आणि ती अगदीच मळकट आणि जुनाट असल्यामुळे लगेच त्यांना देऊन टाकली.

"धन्यवाद, उम्नूमझान."

"ऊम्फुंडीस, तुम्हाला नक्की बरं वाटतंय ना आता?"

"हो उम्न्मझान, मला आता बरं वाटतंय."

“ऊम्फुंडीस, तुम्ही इथे कोणाला भेटायला आलेलात का?"

म्हाताऱ्या पाद्र्याने पुन्हा आपली काठी आणि हॅट पायरीवर ठेवली आणि आपल्या हिरवट कोटातल्या खिशातून पाकीट बाहेर काढले. हात अजूनही थरथरत असल्यामुळे त्यातली कागदं खाली पडली.

"मला माफ करा, उम्न्मझान."

म्हातारा कागदं उचलायला खाली वाकला आणि नीट वाकता येत नसल्यामुळे गुडघे टेकवून खाली पडलेली जुनाट आणि मळकी कागदं उचलू लागला. त्याच्या थरथरणाऱ्या हातांमुळे त्यातली काही कागदं पुन्हा खाली पडत होती, मधूनच पाकीट खाली पडत होतं. जार्विसना एकीकडे त्यांची दया येत होती तर दुसरीकडे वैतागही आला होता. पण ते थांबून अस्वस्थपणे बघत राहिले.

"मला माफ करा, उम्न्मझान, मी तुम्हाला अडकवून ठेवलंय."

"काही हरकत नाही, ऊम्फुंडीस."

शेवटी एकदाचे सगळे कागद उचलले गेले आणि एक कागद सोडून बाकीचे सगळे पाकिटात कोंबले गेले. तो कागद त्यांनी जार्विस ह्यांच्या हातात दिला. त्या कागदावर ते आत्ता जिथे उभे होते त्या जागेचा पत्ता आणि एक नाव लिहलं होतं.

"ह्यात लिहिलंय तेच हे ठिकाण आहे, ऊम्फुंडीस."

"हो, मला इथे यायला सांगितलं होतं, उम्न्मझान. सिबेको नावाचा एक माणूस न्दोत्शेनीला राहतो..."

"न्दोत्शेनी? न्दोत्शेनी मला माहित आहे. मी तिथूनच आलोय."

"त्याला एक मुलगी आहे आणि ती इकोपोतल्या स्मिथ नावाच्या गोऱ्या माणसाकडे काम करत होती."

"हो, हो."

"स्मिथ यांच्या मुलीचं लग्न ह्या कागदावर नाव लिहिलंय त्या माणसाबरोबर झालं."

"हो, बरोबर."

"ते स्प्रिंग्जला राहायला आले आणि ती मुलगीही त्यांची कामं करायला त्यांच्याबरोबर इकडे आली. गेल्या बारा महिन्यात सिबेकोला आपल्या मुलीबद्दल काहीच समजलं नाही. म्हणून त्याने मला इथे येऊन त्या मुलीची चौकशी करायला सांगितली आहे."

जार्विस घरात गेले आणि तिथे काम करणाऱ्या मुलाला घेऊन आले. तुम्ही या मुलाला विचारा असं म्हणून ते पुन्हा वळले आणि घरात गेले. पण घरात गेल्यावर त्यांना लक्षात आलं की तो माणूसही न्दोत्शेनीतला आहे आणि पुन्हा एकदा आस्थेने ते बाहेर आले.

"तुम्हाला हवं होतं ते मिळालं का, ऊम्फुंडीस?"

"ह्या मुलाला तिच्याबद्दल माहित नाहीये कारण तो यायच्या आधीच ती मुलगी ह्या घरातून निघून गेली आहे."

"स्मिथची मुलगी, म्हणजे ह्या घराची मालकीण, बाहेर गेली आहे, पण येईलच इतक्यात. तुम्हाला हवं असेल तर तुम्ही तिची वाट बघू शकता."

जार्विसनी त्या मुलाला घरात जायला सांगितले आणि तो मुलगा आत जाईपर्यंत ते थांबले.

"मी तुम्हाला ओळखतो, ऊम्फुंडीस."

म्हाताऱ्या माणसाच्या चेहऱ्यावरील वेदना त्यांना अस्वस्थ करीत होत्या म्हणून ते त्यांना म्हणाले, खाली बसा, ऊम्फुंडीस. तो म्हातारा माणूस खाली बसला आणि मग जार्विस त्याच्याकडे न बघता म्हणाले की काय ते माझ्या लक्षात येत नाहीये, पण आपल्या दोघांमध्ये काहीतरी नक्की आहे.

"उम्नूमझान"

“मला असं वाटतंय की तुम्ही मला घाबरलेला आहात. कशामुळे ते काही मला समजत नाहीये.”

”मला भीती वाटते आहे हे खरंय, उम्नूमझान. पण कसली भीती वाटते आहे ते तुम्हाला माहित नाही.”

”तेच तर समजावं असं मला वाटतंय.”

”पण मी ते तुम्हाला सांगू शकेन का ही शंका आहे उम्नूमझान.”

”सांगा ऊम्फुंडीस. ते सांगणं एवढं अवघड आहे का?

”ते खूप कठीण आहे, उम्नूमझान. माझ्या आयुष्यातली सगळ्यात कठीण गोष्ट आहे ही.”

त्यांनी मान वर उचलली. इतका वेदनेने कळवळलेला चेहरा जार्विसनी यापूर्वी कधी बघितला नव्हता. “सांगा मला, तुम्हाला बरं वाटेल”, ते म्हणाले.

”मला खूप भीती वाटते आहे, उम्नूमझान”

”तुमची भीती मला दिसते आहे ऊम्फुंडीस, पण का ते मला कळत नाहीये. पण मी तुम्हाला सांगतो, तुम्ही घाबरू नका, मी तुमच्यावर रागवणार नाही. माझ्या मनात तुमच्याबद्दल अजिबात राग नाही.”

”जी माझ्या आयुष्यातली सगळ्यात कठीण गोष्ट आहे ती तुमच्या आयुष्यातलीसुद्धा सगळ्यात कठीण गोष्ट आहे.”

जार्विस आधी गोंधळले पण नंतर एकदम त्यांच्या मनात काहीतरी चमकले.

”तुमच्या मुलाला माझ्या मुलाने मारलं.” म्हातारा माणूस बोलला.

दोघंही जण गप्प झाले. काहीच न सुचल्याने जार्विस त्यांना सोडून बागेत गेले. ते कुंपणाजवळ उभे राहिले आणि त्यांनी माळरानाकडे, लांबवर दिसणाऱ्या खाणीतून निघालेल्या पांढऱ्या डोंगराकडे आणि त्यावर तळपत असलेल्या सूर्याकडे बघितलं. जेव्हा ते पुन्हा त्यांच्याकडे यायला निघाले तेव्हा त्यांनी बघितलं की तो म्हातारा एका हातात हॅट आणि दुसऱ्या हातात काठी घेऊन उठलाय आणि त्याची नजर अजून जमिनीवरच खिळलेली आहे. ते त्यांच्याजवळ आले आणि म्हणाले,

”मी तुमचं म्हणणं ऐकलं. मला जे आधी माहीत नव्हतं ते आता कळलं. पण माझ्या मनात तुमच्याबद्दल राग नाही.”

”उम्नूमझान.”

”स्मिथची मुलगी; ह्या घराची मालकीण आली आहे. तुम्हाला तिला भेटायचंय का? तुम्हाला आता बरं वाटतंय का?”

”हो, त्याच कामासाठी मी आलो होतो उम्नूमझान.”

”माझ्या लक्षात आलं ते. पण मला बघून तुम्हाला धक्का बसला होता, ना? मी इथं असेन असं तुम्हाला वाटलंच नसेल. पण मला तुम्ही कसं काय ओळखता?”

”मी तुम्हाला घोड्याने न्दोत्शेनीवरून मी जिथे काम करतो त्या चर्चवरून जाताना बघितलेलं आहे.”

घरातल्या बोलण्याचा आवाज ऐकून ते हळूच बोलले, तुम्ही कदाचित मुलाला सुद्धा बघितले असेल. तो सुद्धा कधीमधी घोड्यावरून न्दोत्शेनीच्या आसपास फिरायचा. लाल घोड्यावरचा गुलाबी चेहऱ्याचा मुलगा. लहान मुलं लावतात न तशी तो त्याच्या पट्टयात लाकडी बंदूकही लावायचा.

म्हाताऱ्याचा चेहरा बघवत नव्हता. तो अजूनही खालीच बघत होता आणि जार्विसने जमिनीवर अश्रू पडताना पाहिले. ते स्वतःही हेलावून गेले होते. दुबळे झाले होते. काहीतरी बोलावं असं त्यांना वाटत होतं पण त्यांनाही भरून आलं होतं.

”मला आठवतंय, उम्नूमझान. त्याच्यामध्ये एक वेगळीच चमक होती.”

”हो,हो. त्याच्यामध्ये एक वेगळीच चमक होती.”

”उम्नूमझान, बोलायला खूप अवघड आहे पण माझं काळीज तुमच्यासाठी आतून तुटतंय. मालकीण बाई, छोट्या मालकीण बाई आणि मुलांसाठीही मला खूप वाईट वाटतंय.”

”हो, हो.” जार्विस तिरसट माणसासारखे चिडून म्हणाले. “मी ह्या घराच्या मालकिणीला बोलावतो.”

ते आत गेले आणि तिला घेऊन बाहेर आले. हा म्हातारा माणूस सिबेको नावाच्या काळ्या माणसाच्या मुलीची चौकशी करायला आला आहे, इंग्रजीतून त्यांनी तिला सांगितलं. ती तुझ्याकडे काम करत होती आणि गेल्या काही महिन्यांपासून त्यांनी तिच्याबद्दल काही ऐकलं नाहीये.

"मला तिला कामावरून काढून टाकावं लागलं." स्मिथची मुलगी बोलली. "ती जेव्हा आली तेव्हा चांगली होती आणि तिची काळजी घेण्याचं मी तिच्या वडिलांना वचन दिलं होतं. पण ती वाईट संगतीला लागली आणि दिलेल्या खोलीत दारू गाळायला लागली. तिला पोलिसांनी पकडलं होतं आणि महिनाभर तुरुंगात ठेवलं होतं. त्यानंतर अर्थातच मी तिला कामावर घेतले नाही."

"म्हणजे ती कुठे आहे तुला माहित नाही?" जार्विसनी विचारले.

"मला कसं माहित असणार?" स्मिथची मुलगी इंग्रजीत बोलली. "मला माहित नाही आणि मला आता तिची पर्वाही नाही.

"तिला माहित नाही." जार्विसनी झुलू भाषेत म्हाताऱ्याला सांगितलं. पण स्मिथच्या मुलीला तिची पर्वाही नाही हे मात्र त्यांनी सांगितलं नाही.

"धन्यवाद, उम्नूमझान." म्हातारा झुलू भाषेत बोलला. "निघतो मी उम्नूमझान." ते स्मिथच्या मुलीकडे बघून थोडे झुकले आणि प्रतिसाद म्हणून तिने मान हलवली.

त्यांनी हॅट घातली आणि ते रिवाजाप्रमाणे मागच्या दारातून जाण्यासाठी निघाले. स्मिथची मुलगी घरात शिरली आणि जार्विस त्यांना कळणार नाही अशा बेताने त्यांच्या मागे जाऊ लागले. कुमालोंनी फाटक उघडले आणि बाहेर पडले. फाटक बंद करायला ते मागे वळले तेव्हा त्यांना जार्विस दिसले. ते जार्विसकडे बघून थोडे झुकले.

"सावकाश जा, ऊम्फुंडीस." जार्विस म्हणाले.

डोक्यावरची हॅट उंचावत म्हातारा म्हणाला, नीट रहा, उम्नूमझान. मग ते हळूहळू स्टेशनकडे जाणाऱ्या रस्त्याकडे जाऊ लागले आणि जार्विस ते नजरेआड होईपर्यंत त्यांच्याकडे बघत राहिले. ते वळणार एवढ्यात त्यांची बायको त्यांच्याकडे येताना दिसली. आपल्या अकालीच म्हाताऱ्या झालेल्या बायकोला चालताना बघून त्यांच्या काळजातून एक तीव्र वेदना उमटली.

ते तिच्याजवळ गेले आणि तिने आपल्या हातात त्यांचे हात घेतले.

"एवढा अस्वस्थ का दिसतोयस, जार्विस? आम्ही आलो तेव्हापासून बघतेय, तू खूप अस्वस्थ दिसतोयस" ती म्हणाली.

"भूतकाळातलं काहीतरी एकदम समोर आलं, तुला माहित्ये न ते कधीकधी किती अचानक समोर येतं ते?"

तिला काहीसं पटलं आणि ती हो म्हणाली.

तिने त्याचा हात आपल्याभोवती लपेटून घेतला. चल, बार्बरा जेवायला बोलवते आहे.

9

मस्तवाल बैलाचा दमदार पहाडी आवाज चौकात घुमत होता. काळे आणि गोरे असे अनेक पोलीस तिथे होते. कडक बंदोबस्तासाठी तैनात असलेले पोलीस आणि भाषण ऐकायला जमलेले हजारो लोक हीच आपली ताकद आहे हे समजून त्या आवाजाच्या मालकाची छाती फुलून आली. त्याचा आवाज कधी वरच्या तर कधी खालच्या पट्टीत फिरत होता.

त्या आवाजाने मोहित होणारे अनेकजण तिथे होते. त्याला पहिल्यांदा ऐकलं होतं तेव्हाचा रोमांच अजूनही अनेकांना आठवत होता. त्यांच्या अंगावर काटा उठत होता, अंगातून वीज सळसळून जावी असं त्याचं बोलणं त्यांना वेडं करून टाकत होतं. त्याच्या आवाजात एक जादू होती, एक जरब होती, त्याच्या आवाजातच जणू संपूर्ण आफ्रिकेचा त्वेष ठासून भरला होता. तो आवेशाने बोलत होता आणि समोरच्या काळ्या पहाडातून त्याचे प्रतिध्वनी उमटत होते.

व्यासपीठावर त्याच्या बाजूला बसलेले ड्युबुला आणि तोम्लीन्सोन तुच्छतेने आणि असूयेने त्याचं बोलणं ऐकत होते. हा जिगरी आवाज काहीही ठोकपणे सांगत नव्हता, कोणतीही दिशा देत नव्हता तरीही हजारोंना हलवून टाकत होता.

पोलीस त्याचं भाषण ऐकत होते. हा माणूस भयानक आहे, एकाने दुसऱ्याला सांगितलं, तो काय बोलतोय त्याचा विचार करणं हे माझं काम नाही, दुसरा म्हणाला.

जे देता येणार नाही असं आम्ही काही मागत नाहीयोत, जॉन कुमालो म्हणाला. आमच्या कामगारांनी जे निर्माण केलं आहे त्यातला आमचा वाटा फक्त आम्ही मागत आहोत. नवीन सोनं सापडलंय आणि दक्षिण आफ्रिका पुन्हा श्रीमंत झालीय. त्यातला आमचा वाटा फक्त आम्ही मागत आहोत. आम्ही जर खणून काढलं नाही तर ते सोनं जमिनीच्या पोटातच राहील. ते आमचं सोनं आहे असं मी म्हणत नाहीये, त्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा मोबदला मात्र आम्हाला मिळाला पाहिजे. ते सोनं काळे, गोरे, निमगोरे, भारतीय अशा सगळ्यांचं आहे. पण तुम्हाला माहीतच आहे त्यातलं जास्तीत जास्त सोनं कोण घेईल.

आणि मग त्या मस्तवाल बैलाच्या घशातून पुन्हा एकदा डुरकण्याचा आवाज आला. गर्दीच्या अंगात एक लाट उसळली. त्याला पूर्वी ज्यांनी ऐकलं आहे असे पोलीस सोडून बाकीचे एकदम सावध झाले. जे आत्ता बोललाय त्याच्यापुढे जॉन कुमालो फारसा जाणार नाही हे जुन्या जाणत्यांना माहित होतं. नवखे हळूच म्हणाले हा आवाज असाच चढत चढत गेला तर लोकांची टाळकी तापून उठतील. गुलामगिरी निपटून काढण्यासाठी त्वेषाने पेटून उठतील. सत्तेचं वर्चस्व झुगारून देत बंडखोरी करतील. झोपेतून जागी झालेली आफ्रिका, गुलामगिरीच्या काळ्या कालखंडातून बाहेर पडत नव्याने जन्माला आलेली आफ्रिका त्यांना दिसू लागली. ते असा विचार करत असतानाच ते वादळ मंदावलं, तो आवाज घाबरलेला वाटायला लागला आणि लोकं पुन्हा भानावर आली.

जास्त पैसे मागणं चुकीचं आहे का? आपल्याला किती कमी पैसे मिळतात. आम्ही फक्त आमच्या बायको मुलांना भुकेपासून वाचवण्याइतकाच आमचा वाटा मागतोय. आम्हाला पुरेसं मिळत नाहीये. लॅन्सडाऊन समितीने सांगितलंय, आम्हाला पुरेसं मिळत नाहीये. स्मिट समितीने सांगितलंय, आम्हाला पुरेसं मिळत नाहीये.

आणि तो आवाज पुन्हा वाढला, लोक पुन्हा थरारून उठले.

आम्हाला माहित आहे की आम्हाला पुरेसं मिळत नाहीये. कष्टाचा योग्य मोबदला मिळण्यासाठी, आमच्या कुटुंबासह एक चांगलं आयुष्य जगण्यासाठी जगभरातले कामगार जेवढी मागणी करतायत तेवढच आम्हीही मागतो आहोत.

ते म्हणतात, कामगारांचे पगार वाढवले तर खाणी बंद कराव्या लागतील. मग ह्या खाण उद्योगाचा उपयोग तरी काय? आमच्या गरीबीवरच जर खाणी जिवंत राहणार असतील तर त्या जिवंत रहायची गरजच काय? ते म्हणतात खाणींमुळे देश श्रीमंत होतो. पण ह्या श्रीमंतीचं आम्ही काय करायचं? आम्हाला गरिबीत ठेऊनच त्यांची श्रीमंती टिकणार आहे काय?

भावनांच्या सुसाट वादळात गर्दी ढवळून निघत होती. जर त्याच्या शब्दांनी लोकांच्या उत्कट भावनांना तीव्र करण्याबरोबरच, हिंसक आणि बेफाम करण्याबरोबरच, वेडंपिसं करण्याबरोबरच साखळदंड तोडायला शिकवलं असतं, काही रचनात्मक काम करायला शिकवलं असतं, तर त्या क्षणाने जॉन कुमालोला सर्वोच्च स्थानी बसवलं असतं. पण सत्ता आपल्या अगदी निकट आली आहे याची जाणीव जॉन कुमालोला झाली होती,

आणि ही सत्ताच त्याला दुबळं बनवत होती. ही सत्ता आपल्याला पुन्हा हुलकावणी देईल या भितीनं पुढचं पाउल उचलायला तो घाबरत होता. एखाद्या पर्वतावर आपटून वादळ जसं शांत होतं तसा त्याचा आवाज लहान होत गेला आणि त्याचे पडसाद आणखी आणखी क्षीण होत गेले.

"मी म्हटलं ना, हा माणूस धोकादायक आहे?" पहिला पोलीस म्हणाला.

"मी त्याची बडबड आधीही ऐकली आहे. ह्या हरामखोराला तुरुंगात का टाकत नाहीत कोण जाणे."

"त्याला गोळ्याच का घालत नाहीत?" पहिला पोलीस म्हणाला.

"हो, गोळ्याच घातल्या पाहिजे." दुसरा म्हणाला.

"सरकार उगाच आगीशी खेळतंय." पहिला म्हणाला.

"पटतंय तुझं." दुसरा म्हणाला.

आम्ही फक्त पोटापुरता न्याय मागत आहोत. समानता किंवा मतदानाचा अधिकार किंवा इथला वर्णद्वेषी कायदा रद्द करण्याची मागणी आम्ही करत नाहीयोत. श्रीमंत उद्योगपतीकडून आम्ही आमच्यासाठी थोडे जास्त पैसे मागतो आहोत. आमच्या कष्टांशिवाय हा उद्योग चालणार नाही. चला आपण काम थांबवूया आणि हा श्रीमंत उद्योग बंद करूया. मी म्हणतो एवढ्या पैशांवर काम करण्यापेक्षा काम थांबवलेलं बरं.

काळे पोलीस चलाख आणि तत्पर आहेत. ते त्यांना सांगितलेल्या जागी सैनिकांप्रमाणे ताठ उभे आहेत. ह्या भाषणाचा किंवा इतर कशाचाही त्यांच्यावर काही परिणाम होतोय का नाही कोण जाणे. सभा शांततेत आणि सुव्यवस्थेत सुरु आहे. आत्तापर्यंत तरी इथे शांतता आणि सुव्यवस्था आहे. पण अराजकाचं, गोंधळाचं एक लक्षण जरी दिसलं तरी जॉन कुमालोला खाली उतरवून गाडीत घालून कुठेतरी दुसरीकडे नेलं जाईल. आणि मग आठवड्याला आठ, दहा, बारा पाउंड देणाऱ्या त्याच्या सुतारकीच्या दुकानाचं काय होईल? देशाच्या काना-कोपऱ्यातून येऊन लोक ऐकतात त्या त्याच्या सुतारकीच्या दुकानातल्या गप्पांचं काय होईल?

काही लोक हौतात्म्यासाठी आस लावून बसलेले असतात. तुरुंगात जाण्याने आपली महानता सिद्ध होत असते असं काही जणांना वाटत असतं. आपलं महत्व वाढेल की नाही

ह्याची पर्वा न करता तुरुंगात जायलाही काही जण तयार असतात. जॉन कुमालो ह्यांच्यापैकी कुणाही सारखा नाही. त्याला माहित आहे, तुरुंगात टाळ्यांचा कडकडाट नसतो.

उशीर होत चाललाय, पुढच्या वक्त्यालाही बोलायचंय आणि वेळेत तुम्ही घरी पोचला नाहीत तर तुम्हाला पोलिसांचा त्रासही सहन करायला लागेल म्हणून तुम्हाला मी जास्त वेळ ताटकळत ठेवणार नाही. मला फरक पडत नाही पण तुमच्यापैकी जे पास घेऊन आले आहेत त्यांना त्रास होऊ शकतो. आणि पोलिसांना त्रास देण्याचीही आमची इच्छा नाही. मला एवढंच सांगायचंय की आमच्याकडे विकण्यासाठी फक्त आमचे श्रम आहेत. तर ते योग्य भावात विकण्याचे स्वातंत्र्य आम्हाला हवं आहे. ह्या स्वातंत्र्यासाठीच हा आमचा लढा चालू आहे. त्यासाठीच आमचे आफ्रिकी स्वातंत्र्यसैनिक लढत आहेत. फक्त इथेच नाही तर संपूर्ण आफ्रिकेत, जिथे जिथे आफ्रिकी लोक राहतात तिथे तिथे सगळीकडे.

आवाज पुन्हा वाढला.

आता काहीतरी ठोस ऐकायला मिळणार, काहीतरी मुलभूत. जुन्याला गाडून टाकणारा नव्या जगाची रचना करणारा विचार आता आपल्यासमोर मांडला जाणार ...

लोक मुठी आवळून ऐकतायत. त्याच्या बोलण्याचा एक अर्थ अगदी साधा आहे तर दुसरा अर्थ खतरनाक आहे. जॉन कुमालो बोलतो एक पण त्याचा त्याला अभिप्रेत असलेला अर्थ दुसराच असतो.

म्हणूनच योग्य मोबदला घेऊनच आपण आपले श्रम विकूया. आणि जर उद्योग आमचे श्रम काडीमोल भावात विकत घेऊ इच्छित असेल तर असा उद्योग बंद पडला तरी चालेल. पण उद्योगाला जिवंत ठेवण्यासाठी आम्ही कमी पैशात आमचे श्रम विकणार नाही.

जॉन कुमालो खाली बसला. टाळ्यांच्या गजर झाला आणि आरोळ्या आणि चित्कारांनी परिसर दुमदुमून गेला. ती सगळी अगदी साधी लोकं होती. त्यांना माहित नव्हतं की हा अतिशय प्रभावी वक्ता मनातून घाबरट आहे. त्यांनी त्याचा मस्तवाल आवाज ऐकला, उत्साहाच्या परमोच्च ठिकाणी आपण पोहचलो हे त्यांना समजलं पण

भावनांच्या सुसाट वादळात गरगर फिरण्याशिवाय दुसरं काहीच आपल्याला मिळालं नाही हे त्यांना कळलं नाही.

“काय, ऐकलंत का भावाला?” सिमँगु म्हणाला.

स्टीफन कुमालोंनी मान हलवली. मी आत्तापर्यंत कोणालाच असं बोलताना ऐकलं नव्हतं, ते म्हणाले. मी त्याचा मोठा भाऊ असूनही त्याने लहान मुलासारखं मला खेळवलं.

“सत्ता. फक्त सत्तेसाठी.” सिमँगु म्हणाला. “एखाद्याला देव एवढी ताकद का देतो हे आपल्या कळण्याच्या पलीकडचं आहे. जर का हा माणूस प्रवचन करणारा असता तर आख्खं जग त्यांच्या मागे लागलं असतं.”

“मी कधीच असं ऐकलं नव्हतं.” कुमालो म्हणाले.

“म्हणूनच तो भ्रष्ट माणूस आहे याबद्दल आपण देवाचे आभार मानायला हवेत. जर तो भ्रष्ट नसता तर संपूर्ण देशाला त्याने रक्ताच्या थारोळ्यात बुडवून टाकलं असतं. तो त्याने मिळवलेल्या मालमत्तेमुळे घाबरलेला आहे. ही मालमत्ता हरवण्याची, मिळालेली सत्ता गमावण्याची त्याला भीती वाटते आहे. आपण हे सगळं कधीच समजू शकणार नाही. आपण निघूयात की तुम्हाला तोम्लीन्सोनचं भाषण ही ऐकायचंय?”

“मला आवडेल त्याचंही भाषण ऐकायला.”

“मग आपल्याला आणखी जवळ जायला लागेल. तो इतकं हळू आवाजात बोलतो की ऐकूच येत नाही.”

**

“आपण जायचं का, मि. जार्विस?”

“हो, जॉन. चल जाऊया.”

“भाषण ऐकून तुम्हाला काय वाटलं, मि. जार्विस?”

“ह्या असल्या चर्चांमध्ये मला अजिबात रस नाही. मी त्यांची पर्वाही करत नाही.” जार्विस चटकन बोलले.

“जग बदलत चाललंय, काहीतरी घडतंय हे तरी खरं ना ?”

मला त्याच्याशी काही देणं घेणं नाही. जार्विस तिरसटपणे बोलले. चल, आपण तुमच्या क्लब वर जाऊया.

बाबांसारखंच ह्यांच्याही हे सगळं समजण्याच्या पलीकडचं आहे, जॉन हॅरिसन स्वतःशीच बोलला.

तो गाडीत शिरला अन त्याने गाडी सुरु केली.

पण आपल्याला याला सामोरं जायलाच हवं. तो स्वतःशीच समजुतीच्या सुरात बोलला.

**

कॅप्टनने वरिष्ठाला सलाम ठोकला.

“सर, अहवाल.”

“कसं झालं सगळं, कॅप्टन?”

“सगळं सुरळीत पार पाडलं सर. पण तो जॉन कुमालो मात्र खतरनाक आहे. तो गर्दीला आपल्या कह्यात घेतो आणि मग एका क्षणी त्यांना वाऱ्यावर सोडून देतो. आपण तिथे नसलो तर तो काय बोलेल ह्याची कल्पना त्याच्या बोलण्यावरून करता येते.”

“हं, म्हणूनच तर आपण तिथे असतो. कमाल आहे, सगळे अहवाल सांगतात की हा माणूस एका मर्यादेच्या पुढे जात नाही. मग तुला तो एवढा खतरनाक का वाटतोय?”

“त्याचा आवाज, सर. त्याच्या आवाजासारखा आवाजच मी अजूनपर्यंत कधी ऐकला नव्हता. ऑर्गनच्या सगळ्यात वरच्या पट्टीतल्यासारखा आवाज. समोर बसलेली सगळी जनता त्या आवाजाने वेडावून जाते. मी स्वतः त्याचा अनुभव घेतला. सगळं काही जणू आपल्यासमोर घडतंय असं वाटत राहतं त्याला ऐकताना.”

“भेकड आहे तो.” वरिष्ठ अधिकारी थोडक्यात बोलले. “मी सुद्धा ऐकलंय त्या आवाजाबद्दल. मला स्वतःला पण एकदा त्याला ऐकायचंय.”

“सर, संप होईल असं वाटतं का तुम्हाला?”

“देव जाणे. पण आपण त्या बाबतीत काही करू शकत नाही. आपल्याला काय, आदेश येईल तसं वागायचं. तू आता घरी गेलास तरी चालेल.”

“गुड नाईट सर.”

“गुड नाईट, हॅरी. तुझी बढती होईल असं ऐकलंय मी.”

“धन्यवाद, सर.”

“तू एक दिवशी माझ्या हुद्द्यापर्यंत पोचशील. चांगला पगार, चांगला हुद्दा, प्रतिष्ठा आणि जगाच्या काळज्या. निद्रिस्त ज्वालामुखीच्या तोंडावर बसल्यासारखं वाटत राहतं. कोण जाणे एवढा सगळा त्रास सहन करण्याच्या लायकीचं हे आहे की नाही. गुड नाईट, हॅरी.”

“गुड नाईट सर.”

वरिष्ठाने सुस्कारा सोडला आणि अहवालाचे कागद आपल्याकडे खेचले. त्यातल्या काळजी करण्यासारख्या ओळींनी त्यांच्या कपाळावर आठ्या चढल्या.

“हं..चांगला पगार, चांगला हुद्दा, प्रतिष्ठा..” ते पुटपुटले आणि पुन्हा कामात गढून गेले.

**

संप झाला तर परिस्थिती चिंतेची होऊन बसेल. कारण विट्सवॉटरस्रँडमध्ये तीन लाख काळे खाणकामगार आहेत. ते ट्रान्सकेईहून, बस्टुओलँडहून, झुलूलँडहून, बेचुआनालँडहून, सेकुकुनीलँडहून आणि दक्षिण आफ्रिकेच्या बाहेरूनही येत असतात. ते साधे, अडाणी, अशिक्षित काळे लोक आहेत, कुणाच्याही हातातील बाहुले होऊ शकतील इतके अडाणी. ते जेव्हा संपावर जातात तेव्हा वेडेपिसे होतात. ते खाणीतल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयातच बंदी बनवून ठेवतात, बाटल्या फेकतात, दगड फेकतात आणि आगी लावतात. ते वेगवेगळ्या शंभर खाणींच्या बंदिस्त आवारात असतात त्यामुळे त्यांना हाताळणं शक्य असतं हे खरंय. पण ते खूप नुकसान करू शकतात, मनुष्यहानी करू

शकतात आणि ज्या बळावर दक्षिण आफ्रिका उभी आहे आणि अवलंबून आहे असा हा महान उद्योग ठप्पही करू शकतात.

अशीही भीती आहे की हा संप फक्त खाणींपुरता मर्यादित राहणार नाही तर तो दक्षिण आफ्रिकेतील सगळ्या प्रकारचे उद्योगधंदे, रेल्वे, जहाजं असा सगळीकडे पसरेल. असंही म्हणतात की प्रत्येक काळा पुरुष आणि प्रत्येक काळी स्त्री काम करायचं थांबवेल. प्रत्येक शाळा, प्रत्येक चर्च बंद होईल. ऐंशी लाख जणं गावात, शहरात, खेड्या-पाड्यात, रस्त्यावर, शेतात काहीही काम न करता नुसते उभे राहतील. ही गोष्ट कोणाला अतिरंजित वाटू शकते कारण ते एवढे संघटीत नाहीत. कल्पनाही करता येणार नाही इतक्या यातना सहन करण्याची, भुकेने मरण्याची त्यांना सवय आहे, पण बंड करण्यासाठी ते अजून तयार झालेले नाहीत हे सत्य आहे. पण तरीही अशी अतिरंजित कल्पनाही गोऱ्या लोकांना घाबरवणारी वाटते. कारण आपण काळ्या लोकांच्या कष्टांवर किती अवलंबून आहोत हे त्यांना पक्कं माहित आहे.

दिवस काळजी वाटायला लावणारे होते यात काही शंका नाही. आख्ख्या जगभरात अनेक विचित्र गोष्टी घडतायत आणि जग दक्षिण आफ्रिकेला कधीच एकटं सोडत नाही.

**

संप आला आणि गेला. तो खाणींच्या पलीकडे कधी गेला नाही. सगळ्यात जास्त गडबड ड्राएनफोन्टेनला झाली. तिथे काळ्या खाण कामगारांना पुन्हा कामाला लावण्यासाठी पोलिसांना बोलवावं लागलं. तिथे थोडी मारामारीही झाली आणि तीन काळे खाण कामगार ठार झाले. पण अहवाल म्हणतो, सगळीकडे आलबेल आहे, सगळीकडे शांतता आहे.

जोहान्सबर्गमधील धर्मपीठात धर्माधिकाऱ्यांच्या वार्षिक सभेला खाणींबद्दल फार काही माहित असण्याची गरज नव्हती. धर्माधिकाऱ्यांनी स्वतःला जेव्हा फक्त धार्मिक बाबींपुरतं मर्यादित ठेवलं होतं तेव्हा हा विषयच नव्हता. पण एका धर्मोपदेशकाने ह्या विषयावर भाषण केलं. आफ्रिका खाण कामगार संघाला मान्यता देण्याची वेळ आली आहे असं त्याने प्रतिपादन केलं आणि तसं केलं नाही तर यापुढे आफ्रिकेत कधीही रक्ताचा सडा पडू शकतो असं भविष्यही त्यांनी वर्तवलं. आफ्रिका खाण कामगार संघाला एक जबाबदार समिती समजून तिच्याशी कामगारांची अवस्था, काम आणि पगार ह्या

विषयावर बातचीत करण्याची वेळ आली आहे असंही त्याने सांगितलं. पण प्रवक्ता समजल्या जाणाऱ्या एकाने आफ्रिकी खाण कामगार हे खूपच साधे, व्यवहार करण्याचे कौशल्य माहित नसलेले, कोणतीही तत्वं, विवेक नसलेल्या आंदोलकांच्या हातातले खेळणे आहेत असं सांगितलं. कोणत्याही परिस्थितीत वाढता खर्च हा खाणींच्या आणि दक्षिण आफ्रिकेच्या अस्तित्वाला धोकादायक आहे असंही त्यांनी ठामपणे मांडलं.

ह्या अवघड प्रश्नाला अनेक कंगोरे आहेत. लोक चिकाटीने जमिनीची धूप, समाज व्यवस्थेची हानी, शाळांची कमतरता, वाढती गुन्हेगारी ही सगळी एकाच प्रश्नाची अंग आहेत असं म्हणत असतात. जर आपण दूरवर विचार केला तर स्वातंत्र्य, द्विभाषिकता, लोकांची स्थलांतरं, पॅलेस्टाईन आणि देव जाणे आणखी कितीतरी विषय ह्यालाच जोडलेले आहेत असं वाटायला लागतं. म्हणूनच फारसा विचार न करणंच चांगलं.

अगदी मामुली नुकसान होऊन आता संप पूर्णपणे मिटला आहे. अहवाल म्हणतो, सगळीकडे आलबेल आहे, सगळीकडे शांतता आहे.

**

कुण्या निर्जन बंदरावरच्या धक्क्याला बांधलेल्या जहाजाला अजून पाणी साद घालतंच आहे. घनदाट आणि निरव शांतता असणाऱ्या अरण्यात एक ना एक पान गळतंच आहे. भक्कम लाकडी चौकटीला वाळवी हळूहळू पोखरतेच आहे. स्वतःमध्येच मश्गूल असणाऱ्या लोकांव्यतिरिक्त इतरांना माहित आहेच - काहीच पूर्णकाळ शांत नसतं.

10

मिसेस लिथेबे आणि गर्टरुड घरात शिरल्या आणि मिसेस लिथेबेंनी दरवाजा लावून घेतला.

"मी तुला समजून घेण्याचा पुरेपूर प्रयत्न करते आहे मुली, पण मला अजूनही ते जमत नाहीये."

"मी काहीच वाईट काम केलं नाही, मदर."

"मी असं म्हणतंच नाहीये की तू काही वाईट काम केलंस. पण तू या घराला, इथे राहणाऱ्या माणसांना समजून घेत नाहीयेस."

गर्टरुड खिन्नपणे उभी राहिली. तुम्ही जे सांगताय ते कळतंय मला, ती म्हणाली.

"मग तू अशा लोकांशी गप्पा का मारत राहिलीस?"

"ती चांगली माणसं नाहीत हे मला कळलंच नाही."

"ते ज्या पद्धतीने बोलत होते, हसत होते ते तुला कळत नव्हतं? त्यांचं हसणं, खिदळणं तुला वेगळं वाटलं नाही?"

"ते चुकीचं आहे हे माझ्या लक्षात आलं नाही."

"ते चुकीचं होतं असं मी म्हणत नाहीये, पण ते ज्या पद्धतीने बोलत होते, हसत होते ते नक्कीच बेजबाबदार आणि खटकणारं होतं. एक चांगली बाई होण्याचा तू प्रयत्न करत नाहीयेस का?"

"मी प्रयत्न करतेय."

"मग अशी माणसं तुझ्या उपयोगाची नाहीत."

"मला समजलं."

"मी तुला नावं ठेवत नाहीये. पण तू एका पाद्र्याची बहिण आहेस. त्याने आत्तापर्यंत खूप दुःखं सहन केलं आहे."

"हो, खूप सहन केलंय."

"मग त्यांना आणखी सहन करायला लावू नकोस."

“मी इथून निघून जाते.” गर्टरुड म्हणाली. तिचे डोळे भरले. “इथे काय करायचं तेच मला कळत नाही.”

“इथेच असं नाही, कुठेही अगदी न्दोत्शेनीला गेलीस तरी तुला असे बेजबाबदार टोळभैरव दिसतील.”

“ह्या जोहान्सबर्गने मला संकटांशिवाय दुसरं काहीच दिलं नाही. मी इथून निघून जाते.”

“आता तुम्हाला जायला जास्त दिवस उरले नाहीत. खटल्याचा निकाल उद्या लागेल. पण मला तुझी काळजी वाटते, मला ऊम्फुंडीसची काळजी वाटते.”

“माझी काळजी नका करू.”

“तुझी काळजी नको करू म्हणतेस? हरकत नाही. मला आधी त्या मुलीची खूप काळजी वाटायची. पण तू बघितलंस ना, तिच्यात किती सुधारणा झालीये. ती चांगल्या घरातले रितीरिवाज मनापासून शिकते आहे, ऊम्फुंडीसना आनंदी ठेवण्याची धडपड करते आहे. आणि ते सहाजिकच आहे. तिच्या वडिलांकडून तिला जे मिळालं नाही ते सगळं तिला ऊम्फुंडीसकडून मिळतं आहे.”

“पण तीही कधी कधी वेड्यासारखं बोलते.”

“पोरी, मला ते कळत नाहीये असं वाटतं का तुला? पण ती जिथून आली आहे त्या मानाने चांगली सुधारते आहे, स्वतःत ठरवून बदल घडवते आहे. आपलं बोलणं थांबवूया आता, कोणीतरी इकडे येतंय.”

दरवाज्यावर टकटक झाली. एक जाडजूड बाई तिच्या घरापासून इथे येईपर्यंत धापा टाकू लागली होती. भयंकर वाईट बातमी आली आहे, वर्तमानपत्रात, ती म्हणाली. मी तुम्हाला दाखवायला घेऊन आले. तिने वर्तमानपत्र टेबलावर ठेवलं आणि बातमीचा मथळा ती त्या बायकांना दाखवू लागली. *शहरात आणखी एक खुनी हल्ला. काळ्या नोकराने* युरोपीय *घरमालकाला गोळ्या झाडल्या .*

त्यांना मोठाच धक्का बसला. आजकालच्या ह्या बातम्या माणसांना घाबरवून टाकतात. घरमालक घाबरतात, त्यांच्या बायका घाबरतात. दक्षिण आफ्रिकेत काम करणारे सगळेजण घाबरतात. कायदे पाळणारे काळे लोक घाबरतात. काही लोक अशा

बातम्यांमधून काळे हा शब्द गाळावा म्हणून वर्तमानपत्रांना विनंती करतायत, काहींना हे कटू सत्य का लपवायचं हेच कळत नाहीये.

"आपल्या खटल्याचा निकाल लागणार असतानाच ही बातमी येणं जास्त वाईट आहे." खटल्याबद्दल सगळं माहित असलेली आणि मिसेस लिथेबेंबरोबर नेहमी न्यायालयात जात असणारी ती बाई बोलली.

"अगदी बरोबर बोललात." मिसेस लिथेबे म्हणाल्या.

त्यांनी फाटकाची करकर ऐकली आणि पटकन वर्तमानपत्र खुर्चीखाली टाकले. कुमालो आणि ती मुलगी येत होते. हल्ली ते खूपच अशक्त झालेले असल्यामुळे ती मुलगी त्यांच्या हाताला धरून हळूहळू त्यांना त्यांच्या खोलीत घेऊन गेली. ते खोलीत शिरले असतील न असतील इतक्यात पुन्हा फाटक वाजले आणि सिमँगु घरात शिरला. त्याचं लक्ष अचानक वर्तमानपत्राकडे गेलं आणि ते त्याने खुर्ची खालून उचललं.

"त्यांनी बघितलं का हे?" त्याने विचारलं.

"नाही, ऊम्फुंडीस. पण ह्या क्षणी ही बातमी येणं वाईट नाही का?"

"आपले न्यायाधीश सुजाण आहेत. पण ही बातमीही खूपच वाईट आहे. त्यांना वर्तमानपत्र वाचायला आवडतात. आपण तरी काय करणार?"

"आपल्याकडे वर्तमानपत्र येत नाही, पण आत्ता ह्या बाई घेऊन आल्या." मिसेस लिथेबे म्हणाल्या. "पण ते जेव्हा मिशन हाउसला जेवायला जातील तेव्हा त्यांना कळेलच."

"म्हणूनच, मी घाईघाईनी आलो. मदर, आम्ही आज इकडेच जेऊ शकतो का?"

"हे काय विचारायला हवं? अगदी साधं असलं तरी भरपूर जेवण आहे."

"खरंच मदर, तुम्ही नेहमीच मदतीला तत्पर असता."

"मग आपला उपयोग तरी काय?" त्या म्हणाल्या.

"जेवल्यानंतर आपण सरळ बैठकीला जाऊ." सिमँगु म्हणाला. उद्या सकाळी काही अडचण नाही. ज्या दिवशी सुनावणी असते त्या दिवशी ते वर्तमानपत्र वाचत नाहीत. आणि त्यानंतर त्याने काहीच फरक पडणार नाही."

म्हणून मग त्यांनी ते वर्तमानपत्र लपवलं. सगळेजण मिसेस लिथेबेंकडे जेवले आणि नंतर चर्चमध्ये बैठकीला गेले. तिथे स्त्रीत्वाची आपल्या आतली ओढ ईश्वराने कशी संपवून टाकली आहे असं एका काळ्या बाईने त्यांना सांगितलं. नन(जोगीण) होण्याची आणि जगासाठी त्याग करण्याची आपली इच्छा तिने व्यक्त केली.

बैठकीनंतर जेव्हा सिमँगु आपल्या घरी आणि कुमालो आपल्या खोलीत गेले, आणि ती मुलगी जेवण्याची खोली आवरून तिथे तिचा बिछाना टाकत होती, तेव्हा गर्टरुड मिसेस लिथेबेंच्या पाठोपाठ त्यांच्या खोलीत आली.

"मदर, मी तुमच्याशी थोडं बोलू का?"

"त्यात विचारण्यासारखं काय आहे बाळा? बोल की."

त्यांनी दरवाजा बंद केला आणि गर्टरुडच्या बोलण्याची वाट पाहू लागल्या.

"मी त्या काळ्या सिस्टरचं बोलणं ऐकलं आणि माझ्या मनात आलं की मीसुद्धा नन बनायला हवं."

एखाद क्षण मिसेस लिथेबेंचा चेहरा उजळला पण नंतर लगेच त्या गंभीर झाल्या.

"तू नन बनायला हवं असं नाही, गर्टरुड. पण तू त्याचा विचार करते आहेस ह्याचाच मला आनंद झाला. पण तुला मुलगा आहे."

गर्टरुडला रडू कोसळलं.

"कदाचित माझी वहिनी त्याची जास्त चांगली काळजी घेऊ शकेल. तुम्हाला माहीतच आहे, मी एक दुबळी बाई आहे. मी बेजबाबदारपणे हसते आणि बोलते. कदाचित 'ती' मला नन बनायला मदतच करेल."

"'ती' म्हणजे काय तुझ्यातली इच्छा?"

गर्टरुडने मान हलवली.

मिसेस लिथेबेंनी गर्टरुडचे हात आपल्या हातात घेतले.

"तसं झालं तर चांगलंच आहे," त्या म्हणाल्या. "पण असे निर्णय घाईघाईने किंवा उथळपणे घ्यायचे नसतात. ती बाई काय बोलली माहित आहे ना?"

“हो.”

“हे सध्या आपण आपल्या दोघींच्यातच ठेऊया. मी तुझ्यासाठी प्रार्थना करीन आणि तूही प्रार्थना करत रहा. काही काळाने आपण पुन्हा बोलूया. चालेल ना?”

“हो, मलाही तेच वाटतंय, मदर.”

“मग शांत झोप, मुली. तुझी इच्छा पूर्ण होईल की नाही ते मला माहित नाही. पण जर तसं झालं तर तुझ्या भावाला थोडं समाधान मिळेल.”

“तुम्हीही शांत झोपा, मदर.”

गर्टरुडने मिसेस लिथेबेंच्या खोलीचा दरवाजा लावला. आपल्या खोलीत जात असताना अचानक आलेल्या आवेगात ती मुलगी झोपली होती त्या बिछान्याजवळ ती बसली.

“मला नन बनावसं वाटतंय”, ती म्हणाली.

मुलगी पटकन बिछान्यात उठून बसली.

“बापरे! पण ते तर खूप कठीण असतं.”

“हो, ते कठीण असतं.” गर्टरुड म्हणाली, “मी अजून नक्की ठरवलं नाहीये, पण जर मी तसं करायचं ठरवलं तर तू माझ्या मुलाची काळजी घेशील का?”

“नक्कीच.” त्या मुलीने उत्तर दिलं. तिचा चेहरा उत्तेजित झाला होता. “मी त्याची अगदी नीट काळजी घेईन.”

“तुझा स्वतःचा असल्यासारखी?”

“हो, अगदी माझा स्वतःचा असल्यासारखी.”

“आणि तू बेजबाबदारपणे त्याच्यासमोर बोलणार नाहीस?”

ती मुलगी गंभीर झाली. मी आता बेजबाबदारपणे बोलत नाही, तिने सांगितलं.

“मी सुद्धा आता बेजबाबदारपणे बोलणार नाही.” गर्टरुड म्हणाली. “पण अजून हे पक्कं ठरलेलं नाहीये, लक्षात ठेव.”

“हो, मी लक्षात ठेवीन.”

“आणि याबद्दल काही बोलायचंही नाहीस. मी ते ठरवलं आणि तसं केलं नाही तर माझ्या भावाला खूप वाईट वाटेल.”

“हो, बरोबर आहे तुमचं.”

“बरं, झोप हं आता.”

“तुम्हीही शांत झोपा.”

11

न्यायाधीश जेव्हा न्यायालयात येतात तेव्हा लोक उठून उभे राहतात. आज ते जास्त गांभीर्याने उभे राहिले कारण आज निकालाचा दिवस होता. न्यायाधीश बसले, मग त्यांचे दोन सल्लागार बसले आणि मग लोक बसले. तिन्ही आरोपींना तळकोठडीतून वर न्यायालयात आणले गेले.

“मी या खटल्यासंदर्भात खूप विचार केला, खूप चिंतन केलं. माझ्या सल्लागारांनीही केलं. आमच्यापुढे सादर केल्या गेलेल्या सगळ्या साक्षी पुराव्यांना आम्ही अगदी काळजीपूर्वक ऐकलं, त्यावर चर्चा केल्या, एकेक घटना समोर ठेवत त्यांची तपासणी आणि उलट तपासणी केली.”

न्यायाधीशांनी जे सांगितलं त्याचं दुभाष्याने झुलू मध्ये भाषांतर केलं:

आरोपी अब्सालोम कुमालोने त्याचा गुन्हा नाकारायचा प्रयत्न केला नाही. बचाव पक्षाने आरोपीला पिंजऱ्यात उभं केलं तेव्हा त्याने प्रांजळपणे आणि स्वच्छपणे आर्थर जार्विसला पार्कवर्ल्डच्या त्याच्या राहत्या घरात कशी गोळी मारली त्याबद्दल सांगितलं. पुढे त्याने हेही ठामपणे सांगितलं की कुणाला मारण्याचा किंवा गोळी झाडण्याचासुद्धा त्याचा इरादा नव्हता. हत्यार फक्त घरातला नोकर रिचर्ड म्प्रिंगला घाबरवण्यासाठी आणलं होतं. ज्यांना मारलं गेलं ते घरी नसावेत असा विचार करूनच तो त्या घरात शिरला होता. घटनेच्या खरे खोटेपणाबद्दल आपण नंतर बोलू पण त्यातला काही भाग दुसऱ्या आणि तिसऱ्या आरोपीच्या गुन्ह्याविषयी चर्चा करताना महत्वाचा ठरणार आहे. पहिल्या आरोपीचं म्हणणं आहे की हा बेत तिसरा आरोपी जोहान्नेस पाफुरी याने मांडला होता आणि पाफुरीने मारलेल्या फटक्यामुळे नोकर म्प्रिंग बेशुद्ध झाला होता. त्याच्या म्हणण्याला म्प्रिंगने पाठींबा दिला आहे. त्याच्या म्हणण्याप्रमाणे त्याने फडफडत्या डोळ्यांच्या पाफुरीला मास्क घातलेला असूनही ओळखलं. हे खरं आहे की त्याच्यासारखं सोंग घेतलेल्या दहा जणांमधून, ज्यापैकी एका जणाला तर अगदी पाफुरी सारखाच डोळा फडकण्याचा आजार होता म्प्रिंगने शोधून काढले होते. पण बचाव पक्षाचे असे म्हणणे आहे की ती फडफड सारखी होती पण तंतोतंत सारखी नव्हती. बचाव पक्षाने अशी बाजू मांडली की जर पाफुरीला जसा डोळ्याच्या फडफड होण्याचा आजार होता तसाच आजार असलेले त्याच्यासारखी शरीराची ठेवण असलेले दहाजण आपण आणू शकलो असतो

आणि त्यातून स्प्रिंग ने पाफुरीला शोधले असते तर ते योग्य ठरले असते. हा युक्तिवाद पूर्णपणे मान्य करण्यासारखा नाही. कारण त्यातून असं तात्पर्य निघेल की ओळख पटवण्यासाठी सगळ्या गोष्टी अगदी सारख्या असायला हव्यात. पण युक्तिवादाचा काही भाग समजण्यासारखा आहे. डोळ्यांच्या फडफडीसारखी खूण इतकी चकवणारी असते की जेव्हा चेहऱ्याचा अर्धा भाग झाकलेला असतो तेव्हा थोड्याशा नजरचुकीने फसगत होऊ शकते, हे मान्य करायला हवं. ओळख ही चेहऱ्याच्या पूर्ण ठेवणीवर अवलंबून असते. जेव्हा ही ठेवण अर्धी झाकलेली असेल तेव्हा अनिश्चितता वाढते. खरंतर अशा वेळेला ओळखणं खूपच कठीण होतं. कारण आपण त्या दोन ठेवणीमधल्या समान गोष्टी लक्षात ठेऊन असमान गोष्टींकडे दुर्लक्ष करतो. सारखाच व्रण असलेल्या दोन माणसांना जर त्यांचा बाकीचा चेहरा झाकलेला असेल तर ओळखणं गोंधळात टाकणारं असू शकतं. त्यामुळे स्प्रिंगचं पाफुरीला ओळखणं हा तो माणूस पाफुरीच होता ह्याचा भक्कम पुरावा होऊ शकत नाही.

इथे हे लक्षात घेतले पाहिजे की जरी पहिला आरोपी अब्सालोम कुमालोने पाफुरी तिथे हजर होता आणि त्याने स्प्रिंगला मारले असे म्हटले असले तरी ते त्याने पोलिसांनी जेव्हा त्याला पाफुरी कोठे आहे असा प्रश्न विचारला तेव्हा सांगितले होते. तेव्हाच त्याच्या मनात पाफुरीला ह्यात अडकवण्याचा विचार आला असेल का? की पाफुरी आणि झालेला खून ह्यात काही पूर्वायुष्याचा संबंध होता? पहिल्या आरोपीच्या समुपदेशकाचे म्हणणे आहे की गेले काही दिवस अब्सालोम कुमालो पूर्णपणे भीतीच्या कह्यात होता, आणि त्याला अटक केल्यानंतर त्याच्यासमोर जी नावं ठेवण्यात आली ती त्याने कबूल केली. त्याच्या मानसिक स्थितीमुळे त्याने अशी कबुली दिली असण्याची शक्यता आहे. खरोखर त्याच्या मनाची अवस्थाच अशी होती की त्याने ह्या तर्काला उठाव मिळतो. दुसरीही एक शक्यता नाकारता येत नाही की त्याने पाफुरीचे नाव झटकन पकडून ठेवले आणि पाफुरी तिघांमधला एक होता असे सांगितले याचे कारण एवढ्या गंभीर आरोपाला त्याला एकट्याला सामोरे जायचे नव्हते. स्प्रिंग म्हणतो त्याप्रमाणे जर स्वयंपाकघरात तिघेजण आले होते तर त्याच्या खऱ्या सहकाऱ्यांचे नाव तो का घेत नाही हा प्रश्नच आहे. त्याने स्वतःच्या कृत्याचा स्वीकार केला आहे, मग दोन खऱ्या गुन्हेगारांची नावे घेण्याऐवजी तो दोन निष्पाप माणसांना त्यात का गुंतवत आहे ?

आणखी एक विचित्र योगायोग असा की ज्याला चुकून गुन्हेगार समजलं होतं, त्याच्या सहकाऱ्याला चौकशीसाठी पकडलं तर त्यानेच लगेच गुन्हा कबूल केला.

पेचात टाकणाऱ्या ह्या खटल्यात आणखी एक अडचण आहे. बाकीचे आरोपी किंवा बेबी म्काईझ ह्यापैकी कोणीही ते ७९, ट्वेंटी थर्ड अव्हेन्यू, अलेक्झांड्रा येथे खुनाच्या नंतरच्या रात्री भेटले ह्याचा इन्कार करत नाहीयेत. हाही योगायोग होता का की त्यातील दोघांची नावे पहिल्या आरोपीने आपले गुन्ह्यातले साथीदार म्हणून घेतली? का ती खरोखर तो म्हणतो तशी खुनानंतर ठरवून झालेली भेट होती? खुनाबद्दल तिथे बोलणं झालं का? त्या बाई, बेबी म्काईझ ह्या पूर्ण बेभरवशाच्या साक्षीदार वाटतात. सरकारी वकील आणि पहिल्या आरोपीचा समुपदेशक ह्यांनी स्पष्टपणे मांडलंय की तिथे खुनाबद्दल बोललं गेलं ह्याचा कोणताही पुरावा मिळू शकला नाही. ती बाई पोलिसांशी पहिल्यांदा खोटं बोलली की तिने पहिल्या आरोपीला गेल्या वर्षभरात पाहिलेलं नाही. ती गोंधळलेली, परस्पर विरोधी विधानं करणारी आणि घाबरलेली साक्षीदार होती. पण ही भीती आणि गोंधळ न्यायालयामुळे होता की तिचा स्वतःचा ह्या गुन्ह्यात कुठेतरी सहभाग होता की आपल्या घरी खुनाची चर्चा झाली ह्याची ती टोचणी होती हे आमच्या मते नीट उलगडले गेले नाही.

सरकारी वकिलांनी ह्या तिन्ही आरोपींच्या वेगवेगळ्या गुन्ह्यात भागीदार असल्याचे इतके भक्कम पुरावे सादर केले आहेत की त्यामुळे खटला अगदी मजबूतपणे उभा राहिला आहे. त्यामुळे तिघांच्या इतर गुन्ह्यांमधल्या भागीदारीबद्दल शंका रहात नाही. पण पूर्वीची भागीदारी गुन्हेगारी स्वरूपाची असली तरी ह्या गंभीर गुन्ह्यात ते तिघेही सहभागी होते ह्याचा हा पुरावा मानता येणार नाही.

दीर्घ चर्चा आणि चिंतनानंतर मी आणि माझे सल्लागार ह्या निष्कर्षापर्यंत आलो आहोत की दुसऱ्या आणि तिसऱ्या आरोपींवरील गुन्हा सिद्ध होऊ शकलेला नाही, त्यामुळे त्यांना ह्या खटल्यातून मुक्त करण्यात येत आहे. पण त्यांच्या पूर्वीच्या गुन्ह्यांची सखोल चौकशी केली जावी अशी शिफारस आम्ही करत आहोत.

ह्या नाटकाचा पहिला अंक संपला आहे ह्याची खूण न्यायालयात दिसत होती. आरोपी अब्सालोम कुमालोने कोणतीही हालचाल केली नाही. आता दोषमुक्त करण्यात आलेल्या दोघांकडे त्याने पहिले सुद्धा नाही. पाफुरी मात्र झाले ते बरोबरच झाले, न्याय मिळाला अशा भावनेने सगळीकडे बघत राहिला.

आता पहिल्या आरोपीचा निवाडा करणे बाकी आहे. त्याचा कबुलीजबाब काळजीपूर्वक तपासला गेला, त्याच्या सत्यासत्याची चौकशी करण्यात आली आणि तो खरे बोलतो आहे असे आढळले. कुणी निष्पाप माणूस त्याने न केलेल्या गुन्ह्याची कबुली देत आहे असे आढळले नाही. त्याचे विद्वान वकील त्याला कठोर शिक्षा मिळू नये म्हणून आर्जव करत आहेत. ते असा युक्तिवाद करत आहेत की त्याला स्वतःला त्याच्या कृत्याने धक्का बसला आहे, त्याच्याकडून अनवधानाने झालेल्या कृतीने तो हतबुद्ध झाला आहे. त्याचे वकील त्याच्या खऱ्या बोलण्याची आणि प्रांजळ कबुलीजबाबाची वाखाणणी करत आहेत. एका साध्यासुध्या, कोवळ्या वयातील काळ्या मुलाच्या मनावर ह्या महानगरीच्या विदारक परिस्थितीने आणि क्रौर्याने घातलेल्या घाल्याकडे ते आपले लक्ष वेधून घेत आहेत. सखोल चिकित्सा करून त्यांनी अशी मांडणी केली आहे की या विदारक परिस्थितीने आपल्या काळ्या समाजाला हतबल करून टाकले आहे. त्यांनी जोरदार युक्तिवाद करून असे पटवून द्यायचा प्रयत्न केला आहे की अशी अनर्थकारक परिस्थिती निर्माण करण्याच्या गुन्ह्यात आपण सगळे साथीदार आहोत. अविचाराने, आपल्या भीतीमुळे आणि स्वार्थामुळे एका समाजाचा सुधारला जाऊ शकणार नाही इतका विध्वंस आपण केला आहे हे जरी खरे मानले, आपल्याला आपल्या अशा वागण्याची लाज वाटली पाहिजे आणि धैर्याने आणि निर्भीडपणे पुढे येऊन आपण आपल्या गुन्ह्यासाठी शिक्षा घेतली पाहिजे हे जरी खरे मानले तरी सध्या तसा कोणताही कायदा नाही. ह्या सदोष समाजाने केलेल्या सगळ्यात महत्वाच्या कामांपैकी एक काम म्हणजे कायद्यांची निर्मिती. त्यांनी कायदे केले आहेत आणि ह्या कायद्यांची अंमलबजावणी होते आहे ना हे कोणत्याही दबावाखाली न येता निस्पृहपणे पाहण्याची जबाबदारी न्यायाधीशांवर टाकली आहे. पण सदोष समाजाने बनवलेला कायदा असे म्हणून न्यायाधीश आता आहे त्या कायद्याला नाकारु शकत नाहीत, चुकीचा ठरवू शकत नाहीत. समाजाने बनवलेला कायदा जर पुरेसा न्याय देऊ शकत नसेल तर समाजानेच तो बदलायला हवा. तो नवीन कायदा येईपर्यंत जुन्या कायद्याच्या देखरेखीचे पवित्र काम न्यायाधीशाला करावे लागणार आहे. आणि त्या कायद्याला धरून त्याने दिलेला निवाडा कोणावर अन्याय करणारा वाटला तरी तो आहे त्या परिस्थितीत योग्य आहे असे मानले जायला हवे. अर्थात हा कायदा न मानण्याचे आवाहन आमच्या बचाव पक्षाच्या विद्वान वकिलांनी केले आहे असे मला अजिबात म्हणायचे नाही. मला फक्त एवढेच सांगायचे आहे की न्यायाधीशाने समाजातील आताच्या दोषांच्या चिकित्सेवर अवलंबून कोणताही निर्णय घेण्याचा प्रयत्न करू नये.

अपवादात्मक परिस्थिती वगळता कायद्याप्रमाणे माणूस त्याच्या कृत्याला जबाबदार धरला जातो. ह्या खटल्यात तशी अपवादात्मक परिस्थिती आहे असे प्रतिपादन कोणीही केलेले नाही. न्यायाधीश एखाद्याने गुन्हा स्वीकारला आहे म्हणून त्याच्या शिक्षेतून त्याला सवलत देऊ शकत नाही. कायद्याप्रमाणे तो पूर्णपणे त्याच्या कृतीला जबाबदार असतो. दया दाखवणे हेही न्यायाधीशाचे काम नाही. वरिष्ठ पदावरील व्यक्ती, ह्या खटल्याबाबतीत गव्हर्नर जनरल इन कौन्सिल तसा निर्णय घेऊ शकतील. पण तो त्या पदाचा अधिकार आहे.

ह्या खटल्यातली वस्तुस्थिती काय आहे? हा तरुण माणूस घरफोडीच्या निमित्ताने घरात शिरला. त्याने भरलेले पिस्तूल सोबत घेतलेले होते. तो ठामपणे म्हणतोय की ते फक्त घाबरवण्यासाठी होते. मग ते भरलेले असण्याची काय गरज होती? तो ठामपणे म्हणतोय की कोणाला मारण्याचा त्याचा हेतू नव्हता. पण तरीही त्याच्या साथीदारांपैकी एकाने घरातल्या काळ्या नोकराला क्रूरपणे मारले, तो हल्ला प्राणघातकही ठरला असता. तो म्हणतो की ते हत्यार म्हणजे लोखंडी गज होता, ह्यापेक्षा जास्त क्रूर आणि भयानक आणखी काही असू शकत नाही. त्या बेतात तो सहभागी होता आणि हे प्राणघातक भयंकर हत्यार सोबत घ्यायला त्याने विरोधही केला नव्हता. जो मेला असता तो काळा माणूस होता आणि काळ्या माणसाला मारणं हा तेवढा गंभीर गुन्हा नसतो असं मानणारे लोक आहेत हे खरंय. पण कोणतेही न्यायालय या दृष्टीकोनाला पाठींबा देऊ शकत नाही.

विचार करण्यासारखा सगळ्यात महत्वाचा मुद्दा हा आहे की आरोपी सतत म्हणतोय की त्याचा कोणाला मारण्याचा उद्देश नव्हता, तो गोरा माणूस अचानक आला आणि घाबरून आणि गडबडून त्याने गोळी झाडली. जर न्यायालयाने हे सत्य आहे असं मानलं तर आरोपीने खून केलेला नाही असं न्यायालयाला मान्य करावे लागेल.

पुन्हा ह्या खटल्यातली वस्तुस्थिती काय आहे? ती तीन तरुण मुलं खुनी आणि धोकादायक होती ह्याशिवाय दुसरं कोण काय म्हणू शकणार? माणूस मारायच्या उद्देशाने ते घरात शिरले नव्हते हे खरं आहे. पण माणूस मरू शकतो अशी हत्यारं त्यांच्या हातात होती आणि त्यांच्या बेकायदेशीर कामात अडथळा आणणाऱ्या माणसाच्या मृत्यूला ती कारणीभूत ठरू शकली असती.

मारण्याचा हेतू असणे हा खुनामधला अविभाज्य घटक असतो असे विधान दक्षिण आफ्रिकेच्या महान न्यायाधीशांनी करून ठेवले आहे. पण त्या घटकाचे अनुमान आनुषंगिक

परिस्थितीवरून काढता येते. आणि इथे जी वस्तुस्थिती आपल्यासमोर आली आहे त्यानुसार असा निष्कर्ष काढता येईल का असा प्रश्न आहे. असा हेतू फक्त मारायचेच असे ठरवून गेलेल्या उदाहरणांपुरता मर्यादित नाही. जबर जखमी करणे आणि त्यातून मृत्यु होवो न होवो पण मृत्युमुखी पडण्याची शक्यता असणे ह्याचाही नक्कीच अंतर्भाव होत असतो.

आपण असे समजू शकतो का की त्या छोट्या खोलीमध्ये इतक्या छोट्या कालावधीमध्ये एका निष्पाप काळ्या माणसावर क्रूर हल्ला करणे आणि एका निष्पाप गोऱ्या माणसाला गोळी घालून ठार मारणे ह्या कृती कोणालाही मोठी दुखापत करण्याचा हेतू नसताना कोणत्यातरी अपरिहार्य कारणामुळे झाल्या आहेत? मी स्वतःची अशी समजूत घालून देऊ शकलो नाही.

न्यायालयात पूर्ण शांतता आहे. न्यायाधीश स्वतः देखील शांत आहेत. कसलाही आवाज नाही. ना खोकण्याचा, ना हलण्याचा, ना श्वासाचा. न्यायाधीश पुढे बोलू लागले.

अब्सालोम कुमालो, हे न्यायालय तुला आर्थर ट्रेवेल्यान जार्विस ह्याचा प्लँटेशन रोड, पार्कवर्ल्ड, जोहान्सबर्ग इथल्या त्याच्या राहत्या घरी मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर १९४६ रोजी दुपारच्या सुमारास खून करण्यासाठी अपराधी मानते आहे. मॅथ्यू कुमालो आणि जोहान्नेस पाफुरी, तुम्हाला हे न्यायालय निरपराध मानते आहे आणि ह्या आरोपातून तुमची मुक्तता करत आहे.

मग ते दोघे तिसऱ्याला एकटे सोडून जिन्याने तळघरात गेले. त्याने त्या दोघांना जाताना पहिले आणि आता मी एकटाच उरलो ह्या विचाराने गर्भगळीत झाला.

न्यायाधीश पुन्हा बोलू लागले. कोणत्या कारणाने न्यायालयाने याला दया मिळावी म्हणून रदबदली करावी? मी खूप वेळ गंभीरपणे विचार केला आणि मला कोणतीही सहानुभूती दाखवावी अशी परिस्थिती आढळली नाही. हा तरुण आहे, पण अगदी पुरुष होण्याच्या वयातला आहे. दोन प्राणघातक हत्यारं घेऊन तो त्याच्या दोन सहकाऱ्यांबरोबर घरात घुसला. दोन्ही हत्यारं वापरली गेली. एका हत्याराने गंभीर जखम केली, दुसऱ्याने प्राण घेतला. धोकादायक माणसांकडून, मग ते तरुण असोत की म्हातारे, खुनी हल्ले होण्यापासून समाजाला वाचवावे आणि त्यांना कडक शिक्षा द्यावी हे न्यायालयाचे

सगळ्यात महत्वाचे कर्तव्य आहे. म्हणूनच मी दया मिळण्यासाठी कोणतीही रदबदली करू शकत नाही.

न्यायाधीश त्या मुलाशी बोलू लागले.

“मी शिक्षा ठोठावण्याआधी तुला काही बोलायचे आहे?”

“मला फक्त एवढंच सांगायचंय की मी त्या माणसाला मारलं पण मला त्याला मारायचं नव्हतं, मी फक्त घाबरलो होतो.”

गोऱ्या माणसाने मोठ्या आवाजात शांततेसाठी आवाहन केले आणि न्यायालयात शांतता पसरली. कुमालोंनी आपला चेहरा हातांनी झाकून घेतला. ह्या सगळ्या बोलण्याचा अर्थ त्यांना समजला होता. जार्विस श्वास रोखून, अधीरपणे न्यायाधीशांकडे बघत होते. तो गोरा तरुण त्या मुलाकडे रागारागाने बघत होता. ती मुलगी अगदी छोट्या मुलीसारखी बसून राहिली होती आणि तिचे डोळे आपल्या प्रियकराऐवजी न्यायाधीशावर खिळले होते.

“अब्सालोम कुमालो, मी तुला तुरुंगात परत जाण्याची आणि मरेपर्यंत फाशीची शिक्षा देत आहे. देव तुझ्या आत्म्यावर दया करू शकेल.”

न्यायाधीश उठले, लोक उठले. पण तिथे अजिबात शांतता नव्हती. गुन्हेगार जमिनीवर पडून रडत होता, हुंदके देत होता. एक बाई आक्रोश करत होती आणि एक म्हातारा मुसमुसत होता. अरे देवा! अरे देवा!! न्यायाधीश अजून गेले नसले तरी कोणीही शांततेचे आवाहन करत नव्हते. कारण हृदय दुभंगताना होणारा आक्रोश कोण थांबवू शकणार होतं?

रिवाजाप्रमाणे काळे एका बाजूने आणि गोरे दुसऱ्या बाजूने न्यायालयातून बाहेर आले. पण प्रथा तोडून तो सुधारगृहातील गोरा तरुण त्या म्हाताऱ्या माणसाजवळ आला आणि त्याने आणि सिमँगुने असे दोघांनी त्यांना एकेका बाजूने धरले. अतिशय अपवादात्मक परिस्थितीतच ही प्रथा मोडली जाते. कुमालोंची अवस्थाच अशी होती की एक विषमतावादी प्रथा आपण मोडत आहोत हेही त्या गोऱ्या तरुणाला समजले नाही .

12

बघूनच थरकाप उडवणाऱ्या उंच भिंतीतल्या मोठ्ठ्या फाटकामधून ते पुन्हा आत गेले. यावेळेस त्यांच्यासोबत फादर विन्सेंट, गर्टरुड, ती मुलगी आणि सिमँगु होते. मुलाला त्यांच्यासमोर आणण्यात आले. क्षणभरासाठी त्याचे डोळे आशेने चमकले आणि तो धडपडत, थरथरत उभा राहिला. पण कुमालोंनी त्याला हळुवारपणे आम्ही लग्नासाठी आलोय असं सांगितलं आणि त्याची उरलीसुरली आशाही विझून गेली.

"बाळा, ही तुझी होणारी बायको."

मुलाने आणि मुलीने एकमेकांकडे अनोळखी नजरेनं बघितलं. दोघांनी थंड पडलेले प्राणहीन हात एकमेकांच्या हातात दिले, पण त्यांनी हस्तांदोलन केले नाही. इतके सैलपणे त्यांनी हात पकडले होते की कुठल्याही क्षणी ते निसटून जातील. युरोपीय पद्धतीने चुंबन न घेता, बळजबरीने एकत्र बांधल्यासारखे, एक शब्दही न बोलता ते एकमेकांकडे बघत राहिले. पण शेवटी एकदाचं तिने विचारलं तब्बेत कशी आहे तुझी? बरी आहे, त्याने उत्तर दिलं. आणि तुझी तब्बेत कशी आहे? त्याने विचारलं. माझीही बरी आहे, ती म्हणाली. मात्र ह्याशिवाय दोघांमध्ये काहीच संभाषण झालं नाही.

फादर विन्सेंट बाजूला गेले आणि बाकीचे सगळे असेच बळजबरीने उभे राहिले. सिमँगुने बघितलं की गर्टरुड हंबरडा फोडण्याच्या बेतात होती. बाकीच्या सगळ्यांकडे पाठ करून हलक्या पण गंभीर आवाजात तो गर्टरुडला म्हणाला की जे घडायचं ते घडून गेलंय. पण हा लग्नाचा प्रसंग आहे. तुला जर रडू आवरता येणार नसेल तर इथे रडत बसण्यापेक्षा तू बाहेर गेलीस तरी चालेल. तुला कळलं न मी काय बोलतोय? तिने काहीच उत्तर न दिल्याने त्यांनी ठामपणे पुन्हा तिला विचारलं. हो समजलं मला, ती चिडून म्हणाली. ती बाजूला होऊन निर्दयी भिंत जिथून दिसत होती त्या खिडकी जवळ गेली आणि खिन्नपणे उभी राहिली. पण रडण्याच्या अगदी बेतास येऊनही आता ती रडणार नाही हे त्याला माहित होतं.

कुमालोंनी अधीरपणे मुलाला विचारलं, तब्बेत कशी आहे तुझी? बरी आहे, त्याने उत्तर दिलं. तुमची तब्बेत कशी आहे आहे बाबा? बरी आहे, कुमालो म्हणाले. आणखी काहीतरी बोलावसं त्याला वाटत होतं पण त्याच्या तोंडातून शब्द फुटत नव्हता. आणि

जेव्हा गोरा माणूस त्यांना तुरुंगाच्या चर्चमध्ये घेऊन जायला आला तेव्हा सगळ्यांनाच सुटल्यासारखं झालं.

धर्मोपदेशकाचे कपडे घालून फादर विन्सेंट तिथे त्यांची वाट बघत होते. त्यांनी बायबलमधले उतारे त्यांना वाचून दाखवले आणि मुलाला तू हिचा स्वीकार करणार का आणि त्या मुलीला तू ह्याचा स्वीकार करणार का असे विचारले. दोघांनीही पुस्तकात सांगितल्याप्रमाणे चांगल्या आणि वाईट परिस्थितीत, श्रीमंतीत आणि गरिबीत, आजारपणात आणि निरोगी अवस्थेत, मृत्यु त्यांचा वियोग करेपर्यंत स्वीकार करणार असे सांगितले आणि मग फादरनी त्यांचे लग्न लावले. नंतर फादरनी प्रथेप्रमाणे त्यांना उपदेश केला की त्यांनी एकमेकांशी निष्ठेने राहावं, त्यांच्या मुलाबाळांना धर्मात सांगितल्याप्रमाणे वाढवावं. अशाप्रकारे त्यांचं लग्न लागलं आणि त्यांनी पुस्तकात सह्या केल्या.

लग्न लागल्यावर नवरा मुलगा आणि बापाला तिथेच सोडून बाकीचे बाहेर गेले. कुमालो मुलाला म्हणाले, तुझं लग्न झालेलं पाहून मला आनंद झाला.

“मलाही आनंद झाला, बाबा.”

“पोरा, मी तुझ्या मुलाची अगदी माझं मूल असल्यासारखी काळजी घेईन.”

जेव्हा त्यांच्या या बोलण्याचा अर्थ मुलाला कळला तेव्हा त्याचे ओठ थरथरू लागले. आपली भीती, वेदना चेहऱ्यावर दिसू द्यायची नाही असं आधी ठरवलं असलं तरी भावनांना लपवणं त्याला आता अवघड जाऊ लागलं.

“तुम्ही न्दोत्शेनीला जायला कधी निघणार?”

“उद्या, बाळा.”

“उद्या?”

“हो, उद्या.”

“तुम्ही माझ्या आईला मी तिची आठवण काढली आहे म्हणून सांगा.”

“हो, मी तिला नक्की सांगीन. मी तुझा निरोप तिला नक्की देईन.”

“आणि बाबा,”

“बोल.”

“माझ्या पोस्टाच्या पुस्तकात साधारण चार पाउंड आहेत. ते माझ्या मुलासाठी. ते तुम्हाला ऑफिसमध्ये मिळतील. मी तशी व्यवस्था केली आहे.”

“हो, मी ते नक्की घेईन. तू व्यवस्था केली आहेस त्याप्रमाणे मी ते नक्की घेईन.”

“आणि अजून एक.”

“बोल, बाळा.”

“जर मला मुलगा झाला तर त्याचं नाव पिटर ठेवावं असं मला वाटतं.”

“पिटर”, गळा भरून आल्यासारखे कुमालो म्हणाले. “हो पिटर नाव ठेऊ. आणि मुलगी झाली तर?”

“मुलगी झाली तर काय नाव ठेवायचं हे मी ठरवलं नाहीये. आणि बाबा,”

“बोल बाळा.”

“माझं एक पार्सल जर्मिस्टनला आहे. नंबर 12, मसेरू स्ट्रीट वरच्या जोसेफ भेन्गुच्या घरी. ते माझ्या मुलासाठी विकलं तर मला आनंद होईल.”

“अच्छा.”

“काही गोष्टी पाफुरीकडे आहेत. पण त्या माझ्या आहेत हे तो कबूल करणार नाही.”

“पाफुरी? तोच पाफुरी?”

“हो, बाबा.”

“मग त्या गोष्टी विसरलेल्या बऱ्या.”

“जसं तुम्ही म्हणाल तसं.”

“आणि त्या जर्मिस्टनमधल्या वस्तू. उद्या आम्ही निघणार आहोत, त्यामुळे त्या आम्ही कशा घेऊ शकू शंका आहे.”

“मग ते राहू दे.”

मी रेव्हेरेंड सिमँगुशी बोलतो, त्याने राहू दे म्हटलं तरी त्याची इच्छा ओळखून कुमालो म्हणाले.

"बरं."

"हा पाफुरी आणि तुझा चुलत भाऊ, त्या दोघांना क्षमा करणं मला शक्य नाही.", कुमालो कडवटपणे बोलले.

मुलाने निराशेने खांदे उडवले.

"ते खोटं बोलले बाबा, मी म्हणालो तसे ते तिथेच होते."

"मला माहित्ये ते तिथेच होते. पण ते आता इथे नाहीत."

"ते इथेच आहेत बाबा, त्यांच्यावर दुसरा खटला सुरु आहे."

"मला तसं म्हणायचं नाहीये बाळा. ते इथे नाहीत म्हणजे, ते तुझ्याबरोबर..."

पण ते काय म्हणताहेत हे त्याला कळलंच नाही.

"इथेच आहेत." काही न समजल्यासारखा मुलगा म्हणाला. "ह्याच ठिकाणी. ते इथेच राहतील, मला जायला लागेल."

"जायला लागेल?"

"हो, हो मला जायलाच लागेल."

"प्रिटोरियाला?" कुमालो कुजबुजले.

प्रिटोरिया हा शब्द ऐकून मुलाने जमिनीवर बसकण घातली. काही भारतीय प्रार्थना करायला बसतात तसा तो मुलगा गुडघ्यात वाकून बसला आणि हुंदके देऊ लागला. त्याच्या हुंदक्यांनी ते हेलावून गेले. मुलाला मृत्यूची भीती वाटत होती. त्यांच्या आत भरून राहिलेली करुणा मुलाची अवस्था पाहून ओथंबून बाहेर आली. ते त्याच्याजवळ त्याच्यासारखेच गुडघे टेकवून बसले आणि त्याच्या डोक्यावरून हात फिरवू लागले.

"स्वतःला सांभाळ, बाळा."

"मला खूप भीती वाटत्ये, मला खूप भीती वाटत्ये."

"स्वतःला सांभाळ, बाळा."

मुलगा थोडा उठून बसला. तो आता काहीही लपवून ठेवण्याच्या मनस्थितीत नव्हता. रडून रडून त्याचा चेहरा वेडावाकडा झाला होता. “मला फाशीची भीती वाटते आहे बाबा,” हुंदके देत तो म्हणाला, “मला फाशीची भीती वाटते आहे.”

वडिलांनी मुलाचे हात हातात घेतले. त्यात आता जीव आल्यासारखा वाटत होता. बरं वाटावं, दिलासा मिळावा म्हणून नुसते हात घेण्याऐवजी मुलगा वडिलांना बिलगला. म्हाताऱ्याने त्याला घट्ट मिठी मारली आणि ते पुन्हा म्हणाले, हिम्मत ठेव, बाळा.

रडण्याचा आवाज ऐकून तुरुंगातला गोरा राखणदार आत आला आणि हळुवार पण कोरड्या आवाजात म्हणाला, तुम्ही आता जायला हवं.

“मी निघतोय, सर. मी निघतोय. आम्हाला फक्त थोडा वेळ द्या.“

ठीक आहे, अगदी थोडा वेळ असे म्हणून तो राखणदार बाहेर आला.

“बाळा, डोळे पूस.”

दिलेल्या रुमालाने मुलाने आपले डोळे पुसले. तो गुडघ्यावर बसला. हुंदके थांबले असले तरी डोळे सुजले होते.

“मला आता निघायला हवं बाळा. नीट रहा. तुझ्या बायकोची आणि बाळाची मी काळजी घेईन.”

“बरं.” तो बरं असं बोलला खरं, पण आत्ता त्याच्या मनात बायको किंवा बाळ नव्हतं. आता त्याच्या नजरेसमोर फक्त थरकाप उडवणारा मृत्यूदूत होता.

“पोरा, मला आता निघायला हवं.”

ते उठून उभे राहिले, पण मुलाने त्यांच्या पायाला घट्ट धरून ठेवलं आणि तो जोरात ओरडला, तुम्ही मला सोडून जाऊ नका, तुम्ही मला सोडून जाऊ नका. बांध फुटल्यासारखा तो धो धो रडू लागला आणि नाही नाही, तुम्ही मला सोडून जाऊ नका अशी आर्जवं करू लागला.

गोरा राखणदार आत आला आणि कडक आवाजात म्हणाला, “बाबा, तुम्ही आता निघा. कुमालो निघाले असते पण मुलाने रडत रडत त्यांचे पाय घट्ट धरून ठेवले होते. राखणदाराने त्याचे हात खेचण्याचा प्रयत्न केला पण त्याला ते जमेना. शेवटी त्याने

आणखी एकाला मदतीला बोलावले आणि दोघांनी मिळून मुलाला बाजूला केले. कुमालोंनी जीवावर उदार होऊन म्हटले, नीट रहा, माझ्या बाळा. पण मुलाने ते ऐकले नाही."

आणि ते वेगळे झाले.

छातीवर दगड ठेऊन कुमालोंनी त्याचा निरोप घेतला आणि ते भिंतीतल्या फाटकाजवळ आले. बाकीचे सगळे त्यांची तिथेच वाट बघत होते. ती मुलगी त्यांच्या जवळ आली आणि त्यांच्या हाताला स्पर्श करीत म्हणाली, "ऊम्फुंडीस."

"बोल पोरी."

"मी आता तुमची मुलगी झाले आहे."

त्यांनी बळेबळे तिच्याशी हसण्याचा प्रयत्न केला. "खरंय" ते म्हणाले. तिला भरभरून बोलायचं होतं. पण त्यांच्याकडे बघितल्यावर तिच्या तोंडून एक शब्दही फुटला नाही.

**

तुरुंगातून परत आल्यावर कुमालो टेकडी चढून भावाच्या सुतारकीच्या दुकानाकडे जाणाऱ्या रस्त्याने चालू लागले. आश्चर्य म्हणजे त्यांच्या भावाशिवाय दुकानात कोणी नव्हतं. भावाने जरा जबरदस्तीनेच त्याचे स्वागत केलं.

"मी तुझा निरोप घ्यायला आलोय, जॉन."

"बरं, बरं, तू न्दोत्शेनीला परत चाललायस. तू बरेच दिवस इकडे राहिलास, दादा. वहिनीला तुला बघून आनंद होईल. तू कधी निघणार आहेस?"

"आम्ही उद्या नऊ वाजताच्या ट्रेनने निघणार आहोत."

"म्हणजे गर्टरुड तुझ्याबरोबर येणार आहे वाटतं. आणि तिचा मुलगा. तू चांगलं काम करतोयस, दादा. जोहान्सबर्ग एकट्या बाईसाठी चांगलं ठिकाण नाही. पण ते राहू दे. आपण चहा घेऊया."

तो मागच्या बाजूस जाऊन त्या बाईला हाक मारण्यासाठी उठला. पण कुमालो म्हणाले, मला चहा वगैरे घ्यायची इच्छा नाहीये.

“येण्याऱ्या पाहुण्याला चहा देण्याची माझी पद्धत आहे. आता तुझी इच्छा नसेल तर हरकत नाही.”

तो बसला आणि दातात चिरूट धरून ती पेटवण्यासाठी आगपेटी शोधत असल्याचा बहाणा करत राहिला, पण त्याने भावाकडे बघितलं नाही.

“तू चांगलं काम करतोयस, दादा.” चिरूट दातात धरून तो बोलू लागला. “जोहान्सबर्ग एकट्या बाईसाठी चांगलं ठिकाण नाही. आणि गावात गेलं तर तिच्या मुलासाठीही ते बरं होईल.”

“मी दुसरं एक मूलही घेऊन चाललोय. माझ्या मुलाची बायको आणि तिचं होणारं मूल.”

“हो, हो. मी ऐकलं होतं त्याबद्दल.” चिरूटावर धरलेल्या काडीकडे लक्ष देत तो बोलू लागला. “ते आणखी एक चांगलं काम करतोयस तू. “

आता त्याचा चिरूट पेटला होता आणि त्याने त्यात दाबून तंबाखू भरायला सुरुवात केली. शेवटी काहीच करायला शिल्लक नसल्यामुळे त्याने धुरातून आपल्या भावाकडे पाहिलं.

“कितीतरी लोकांनी मला सांगितलं की तुझा भाऊ खूपच चांगलं काम करतोय. छान, खूपच छान! वहिनीला मी आठवण काढली म्हणून सांग आणि आपल्या तिथल्या मित्रांना पण. पिटरमॅरिट्झबर्गला तू पहाटे उतरशील आणि तिथून डोनिब्रुकला जाणारी ट्रेन पकडशील. परवा संध्याकाळी तू न्दोत्शेनीला पोचशील. मोठा लांबचा प्रवास आहे.”

“जॉन, मला एका गोष्टीबद्दल तुझ्याशी बोलायचंय.”

“बोल.”

“मी खूप खोलवर विचार केला. मी तुझ्यावर ठपका ठेवायला इकडे आलेलो नाहीये.”

ह्याचीच वाट बघत असल्यासारखा जॉन पटकन म्हणाला, “माझ्यावर ठपका? तू माझ्यावर ठपका कशाला ठेवशील? खटला होता आणि न्यायाधीश होता. तिथे मी काय, तू काय आणि आणखी कोणी काय, आपला काय संबंध?”

त्याच्या कपाळावरची शीर टणक व्हायला लागली. पण तो बोलायच्या आतच कुमालो बोलले.

“मी तुझ्यावर ठपका ठेवायला हवा असं मी म्हणालो नाही. खटला होता आणि न्यायाधीश होता हे तू बरोबर बोललास. पण आणखी एक मोठा न्यायाधीश आहे, ज्याच्याबद्दल आपण बोललो नाही. पण खरं तर मला दुसरी गोष्ट बोलायची होती.”

“अच्छा, मग तू काय बोलायला आलेलास?”

“एक तर तुला जायच्या आधी शुभेच्छा द्यायच्या होत्या. पण आता कुणाला शुभेच्छा देण्याची किंवा उपदेश करण्याची माझी मनस्थिती नाही. माझ्या मुलाच्या बाबतीत काय झालं ते तर तुला माहीतच आहे. माझा मुलगा घराबाहेर पडला आणि त्याचा सर्वनाश झाला. म्हणून वाटलं की तुझ्याशी बोलावं. तुझ्या मुलाचं काय? तोही घराबाहेर पडलाय.”

“माझा विचार चालू आहे ह्या गोष्टीवर. ही गडबड जरा संपली की मी त्याला परत घरी आणीन.”

“नक्की?”

“अगदी नक्की. मी तुला तसं वचनही देऊ शकतो.” मोठमोठ्याने हसत तो म्हणाला, “सगळी चांगली कामं मी तुझ्यावर सोडू शकत नाही, दादा. माझ्या मुलाच्या स्वागताची मी जय्यत तयारी करतो आहे.”

“हे तर खरोखर चांगलं काम आहे .”

“तुमच्याकडूनच शिकलोय, दादा. चांगली शिकवणूक मी लक्षात ठेवत असतो, कारण... तुला माहीतच आहे ते.”

“आणखी एक गोष्ट.”, कुमालो म्हणाले.

“तू माझा मोठा भाऊ आहे. जे तुला बोलायचंय ते तू बोल.”

“तुझं राजकारण, जॉन. तुला कुठे घेऊन जातंय ते?”

कपाळावरची शीर आणखी टणक व्हायला लागली. दादा, माझं राजकारण माझं आहे. मी तुझ्याशी तुझ्या धर्माबद्दल बोलत नाही.

“तू बोल म्हणालास, म्हणून मी बोलतोय.”

“हो, हो. मी म्हणालो खरं. बरं बोल, मी ऐकतोय.”

“तुला कुठे घेऊन जातंय ते?”

“मी कशासाठी लढतोय ते मला माहित आहे. रेव्हरंड सिमँगु इथे नाहीये, तो मोठयाने हसत म्हणाला, पण मी इंग्रजीत बोललो तर तू मला माफ कर.“

“तुला ज्या भाषेत बोलायचंय त्या भाषेत बोल.”

“तू इतिहास वाचला आहेस, दादा. इतिहासात लिहिलंय की काम करणाऱ्या माणसाला जास्त दिवस दाबून ठेवता येत नाही. आपण जर एकत्र उभे राहिलो तर आपल्यासमोर कोण टिकू शकेल? आपल्या जास्तीत जास्त लोकांना हे आता कळायला लागलंय. जर त्यांनी ठरवलं तर दक्षिण आफ्रिकेत यापुढे काहीच काम होणार नाही.”

“म्हणजे ते संपावर गेले तर, असं म्हणायचंय तुला?”

“हो, मला तसंच म्हणायचंय.”

“पण नुकताच झालेला संप यशस्वी झाला नाही.”

जॉन कुमालो ताडकन उठला आणि त्याचा आवाज एकदम चढला.

“बघितलंस ते आपल्याशी कसे वागतात? त्यांनी आपल्याला असे खाणीत ढकलले की जणू काही आपण त्यांचे गुलाम आहोत. काम न करण्याचा आपल्याला अधिकार नाहीये का?”

“जॉन, तू गोऱ्या लोकांचा द्वेष करतोस का?”

जॉनने संशयाने त्यांच्याकडे पाहिलं, “मी कोणाचाही द्वेष करत नाही. मी फक्त अन्यायाचा द्वेष करतो.”

“पण तू बोलतोस त्याबद्दल काही गोष्टी मी ऐकल्यायत.”

“कुठल्या गोष्टी?”

“मी ऐकलंय की तू बोलतोस त्यातल्या काही गोष्टी भयानक आहेत. मी ऐकलंय की पोलीस तुझ्यावर लक्ष ठेऊन आहेत आणि योग्य वेळ आली की ते तुला अटक करतील. मला हे तुला सांगावसं वाटलं कारण तू माझा भाऊ आहेस.”

त्याच्या डोळ्यात भीती उतरली. आडदांड माणूस लगेच गरीब शाळकरी मुलासारखा दिसायला लागला. “तू कुठल्या गोष्टींबद्दल बोलतोयस ते मला माहित नाही,” उसने अवसान आणून तो म्हणाला.

“तू इथे दुकानात बसून मारतोस त्या गप्पा गोष्टींपैकी काही गोष्टी.”

“दुकानातल्या गोष्टी? मी दुकानात काय बोलतो ते त्यांना काय समजणार?”

नेहमी दुसऱ्याला क्षमा करण्यासाठी प्रार्थना करणाऱ्या कुमालोंच्या मनात भावाला दुखवायची प्रबळ इच्छा झाली. इथे येणाऱ्या प्रत्येक माणसाला तू नीट ओळखतोस का? त्यातले कोणी तुला अडकवायला पाठवलेले असू शकणार नाही?

भरदार छातीच्या माणसाने आपले घामेजलेले कपाळ पुसले. त्याच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. त्यांच्या बोलण्यात थोडंफार तथ्य असलं तरी तसं असेलच असं नाही हे कुमालोंना माहित होतं. पण त्याला दुखवायची त्यांच्या मनातली इच्छा एवढी उफाळून आली की त्यांना एकदम खोटं बोलावसं वाटलं. “मी असं ऐकलंय की मित्र बनून तुला अडकवायला एक माणूस आधीच पाठवला गेलाय.” त्या आवेगात ते खोटं बोलूनही गेले.

“तू ऐकलंयस हे?”

कुमालोंना शरमून का होईना हो म्हणावं लागलं.

“काय पण मित्र आहेत, काय पण मित्र आहेत” जॉन चिडून म्हणाला.

“माझ्या मुलालाही असेच दोन मित्र होते.” वेदनेने पोळलेल्या काळजातून शब्द निघाले.

जॉनने त्यांच्याकडे बघितलं. “तुझ्या मुलाला?” त्याने विचारलं. आणि मग एकदम त्यांच्या म्हणण्याचा अर्थ त्याच्या डोक्यात शिरला. संतापाने थरथरत तो ओरडला,”चालता हो माझ्या दुकानातून, ताबडतोब चालता हो.”

त्याने टेबलाला जोरात लाथ मारली आणि दात ओठ खात तो कुमालोंकडे असा धावला की कुमालोंना त्याच्या दुकानातून बाहेर पडण्याशिवाय दुसरा उपाय राहिला नाही. ते बाहेर आले आणि धाडकन दरवाजा लावला गेला. आतून रागारागाने वस्तू पडल्याचा आवाज येत राहीला .

इकडे रस्त्यावर कुमालोंची अवस्था अगदी लाजीरवाणी झाली. लोकं आश्चर्याने वळून वळून बघत असल्यामुळे त्यांना अपमानित झाल्यासारखं आणि हे बोलण्यासाठी ते जॉनकडे गेले नसल्यामुळे त्यांना लाजल्यासारखं झालं. ते खरं तर भावाला सत्ता बिघडवते, जो माणूस न्यायासाठी लढत असतो त्याने स्वतः स्वच्छ आणि शुद्ध असणं गरजेचं असतं, प्रेम हीच सगळ्यात मोठी ताकद आहे वगैरे वगैरे वडिलकीच्या नात्याने सांगायला आले होते. पण ह्यातलं त्यांनी काहीच केलं नाही. देवा, माझ्यावर दया कर. येशू, माझ्यावर दया कर. ते पुन्हा काहीतरी बोलण्यासाठी दरवाजाकडे गेले पण तो आतून कडी कुलूप घालून बंद केलेला होता. एकाच उदरातून(गर्भाशयातून) बाहेर पडलेल्या भावाने आपल्या भावासाठी दरवाजा बंद केला होता.

लोक त्यांच्याकडे बघत होते म्हणून जड अंत:करणाने ते तिथून निघाले.

**

"मी तुमचे आभार तरी कसे मानू." जार्विस म्हणाले.

"शक्य असतं तर आणखीही करायला आम्हाला आवडलं असतं, जार्विस."

स्टेशनजवळ येताच जॉन हॅरिसनने गाडी थांबवली. जार्विस आणि हॅरिसन गाडीबाहेर उभे राहून मिनिटभरासाठी बोलत उभे राहिले .

"मार्गारेट, मेरी आणि मुलांची आम्ही आठवण काढत असतो हे त्यांना तुम्ही नक्की सांगा. मधेच कधीतरी आम्ही तुम्हाला भेटायला येऊन जाऊ."

"नक्की या, हॅरिसन. आम्हाला खूप आवडेल तुम्ही आलात तर."

"एक गोष्ट मला तुम्हाला सांगायची आहे, जार्विस." हळू आवाजात हॅरिसन बोलले. "शिक्षेबद्दल... मान्य आहे की आपला गेलेला माणूस त्यामुळे परत येणार नाही. पण दिलेली शिक्षा बरोबर आहे, अगदी बरोबर आहे. ह्यापेक्षा दुसरी कुठली शिक्षा बरोबर

ठरलीच नसती. जर दुसरी काही शिक्षा झाली असती तर जगात न्याय उरला नाही असंच मला वाटलं असतं. ते दोघे सुटले ते मात्र वाईट झालं. आणि त्या म्काईझ बाईला पण अडकवायला पाहिजे होतं."

"हो, मलाही थोडं फार असंच वाटतं. चला, मी निघतो आता आणि तुम्हाला सगळ्यांना पुन्हा एकदा धन्यवाद."

"तुम्हाला काही मदत करु शकलो ह्याचं समाधान आहे."

स्टेशनवर जार्विसने जॉन हॅरिसनकडे एक पाकीट दिले.

"मी गेल्यावर हे उघड."

ट्रेन सुटली जॉनने ते पाकीट उघडलं. तुमच्या क्लबसाठी, त्यात लिहिलं होतं. तुम्हाला - तुला आणि आर्थरला ज्या गोष्टी करायच्या होत्या त्या सगळ्या गोष्टी कर. जर त्या क्लबला 'आर्थर जार्विस क्लब' असं तुला म्हणावसं वाटलं तर मला आनंद होईल, पण अर्थातच ती अट नाही.

कागदाच्या खालचा चेक जॉनने बघितला. ट्रेन मागे धावता येईल का असा विचार करत त्याने चाललेल्या ट्रेनकडे बघितलं. एक हजार पाउंड, त्याने वाचले. बाप रे! एक हजार पाउंड!

**

मिसेस लिथेबेंच्या घरी आज मेजवानी होती आणि सिमँगु त्या मेजवानीचा यजमान होता. अर्थातच तो आनंदाचा समारंभ नव्हता, कुणाच्या मनातही तसा विचार आला नाही. पण जेवण चांगले होते आणि वातावरणात एक उदास सुखाची छटा होती. युरोपीय पद्धतीप्रमाणे सिमँगु अध्यक्षपदी होता आणि त्याच्या पाद्री भावाच्या सद्‌गुणांची, मातृभावाने मिसेस लिथेबेंनी सगळ्यांच्या केलेल्या सेवेची वाखाणणी करणारे भाषण त्याने केले. कुमालोही बोलले. पण ते बोलता बोलता खूप वेळा अडखळले, वेगळंच बोलत राहिले कारण ह्या क्षणीही त्यांच्या मनात खोटं बोलणं आणि भावाबरोबरचं भांडण हेच विषय घोळत होते. सिमँगु आणि मिसेस लिथेबेंच्या उपकारांसाठी त्यांनी त्यांचे आभार मानले. मिसेस लिथेबे काही बोलल्या नाहीत, फक्त लहान मुलीसारख्या गोड हसत राहिल्या आणि जे केलं ते

करण्यासाठीच आपण जन्माला येतो एवढंच म्हणत राहिल्या. पण त्यांची ती जाडी मैत्रीण त्यांच्या वतीने बोलत राहिली. कधीच संपणार नाही असं वाटावं असं लांबलचक भाषण ती देत राहिली. दोन्ही पाद्र्यांच्या आणि मिसेस लिथेबेंच्या चांगुलपणाबद्दल, गर्टरुड आणि त्या मुलीच्या कर्तव्यांबद्दल आणि त्यांना मिळालेल्या चांगल्या वागणुकीच्या परतफेडीबद्दल ती बोलत राहिली. जोहान्सबर्गबद्दल, ह्या महान नगरीतल्या वाईट गोष्टींबद्दल, आणि सोफिया टाऊन, क्लेअरमाउंट, अलेक्झांड्रा आणि पिम्विले इथल्या माणसांच्या वाईट वर्तणुकीबद्दलही ती बोलत राहिली. सिमँगुना शेवटी नाईलाजाने उठून सांगावं लागलं की मदर आम्हाला उद्या पहाटे उठायचं नसतं तर कितीही वेळ तुमचं बोलणं ऐकायला आम्हाला आवडलं असतं. शेवटी एकदाची ती बाई लाजत खाली बसली. सिमँगुने त्यांना सगळ्यांना सांगितले की त्यांच्याकडे सगळ्यांना सांगण्यासाठी एक बातमी आहे. ही बातमी आत्तापर्यंत त्याने कोणालाही सांगितलेली नाही आणि पहिल्यांदाच ती तो कोणाला तरी सांगणार आहे. तो समाजासाठी सगळ्या भौतिक गोष्टींतून निवृत्ती घेणार आहे आणि त्याच्या मालमत्तेचा तो शपथपूर्वक त्याग करणार आहे. दक्षिण आफ्रिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच कोणी काळा माणूस असे करणार आहे. सगळ्यांनी त्याच्यासाठी टाळ्या वाजवल्या आणि त्याला धन्यवाद दिले. गर्टरुड सगळी भाषणं आनंदाने मन लावून ऐकत असताना तिचा मुलगा तिच्या स्तनांना लपेटून गाढ झोपला होता. आणि ती मुलगीही उत्सुकतेने आणि हसऱ्या चेहऱ्याने सगळं ऐकत होती, कारण तिने तिच्या आत्तापर्यंतच्या आयुष्यात असे कधीच काहीच अनुभवले नव्हते.

मग सिमँगु म्हणाला की आपल्याला सगळ्यांना ट्रेन पकडण्यासाठी पहाटे लवकर उठायचे आहे, टॅक्सी सात वाजता येणार आहे त्यामुळे आता आपण सगळे झोपायला जाऊया.

प्रार्थना म्हणून त्यांनी कार्यक्रम संपवला आणि ती बाई मिसेस लिथेबेंना त्यांच्या चांगुलपणाबद्दल धन्यवाद देऊन तिथून निघाली. कुमालो त्यांच्या मित्राबरोबर फाटकापर्यंत गेले आणि तिथे सिमँगु त्यांना म्हणाला की मी सगळ्या जगाचा आणि माझ्या मालमत्तेचा त्याग करणार आहे, पण मी थोडे पैसे साठवले आहेत. मला माझ्यावर अवलंबून असणारे आई, वडील नाहीत. चर्चकडून तुम्हाला हे देण्याची मला परवानगी मिळाली आहे. तुम्ही जोहान्सबर्गमध्ये केलेला खर्च आणि तुम्ही हाती घेतलेल्या नवीन जबाबदाऱ्या पार पाडण्यात तुम्हाला ह्या पैशांची मदत होईल. हे पुस्तक आता तुमच्या नावाचे झाले आहे.

त्याने ते पुस्तक कुमालोंच्या हातात ठेवले आणि त्या पुस्तकाच्या स्पर्शाने ते पोस्ट ऑफिसचे पुस्तक आहे हे त्यांना कळले. पुस्तक असलेला हात फाटकावर ठेवून आणि त्यावर आपले डोके टेकवून कुमालो हमसाहमशी रडू लागले. सिमँगु त्यांना म्हणाला, माझा आनंद असा खराब करू नका. माझ्या उभ्या आयुष्यात मला असा आनंद कधी मिळाला नाही. त्याच्या ह्या शब्दांमुळे कुमालोंनी आपले रडणं आवरलं पण अजून त्यांचे हुंदके देणं सुरूच होतं. म्हणून सिमँगु म्हणाला, शांत व्हा दादा, कोणीतरी येतंय.

तो माणूस जाईपर्यंत ते शांत राहिले. कुमालो म्हणाले की माझ्या एवढ्या दिवसात मला तुझ्यासारखा दुसरा कोणी भेटला नाही. पण सिमँगु लगेच म्हणाला, “मी एक दुबळा आणि पापी माणूस आहे पण परमेश्वराने त्याचा हात माझ्या डोक्यावर ठेवला आहे. मुलाबद्दल सांगायचं तर गव्हर्नर जनरल इन कौन्सिल दया द्यायची की नाही हे ठरवतील. फादर विन्सेंटना कळलं की ते तुम्हाला कळवतील.”

“आणि तसं घडलं नाही तर?”

“जर दया मिळाली नाही तर आमच्यापैकी एक जण त्यादिवशी प्रिटोरियाला जाऊ आणि ते झालं की तुम्हाला कळवू.” सिमँगु समजूतदारपणे बोलला. “आता मला जायला हवं. आपल्याला उद्या लवकर उठायचंय. पण मलाही तुम्हाला एक विनंती करायची आहे.”

“माझ्याकडे जे आहे त्यातले काहीही माग, मित्रा.”

“मी जी नवीन गोष्ट करणार आहे त्यात मला यश मिळावे म्हणून तुम्ही प्रार्थना कराल?”

“माझे जेवढे दिवस उरलेत तेवढ्या सकाळी आणि संध्याकाळी मी तुझ्यासाठी प्रार्थना करीन.”

“गुड नाईट, दादा.”

“गुड नाईट, सिमँगु, माझ्या परममित्रा. देवाचा तुला सदैव आशीर्वाद असो.”

“आणि तुम्हालाही.”

कुमालोनी त्याला रस्त्यावर जाऊन मिशन हाउसकडे वळताना बघितले. मग ते त्यांच्या खोलीत गेले, मेणबत्ती पेटवली आणि पुस्तक उघडले. त्यात तेहतीस पाउंड, चार

शिलिंग आणि पाच पेन्स होते. ते त्यांच्या गुढघ्यावर बसले आणि हुंदके देऊ लागले, खोटं बोलल्याबद्दल आणि भांडल्याबद्दल पश्चात्ताप करू लागले.

भावाकडे जावं असं त्यांना मनापासून वाटत होतं पण खूपच उशीर झाला होता. न्दोत्शेनीला गेल्याबरोबर भावाला पत्र लिहायचं त्यांनी ठरवलं. इथे आल्यापासून लोकांनी त्यांच्यावर केलेल्या उपकारांसाठी त्यांनी देवाचे आभार मानले. नंतर त्यांनी आपल्या मुलासाठी प्रार्थना केली. उद्या ते सगळे घरी जातील, त्यांच्या मुलाशिवाय सगळे. प्रिटोरियाच्या भव्य तुरुंगात, कोणालाही भेटण्यास प्रतिबंध असतो अशा एकाकी कोठडीत ते टाकतील त्या जागी तो राहील. आणि जर दयेचा अर्ज नाकारला गेला तर फाशी दिले जात नाही तोपर्यंत तो तिथे राहील. देवा! ज्या हातांनी एके काळी आईचे स्तन पिळून आपली भूक भागवली होती, काळोखातून जाताना हळूच वडिलांचा हात पकडला होता, त्या हातांनीच खून करावा! देवा! लहानपणी रात्रीला घाबरणारा खुनी आता त्याच्या स्वतःच्या मृत्यूला घाबरत होता.

ते भल्या पहाटेच उठले. त्यांनी मेणबत्ती पेटवली आणि अचानक आठवल्यासारखी सिमँगुसाठी प्रार्थना म्हटली. त्यांनी शांतपणे दरवाजा उघडला आणि त्या मुलीला हळुवारपणे उठवले. चला, उठायची वेळ झाली. ती अधीरपणे मला जास्त वेळ लागणार नाही म्हणत बिछान्यातून उठली. तिच्या उतावीळपणाला ते हसले. न्दोत्शेनी, उद्या आपण न्दोत्शेनीत असं म्हणत मेणबत्ती उंच धरून त्यांनी गर्टरुडच्या खोलीचे दार उघडले. पण गर्टरुड गेली होती. छोटा मुलगा तिथे होता, लाल ड्रेस आणि पांढरी हॅट तिथे होती, पण गर्टरुड मात्र निघून गेली होती.

प्रकरण ३

1

जोरात शिट्टी वाजवत आणि वाफ सोडत गाडी ट्रान्सवालच्या गवताळ माळरानावरून गेली. खाणीमधून निघालेल्या मातीचे पांढरे डोंगर मागे पडले आणि नजर जाईल इतक्या दूरपर्यंत गावं, कुरणं दिसायला लागली. कुमालो, पाय दुमडून बसलेला छोटा मुलगा आणि ती मुलगी एकत्र बसले होते. मुलीने तिच्या महत्वाच्या वस्तूंची पिशवी घट्ट पकडून ठेवली होती. मुलाने आईबद्दल विचारलं, पण कुमालोंनी तुझी आई लांब गेली आहे असं सांगताच तो गप्प बसला.

व्हॉल्कस्रस्टला वाफेचं इंजिन जातं आणि त्या जागी वरच्या धातूंच्या तारांमधून वीज घेणारा पिंजरा जोडला जातो. वेग कमी करत गाडी खोल दरीतून नाताळच्या डोंगराळ भागात येऊन पोचली. कुमालोंनी मुलीला सांगितलं, नाताळ आलं. पहिल्यांदाच येत असल्यामुळे तिने उत्साहाने मान बाहेर काढून पाहिलं.

काळोख झाला आणि बाहेर गडगडाट होत असताना गाडी एकेकाळच्या युद्धभूमीतून पुढे निघाली. ते झोपेत असतानाच ट्रेनने मुई नदी, रोसेत्ता आणि बाल्गोवान ओलांडलं. उजाडत असताना पर्वत रांगातून गाडीचा वेग मंदावला आणि ते पिटरमॅरिट्झबर्ग नावाच्या सुंदर शहरात पोचले.

इकडे ते दुसऱ्या ट्रेनमध्ये चढले. ट्रेन उम्सिंदुसीच्या खोऱ्यातून धावत, काळ्यांच्या झोपडपट्टीवरून, एडेंडेलवरून, उम्कोमासच्या काळ्यांच्या वस्तीमधून आणि माती अगदी निष्प्राण झालेली आहे अशा विस्तीर्ण खोऱ्यातून गेली. इथे लोकांनी कुमालोंना सांगितलं की पाऊस पडत नसल्यामुळे नांगरणी करणं, लागवड करणं शक्य नाही आणि ह्या खोऱ्यात आता भुकेचं साम्राज्य पसरत चालले आहे.

डॉनिब्रूकला ते आणखी एका ट्रेन मध्ये चढले. ही टॉय ट्रेन हिरव्यागार इस्टवल्ड्स आणि लुफाफा वरून इकोपोला जाते. इकोपोला ते उतरले. लोकांनी त्यांना नमस्कार केला आणि किती दिवसांनी तुम्हाला बघतोय असं ते म्हणू लागले.

नंतर ते शेवटच्या सुंदर टेकड्यांमधून जाणाऱ्या ट्रेन मध्ये चढले. इथले बरेच लोक कुमालोंना ओळखत होते. त्यामुळे त्यांच्या प्रश्नाची त्यांना भीती वाटत होती. हे लोक लहान मुलांसारखे काहीही प्रश्न विचारत राहतात. ते तुम्ही कोण, कुठून आलात, कुठे चाललात असले निरुपद्रवी प्रश्न विचारत नाहीत. तर तुमची बहीण कशी आहे, मुलगा

कुठे आहे असले थेट प्रश्न ते विचारत राहतात. म्हणून त्या लोकांना टाळण्यासाठी त्यांनी बायबल बाहेर काढले आणि ते वाचत राहिले.

उम्झीकुलूच्या विस्तीर्ण खोऱ्यावरून निघून पूर्व ग्रीकलँडमधील पर्वतांच्या मागे सूर्य मावळत होता. स्टेशनावर त्यांना घ्यायला त्यांची बायको आणि बॅगा घ्यायला मदत करायला त्यांचा मित्रही आला होता. ते पटकन त्यांच्या बायकोजवळ गेले आणि युरोपीय पद्धतीप्रमाणे त्यांनी तिला मिठी मारली. घरी आल्यामुळे त्यांना आनंद झाला होता.

तिच्या चेहऱ्यावर अनेक प्रश्न होते. ते तिला म्हणाले, “कदाचित दया मिळेल कदाचित मुलगा गमवावा लागेल. पण ह्या विषयावर आपण नंतर बोलूया.”

“बरं, ठीक आहे.” ती म्हणाली.

“गर्टरुडला इथे आणण्याची सगळी तयारी झाली होती. आम्ही सगळे एकाच घरात होतो. पण जेव्हा मी तिला उठवायला गेलो तेव्हा ती निघून गेलेली होती. ह्याबद्दलही आत्ता बोलायला नको.”

तिने मान खाली घातली.

“हा तिचा छोटा मुलगा आणि ही आपली नवीन मुलगी”.

कुमालोंच्या बायकोने त्या मुलाला उचलून घेतले आणि युरोपीय पद्धतीने तिने त्याचा मुका घेतला. तू आता माझं बाळ आहेस, ती म्हणाली. त्याला खाली ठेऊन ती त्या मुलीजवळ गेली. ती मुलगी हातात पिशवी घेऊन नम्रपणे उभी होती. तिने तू माझी मुलगीच आहेस असं म्हणत युरोपीय पद्धतीप्रमाणे त्या मुलीला आलिंगन दिले आणि ती मुलगी हमसाहमशी रडू लागली. तिच्या पाठीवरून हात फिरवत ती तिला शांत करू लागली. आपलं घर अगदी साधं आहे, तिथे कोणत्याही खास वस्तू नाहीत, ती तिच्याशी बोलत राहिली. पाणी भरल्या डोळ्यांतून तिच्याकडे बघत ती म्हणाली, आई, मला असंच सगळं हवं होतं.

तिच्या वाक्याने त्यांना कुठेतरी खोलवर स्पर्श केला. कुठेतरी खोलवर सुखाची भावना जागी झाली. जरी ते वाक्य अश्रूंबरोबर आलं असलं तरी उध्वस्ततेही सांत्वन करणारं होतं.

कुमालोंनी मित्राबरोबर हस्तांदोलन केलं आणि ते सगळे सूर्यास्ताच्या साक्षीने न्दोत्शेनीच्या दिशेने छोट्या वाटेने चालू लागले. या बाजूनी एका माणसानं हाक मारली, वा, ऊम्फुंडीस, तुम्ही परत आलात, खूप बरं वाटलं तुम्ही परत आलात ते बघून. त्या बाजूनी एक बाई दुसरीला म्हणाली, ते बघ, आपले ऊम्फुंडीस परत आलेत. युरोपीय पद्धतीचे कपडे घातलेल्या बाईने आनंदाने आपल्या डोक्यावरचा रुमाल उडवला. झोपडया झोपड्यात जाऊन उत्साहाने लहान मुलासारखी ओरडत ऊम्फुंडीस परत आलेत असं ती सगळ्यांना सांगू लागली. तिनं तिच्या मुलांना दरवाजापाशी आणलं आणि त्या मुलांनी आईच्या मागे लपून परत आलेल्या ऊम्फुंडीसकडे हसत डोकावून बघितलं.

एक लहान मुलगी कुमालो चालले होते त्या वाटेवर आली आणि ते थांबावेत म्हणून त्यांच्यासमोर उभी राहिली. ऊम्फुंडीस, तुम्ही परत आलायत याचा आम्हाला खूप आनंद होत आहे.

बिशपनी पाठवलेल्या तरुण माणसाचा उल्लेख करून ते म्हणाले की तुमच्याकडे माझ्याऐवजी दुसरे ऊम्फुंडीस तर होते ना.

“ते काय बोलतात आम्हाला कळत नाही”, ती म्हणाली. “आम्हाला आमच्या ऊम्फुंडीसचच कळतं.”

हिरव्यागार डोंगरातून, दवावर पोसलेल्या गवत आणि नेच्यावरून त्यांची वाट उतरली. चढण असल्यामुळे वाट आता दगड गोट्यातून हळू हळू चढू लागली. गरोदर बाईनं काळजीपूर्वक चालायला हवं म्हणून कुमालोंची बायको त्या मुलीच्या पुढे राहून इथून ये, इथून नको, जपून, घसरशील वगैरे वगैरे सूचना देऊ लागली. ते पोचेपर्यंत रात्र पडू लागली होती आणि राखाडी आकाशाच्या पार्श्वभूमीवर पूर्व ग्रीकलँडमधील निळेशार पर्वत उठून दिसत होते.

वाट न्दोत्शेनीतल्या लाल मातीवर उतरत होती. फक्त म्हातारी माणसं आणि लहान मुलं रहात असलेली ती निकृष्ट दर्जाची माती असली तरीही ती त्यांची माती होती. मका कसाबसा माणसाच्या उंचीचा होत असला तरीही तेच त्यांचं पांढर होतं.

“इथं सगळं उजाड झालंय, ऊम्फुंडीस. आम्ही पावसासाठी आक्रोश करतोय.”

“हो, जोहान्सबर्गलाही मी ऐकलं होतं त्याबद्दल.”

"साठवणुकीतलं सगळं संपत आलंय. पुढे कसं होणार, देवालाच माहीत."

वाट थोडी चढी होत जाते. चर्चजवळून एका झरा वाहत असतो. कुमालो त्या झऱ्याचा आवाज ऐकायला थांबतात, पण तिथं कुठलाही आवाज ऐकू येत नाही.

"झरा वाहत नाहीये का?"

"झरा आटून गेला त्याला महिना होऊन गेला."

"मग आपल्याला पाणी तरी कुठून मिळतं?"

"उजार्विसच्या घराजवळून जी नदी वाहते तिथं जाऊन बायका पाणी भरून आणतात."

जार्विसचे नाव ऐकताच कुमालोंना भीती आणि वेदना जाणवली. पण तरीही स्वतःला सावरत त्यांनी विचारलं उजार्विस कसे आहेत?

"ते काल आले. ते कसे आहेत मला कळलं नाही, पण इंकोसिगाझ* काही आठवड्यांपूर्वीच आल्या आणि लोक म्हणतात त्या आजारी आणि अशक्त झाल्या आहेत. ऊम्फुंडीस, मी आता त्यांच्याकडे काम करतो."

कुमालो गप्प झाले आणि आणि पुढे काही बोलू शकले नाहीत. पण त्यांचा मित्र म्हणाला, त्रास करून घेऊ नका. इकडे माहीत आहे ते.

"काय? माहीत आहे?"

"हो, माहीत आहे, ऊम्फुंडीस."

ते पुन्हा त्यावर काही बोलले नाहीत. वाट सपाट भागातून झोपडया आणि लाल रिकामी शेतं ह्यातून पुढे जात राहिली. सांजवेळ झाली आणि हाकारे सुरु झाले. एक आवाज दुसऱ्या आवाजाला दूर अंतरावरून साद देऊ लागला. तुम्ही जर झुलू असाल तर ते काय बोलतायत ते तुम्हाला सहज समजू शकेल. आणि जर तुम्ही झुलू नसाल तर मात्र ती भाषा तुम्हाला येत असली तरी ते हाकारे कशासाठी चाललेत ते तुम्हाला कळणार

इंकोसगाझ : मालकीणबाई

नाही. काही गोरी लोकं म्हणतात ही जादू आहे, पण ही जादू नाही, एक सुंदर कला आहे. ही आफ्रिका आहे, प्रियतम आफ्रिका!

“ऊम्फुंडीस, तुम्ही परत आलायत असं ते एकमेकांना साद घालून सांगतायत.”

“हो,ऐकलं. खूप भरून आलंय ऐकून.”

“त्यांना खूप आनंद झाला आहे, ऊम्फुंडीस.”

त्यांना खरंच खूप आनंद झालाय. ते झोपड्यांमधून बाहेर रस्त्यावर येतायत, ते डोंगरा टेकड्यांवरून काळोखातून धावत पळत येतायत, मुलं ओरडत, आरोळ्या ठोकत खेड्यापाड्याची खासियत असलेल्या विलक्षण आर्त स्वरात हाका देत येतायत.

“ऊम्फुंडीस, तुम्ही परत आलात?”

“ऊम्फुंडीस, खूप छान झालं तुम्ही परत आलात ते.”

“ऊम्फुंडीस, तुम्ही किती वेळ लावलात यायला.”

एक मुलगी धावत येत त्यांना म्हणते, आमच्या शाळेत नवीन शिक्षिका आल्यात. दुसरा मुलगा तिला म्हणतो, अगं मूर्ख आहेस का, त्या तर कधीच्याच आल्या आहेत. त्या शिक्षिकेने शाळेत सलाम कसा करायला शिकवलाय हे तो करून दाखवतो आणि जोरात ओरडतो, ऊम्फुंडीस! कोण काय बोलतंय ह्याची वाट न बघता जरासा बाजूला होऊन तो विलक्षण आर्त स्वरात हाक मारतो, कुण्या एका माणसाला नाही तर हवेला, मुक्त वाऱ्याला. तो नाचातली पहिली हळुवार गिरकी घेतो, दुसऱ्या कुणासाठी नाही, स्वतःसाठीच.

विशेष प्रसंगी लावला जाणारा दिवा आज चर्चच्या बाहेर लावला आहे. बायका चर्चबाहेर दिव्याच्या खाली लाल जमिनीवर बसल्यात. त्यांनी पांढरे कपडे घातले आहेत आणि हिरवा रुमाल गळ्याभोवती गुंडाळला आहे. लोक आल्यावर त्या उठतात आणि त्यातील एकजण आर्त सुरात भजन गाऊ लागते. तिच्या सुराला आजूबाजूच्या बायका उचलून धरतात. काही पुरुषही त्यांना भजनात साथ देऊ लागतात, उंच सुरात गाऊ लागतात. कुमालो त्यांची हॅट काढतात. ते, त्यांची बायको आणि मित्रही देवाच्या स्तुती गायनात सामील होतात आणि ती मुलगी आश्चर्याने सगळं बघत राहते. हे परमेश्वराचे आभार मानणारं गीत आहे, माणूस देवाची आठवण काढतोय, शरण जातोय आणि देवाने

दाखवलेल्या अमर्याद दयेसाठी त्याचे आभार मानतोय. त्यांच्या गीताचे प्रतिध्वनी तिथल्या उजाड लाल डोंगरावरून, भग्न पावलेल्या समाजाच्या उजाड लाल शेतांवर पसरतायत. सारं काही विसरून, भक्तिरसात आकंठ बुडून, तल्लीन होत गायलेल्या त्या गाण्यात साधीसुधी माणसं त्यांचे प्राण ओततायत.

आता कुमालो प्रार्थना सुरु करतात. “देवा, तुझे अनंत उपकार. तुझ्या अमर्याद प्रेमाबद्दल, न संपणाऱ्या दयेबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. सुरक्षितपणे परत आणल्याबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. आमचे मित्र आणि आमचे कुटुंबीय ह्यांच्या आमच्यावरील जिव्हाळ्याबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो. तुझ्या आमच्यावरील अनुकंपेबद्दल आम्ही तुला धन्यवाद देतो.”

“आम्ही तुझी विनवणी करतो, देवा, आम्हाला पाऊस दे...”

लोक आमेन म्हणत राहतात, इतक्या सगळ्यांचं आमेन म्हणून होईपर्यंत त्यांना थांबावं लागतं.

“आम्ही तुझी विनवणी करतो, देवा. आम्हाला पाऊस दे म्हणजे आम्ही जमीन नांगरून बी पेरू शकू. आणि जर पाऊस पडणारच नसेल तर भूक आणि उपासमारीपासून आमचं रक्षण कर.”

लोक मनापासून आमेन म्हणत राहतात, इतक्या सगळ्यांचं आमेन म्हणून होईपर्यंत त्यांना पुन्हा थांबावं लागतं. सगळ्यांनी मोठ्या प्रेमाने स्वागत केलेलं बघून त्यांचं मन भरून येतं. संकोच बाजूला सारत खोलवरची काळजी प्रार्थनेच्या रूपातून त्यांच्या ओठातून बाहेर पडू लागते.

“देवा, ह्या छोट्या मुलाचा न्दोत्शेनीत स्वीकार होऊ दे. ह्या मातीच्या अंगाखांद्यावर तो मोठा होऊ दे. आणि त्याची आई...”

क्षणभर ओठातून शब्द फुटला नाही पण तरी नेटाने ते पुढे म्हणाले,

“आणि त्याची आई - तिच्या पापासाठी तिला क्षमा कर.”

एक बाई कुरकुरली पण ती त्यांच्या गावातली कुचाळक्या करण्यात पटाईत असलेली बाई आहे हे त्यांना माहीत होतं म्हणून त्यांनी झटकन प्रार्थना पुढे सुरु केली.

“आम्हाला सगळ्यांना माफ कर कारण आम्ही सगळ्यांनी आगळीक केली आहे. आणि देवा, आमच्या ह्या मुलीचे न्दोत्शेनीत स्वागत होऊ दे. इथेच तिचे सुखरूप बाळंतपण होऊ दे.”

त्या अश्राप मुलीकडे करुणामयी नजर टाकत ते हळुवारपणे म्हणाले:

“तिच्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण होऊ देत.”

आणि आता सगळ्यात अवघड आणि सगळ्यात महत्वाची विनवणी. करुणेच्या सागरापुढे अत्यंत लीन होत ते म्हणाले:

“आणि देवा, माझा मुलगा...”

आता कुणीच कुरकूर केली नाही, सगळेजण शांत आहेत. कुचाळक्या करणारी बाईही कुरकूर करत नाहीये. त्यांचा आवाज कुजबुजल्यागत हळू झाला:

“त्याच्या चुकांसाठी त्याला क्षमा कर”.

जिचा उच्चार करणंही त्यांना इतके दिवस अवघड वाटत होतं ती क्षमायाचना आपल्या माणसांच्या सहवासात सहजपणे मागितली गेली. फक्त ह्या साध्या भोळ्या माणसांच्या प्रेमामुळेच हे शक्य झालंय हे त्यांना ठाऊक होतं. पेशाने धर्मगुरू असलेल्या त्या कृश माणसात अचानक ताकद आली आणि उजाड लाल मातीवर गुडघे टेकवत आवेगात हात उंचावत ते बोलू लागले:

“ मुला, तुला देवाचा आशीर्वाद असो, तो तुझा सांभाळ करो, त्याच्या नेत्रकटाक्षाने तुझे जीवन उजळो, तुला सदैव शांती लाभो. करुणेचा सागर, पवित्र आत्म्याचा आप्त असलेल्या आपल्या परमेश्वराची, येशू ख्रिस्ताची शाश्वत कृपा तुझ्यावर आणि तुझ्या जिवलगांवर सदोदित असू दे. आमेन.”

ते उठले आणि तेवढयात नवीन शिक्षिका म्हणाल्या,

“आपण ‘इंकोस सिकेलेल आफ्रिका’ - ‘गॉड सेव्ह आफ्रिका’ नको म्हणूया का?”

जुन्या शिक्षिका म्हणाल्या, “अजून इथल्या लोकांना माहीत नाही हे गाणं. अजून इथपर्यंत ते आलंच नाहीये.”

“पिटरमॅरिट्झबर्गला तर ते कधीच सगळ्यांना माहिती आहे. ते इथेपण माहीत असायला नको का?”

“हे पिटरमॅरिट्झबर्ग नाहीये”, जुन्या शिक्षिका म्हणाल्या. “आपल्याला इथे बऱ्याच गोष्टी करायच्या असतात.”

नवीन शिक्षिकेबरोबर अजून विशेष संबंध न जुळल्यामुळे आणि ‘गॉड सेव्ह अफ्रिका’ आपल्याला येत नसल्याची लाज वाटल्यामुळे जुन्या शिक्षिकेने तिला झटकले.

हो, देव आफ्रिकेचे रक्षण करो, आपल्या जिवलग आफ्रिकेचे. पापांच्या खोल गर्तेत बुडून जाण्यापासून पासून देव आपले रक्षण करो. न्यायाची भीती, माणसाला माणसाची वाटणारी भीती यापासून देव आपले रक्षण करो. देव आपले सगळ्यांचे रक्षण करो."

बाळा, जिचे पडसाद दऱ्याखोऱ्यातून उमटत राहतील अशी विलक्षण आर्त स्वरातली साद घाल. लेकरा, स्वतःच्याच नादात, स्वतःसाठीच एक हळुवार गिरकी घे. कोवळ्या निरागस मुला, भान हरपून साद घाल, देह हरपून नाच कर. आनंदाचे क्षण भरभरून वेचून घे. कारण ही तर केवळ नांदी आहे, ही तर केवळ तुझ्या आयुष्याची सुरुवात आहे. अनोळखी ठिकाणच्या अपरिचित लोकांकडून आलेले अकल्पित अनुभव तुला सुन्न करून टाकतील. आयुष्याच्या प्रवाहात पोहण्याचा आनंद आज तू घेत आहेस. तुला भीती वाटत नाही, कारण अजून तुला भीतीची ओळखच झालेली नाही. तोवर आर्त साद घाल आणि मनमुराद नाच कर. भान हरपून साद घाल, देह हरपून नाच कर. आनंदाचे क्षण भरभरून वेचून घे.

**

सगळी लोकं गेली आणि आता कुमालो त्यांच्या मित्राकडे वळले.

“मला तुला काहीतरी खूप महत्वाचं सांगायचंय. माझी बहीण गर्टरुडही माझ्याबरोबर इथे येणार होती. सगळी तयारी झाली होती. आम्ही सगळे एकाच घरात होतो. पण पहाटे जेव्हा मी तिला उठवायला गेलो तेव्हा ती कुठेतरी निघून गेलेली होती.”

“फार वाईट झालं, ऊम्फुंडीस.”

"आणखी एक. माझ्या मुलाला फाशीची शिक्षा झाली आहे. कदाचित त्याला दया मिळेल, कदाचित नाही. फादर विन्सेंटना कळलं की ते मला कळवणार आहेत."

"खूपच वाईट बातमी आहे ही."

"तुला सांगण्याचं कारण म्हणजे ह्यात लपवून ठेवण्यासारखं काही नाही. तू तुझ्या मित्रांना हे सांग आणि तेही त्यांच्या मित्रांना हे सांगू शकतील."

"बरं, ऊम्फुंडीस."

"मी यापुढे इथे राहावं की नाही मला कळत नाहीये, मित्रा."

"का, ऊम्फुंडीस?"

"ज्याची बहीण आपल्या लहान मुलाला सोडून गेली आहे आणि ज्याच्या मुलाने एका भल्या माणसाला मारलं आहे अशा माणसाने इथं का रहावं?" त्यांनी कडवटपणे विचारलं.

"ऊम्फुंडीस, मी खूप छोटा माणूस आहे. योग्य काय ते तुम्ही ठरवालच. पण लक्षात घ्या की इथला एकही पुरुष किंवा बाई असे नाहीत ज्यांना तुम्ही जावं असं वाटतंय. इथला एकही पुरुष किंवा बाई असे नाहीत ज्यांनी तुमच्यासाठी शोक केलेला नाही, जो तुमच्या परत येण्याने सुखावला नाही. तुम्हाला हे दिसत नाहीये का? तुम्हाला हे जाणवत नाहीये का?"

"मला अगदी जाणवतंय, मित्रा. तुमच्या माझ्यावरील प्रेमामुळे माझं मन कृतज्ञतेने भरून आलंय. इकडे तुम्हीही माझ्यासाठी खूप काही सोसलंय. हे माझं घर आहे. तुम्ही सगळे माझे आहात. गेली किती वर्षं मी इथे राहतोय. त्यामुळे इथून निघून जाण्याचा विचार करणंही मला त्रासाचं वाटतंय."

"तुम्ही खूप खूप चांगले आहात. आणि माझं स्वतःचं सांगायचं तर मी तुमच्याशिवाय राहूच शकत नाही. मी पूर्ण अंधारात होतो..."

"मी भारावून गेलोय, मित्रा."

"ऊम्फुंडीस, तुम्हाला सिबेकोची मुलगी भेटली का? मी सांगितलेलं तुम्हाला आठवतंय?"

“हो, मी शोधायला गेलो होतो तिला. पण तीही कुठेतरी निघून गेली आहे. कुठे गेली आहे हे त्यांना मी विचारलं तर ते म्हणाले आम्हाला माहित नाहीये.. ”

“आणि त्यांना त्याबद्दल काहीही देणंघेणं नाही.” अचानक त्यांचं तोंड कडू झालं आणि त्यांनी पुढचंही सांगून टाकलं.

“अरे बापरे, ऊम्फुंडीस.”

“मला माफ कर, मित्रा.”

“हे जग संकटांनी भरलेलं आहे, ऊम्फुंडीस.”

“माझ्याहून जास्त हे कोणाला कळलं असेल?”

“आणि तरीही तुमची ईश्वरावर श्रद्धा आहे?”

दिव्याच्या प्रकाशात कुमालोंनी त्याच्याकडे बघितलं. “माझी त्याच्यावर श्रद्धा आहे आणि आयुष्य हे एक रहस्य असतं हेही मला कळलंय. व्यथा आणि वेदना हे एक रहस्य आहे. अनुकंपा आणि प्रेम हे एक रहस्य आहे. पण मला कळलंय की अनुकंपा आणि प्रेम हे व्यथा आणि वेदनांवरचे उतारे आहेत. माझी बायको, तू, माझं स्वागत करणारी माझी ही सगळी माणसं आणि इथे येऊन नवीन आयुष्य जगायला उत्सुक असलेली मुलगी - म्हणूनच ह्या व्यथा भोगत असतानाही माझी त्याच्यावर श्रद्धा आहे.”

“खरा ख्रिश्चन व्यथा वेदनांपासून दूर राहूच शकत नाही. आपल्या परमेश्वरानेच किती भोगलंय. आणि आता मला कळलंय की आपल्याला वेदनांपासून वाचवायला नाही तर सहन कसं करावं हे शिकवायला त्यानं सगळं सहन केलं. त्याला ठाऊक आहे वेदनांशिवाय जगणं अपूर्ण आहे.”

कुमालोंनी आनंदाने आपल्या मित्राकडे बघितलं. “तू तर चांगला प्रवचनकार आहेस.”

त्याने आपले खरबरीत, घट्टे पडलेले हात त्यांच्यासमोर धरले आणि हसत हसत त्यांना विचारलं, “मी दिसतो प्रवचनकार?”

कुमालो हसले, “मी तुझ्या सुंदर हृदयाकडे बघत होतो मित्रा, हाताकडे नाही. तुझ्या सगळ्या मदतीसाठी आभार.”

“तुम्ही कधीही बोलवा, ऊम्फुंडीस. निघतो आता.”

“सावकाश जा मित्रा. घरी चाललास न, मग इकडून का चाललास?”

त्याने सुस्कारा सोडला. मी आधी सिबेकोकडे जातो, तो म्हणाला. मी त्याला वचन दिलं होतं मला कळलं की मी तुला लगेच सांगीन.

कुमालो समजूतदारपणे आपल्या घराकडे निघाले. अचानक वळून त्यांनी मित्राला हाक मारली.

“तुला एक सांगायचं राहून गेलं. स्मिथच्या मुलीने असं म्हटलं की मला माहीत नाही आणि मला पर्वाही नाही. तिने ते जार्विसना इंग्रजीत सांगितलं. पण मला झुलूमध्ये सांगताना जार्विसनी तिला माहीत नाही एवढंच सांगितलं. तिला पर्वा नाही हे मात्र त्यांनी मला सांगितलं नाही.”

“मला समजलं, ऊम्फुंडीस.”

“सावकाश जा मित्रा.”

“थोडा आराम करा, ऊम्फुंडीस.”

कुमालो पुन्हा वळले आणि घरात शिरले. त्यांची बायको आणि मुलगी जेवत होते.

“मुलगा कुठाय?” त्यांनी विचारलं.

“तो झोपला,स्टीफन. तू किती वेळ बोलत बसला होतास?”

“हो, बऱ्याच गोष्टी सांगायच्या होत्या.”

“तू दिवा घालवलास का?”

“राहू दे अजून थोडा वेळ.”

“चर्चकडे एवढा पैसा आहे का?”

ते तिच्याकडे बघून हसले. आजची रात्र खास आहे.

तिचा चेहरा वेदनांनी झाकोळला. तिच्या डोक्यात काय विचार आला असेल ते लगेच त्यांच्या लक्षात आलं.

“मी विझवतो दिवा.” ते म्हणाले.

“राहू दे अजून थोडा वेळ. तुझं जेवण झालं की मग विझव.”

“बरं, चालेल. इथे जे आज झालं त्यासाठी आणखी थोडा वेळ उजळलेला राहू दे. तिथे जे झालं त्यासाठी नंतर विझवू.”

त्यांनी मुलीच्या डोक्यावरून हात फिरवला. जेवण झालं का बाळ?

”माझं पोट आणि मन भरलंय.” ती हसत म्हणाली.

“मग झोप आता.”

“हो, बाबा.”

ती खुर्चीवरून उठली. तुम्ही पण झोपा, आई. थोडा आराम करा, बाबा.

“सावकाश,पोरी. चल, मी तुला तुझ्या खोलीत घेऊन जाते.”

जेव्हा त्यांची बायको तिला सोडून परत आली तेव्हा कुमालो पोस्ट ऑफिसच्या पुस्तकाकडे बघत होते. तिच्याकडे ते देत ते म्हणाले, ह्यात, तुझ्याकडे आणि माझ्याकडे कधीही नव्हते एवढे पैसे आहेत.

तिने ते उघडलं आणि त्यातील रक्कम बघून तिला भरून आलं. हे आपले आहेत? तिने विचारलं.

“हो, आपले आहेत”, ते म्हणाले. ”आतापर्यंत भेटलेल्या सगळ्यात चांगल्या माणसाकडून ते भेट आलेले आहेत.”

“तू यातून नवीन कपडे घे, स्टीफन. नवीन काळे कपडे, नवीन पांढरी कॉलर आणि नवीन हॅट.”

“आणि तुझ्यासाठीही नवीन कपडे आणि स्टोव्ह”, ते म्हणाले. “बस, मी तुला सिमँगुबद्दल सांगतो आणि तिकडच्या बाकीच्या गोष्टींबद्दल.”

ती थरथरत बसली. मी ऐकतेय, ती म्हणाली.

2

कुमालोंनी न्दोत्शेनीच्या सुधारणेसाठी चर्चमध्ये प्रार्थना करायला सुरुवात केली. पण ते पुरेसं नाही हे त्यांना माहीत होतं. जगाच्या पाठीवर कुठेतरी लोकांनी एकत्र यायला पाहिजे, एकत्र बसून विचार करायला पाहिजे आणि काहीतरी कृती केली पाहिजे. आसपासच्या डोंगराळ भागावर नजर टाकल्यावर त्यांना काही करू शकणारी दोनच माणसं दिसली. एक म्हणजे मुखिया आणि दुसरा मुख्याध्यापक. मुखिया म्हणजे ढगळ सदरा, घट्ट सलवार घातलेली आणि थंड प्रदेशातील लोक घालतात तशी फरची हॅट घालणारी जाडजूड असामी होती. ते नेहमी घोड्यावरून सल्लागारांबरोबर फिरत असत. ते सल्लागार त्यांना काय सल्ला द्यायचे हे मात्र कोडेच होते. मुख्याध्यापक हे बारीक चणीचे गोल चष्मा लावणारे हसरे व्यक्तिमत्व होते. त्यांचे ऑफिस लाल निळ्या आणि हिरव्या रंगातल्या सूचनांनी भरलेले असायचे. मुत्सद्देगिरीचा भाग म्हणून कुमालोंनी पहिल्यांदा मुखियांना भेटायचं ठरवलं.

सकाळ सहन करण्याच्या पलीकडे तापली होती. आकाश निरभ्र होते आणि पावसाचा मागमूसही नव्हता. एवढा मोठा दुष्काळ तिथं आजपर्यंत कधीच आला नव्हता. थंडीचा मोसम असावा अशी झाडं निष्पर्ण झाली होती आणि जाड कातडीचे तळवे असलेली मुलंसुद्धा सावलीच्या शोधात एका झाडाकडून दुसऱ्या झाडाकडे पळत होती. जमातीतल्या सगळ्यात म्हाताऱ्या माणसालासुद्धा असा काळ पूर्वी कधी आल्याचं आठवत नव्हतं. कुणी जर गवतावरून चाललं तर ते असं चुरलं जायचं की जसं काही ते आगीत जळालेलं गवत आहे. आख्या खोऱ्यामध्ये एकही झरा वाहत नव्हता. वरच्या भागातसुद्धा गवत पिवळं पडलेलं होतं आणि वर आणि खाली कुठेही नांगरणीचं किंवा शेतीचं कुठलंही काम चालू नव्हतं. निर्दय आकाशातून सूर्य आगीचा रस ओतता होता. हाडं वर आलेली गुरं सुकलेल्या झऱ्यांच्या माळरानावरून आधीच कुरतडलेलं गवत पुन्हा पुन्हा खायचा केविलवाणा प्रयत्न करत होती.

कुमालो टेकडी चढून मुखियांच्या दारी आले आणि त्यांना थांबायला सांगितले गेले. त्यात विशेष असं काही नव्हतं. काहीही कारण नसताना आपण केवळ मुखिया आहोत म्हणून मुखिया कोणालाही वाट बघायला सांगू शकत होते. त्यांच्या मनात आलं असतं तर फक्त दात कोरतो आहे म्हणून किंवा खोऱ्याकडे एकटक बघत दिवास्वप्नात रमायचंय

म्हणूनही त्यांनी कुणाला वाट बघायला लावली असती. पण विश्रांती घ्यायला मिळाल्यामुळे कुमालोंना बरंच वाटलं. त्यांनी आपला कोट काढला आणि झोपडीच्या सावलीत बसून ते मुखियाची वाट बघू लागले. या उध्वस्त अवस्थेत दुसरं कोण मुखिया बनेल? खरी गोष्ट अशी होती की गोऱ्या लोकांनी मुखियांना पहिल्यांदा नेस्तनाबूत केलं आणि नंतर पुन्हा उभं करून त्यांच्या साम्राज्यातले काही तुकडे धरून बसायला लावलं. गोऱ्या लोकांनी त्यातले बरेचसे तुकडे आधीच लुटून नेले होते. काही मुखिया काहीच अर्थ नसलेल्या या दळभद्री राज्याच्या मिजाशीत बसायचे. अर्थात सगळेच तसे नव्हते. काहींनी गरिबांना मदत करण्याचा प्रयत्न केला होता, त्यांच्या मुलांना शाळेत पाठवलं होतं. आणि सरकारही त्यांना थोडीफार मदत करायचा प्रयत्न करत होतं, पण हे सगळं म्हणजे म्हाताऱ्याला दूध पाजून थोडे दिवसांनी तो तरणाबांड पुरुष होईल असा आभास निर्माण करण्यासारखं होतं.

विचार करता करता कुमालो स्वतःपाशी येऊन पोचले आणि जोहान्सबर्गला गेल्यापासून किती लांबचा प्रवास त्यांनी केला आहे हे त्यांच्या लक्षात आलं. त्या महानगरीने ज्याची सुरुवात झाली आहे आणि जे चालू राहायलाच हवे आहे अशा नवनिर्माणाविषयी त्यांचे डोळे उघडले होते. जोहान्सबर्गमध्ये कोणत्याही मुखियाशी संबंधित नसलेल्या अनेक नवीन गोष्टी घडत होत्या. ते विचार करत असतानाच त्यांना बोलावण्यात आलं आणि कुमालो जमातीच्या सध्याच्या शासकाशी बोलायला निघाले.

त्यांनी शक्य होईल तितक्या जास्तीत जास्त आदराने त्यांना अभिवादन केलं कारण मान सन्मानाच्या बाबतीत मुखिया किती आग्रही आहेत हे त्यांना माहीत होतं.

“तुम्हाला नेमकं काय हवंय ऊम्फुंडीस?”

“इंकोस*, मी जोहान्सबर्गला जाऊन आलो.”

“हो, माझ्या कानावर आलं आहे.”

“आपली खूप लोकं आहेत तिकडे, इंकोस.”

**इंकोस : झुलू भाषेत मालक किंवा मुखिया*

“अच्छा.”

“आणि माझ्या मनात असा विचार आला की त्यातली काही माणसं आपण आपल्या खोऱ्यात पुन्हा आणू शकलो तर चांगलं होईल.”

“अच्छा, आणि ते कसं करणार आपण?”

“जास्त उशीर होण्याच्या आत आपल्या जमिनीची काळजी घेऊन. शाळेत जमिनीची काळजी कशी घ्यायची हे शिकवून. म्हणजे काहीजणं तरी न्दोत्शेनीत टिकतील.”

मग मुखिया शांत होऊन विचारांत मग्न झाले, आणि विचारात मग्न झालेल्या मुखियाच्या विचारात अडथळा आणणे प्रथेला धरून नव्हते. कुमालोंच्या लक्षात आलं की काय उत्तर द्यायचं हेच मुखियांना कळत नाहीये. काहीतरी बोलण्याचा त्यांनी एक दोन वेळा प्रयत्न केला पण ते स्वतःशी बोलत होते की शब्दाची जुळवाजुळव करत होते, कोण जाणे पण ते बोलले नाहीत. कोणीतरी अचानक एखादा अवघड प्रश्न घेऊन येतो, ज्यावर त्याने अनेकदा विचार करूनही उत्तर सापडलेलं नसतं तेव्हा माणसाचं असंच होतं.

पण शेवटी एकदाचे ते बोलले, “मी ह्या अवघड प्रश्नावर अनेकदा विचार केला आहे.”

“हो, इंकोस.”

“आणि काय करायला हवं त्यावरही मी आधीच विचार केला आहे.”

“बरं, इंकोस.”

“आणि तुम्हीही तसाच विचार करताय हे बघून मला आनंद झाला.”

एवढं बोलून झाल्यावर पुन्हा शांतता पसरली आणि कुमालोंच्या लक्षात आलं की मुखियांना शब्दच सापडत नाहीयेत.

“ऊम्फुंडीस, तुम्हाला माहीतच असेल आपण अनेक वर्षांपासून ह्या गोष्टी शाळेत शिकवतोय. गोरा निरीक्षक आणि मी बरेचदा ह्या विषयावर शाळेत बोललोय.”

“हो, मला माहीत आहे इंकोस.”

“निरीक्षक पुन्हा लवकरच आपल्या इथं येणार आहे. त्याच्याशी बोलून आपण ह्या गोष्टी नक्की पुढे नेऊया.”

मुखियांनी आशादायी आणि प्रोत्साहक शब्द वापरले आणि जणू काही असे सुचवले की त्या दोघांनी मिळून तो अवघड प्रश्न यशस्वीपणे सोडवला आहे. कुमालोंच्या लक्षात आलं की ही बातचीत आता लवकरच गुंडाळली जाईल. तसं होऊ नये म्हणून धीर गोळा करून ते म्हणाले, “इंकोस?”

“बोला, ऊम्फुंडीस.”

“इंकोस, तुम्ही म्हणताय ते खरंय की गेल्या कित्येक वर्षांपासून ते ह्या गोष्टी शिकवतायत. तरीही जिथे ते शिकवतायत तो आपला भाग पाहून वाईट वाटतं. इथे गवत किंवा पाणी काहीही नाही. पाऊस पडतो तेव्हासुद्धा मका पुरुषभर उंचीचा होत नाही. इथे गुरं मरतायत आणि दूधही नाहीये. मालूसीची मुलगी मेली. कुलुसीचा मुलगा मरायला टेकलाय आणि आणखी कोणा कोणाला मरायला लागेल देवच जाणे.”

कुमालोंना समजलं की त्यांनी जरा कडक आणि कडू शब्दात सगळं सांगितलं आणि त्यात मुखियांची आशा आणि प्रोत्साहन करपून गेलं. आता नक्कीच मुखिया चिडतील, त्यांनी सांगितलं ते खोटं होतं म्हणून नाही तर कुमालोंनी बातचीत यशस्वीपणे संपली हे मान्य केलं नाही म्हणून.

“दुष्काळ आलाय, ऊम्फुंडीस. तुम्ही हे विसरू नका, की दुष्काळ आलाय.”

“मी विसरलो नाहीय, इंकोस.” कुमालो आदरपूर्वक म्हणाले. “पण दुष्काळ असो वा नसो गेली अनेक वर्षं हीच परिस्थिती आहे.”

बोलायला शब्द नसल्यासारखे मुखिया पुन्हा शांत झाले. रागाने बोलून विषय संपवण्याचा विचार त्यांच्या मनात आलासुद्धा पण समोरचा माणूस पाद्री असल्यामुळे ते तेवढं सोपं नव्हतं.

“मी मॅजिस्ट्रेटना जाऊन भेटतो, पण खरं तर तुम्ही जे बघताय ते मीही कधीचं बघतोय.”

आपली बाजू वरचढ राहावी यासाठी आपण आधी जे बोललो ते त्यांनाच पुरेसं वाटलं नाही की काय कुणास ठाऊक पण ते पुन्हा बोलले.

“तुम्हाला माहित नसेल, पण मी आधीही एकदा त्यांना जाऊन भेटलोय.”

काहीतरी गहन विचार करतोय असा चेहरा करून ते बसून राहिले. आता ह्यापुढे काही बोलणं होणार नाही हे कुमालोंना माहीत होतं म्हणून त्यांनी थोडीशी हालचाल केली की जेणेकरून मुखियांना कळावं की ते आता निघू बघतायत. वाट बघत असताना त्यांनी बघितलं मुखियांच्या मागे उभे असलेले सल्लागार देखील गोंधळल्या मनस्थितीत कपाळावर आठ्या घालून आहेत कारण त्यांच्याकडे द्यायला काहीच सल्ला नाहीये. दुभंगलेल्या जमातीचे सल्लागार बाकी सगळ्या विषयावर सल्ले देऊ शकतात पण जमातीच्या दुभंगण्याच्या कारणांसाठी सल्ला देऊ शकत नाहीत.

दमून गेलेले मुखिया कसेबसे उठले आणि त्यांनी कुमालोंशी हस्तांदोलन केले. मी मॅजिस्ट्रेटना जाऊन भेटतो, ते म्हणाले. सावकाश जा ऊम्फुंडीस.

“नीट रहा, इंकोस.”

कुमालो डोंगर उतरले आणि चर्च येईपर्यन्त कुठेही थांबले नाहीत. तिथे जाऊन त्यांनी मुखियांसाठी आणि न्दोत्शेनीच्या सुधारणेसाठी प्रार्थना म्हटली. लाकूड आणि लोखंडाची ती इमारत भट्टीसारखी गरम झाली होती आणि त्यांचा उत्साह मावळत होता. त्यांच्यातली आशा तळपत्या उन्हात वितळून चालली होती. म्हणून त्यांनी अगदी थोडक्यात प्रार्थना म्हटली. तुझ्या हातात देवा, न्दोत्शेनी तुझ्या हातात दिली आहे. जराही विश्रांती न घेता ते पुन्हा तेवढ्या कडक उन्हात मुख्याध्यापकांना भेटायला शाळेत गेले.

शाळेतसुद्धा त्यांच्या वाट्याला निराशाच आली. मुख्याध्यापक नम्र आणि मदत करायला तत्पर होते. त्यांनी कामाच्या वेगवेगळ्या योजना आणि फुलांची आणि बियांची चित्रं आणि वेगवेगळ्या मातींचे नमुने दाखवले. शाळेत मुलांचं आयुष्य आणि समाजजीवन ह्यांची कशी सांगड घातली जाते ते मुख्याध्यापकांनी त्यांना समजावून सांगितलं. त्यांनी पिटरमॅरिट्झबर्ग मधील कार्यालयातून या संदर्भात आलेली सगळी परिपत्रकंही दाखवली आणि तळपत्या उन्हात कुमालोंना शाळेची बाग दाखवायला घेऊन गेले. बागेची अवस्था अतिशय दयनीय होती. पाण्याचा एक टिपूसही नसलेल्या त्या बागेवर मृत्यूचं सावट होतं. तिथे तात्विक चर्चा तर होत होती पण कोणतंही काम साकारलेलं दिसत नव्हतं. सगळा नुसता शब्दांचा खेळ होता. पण फक्त शब्दांचा खेळ तरी कसा म्हणावा? बागेप्रमाणे संपूर्ण परिसर मृत्यूच्या सावटाखाली होता. खोरं मरायला टेकलं होतं, खोऱ्यातली मुलंही मरायला टेकली होती.

न्दोत्शेनीत मुलं कशी टिकवता येतील असा प्रश्न कुमालोंनी मुख्याध्यापकांना विचारला. ह्याहून जास्त काही करण्याची ताकद शाळेत नाही असं सांगत मुख्याध्यापकांनी त्यांच्याकडे ह्याचं उत्तर नसल्याचं कबूल केलं. कुमालो पुन्हा चालत चर्चकडे आले. विमनस्क अवस्थेत ते बराच वेळ तिथेच बसून राहिले. एझेन्झेलेनीला जन्मतः अंधार सहन कराव्या लागणाऱ्यांच्या डोळ्यातील तेजाने ते दिपून गेले होते. त्यातून मिळालेली उभारी आजच्या घटनांनी झाकोळून गेली. धर्मोपदेशक त्याच्या आजूबाजूची जागाही त्याच्या लोकांना राहण्यासाठी आणि त्यांच्या मुलाबाळांना शिकण्यासाठी सुधारु शकत नाही का? ते आता जास्तच म्हातारे झालेत का? काही सकारात्मक करण्याच्या लायक उरले नाहीत का? की त्यांना जो दृष्टीकोन वाटत होता ती एक फसवी भ्रांत होती? इथलं सगळं सुधारणेच्या पलिकडचं झालंय का? इतर कोणी नाही पण दैवी शक्ती मात्र चमत्कार करू शकते. त्यांनी पुन्हा एकदा प्रार्थना करायला सुरुवात केली. परमेश्वरा, मी आमचे भविष्य, ह्या न्दोत्शेनीचे भवितव्य तुझ्या स्वाधीन करत आहे.

ते घरी गेले आणि तिथे तेवढया उकाड्यात चर्चचा हिशोब तपासू लागले. जमाखर्च बघत असतानाच घोड्यांच्या टापांचा आवाज ऐकू येऊ लागला आणि त्यांच्या चर्चच्या बाहेर तो आवाज थांबला. ते खुर्चीतून उठले आणि इतक्या कडक उन्हात घोड्यावरून कोण आलं आहे ते बघू लागले. लाल घोड्यावरील एक गोरा छोटा मुलगा बघून काही क्षण आश्चर्याने त्यांना काहीच सुचेना. खूप वर्षं आधी असाच घोड्यावरून फिरणारा दुसरा गोरा मुलगा, वीज चमकून जावी तसा त्यांना आठवून गेला.

तो छोटा मुलगा गोड हसला आणि आपली हॅट उंचावून त्यांना गुड मॉर्निंग म्हणाला. सुखावलेल्या कुमालोंना ह्या गोऱ्या मुलाला काहीच रीतीरिवाज माहीत नसल्याचे आश्चर्य वाटले.

"गुड मॉर्निंग इंकोसान*, इतके कडक ऊन असताना घोडेस्वारी?"

"मला काही हे ऊन इतकं कडक वाटत नाहीये. हे तुमचे चर्च आहे का?"

"हो, हे आमचं चर्च आहे."

"मी सेंट मार्कच्या चर्चच्या शाळेत जातो. आमची शाळा जोहान्सबर्गमधील सगळ्यात चांगली शाळा आहे. तिथे चॅपेल पण आहे."

"सेंट मार्कच्या चर्च मध्ये स्वागत." कुमालोंनी उत्साहात म्हटले. "हे चर्च ही सेंट मार्कचे आहे. पण तुमचे चॅपेल हयापेक्षा खूप चांगले असेल ना?"

इंकोसान : छोटे मालक

"अं. हो, ते जास्त चांगले आहे." मुलगा हसत म्हणाला. "पण ते शहरात आहे ना. हे तुमचं घर आहे का?"

"हो, हे माझं घर आहे."

"मला आतून बघायला मिळेल? मी कधीच धर्मोपदेशकाचे घर बघितलेले नाही, खरं तर काळ्या धर्मोपदेशकाचे घर."

"इंकोसान, तुझे स्वागत आहे माझं घर बघायला."

तो छोटा मुलगा झटकन घोड्यावरून उतरला आणि चर्चमध्ये येणाऱ्या लोकांच्या घोड्यांसाठीच्या खांबाला त्याने आपला घोडा बांधला.

दाराबाहेरच्या पायपुसण्यावर त्याने आपले पाय झटकले आणि हॅट हातात घेऊन तो घरात शिरला.

"हे घर खूप छान आहे, ते इतकं छान असेल असं मला वाटलं नव्हतं."

सगळी घरं अशी नसतात." कुमालो हळुवारपणे म्हणाले. "पण पाद्र्याला त्याचे घर नीट ठेवावे लागते. तू कदाचित आणखी कोणाची घरं बघितलीस का?"

"हो, बघितली. माझ्या आजोबांच्या शेतावर. ती एवढी चांगली नाही वाटली मला. इथे तुमचं काम चालू होतं का?"

"हो, इंकोसान."

"ते गणितासारखं दिसतय."

"ते गणितच आहे, तो चर्चचा हिशोब आहे."

"चर्चमध्ये पण हिशोब असतो? मला वाटलं होतं हिशोब फक्त दुकानातच असतो."

आणि कुमालो जोरात हसले. एकदा हसले आणि थांबून पुन्हा एकदा हसले. लहान मुलाने तुम्ही का हसताय असं विचारलं आणि रागावण्याऐवजी तोही हसू लागला.

“मी उगाच हसतोय, इंकोसान.”

“इंकोसान? म्हणजे छोटे इंकोस, बरोबर ना?”

“बरोबर, छोटे इंकोस म्हणजे छोटे मालक.”

“हो, मला माहित्ये. तुम्हाला काय हाक मारतात? मी तुम्हाला काय हाक मारू?”

“ऊम्फुंडीस.”

“अच्छा, ईम्फुंडीस.”

“नाही, ऊम्फुंडीस.”

“ऊम्फुंडीस. ह्याचा अर्थ काय?”

“ह्याचा अर्थ पाद्री.”

“मी बसू का ऊम्फुंडीस?” त्याने शब्द चुकू नये म्हणून हळू हळू उच्चारला. “बरोबर बोललो ना?”

कुमालोंनी हसू दाबून धरले. “अगदी बरोबर. तुला पाणी देऊ का प्यायला? तू खूप तापला आहेस.”

“मला दूध प्यायला आवडेल. फ्रीजमधलं गारेगार दूध.”

“इंकोसान, न्दोत्शेनीत फ्रीज नाही.”

“मग साधं दूधही चालेल, ऊम्फुंडीस.”

“इंकोसान, न्दोत्शेनीत दूध नाही.”

छोट्या मुलाला कमाल वाटली. “मला पाणी हवं, ऊम्फुंडीस.”

कुमालोंनी त्याच्यासाठी पाणी आणलं. तो पाणी पीत असतानाच त्यांनी त्याला विचारलं, “अजून किती दिवस तू इथे राहणार आहेस, इंकोसान?”

“आता थोडेच दिवस राहिलेत, ऊम्फुंडीस.”

तो घोट घोट पाणी पीत राहिला आणि मग म्हणाला, आता आम्हाला खरंतर सुट्ट्या नाहीयेत, आम्ही वेगळ्या कारणासाठी इथे आहोत.

झटका बसल्यासारखे कुमालो उभे राहिले आणि अरे माझ्या अनाथ झालेल्या बाळा, मला माहीत आहे ते कारण असं काहीतरी त्यांच्या मनात येऊन गेलं.

“पाणी म्हणजे अमान्झी नं, ऊम्फुंडीस.”

कुमालोंनी काहीच उत्तर न दिल्यामुळे त्याने पुन्हा हाक मारली, ऊम्फुंडीस.

आणि पुन्हा एकदा, ऊम्फुंडीस.

“बोल माझ्या बाळा.”

“पाणी म्हणजे अमान्झी ना, ऊम्फुंडीस.”

कुमालोंनी स्वतःला हलवून तंद्रीतून बाहेर पडावे म्हणून वाट बघत असलेल्या त्या निष्पाप चेहऱ्याकडे बघून कुमालो हसले. “बरोबर आहे, इंकोसान.”

“आणि घोडा म्हणजे इहाशी?“

“अगदी बरोबर.”

“आणि घर म्हणजे इकाया?”

“हे ही बरोबर.”

“आणि पैसे म्हणजे इमाली?”

“बाप रे, हे पण बरोबर.”

“आणि मुलगा म्हणजे उम्फाना?”

“शाबास!”

“आणि गाय म्हणजे इंकोमो?”

कुमालो मोठमोठ्याने हसले. अरे थांब, थांब. ते म्हणाले. मला श्वास तरी घेऊ दे. धाप लागल्याचे सोंग करत त्यांनी मोठ्या मोठयाने श्वास घेतला, खुर्चीवर बसले आणि आपले कपाळ पुसले.

“तू लवकरच झुलू बोलायला लागशील.”

“झुलू सोप्पी आहे. किती वाजले ऊम्फुंडीस?”

"बारा वाजले, इंकोसान."

"अच्छा! मी आत्तापर्यंत पोचायला पाहिजे होतं. पाणी दिल्याबद्दल धन्यवाद, ऊम्फुंडीस."

छोटा त्याच्या घोड्याजवळ गेला. मला वर चढवा ना, तो म्हणाला. कुमालोंनी त्याला वर चढवले आणि तो मुलगा म्हणाला मी परत येईन तुम्हाला भेटायला, ऊम्फुंडीस. येईन तेव्हा आणखी झुलू बोलीन.

कुमालो हसले. नक्की ये, मी तुझी वाट बघीन, ते म्हणाले.

"ऊम्फुंडीस?"

इंकोसान?"

"न्दोत्शेनीत दूध का नाहीये? लोक गरीब आहेत म्हणून?"

"हो, इंकोसान."

"मग मुलं काय करतात?"

कुमालोने त्याच्याकडे बघितलं. ती मरतात, बाळा, ते म्हणाले. त्यांच्यातले काहीजण तर आत्ताच मरायला टेकलेत.

"कोण मरायला टेकलाय?"

"कुलूसचं छोटं बाळ."

"मग डॉक्टर नाही का आले?"

"हो, येऊन गेले."

"ते काय म्हणाले?

ते म्हणाले, "बाळाला दूध मिळायला हवं, इंकोसान."

"आणि त्याचे आई बाबा काय म्हणाले?"

ते म्हणाले, "डॉक्टर, तुम्ही काय म्हणालात ते ऐकलं आम्ही ."

छोटा मुलगा बारीक आवाजात म्हणाला, अच्छा. त्याने त्याची हॅट उंचावली आणि गुड बाय, ऊम्फुंडीस असं गंभीरपणे म्हणाला. तसाच उदासपणे तो निघाला. लोक त्याला बघत होते आणि धूळ उडवणाऱ्या तापलेल्या रस्त्यावर त्याचा घोडा चौखूर उधळला होता.

**

रात्र थोडा गारवा आणि शांतता घेऊन आली. जेव्हा कुमालो, त्यांची बायको, ती मुलगी आणि तो छोटा मुलगा जेवत होते तेव्हा चाकांचा आवाज झाला आणि लगेचच दारावर टकटक झाली. त्यांचा मित्र हातात पिशव्या घेऊन आत आला.

"ऊम्फुंडीस, मदर."

"ये मित्रा, जेवतोस का थोडं?"

"नको, नको. मी घरीच चाललोय. मला तुम्हाला एक निरोप द्यायचाय."

"मला?"

"हो, उजार्विस कडून. छोटा गोरा मुलगा आज इकडे आलेला का?"

आपण काहीतरी चुकीचं केलंय ह्याची पहिल्यांदा जाणीव होऊन कुमालोंच्या चेहऱ्यावर भीतीची सूक्ष्म रेष उमटली.

"हो, तो आला होता इथे." ते म्हणाले.

"आम्ही झाडांमध्ये काहीतरी काम करत होतो तेवढ्यात तो घोड्यावर दौडत आला. मला इंग्रजी येत नाही, ऊम्फुंडीस, पण कुलूसच्या बाळाबद्दल ते काहीतरी बोलत होते. बघा मी काय आणलंय."

बाहेर बैलगाडीमध्ये चकाकणाऱ्या किटल्यांमध्ये दूध होतं.

"हे दूध फक्त अजून शाळेत न जाणाऱ्या लहान बाळांसाठी आहे. आणि ते तुम्हीच सगळ्यांना द्यायचंय. ह्या गोणी किटलीभोवती गुंडाळायच्या, येणाऱ्या प्रत्येक मुलाने त्याच्या भांड्यात पाणी घेऊन यायचं, ते पाणी ह्या गोणींवर टाकायचं आणि दूध घेऊन जायचं. आणि रोज सकाळी जाताना मी त्या रिकाम्या किटल्या घेऊन जाईन. आपल्याकडे पुन्हा गवत यायला लागेपर्यंत आणि पुन्हा आपल्याला दूध मिळायला लागेपर्यंत रोज मी दूध आणत जाईन."

त्याने बैलगाडीतून किटल्या बाहेर काढल्या आणि विचारलं, ह्या कुठे ठेऊ, ऊम्फुंडीस? पण कुमालो काहीच न कळल्यासारखे गप्प उभे होते. मग त्यांची बायकोच म्हणाली चर्चमध्ये ऊम्फुंडीसची खोली आहे ना, तिथे ठेऊया. म्हणून त्यांनी त्या तिथे जाऊन ठेवल्या आणि परत गाडीकडे येताना त्या माणसाने कुमालोंना म्हटले, मला खात्री आहे तुमच्याकडे नक्कीच उजार्विसना द्यायला काहीतरी निरोप असेल. कुमालो अडखळले आणि तोतरेपणामुळे काहीच न बोलता त्यांनी फक्त आकाशाकडे बोट दाखवलं. तो माणूस म्हणाला देव त्यांचं भलं करो असं म्हणायचंय ना तुम्हाला? कुमालोंनी मान हलवली.

तो माणूस पुढे म्हणाला. मी त्यांच्याकडे काम करून आठवडाच झालाय पण त्यांनी जरी मला जीव द्यायला सांगितला तरी मी देईन.

तो बैलगाडीत चढला आणि त्याने दावं हातात घेतलं. तो गप्पा मारायला अक्षरशः सुटला होता. तो उत्साहाने म्हणाला, मला असं बैलगाडीतून आलेलं बघून माझ्या बायकोला वाटेल की त्यांनी मला मॅजिस्ट्रेटच बनवलंय. त्यावर सगळेच हसले. कुमालोही तंद्रीतून बाहेर आले आणि हसले. इतका साधा मॅजिस्ट्रेट आणि तोही बैलगाडीतून आलाय ह्या विचाराने कुमालोना पुन्हा हसू फुटले. कुलूसचं बाळ आता जिवंत राहू शकेल ह्या आनंदाने आणि हाय प्लेसवरच्या त्या गंभीर माणसाच्या विचाराने ते स्वतःशीच हसत राहिले. हसून हसून डोळ्यात पाणी आलेल्या अवस्थेतच ते घरात शिरले, आणि त्यांची बायको त्यांच्याकडे आश्चर्याने बघत राहिली.

एक मुलगा दुकानातून चार पत्रं शाळेत घेऊन आला आणि मुख्याध्यापकांनी ती पत्रं ऊम्फुंडीसच्या घरी पाठवून दिली. चारही पत्रं जोहान्सबर्गहून आली होती. एक अब्सालोमचं त्याच्या बायकोसाठी, दुसरं त्याच्या आई-बाबांसाठी होतं. दोन्ही पत्रं प्रिटोरियाच्या तुरुंगातून आली होती. तिसरं पत्र सिमँगुने पाठवलं होतं आणि चौथं मि. कारमिशेल यांचं होतं. ते पत्र त्यांनी घाबरत घाबरत उघडलं, कारण ते देवासाठी खटला लढवणाऱ्या वकिलांचं होतं आणि त्यात दया अर्जाबद्दल लिहिलं असण्याची शक्यता होती. वकिलांनी हळुवार आणि करुणामय शब्दांत दया मिळणार नाही आणि ह्या महिन्याच्या पंधरा तारखेला त्यांच्या मुलाला फाशी देण्यात येईल असं कळवलं होतं. म्हणून दुसरं काही न वाचता ते तासभर, कदाचित दोन तास नुसतेच बसून राहिले. त्यांना काही दिसतही नव्हतं आणि काही ऐकूही येत नव्हतं. कितीतरी वेळानंतर त्यांची बायको त्यांच्याजवळ आली तेव्हा तिला पत्रं दिसली आणि ती म्हणाली, पत्रं आली का, स्टीफन.

जेव्हा त्यांनी नुसतीच मान हलवली तेव्हा ती म्हणाली, आण इकडे, बघू दे मला, स्टीफन. थरथरत्या हाताने त्यांनी ते पत्र तिला दिलं, तिच्या गर्भातून आलेल्या आणि तिच्या स्तनांवर पोसलेल्या तिच्या बाळाविषयीचं पत्रं ती वाचत असतांना ते शून्य नजरेने तिच्याकडे बघत राहिले. ती मात्र त्याच्यासारखी बराच वेळ बसून राहिली नाही. ती उठली आणि म्हणाली, असं काही न करता बसून राहणं चांगलं नाही. पत्रं वाचून घे आणि कुलूसच्या मुलाला आणि आजारी आहे त्या एलिझाबेथला बघायला जा. मलाही घरात बरीच कामं पडलीयेत.

“आणखीही पत्रं आहेत.” ते म्हणाले.

“त्याच्याकडून आलेली?” तिने विचारलं.

“हो.”

त्याने ते तिला दिलं. ती बसली आणि तिने ते काळजीपूर्वक उघडलं आणि वाचलं. तिचा चेहरा वेदनांनी झाकोळला. पण त्यांना तिच्या वेदना दिसल्या नाहीत. ते खाली जमिनीकडे नजर लावून बसले होते. पण त्यांना जमीनही दिसत नव्हती. खरं म्हणजे

त्यांना काहीच दिसत नव्हतं आणि ह्या खोऱ्यात येण्यापूर्वी ज्या व्यथेच्या कोषात ते असत त्यात ते पुन्हा खोल गुरफटलेले गेले."

"स्टीफन." ती जोरात बोलली.

त्यांनी तिच्याकडे बघितलं.

"घे, लवकर वाच आणि मग आपण आपल्या कामाला लागूया."

त्यांनी ते पत्र घेतलं आणि वाचायला सुरवात केली.

प्रिय आई आणि बाबा,

मला अशी आशा आहे की तुमची सगळ्यांची तब्बेत चांगली असेल. आज सकाळी त्यांनी मला सांगितलं की माझा दया अर्ज रद्द झाला आहे. म्हणजे मी आता तुम्हाला किंवा न्दोत्शेनीला पुन्हा कधीच बघू शकणार नाही.

ही जागा चांगली आहे. मला कोठडीत ठेवलं आहे आणि कोणीही माझ्या जवळ येऊन माझ्याशी बोलू शकत नाही. पण मी धुम्रपान करू शकतो, वाचू शकतो आणि पत्रंही लिहू शकतो. गोरी माणसं मला शिवीगाळही करत नाहीत.

प्रिटोरियाचा एक काळा धर्मोपदेशक मला भेटायला येतो. तो माझ्याशी चांगलं बोलतो. तो माझी तयारी करून घेत आहे.

आणखी सांगण्यासारखं काही नाही, म्हणून मी हे पत्र संपवतो. मी न्दोत्शेनीतल्या तुम्हा सगळ्यांचा विचार करत असतो. मला जर परत यायची संधी मिळाली असती तर मी पुन्हा कधीच न्दोत्शेनी सोडलं नसतं.

माझ्या मुलाचा जन्म झाला का? जर तो मुलगा असेल तर त्याचं नाव पिटर ठेवलंत तर मला आवडेल. मॅथ्यू आणि जोहान्नेसच्या खटल्याचं काय झालं? त्या खटल्याच्या सुनावणीच्या वेळी पुरावा द्यायला मला एकदा नेलं होतं पण मला फार वेळ तिथे थांबू दिलं नाही. बाबा, तुम्हाला माझ्या पोस्ट ऑफिसच्या पुस्तकातले पैसे मिळाले का?

तुमचा मुलगा,

अब्सालोम.

“स्टीफन, आता आपण कामाला लागायचं?”

“हो, ते बरं होईल. पण मला अजून सिमँगुचं पत्रं वाचायचंय. आणि हे पत्र आपल्या मुलीसाठी आहे.”

“दे, ते पत्र मी घेऊन जाते. वाचून घे तुझं पत्रं आणि मला सांग तू कुलूसच्या घरी जाणार आहेस का?”

“हो, निघतोय.”

“आणि पुढे दुकानात जायला तुला खूप त्रासाचं होईल का?”

“ते बघ, किती ढग आलेत.” ते म्हणाले.

ती त्यांच्याजवळ जाऊन उभी राहिली आणि उम्झीकुलू खोऱ्याच्या दुसऱ्या बाजूने जमा झालेले ते काळे ढग पाहू लागली.

“पाऊस पडेल असं दिसतंय. बरं, तू मला दुकानात जायला का सांगत होतीस? काही महत्वाचं आणायचंय का?”

“मला काही आणायचं नाहीये, स्टीफन. पण मला असं वाटलं की तू दुकानात जाऊन तिथल्या त्या गोऱ्या माणसाला सांगावं की प्रिटोरिया मध्यवर्ती कारागृह असा शिक्का असलेली पत्रं असतील तर ती त्याने तुला खाजगीमध्ये द्यावी. आपली लाज आपल्याजवळ.”

“हो,हो. मी नक्की त्यांना जाऊन तसं सांगतो.”

“मग वाचून घे तुझं पत्रं.”

त्यांनी सिमँगुचं पत्र उघडलं. त्यात त्याने जोहान्सबर्गमधल्या बऱ्याच वेगवेगळ्या बातम्यांबद्दल लिहिलं होतं. वाचताना त्यांना जाणवलं की त्या अजस्त्र शहराबद्दल एक सूक्ष्म ओढ त्यांच्या मनात निर्माण झाली आहे. कित्येक दिवसांच्या तळपत्या उन्हानंतर आकाशात ढग दिसणं उत्साहाचं होतं, म्हणूनच जेव्हा त्यांचं वाचून झालं तेव्हा ते ढग बघायला बाहेर पडले. त्यातले एक दोन ढग अगदी त्यांच्या डोक्यावरून जात होते आणि त्यांच्या भल्या थोरल्या सावल्या खोऱ्यात पडल्या होत्या. ते डोंगर माथ्याच्या अलीकडे

हळू हळू पुढे सरकत होते आणि उताराच्या पुढे वेगाने जात होते आणि नाहीसे होत होते. वातावरण कोंदट आणि दमट झाले होते. आता लवकरच ढगांचा गडगडाट उम्झीकुलूला व्यापून टाकेल आणि एकदाचं दुष्काळी वातावरण बदलेल.

ते बाहेर उभे होते तेवढयात एक कार कॅरिसब्रुकहून खोऱ्याच्या दिशेने उतरताना त्यांना दिसली. हे क्वचित कधीतरी दिसणारं दृश्य होतं. इथले रस्ते कारसाठी नाही तर बैलगाडी, माल वाहून नेणारी उघडी गाडी, आणि गायी गुरांसाठी बनवले आहेत. चर्चपासून थोड्या अंतरावर एक गोरा माणूस घोड्यावर बसून होता हे त्यांनी बघितलं. तो माणूस कारची वाट बघतोय असं वाटत होतं आणि एकदम त्यांना लक्षात आलं की ते जार्विस आहेत. एक गोरा माणूस कार मधून बाहेर आला आणि त्यांना आणखी आश्चर्य वाटलं कारण ते मॅजिस्ट्रेट होते. काल रात्री मॅजिस्ट्रेट ह्या शब्दाने झालेली चेष्टा त्यांना आठवली आणि एकदम हसू फुटलं. जार्विस घोड्यावरून उतरले आणि त्यांनी मॅजिस्ट्रेटशी हस्तांदोलन केलं. कार मधून आणखी काही गोरी माणसं हातात बऱ्याच काठ्या आणि झेंडे घेऊन उतरत होती. आणि हे काय! दुसऱ्या बाजूने हॅट घातलेले मुखिया आपल्या सल्लागाराला घेऊन घोड्यावरून आले. त्यांनी मॅजिस्ट्रेटना सलाम केला, मॅजिस्ट्रेटनी त्यांना सलाम केला आणि आणखीही बरेच नमस्कार झाले. ते सगळे तिथेच थांबून गप्पा मारू लागले, यावरून एवढं नक्की होतं की काहीतरी कारण काढूनच सगळे भेटले आहेत. इथे तिथे बोटं दाखवत ते बोलत होते. तेवढ्यात एका सल्लागाराने एक सरळ फांद्या असलेलं छोटं झाड तोडलं. त्यांच्या फांद्यांचे सारख्या मापाचे तुकडे केले आणि त्या काठ्यांच्या एका बाजूला टोकंही केली. कुमालोंना मोठंच आश्चर्य वाटत होतं. गोऱ्या माणसांनी कार मधून आणखी काठ्या आणि झेंडे काढले आणि त्यांच्यापैकी एकाने तीन पाय आणि त्यावर एक चौकोन असलेलं फोटो काढण्यासाठी असतं तसलं काहीतरी बसवलं. जार्विसनी काही काठ्या आणि झेंडे हातात घेतले. उकडत असल्यामुळे मॅजिस्ट्रेटनी आपला कोट काढला आणि त्यांनीही काही काठ्या आणि झेंडे हातात घेतले. त्यांनी ढगांकडे बोट दाखवलं आणि जार्विसनी आल्यासारखा वाटतोय खरा असं म्हटलं.

आपण वेगळे वाटायला नको म्हणून मुखियांनी पण घोड्यावरून उतरून हातात काठ्या आणि झेंडे घेतले. पण कुमालोंना इथूनच दिसत होतं की मुखियांना त्यांचं नेमकं काय करायचं काहीच कळत नव्हतं. जार्विस मात्र यात एकदम माहीर दिसत होते आणि ह्या कृतीची सूत्रं त्यांच्याकडे असावीत असं वाटत होतं. त्यांनी एक काठी जमिनीत रोवली. ते बघून मुखियांनी एक काठी सल्लागाराच्या हातात दिली आणि त्याला काहीतरी

सांगितलं. म्हणून सल्लागारानेपण एक काठी जमिनीत रोवून टाकली, पण तीन पाय आणि वरती एक चौकोन असं काहीतरी घेऊन असलेला माणूस म्हणाला, नाही, नाही, तिथे नाही, तिथे नाही, ती काठी काढून टाका. सल्लागाराने गोंधळून मुखियाकडे बघितलं आणि मुखियाही नाही, नाही तिथे नाही, ती काठी काढून टाक असं जोरात ओरडले. अजून काय चाललंय ते नीट न कळलेले मुखिया खजील झाले आणि काठ्या लावण्याचं काम गोऱ्या लोकांवर सोपवून आपल्या घोड्यावर येऊन बसले.

तासभर गेला आणि मैदानावर काठ्या व झेंड्यांची एक रचना तयार झाली. कुमालो मंत्रमुग्ध होऊन बघत राहिले. जार्विस आणि मॅजिस्ट्रेट एकत्र उभे राहिले आणि ते डोंगर आणि दरीकडे आळीपाळीने बोटं दाखवत राहिले. मग ते मुखियाशी बोलले आणि सल्लागारांनीही अगदी गंभीरपणे त्यांचं बोलणं ऐकलं. जार्विस हे तर खूप लांबचं होईल असं काहीतरी बोलताना कुमालोंनी ऐकलं. मॅजिस्ट्रेटने आपले खांदे झटकले अशा कामांना इतका वेळ तर लागतोच असं उत्तर दिलं. मग जार्विस म्हणाले, मी प्रिटोरियाला गेलो तर तुमची काही हरकत नाही ना? मॅजिस्ट्रेट म्हणाले, माझी काहीच हरकत नाही. तुम्ही गेलात तर कदाचित काम थोडं लवकर होऊ शकेल. मग जार्विस म्हणाले तुमच्याशी मला भरपूर वेळ बोलायला आवडलं असतं पण जर तुम्हाला न भिजता घरी जायचं असेल तर तुम्हाला आता निघायला हवं. हे साधंसुधं वादळ नसेल.

पण जार्विस स्वतः मात्र निघाले नाहीत. त्यांनी मॅजिस्ट्रेटना निरोप दिला आणि स्वतः उजाड शेतातून टांगा टाकत अंतरं मोजत राहिले. ह्यांचं डोकं जरा फिरलंय, मी ऐकलंय की काही दिवसांत ह्यांच्याकडे काहीच पैसे उरणार नाहीत, मॅजिस्ट्रेटनी एका गोऱ्या माणसाला सांगताना कुमालोंनी ऐकलं.

मग मॅजिस्ट्रेटनी मुखियांना सांगितलं की ह्या काठ्या आणि झेंडे कुणीही काढणार नाही ह्याकडे तुम्हाला लक्ष द्यावे लागेल. त्यांनी मुखियांचा निरोप घेतला आणि ते व इतर गोरी मंडळी कारमध्ये बसली आणि निघाली. ह्या काठ्यांना आणि झेंड्यांना हात लावायचा नाहीये अशी सक्त ताकीद आजूबाजूच्या सगळ्यांना द्यायला मुखियांनी त्यांच्या सल्लागारांना सांगितलं. सल्लागार मग वेगवेगळ्या दिशेने आजूबाजूच्या झोपड्यात निरोप द्यायला गेले. मुखिया चर्चवरून आपल्या घरी जायला निघाले. मधेच बाहेर उभ्या असलेल्या कुमालोंचं अभिवादन त्यांनी स्वीकारलं पण काठ्या आणि झेंडे हे काय प्रकरण आहे ते काही न सांगता ते पुढे निघून गेले.

हे साधंसुधं वादळ नसेल असं जार्विस म्हणाले ते अगदी खरं होतं. संपूर्ण खोऱ्यात काळोख आणि भीती पसरली होती. ढगांची सावली आता शेतांवर दिसत नव्हती कारण आता सगळीकडे अंधारच अंधार होता. उम्झीकुलूच्या दुसऱ्या बाजूला वादळ सुसाट झालेलं दिसत होतं आणि एवढ्यातच विजा कोसळताना दिसतील असं वाटायला लागलं. एकदाचा पाऊस यावा ह्याचीच तर सगळे वाट बघत होते. बायका चटचट पावलं उचलत घराकडे निघाल्या. रस्त्यात इकडे तिकडे कुठेही भटकू नका, शिक्षकांनी आणि मुख्याध्यापकांनी मुलांना बजावलं आणि कलकलाट करत पोरं शाळेतून बाहेर उधळली.

अशी वादळं बघण्यासारखी असतात. गडद काळ्या रंगाचे भल्या थोरल्या ढगांचे जत्थे उम्झीकुलूवर पसरले होते. कुमालो बराच वेळ ते दृश्य पाहत राहिले. ढगांच्या टक्करीतून जोरदार आवाज झाला आणि जमिनीच्या दिशेने विजा कडकडू लागल्या. न्दोत्शेनीच्या खोऱ्यात वाऱ्याने थैमान घातलं. सगळीकडे धूळच धूळ उडू लागली. काळोख आणखी गडद झाला आणि उम्झीकुलूपासून जरा लांबचे डोंगरही दिसेनासे झाले. जार्विस कुंपणाजवळ बांधलेल्या आपल्या घोड्याकडे धावत येताना त्यांना दिसले. बरेच प्रयत्न करून झाल्यावर ते लगाम आणि खोगीर काढून काहीतरी पुटपुटले आणि त्यांनी घोड्याला मोकळे केले. नंतर कुमालोंच्या दिशेने ते भराभर चालत आले आणि त्यांना हाक मारली, “ऊम्फुंडीस.”

“उम्नूमझान, आपण!”

“ह्या गोष्टी पडवीत ठेऊन मी तुमच्या चर्चमध्ये गेलो तर चालेल का?”

“अगदी अवश्य, उम्नूमझान. मीही तुमच्याबरोबर येतो.”

ते चर्चमध्ये शिरतात न शिरतात तोच ढगांचा एकच गडगडाट झाला आणि तुफान पावसाचा आवाज त्यांना ऐकू येऊ लागला. क्षणार्धात कान फुटावे इतक्या मोठ्या आवाजात छपरावर पावसाची तडतड सुरु झाली आणि काही बोलणं अशक्य होऊन बसलं. कुमालोंनी चर्चमधला दिवा लावला आणि जार्विस तिथल्या एका बाकड्यावर स्तब्धपणे बसून राहिले.

पण थोड्या वेळातच पावसाच्या पाण्याने जुन्या छपरातली भोकं शोधली आणि जार्विसना हलण्याशिवाय पर्याय उरला नाही.

कुमालो ओशाळले आणि माफी मागण्याच्या उद्देशाने मोठ्याने बोलले, छप्पर गळतंय.

हो, दिसतंय मला. जार्विसनी पण मोठयाने बोलूनच उत्तर दिलं.

पुन्हा जार्विस बसले होते तिथे गळायला लागलं आणि पुन्हा जार्विसना दुसरीकडे हलावं लागलं. दिव्याच्या अस्फुट उजेडात हातांनी बाकडी चाचपत ते इकडून तिकडे फिरत राहिले. पण त्यांना बसायला जागा मिळाली नाही कारण जिथे बाकडं कोरडं होतं तिथे जमीन पावसाने ओली झाली होती आणि जिथे जमीन कोरडी होती तिथे बाकडी ओली झाली होती.

“माफ करा, बऱ्याच ठिकाणी गळतंय,” कुमालो मोठयाने बोलले.

“हो, खूपच गळतंय,” जार्विसनी पुन्हा मोठयाने उत्तर दिलं.

खूप जास्त पाऊस पडत नाहीये अशी जागा एकदाची जार्विसना मिळाली, आणि कुमालोंनाही एक जागा मिळाली. दोघेही आपापल्या जागी शांतपणे बसून राहिले पण बाहेर मात्र अजून शांत झालं नव्हतं. कानठळ्या बसवणारे गडगडाट आणि कडकडाट बाहेर अजूनही सुरूच होते. छपरावर अजूनही पाऊस कोसळतच होता.

ते खूप वेळ तसेच बसून राहिले. धोधो वाहणाऱ्या धबधब्यांचे आणि जिवंत झालेल्या नद्यांचे आवाज ऐकू आले तेव्हा त्यांना वादळ ओसरलंय हे समजलं. ढगांची गडगड कमी झाली, चर्चमध्ये एक क्षीण उजेड पसरला आणि छपरावरचा आवाजही कमी झाला.

जेव्हा पाऊस जवळजवळ थांबला तेव्हा जार्विस तिथून उठले आणि दोन बाकांच्या मधून कुमालोंच्या जवळ जाऊन उभे राहिले. त्यांच्याकडे न बघता त्यांनी विचारलं, दया मिळाली का?

थरथरत्या हातांनी कुमालोंनी पाकिटातलं पत्र काढलं. ह्या थरथरीमागे दुःखं तर होतंच पण हा माणूस समोर आल्यावर नेहमीच जाणवणारी अपराधी भावनाही ह्याला कारणीभूत होती. जार्विसनी ते त्यांच्या हातातून घेतलं आणि पुसटसा उजेड पत्रावर पडावा म्हणून लांब धरून वाचलं, पाकिटात टाकलं आणि कुमालोंना परत दिलं.

“मला हे प्रकरण नीट उमजलंच नाही. काय बोलावं मला कळत नाहीये, पण काय लिहिलंय ते मला कळलं.”

“हो, उम्नूमझान.”

पवित्र वेदीकडे आणि वेदीवरच्या क्रॉसकडे बघत जार्विस काही काळ शांत राहिले.

“पंधरावा दिवस माझ्या लक्षात राहील. जपा स्वतःला, ऊम्फुंडीस.”

पण कुमालो सावकाश जा म्हणाले नाहीत. त्यांनी खोगीर आणि लगाम धरतो असंही म्हटलं नाही. दूधासाठी जार्विसचे आभार मानण्याचा विचारही त्यांच्या मनात आला नाही. तो काठ्यांचा काय प्रकार आहे हेही त्यांनी विचारले नाही. जेव्हा ते उठले आणि बाहेर आले तेव्हा जार्विस निघून गेले होते. अजूनही हलके हलके पाऊस पडतच होता. सगळीकडे पृथ्वीचं लाल रक्त घेऊन वाहणाऱ्या झऱ्यांचा आणि नद्यांचा आवाज येत होता.

**

त्या दिवशी सायंकाळी सूर्यास्ताच्या संधीप्रकाशात सगळ्यांनी काठ्या बघितल्या पण कोणालाच त्याचं कारण समजलं नाही. काही लहान मुलं खोटं खोटं त्या काठ्या ओढून आकाशात भिरकावल्याचा खेळ खेळत होती. काही मुली उदास हसत तर काही मुली घाबरून बाजूला उभं राहून हा खेळ पहात होत्या. दाझुमाच्या मुलाने चुकून त्यातली एक काठी खरोखर बाहेर काढली खरी पण नंतर मात्र तो खूप भ्यायला. सगळे एकदम गप्प झाले. छोट्या मुलांनी घाबरून मोठयांकडे पाहिलं. काही मुली रडत, काही ओशाळं हसत, काही, तरी आम्ही म्हणत होतो, तरी आम्ही म्हणत होतो असं पुटपुटत आईला बिलगल्या. काठी काढण्याचा गुन्हा केलेल्या मुलाला त्याची आई बाजूला घेऊन, तू माझी लाज घालवलीस, तू माझी लाज घालवलीस असं ओरडत राहिली. आजुबाजूची मोठी माणसं कुठे भोक दिसतंय का हे शोधू लागली. एकजण तेवढयात म्हणाला, इथे भोक आहे. मग त्यांनी काळजीपूर्वक ती काठी त्यात घातली. एकानं खाली बसून काठी काढलीच नव्हती असं वाटावं म्हणून तिथली माती चांगली दाबली. पण मग दुसरा म्हणाला की जमीन थोडी खडबडीत करूया कारण मैदान ओलं आहे आणि जर जमीन दाबली तर त्यांना लगेच कळेल. म्हणून मग त्यांनी ती खडबडीत केली. त्यावर थोडं गवत व दगड गोटे टाकले. आणि खरंच ती जागा दाबली गेली आहे हे कुणाला कळणार सुध्दा नाही अशी होऊन गेली.

तेवढयात दूध घेऊन बैलगाडी आली. लहानग्यांच्या आया आणि काही मुलं आपल्या हिश्श्याचे दूध घ्यायला चर्चमध्ये गेली.

“हे काठ्यांचं नेमकं काय काम आहे?” कुमालोंनी दूध घेऊन आलेल्या आपल्या मित्राला विचारलं.

“ऊम्फुंडीस मला माहीत नाही पण मी उद्यापर्यंत माहिती काढायचा प्रयत्न करतो.”

4

गोऱ्या माणसांनी उभ्या केलेल्या काठ्या बरेच दिवस उभ्या राहिल्या कारण नंतर पुन्हा कोणीच तिकडे फिरकलं नाही. इथे धरण बांधलं जाणार आहे अशी एक अफवा पसरली पण ते धरण भरणार कसं हे कोणालाच कळेना. चर्चच्या जवळून वाहणारा झरा बरेचदा आटून जायचा आणि त्याचा प्रवाह म्हणावा इतका मोठा कधीच नसायचा. कुमालोंना त्यांच्या मित्राकडून कळलं की जार्विस काठ्यांच्या कामाच्या संदर्भातच प्रिटोरियाला गेले आहेत.

दिवस निघून जात होते. कुमालो नियमितपणे न्दोत्शेनीच्या सुधारणेसाठी प्रार्थना करत होते. सूर्य नेहमीप्रमाणे उगवत होता, मावळत होता.

कुलूसच्या मुलाची तब्बेत आता सुधारली होती. कुमालोंचं पाद्री म्हणून धर्माचं काम सुरु होतं. शाळा तिचं काम करत होती. मुलं तिथे बिया आणि रोपं, चरण्यासाठी गवतांचे प्रकार, मातीला समृद्ध करण्यासाठी त्यात काय घालायला हवं, गाई गुरांना काय खायला द्यायला हवं वगैरे वगैरे शिकत होती. जसजसे कुमालो न्दोत्शेनीच्या सुधारणेचा विचार करत होते, तसतसे जार्विस आणि जार्विसच इथे काहीतरी किमया घडवून आणू शकतील हे त्यांच्या लक्षात आलं होतं.

ती मुलगी नवीन घरावर खुश होती. तिच्या लाघवी आणि प्रेमळ स्वभावामुळे ती छान रुळली होती. छोटा मुलगा आजूबाजूच्या लहान मुलांबरोबर खेळण्यात रमला होता. अगदी एक दोन वेळा त्याने आपल्या आईबद्दल विचारले होते आणि नंतर तो सगळं विसरुनही गेला होता. अब्सालोमबद्दल कोणीही विचारत नव्हते आणि जरी ते आपल्या झोपड्यांमध्ये कधीतरी त्या विषयावर बोलत असले तरी म्हाताऱ्या ऊम्फुंडीसबद्दल त्यांना पूर्वी इतकाच आदर वाटत होता.

एके दिवशी तो छोटा गोरा मुलगा घोडेस्वारी करत पुन्हा त्यांच्याकडे आला. जेव्हा कुमालो त्याच्या स्वागतासाठी बाहेर गेले तेव्हा आधीप्रमाणेच त्याने हॅट काढून त्यांना नमस्कार केला. त्याला बघून कुमालोंना खूपच आनंद झाला.

“मी परत झुलूमध्ये बोलायला आलो आहे.” तो घोड्यावरून उतरला आणि लगाम खांबाला बांधला. तो उत्साहात घराकडे आला आणि पायपुसण्याला पाय झटकून हॅट

काढून तो घरात शिरला. तो टेबलाजवळ येऊन बसला व प्रसन्नपणे सगळीकडे पाहू लागला. त्याच्या चेहऱ्यावरील प्रसन्न हास्यामुळे आपले घर उजळून गेलं आहे असं कुमालोंना वाटलं.

“हिशोब झाला का ऊम्फुंडीस?”

“हो, संपला एकदाचा, इंकोसान.”

“बरोबर होता ना?”

न राहवून कुमालो हसले.

“हो, हिशोब बरोबर लागला, पण फारसं काही करण्यासारखं नव्हतं.”

“फारसं काही करण्यासारखं नव्हतं? बर, तुम्ही झुलूसाठी तयार आहात का?”

कुमालो पुन्हा हसले आणि टेबलाच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या खुर्चीवर जाऊन बसले. “हो, मी झुलूसाठी तयार आहे. तुझे आजोबा कधी परत येणार आहेत?”

“मला माहीत नाही. पण ते लवकर यायला पाहिजेत. मला ते खूप आवडतात.” तो म्हणाला.

इथे कुमालो हसणार होते पण हसणं बरोबर नाही असं वाटून गप्प राहिले. पण मुलालाच हसू फुटले आणि मग कुमालोही हसले. या मुलाबराबर हसायला किती मजा येत होती, या मुलामध्ये एक खट्याळपणा होता.

“तू जोहान्सबर्गला परत कधी जाणार, इंकोसान?”

“माझे आजोबा परत आले की.”

“तू जेव्हा परत जाशील तेव्हा न्दोत्शेनीची रयाच निघून जाईल.”, त्यांनी झुलू मध्ये म्हटलं. “तुम्ही काय म्हणालात, ऊम्फुंडीस?

कुमालो त्याचं भाषांतर करणार इतक्यातच तो मुलगा म्हणाला, “थांबा, थांबा मला सांगू दे. तुम्ही परत एकदा झुलूमध्ये म्हणा ते वाक्य.” म्हणून कुमालो परत एकदा बोलले.

“म्हणजे, तू जेव्हा परत जाशील..” तो मुलगा म्हणाला. “आता पुढचं परत सांगा ना.”

“तेव्हा न्दोत्शेनीची रयाच निघून जाईल.” कुमालो झुलूमध्ये म्हणाले.

“काहीतरी न्दोत्शेनीबद्दल आहे, पण मला बाकीचं काही कळत नाहीये. तुम्ही ते इंग्रजीतूनच सांगा मला.”

“तेव्हा न्दोत्शेनीची रयाच निघून जाईल.” कुमालो इंग्रजीतून म्हणाले.

“अच्छा, म्हणजे मी जेव्हा परत जाईन तेव्हा न्दोत्शेनीची रयाच निघून जाईल.”

छोटा मुलगा दिलखुलास हसला. “बरं, बरं. मी ऐकलं तुमचं.” तो झुलूमध्ये बोलला.

मग कुमालोंनी आनंदाने टाळ्या वाजवल्या. वा! वा! तू झुलू बोललास. मग तो मुलगा आणखी खुशीत हसला. कुमालोंनी पुन्हा एकदा कौतुकाने टाळ्या वाजवल्या. आवाज ऐकून त्यांची बायको तिथे आली. ही माझी बायको, ते मुलाला म्हणाले. आणि हा त्या माणसाचा मुलगा ते झुलूमध्ये बायकोला म्हणाले. मुलगा उठला आणि तिच्यासमोर कमरेत जरा वाकला. पण ती मात्र त्याच्याकडे भितीने आणि दुःखाने पहात राहिली. तुमचं घर खूप छान आहे, तो हसून बोलला. मला भरून आलंय, काय बोलायचं तेच मला सुचत नाहीये, ती नवऱ्याशी झुलूत बोलली. मी ऐकलं तुमचं, मुलगा झुलूमध्ये बोलला. त्यामुळे दचकून ती एक पाऊल मागे सरकली. त्यांनी तिला सांगितलं की आपण झुलू मध्ये बोलतोय एवढंच त्याला कळतंय, आपल्या बोलण्यातले काही शब्दच त्याला कळतायत पण त्यांचा अर्थ त्याला कळत नाहीये. पण त्या छोट्या मुलाने पुन्हा टाळ्या वाजवल्या. वा! वा! तुम्ही झुलू बोलताय. मनावर दडपण आल्यासारखी ती मागच्या मागेच घरात परतली आणि तिने दार लावून घेतले.

“आपण झुलूत बोलूयात का, ऊम्फुंडीस?”

“हो तर, मी तयार आहे.”

“वनस्पती म्हणजे उमुटी, ऊम्फुंडीस.”

“बरोबर, इंकोसान.”

“पण औषध म्हणजेही उमुटी, ऊम्फुंडीस.”

मुलाने खोटं खोटं गोंधळल्यासारखं, मोठं आश्चर्य वाटल्यासारखं म्हटलं आणि दोघंही पुन्हा हसले.

“हे बघ इंकोसान, आमची बरीचशी औषधं वनस्पतीतून येतात. म्हणून दोघांना एकच शब्द आहे.”

“अच्छा”, मुलाला ते स्पष्टीकरण आवडलं. “बॉक्स म्हणजे इबॉकीसी.”

“बरोबर, इंकोसान. हे बघ, आता आमच्याकडे पूर्वी बॉक्स नव्हते त्यामुळे हा शब्द इंग्रजी भाषेतून आला.”

“अच्छा, आणि मोटारसायकल म्हणजे इसीटूटू.”

“बरोबर. हा शब्द मोटारसायकल जसा आवाज करते त्यातून आला इसी - टू- टू- टू शब्द. पण इंकोसान, आपण वाक्य बनवूया. तुला माहीत असलेले शब्दच तू मला सांगतोयस, त्यातून तू नवीन काहीच शिकणार नाहीस. मी घोडा बघितला, हे तू कसं म्हणशील?”

मग त्यांचा धडा चालू राहिला. शेवटी कुमालो त्यांच्या विद्यार्थ्याला म्हणाले, “बारा वाजायला आले, तुझी जायची वेळ झाली असेल ना?”

“हो, मला निघायला हवं, पण आणखी झुलू शिकायला मी येत राहीन.”

“नक्की ये, इंकोसान. थोड्या दिवसांत बऱ्याच झुलूंपेक्षा चांगलं झुलू तुला बोलता यायला लागेल. तू काळोखात बोलशील तर तू झुलू नाहीस हेच लोकांना कळणार नाही.”

मुलगा एकदम खुश होऊन गेला. बाहेर आल्यावर तो म्हणाला, मला मदत करा, ऊम्फुंडीस. मग कुमालोंनी त्याला वर चढायला मदत केली. मुलाने हॅट उंचावून त्यांचा निरोप घेतला आणि टापा टाकीत त्याचा घोडा निघाला. रस्त्यावरून कार येताना दिसली आणि तो जोरात ओरडला, माझे आजोबा आले. आणि मग घोड्याला फटकारून त्या कारला गाठायच्या इर्षेने तो सुसाट निघाला.

एक पंचविशीचा हसऱ्या चेहऱ्याचा तरुण चर्चबाहेर उभा होता. आपल्या बॅगा त्याने जमिनीवर ठेवल्या होत्या. आपली हॅट काढून तो इंग्रजीत म्हणाला, “ऊम्फुंडीस तुम्हीच आहात ना?”

“हो, मीच.”

“मी नवीन शेती तज्ज्ञ, ऊम्फुंडीस.”

“शेती तज्ज्ञ? ये, घरात ये.” कुमालो उत्साहाने म्हणाले.

ते घरात शिरले आणि त्या तरुणाने कागदपत्रांची फाईल कुमालोंना दाखवली. कागदांमध्ये पाद्री, शाळा निरीक्षक आणि इतरांची प्रशस्ती पत्रे होती. हे पत्र बाळगणारा नेपोलिअन लेटीस्टी हा सभ्य आणि चांगली वर्तणूक असणारा तरुण आहे असे एका कागदावर लिहिले होते. दुसरा कागद ट्रान्सकेई शाळेतून शेती तज्ज्ञ म्हणून उत्तीर्ण असे प्रमाणपत्र होते.

“अच्छा”, कुमालो म्हणाले. “पण तुला माझ्याकडे कोणी पाठवलं?”

“त्या गोऱ्या माणसाने मला तुमच्याकडे पाठवलंय.”

“जार्विसनी?”

“मला त्यांचं नाव माहीत नाही, ऊम्फुंडीस, पण ते आताच मला इथे सोडून पुढे गेले.”

“अच्छा, म्हणजे जार्विसच. आता मला सांगशील नीट सगळं.”

“मी तुम्हाला इथे शेतीतली नवीन तंत्र शिकवायला आलोय, ऊम्फुंडीस.”

“आम्हाला? इथे न्दोत्शेनीत?”

“हो, ऊम्फुंडीस.”

कुमालोंचा चेहरा उजळला आणि त्यांच्या डोळ्यात स्वप्नं तरळली. तू म्हणजे आमच्यासाठी देवदूत आहेस, ते म्हणाले. आणि उठून खोलीत ते येरझाऱ्या मारू लागले. तो तरुण त्यांच्याकडे विस्मयाने बघू लागला. कुमालोंनी त्याच्याकडे बघितलं, हसले आणि पुन्हा म्हणाले, तू म्हणजे आमच्यासाठी देवदूत आहेस. ते खाली बसले आणि म्हणाले, पण तुला कुठे शोधलं त्या गोऱ्या माणसाने?

“माझ्या कृगर्सडोर्पच्या घरी ते आले. मी तिकडे एका शाळेत शिकवत होतो. त्यांनी मला तुला एक भन्नाट काम करायला आवडेल का असं विचारलं आणि न्दोत्शेनीबद्दल सांगितलं. मला हे काम पटलं म्हणून मी इकडे यायचं ठरवलं.

“आणि तुझ्या शिक्षकाच्या नोकरीचं काय?”

“खरं म्हणजे मी काही शिक्षक नाही. त्यामुळे ते मला जास्त पैसेही देत नव्हते. ह्या गोऱ्या माणसाने मला महिन्याला दहा पाउंड देईन असं सांगितलं, म्हणून मी आलो. अर्थात फक्त पैशासाठी मी इकडे आलो नाही. शाळेत फारसं काही कामही नव्हतं.”

कुमालोंना क्षणभर त्याचा हेवा वाटला. त्यांच्या साठ वर्षांच्या कारकिर्दीत त्यांना महिन्याला दहा पाउंड कधीच मिळाले नव्हते. पण तो विचार त्यांनी लगेच झटकून टाकला..

“त्या गोऱ्या माणसाने विचारलं की तुला झुलू भाषा येते का?” मी म्हटलं, “नाही, पण मला झोसा भाषा येते कारण माझी आई झोसा होती. मग तो म्हणाला, काही हरकत नाही, झोसा आणि झुलू जवळजवळ सारख्याच आहेत.”

कुमालोंच्या बायकोने पुन्हा दरवाजा उघडला आणि ती म्हणाली जेवायला चला.

कुमालोंनी झुलूत म्हटलं, “हा बघ, हा लेटेस्टी. तो आपल्या लोकांना शेती कशी करावी ते शिकवणार आहे.” ते लेटेस्टीला म्हणाले, “चल, जेवायला जाऊया.”

ते जेवायला गेले आणि तिथे त्याने त्याची ओळख मुलीशी आणि छोट्या मुलाशी करून दिली. प्रार्थना झाल्यावर ते खाली बसले आणि मग कुमालोंनी त्याला विचारलं, तू पिटरमॅरिट्झबर्गला कधी आलास?

“आज सकाळी. आणि नंतर आम्ही कारने इकडे आलो.”

“आणि तुला ती गोरी व्यक्ती कशी वाटली?”

“ते खूपच शांत आहेत. माझ्याशी ते फारसे बोलले नाहीत.”

“त्यांचा स्वभावच तसा आहे.”

“आम्ही रस्त्यात एका ठिकाणी थांबलो. तिथे संपूर्ण खोऱ्याकडे बघून त्यांनी विचारलं, अशा ठिकाणी तू काय करू शकशील? आमच्या प्रवासातला तो पहिला संवाद.”.

“मग तू काही सांगितलंस त्यांना?”

“हो, मी त्यांना सांगितलं, ऊम्फुंडीस.”

“मग ते काय म्हणाले?”

“ते काहीच बोलले नाहीत. त्यांनी फक्त खाकरल्यासारखा आवाज केला.”

“आणि मग?”

“आणि मग आम्ही इथे येईपर्यंत ते गप्पच होते. इथे आल्यावर ते म्हणाले की ऊम्फुंडीसकडे जा आणि तुझी कुठे राहण्याची सोय होऊ शकते का ते बघ. त्यांना सांग मला माफ करा, पण घरी जायची खूप घाई झाल्यामुळे मी येऊ शकलो नाही.”

कुमालोंनी त्यांच्या बायकोकडे आणि तिनं त्यांच्याकडे पाहिलं.

“आमच्या खोल्या खूप छोट्या आहेत. हे एक पाद्र्याचं घर आहे. तुला चालणार असेल तर तू इथे राहू शकतोस.”

“माझ्या घरचेही चर्चची माणसं आहेत, ऊम्फुंडीस. मला आवडेल इथे राहायला.”

“तू काय काय करणार आहेस इकडे?”

तो तरुण हसला. मला आधी संपूर्ण खोरं नीट बघयला लागेल, तो म्हणाला.

“पण त्या आधीच्या खोऱ्यात तू काय केलं असतंस?”

मग तरुणाने आधीच्या खोऱ्यात काय काय केलं असतं ते सगळं सांगितलं. शेण जाळण्यापेक्षा लोकांनी ते मातीत कसं मिसळवलं पाहिजे. चांगलं बी गोळा करून उन्हात जास्त सुकू न देता त्याची जोपासना कशी केली पाहिजे, डोंगरावर आणि खाली सगळीकडे गरज नसेल तिथे नांगरणी करणं कसं थांबवलं पाहिजे, सरपणासाठी कुठली झाडं लावली पाहिजे, जिथे नांगरणी करता येणार नसेल तिथे तसेच झऱ्यांच्या काठाकाठाने भराभरा वाढणारी झाडं लावून जमिनीची होणारी धूप कशी थांबवली पाहिजे, जोराचा पाऊस आला की झऱ्यातलं पाणी लगेच वाहून जाऊ नये म्हणून काय केलं पाहिजे ते सगळं सांगितलं. पण हे सगळं करणं कठीण आहे. सगळ्यांनी एवढ्या छोट्या जमिनीच्या तुकड्यावर गुजराण करणं शक्य नाही हे त्यांना कळलं पाहिजे. काहींना झाडांसाठी तर काहींना गुरांच्या चाऱ्यासाठी त्यांची जमीन द्यावी लागेल. सगळ्यात कठीण गोष्ट म्हणजे ज्यासाठी भरमसाठ गुरं पाळली जातात ती बायकोच्या बदल्यात गुरं देण्याची लोबोला* प्रथा सोडावी लागेल. आपली संपत्ती गुरांच्या संख्येवर मोजण्याची सवय सोडावी लागेल

कारण त्यामुळेच गवत साफ झालंय आणि नवीन गवताला मोठं होण्याची संधीच मिळत नाही."

"आणि धरण असलं पाहिजे?"

"हो, धरण असलं पाहिजे म्हणजे गुरांना प्यायला पाणी मिळेल. झडपा खोलून व्यवस्थित नियोजन करून शेतीच्या जमिनीला आणि गवत आणि झाडं लावलेल्या जमिनीला पाणी देता येईल."

"पण धरणात पाणी कुठून येईल?"

"नदीतून पाईपने पाणी धरणात घेतलं जाईल. त्या गोऱ्या माणसाने तरी मला तसंच सांगितलं."

"म्हणजे त्यांच्या नदीतलं पाणी? कुमालो म्हणाले. "आणि हे सगळं न्दोत्शेनीलाही करता येईल?"

"त्याआधी मला संपूर्ण खोऱ्यात फेरी मारायला लागेल." तो तरुण कृषी निर्देशक हसत म्हणाला.

"पण आता तर तू सगळं बघतच आलास नं." कुमालोंनी अधीरपणे म्हटलं.

"मी बघितलं, पण मला सगळं सावकाश बघायला पाहिजे. पण मला वाटतं की ह्या सगळ्या गोष्टी इथेही करता येतील."

ते टेबलाभोवती बसले. ही सगळी उपाययोजना केल्यावर होणाऱ्या परिणामांचं चित्रं रंगवताना त्यांचे चेहरे उजळून गेले होते. कुमालोंनी सगळ्यांकडे बघून म्हटलं, मी बोललो होतो नं हा आपल्यासाठी देवदूत आहे. उत्साहाच्या भरात ते उठले आणि त्यांनी खोलीत एक चक्कर टाकली. तुला काम सुरु करायची घाई झाली आहे का?

**लोबोला प्रथा: लग्नप्रसंगी मेहेर(हुंडा) म्हणून बायकोच्या किंमतीएवढी गुरं तिच्या वडिलांना देण्याची झुलू, झोसा वगैरे जमातींमधील प्रथा*

तरुणाला हसू आवरेना, तो एकदाचा बोलला, “हो, काम कधी सुरु करतोय असं मला झालंय.”

“सगळ्यात आधी तुला काय करायला आवडेल?”

“ऊम्फुंडीस, सगळ्या आधी मुखियांना भेटून यायला लागेल असं वाटतं.”

“हो, बरोबर. सगळ्यात आधी हेच करायला हवं.”

बाहेर घोड्याच्या टापांचा आवाज आला म्हणून ते बघायला गेले तर काय, तो छोटा मुलगा पुन्हा आला होता. घोड्यावरून न उतरताच तो कुमालोंशी बोलू लागला. तो अगदी कळकळीने बोलत होता आणि खूप काहीतरी महत्वाचं सांगायला आल्यासारखा त्याचा चेहरा लालेलाल झाला होता.

“अगदी थोडक्यात चुकामूक झाली असती.”

“चुकामूक?”

“हो ना, आजोबा जर लवकर आले नसते तर तुमचा निरोप घ्यायला मला येताच आलं नसतं.”

“तू चाललास का, इंकोसान?”

पण मुलाने त्यांच्या प्रश्नाचं उत्तर दिलं नाही. तो आधीच्या चुकामुकीवाल्या प्रसंगातच होता.

“जर आजोबा लवकर आले नसते तर घोड्यावरून तुम्हाला भेटायला येण्याइतका वेळच माझ्याकडे नसता. ते लवकर आले म्हणून आपल्याला भेटता येतंय.”

“म्हणजे तू उद्या जाणार इंकोसान?”

“हो, नॅरोगेजवाल्या त्या छोट्या ट्रेनने.”

“इतक्या लवकर, इंकोसान?”

“काही काळजी करू नका, मी परत सुट्टीत येणारे. मग आपण आणखी झुलू शिकू.”

“मला नक्की आवडेल.” कुमालो हसण्याच्या मनःस्थितीत नव्हते.

“चला मग, अच्छा, ऊम्फुंडीस.”

“अच्छा, इंकोसान.”

मग ते झुलू भाषेत त्याला सावकाश जा म्हणाले. छोटा मुलगा थोडावेळ विचारत पडला आणि मग डोकं खाजवत झुलूमध्ये म्हणाला, सांभाळून रहा, ऊम्फुंडीस. कुमालो आनंदाने म्हणाले. व्वा, शाब्बास! मुलगा गोड हसला, त्याने हॅट उंचावली आणि तो धुरळा उडवत नाहीसा झाला. घोडा चौखूर उधळला, पण थोड्याच अंतरावर जाऊन तो मागे वळला आणि पुन्हा पुढे जाण्याच्या आधी त्याने कुमालोंना एक सलाम ठोकला. तेवढयात तो तरुण शेती तज्ञ कुमालोंजवळ आला. तो मुलगा दिसेनासा होईपर्यंत दोघेही त्या रस्त्याकडे बघत राहिले.

“आणि हा छोटा देवदूत...” तरुणाकडे न बघताच अगदी मनापासून कुमालो म्हणाले.

ते वळून पुन्हा घराकडे निघाले आणि कुमालो त्या तरुणाला बोलले, “म्हणजे तू म्हणतोयस तशा बऱ्याच गोष्टी इथे होऊ शकतील?”

“हो, ऊम्फुंडीस, बऱ्याच गोष्टी इथे होऊ शकतील.”

“खरंच?”

“अगदी खरं, ऊम्फुंडीस. खोरं पूर्वी होतं तसं पुन्हा होण्यात मला तरी काहीच अडचण दिसत नाही.” तरुणाच्या बोलण्यात आत्मविश्वास होता. “एका रात्रीत हा बदल नाही होणार. थोडा वेळ लागेल.”

“देव करो आणि मी मरायच्या आत मला दिसो. मी आतापर्यंत इथं फक्त विध्वंस होतानाच बघितला आहे.”

चर्चमधील दृढीकरणाच्या(कन्फर्मेशन)* सोहळ्याची सगळी तयारी झाली होती. पांढरे झगे आणि गळ्यातले हिरवे रुमाल अशा आजच्या खास वेशभूषेत बायका चर्चमध्ये जमल्या होत्या. न्दोत्शेनी सोडून न गेलेले पुरुष त्यांच्या रविवारच्या खास पोशाखात, त्यातल्या त्यात टापटीपीतील, स्वच्छ आणि नीटनेटक्या कपड्यात तिथे हजर होते. दृढीकरण होणार असलेली मुलं, पांढरे झगे आणि हॅट घातलेल्या मुली तसेच स्वच्छ आणि नीटनेटक्या अशा शाळेच्या गणवेषातली काही मुलं अगदी तयार होऊन आली होती. बायका ऊम्फुंडीसच्या बायकोला जेवणात मदत करत होत्या. मक्यापासून बनवलेला घरगुती केक आणि भरपूर उकळवलेला कडक चहा असा जेवणाचा साधाच बेत होता. पण सगळे एकत्र जेवणार होते ही त्यातली खास बात होती.

आणि अशा उत्साही वातावरणात असताना वादळी ढगांची आकाशात पुन्हा गर्दी जमू लागली. प्रचंड उकाड्याने त्रस्त असताना ह्या वादळाचा आनंद मानावा की खेद हेच कोणाला कळत नव्हते. ढगांची भली थोरली सावली लाल जमिनीवरून, लाल उघड्या बोडक्या डोंगरांवरून पुढल्या डोंगर माथ्यापर्यंत सरकत होती. लोक ढगांकडे आणि बिशप येणार असलेल्या रस्त्याकडे आळीपाळीने बघत होते. आणि ह्या परिस्थिती काय करावं हेच कुणाला कळत नव्हतं. सूर्यास्ताच्या आधी विजांचा लखलखाट आणि ढगांचा गडगडाट सुरु होणार ह्याबद्दल कोणाला काही शंका नव्हती.

कुमालो आकाशाकडे आणि बिशप ह्यांच्या वाटेकडे बघत होते. इतक्यातच गाडीतून दूध घेऊन येणारा मित्र त्यांना दिसला आणि त्यांना थोडे आश्चर्यच वाटले. दूध इतक्या लवकर सहसा कधी येत नाही.

“आज लवकर आलास, मित्रा.”

* *चर्चमध्ये बाप्तिस्मा झालेल्या व्यक्तीवर, बहुतकरून मुलांवर धर्मातील श्रद्धा आणि चर्चवरील विश्वास दृढ झाल्याचे आणि चर्चचा सदस्य झाल्याचे दृढीकरण*(कन्फर्मेशन) *करणारा संस्कार*

“हो, ऊम्फुंडीस,” मित्र गंभीरपणे बोलला. “आम्हाला आज काम नाहीये. इंकोसिगाझ वारल्या.”

“अरे बाप रे! हे कसं शक्य आहे.”

“जेव्हा सूर्य माथ्यावर आला तेव्हाच इंकोसिकगझींनी आपले प्राण सोडले.”

“अरेरे! खूपच वाईट झालं.”

“उम्नूमझान कसे आहेत?”

“ते गप्प आहेत. त्यांचा स्वभाव तर तुम्हाला माहीत आहेच पण ह्यावेळचं त्यांचं गप्प असणं छाती दडपवून टाकणारं आहे. ऊम्फुंडीस, मी घरी जातो, आंघोळ करतो आणि मग दृढीकरणासाठी येतो.”

“बरं.”

कुमालो घरात गेले आणि इंकोसिगाझींच्या मृत्यूची बातमी त्यांनी त्यांच्या बायकोला दिली. त्यांच्या बायकोला धक्का बसला. तिथे हजर असलेल्या इतर बायकांनाही वाईट वाटले, काही जणी रडल्या, काहींनी त्यांच्या चांगल्या आठवणी काढल्या. कुमालो त्यांच्या टेबलाजवळ गेले आणि काय करावं ह्याचा विचार करत बसले. हा दृढीकरणाचा विधी पूर्ण झाला की हाय प्लेसला त्या घरी जावं आणि जार्विसपर्यंत इथल्या लोकांच्या भावना पोचवाव्यात असं त्यांना वाटत होतं. असं संकट कोसळलेल्या घराचं चित्रं त्यांच्या डोळ्यासमोर आलं. गोऱ्या लोकांच्या गाड्यांचा ताफा, काळ्या कपड्यातले गटागटात गंभीरपणे चर्चा करणारे शेतकरी असे दृष्य त्यांनी यापूर्वी पहिले होते. त्यामुळे आणि काळ्यांनी अशा प्रसंगी तिथे जाण्याची प्रथा नसल्यामुळे त्यांनी मनातल्या मनातच तो बेत रद्द केला. त्यांना माहित होतं की ते तिथे कितीही वेळ उभे राहिले तरी त्यांना तुम्ही इथे का उभे आहात असं कोणाला विचारावसं वाटणार नाही, त्यांचा काही निरोप असेल ह्याची दखल घ्यावीशीही कोणाला वाटणार नाही. त्यांनी खणातून कागद काढले. जरी इथल्या बऱ्याचशा गोऱ्या लोकांना झुलू भाषा येत असली तरी खूपच कमी जणांना झुलूमधून लिहिता वाचता येतं. त्यामुळे त्यांनी इंग्रजीतून लिहायचं ठरवलं. त्यांनी खूप वेळा लिहिलं, खूप वेळा खोडलं आणि खूप वेळा फाडलं आणि शेवटी एकदाचं त्यांचं पत्र लिहून झालं.

उम्नूमझान:

मदर निवर्तल्याचे वृत्त समजले. या दुःखद बातमीने आम्ही शोकाने व्याकूळ झालो आहोत. आम्हाला खात्री आहे की जे तुम्ही आमच्यासाठी करत आहात त्याला त्यांची संमती होती आणि त्यात त्यांचाही वाटा होता. त्यांच्या आत्म्यास शांती लाभावी आणि ह्या कठीण प्रसंगाला सामोरे जायचे बळ तुम्हाला मिळावे म्हणून आम्ही आमच्या चर्चमध्ये प्रार्थना करू.

तुमचा विश्वासू चाकर,

रेव्ह. एस. कुमालो.

लिहून झाल्यावर ते पाठवावं की नाही असा प्रश्न त्यांना पडला. मुलाच्या खुनाचा धक्का पचवू न शकणे हे त्यांच्या मृत्यूचे कारण असेल तर? तसे असेल तर ज्याने त्यांच्या मुलाचा खून केला त्याच्या वडिलांनी असे पत्र पाठवावे का? पेचात अडकलेल्या कुमालोंना रोज पाठवले जाणारे दूध, शेती शिकवायला आलेला तरुण आठवला. जार्विसनी आस्थेने विचारलेला दया मिळाली का हा प्रश्न तर आत्ताच विचारला असल्यासारखा त्यांच्या मनात घुमला. त्यांच्या लक्षात आलं की जार्विसनी ठामपणे एक वेगळी वाट धरली आहे आणि त्या वाटेवरून त्यांना आता कोणीही परावृत्त करू शकणार नाही. म्हणून त्यांनी ते पत्र एका पाकिटात भरले आणि बाहेर जाऊन एका मुलाला हाक मारली.

“बाळा, माझं हे पत्रं नेऊन देशील का?”

“हो, ऊम्फुंडीस. मी नेऊन देईन.”

“कुलूसकडे जाऊन त्याचा घोडा घे आणि हे पत्र घेऊन ऊजार्विस ह्यांच्या घरी जा. उम्नूमझानना त्रास न देता त्यांच्यापर्यंत हे पत्र पोचवेल अशा तिथल्या कोणातरी माणसाला तू हे पत्र नेऊन दे. आणि हे बघ, तिथे अगदी शांतपणे मान खाली घालून जायचं, कोणालाही हाका मारत बसायच्या नाही की कोणाशी हसायचं नाही. इंकोसिगाझ वारल्या आहेत, माहीत आहे ना? सगळं लक्षात राहील ना?”

“हो ऊम्फुंडीस, मी सगळं नीट लक्षात ठेवीन.”

“मग जा हं तू. तुला दृढीकरणाचा विधी बघायला मिळणार नाही म्हणून मला खूप वाईट वाटतंय.“

"काही हरकत नाही, ऊम्फुंडीस."

मग कुमालोंनी तिथे जमलेल्या लोकांना इंकोसिगाझ वारल्याची बातमी दिली. सगळे एकदम स्तब्ध झाले. गप्पा, गोंधळ, हास्य विनोद सगळे एकदम थांबले. बिशप येईपर्यंत हळू आवाजात ते एकमेकांच्यात बोलत राहिले.

दृढीकरणाच्या वेळेपर्यंत एवढा अंधार दाटून आला की चर्चमधील दिवे पेटवावे लागले. डोंगर जिथे उजाड होऊन उघडे-बोडके झाले आहेत आणि जमिनीला जिथे खोलवर जखमा झाल्या आहेत तिथे विजा चमकू लागल्या. फक्त म्हातारे आणि म्हाताऱ्या, आया आणि लहान मुलं रहात असलेल्या त्या खोऱ्यावर अक्राळ विक्राळ ढग चालून येऊ लागले. तिथले पुरुष दूर गेले आहेत, तिथली तरुण मुलं आणि मुली दूर गेल्या आहेत, ही माती त्यांना आता आणखी थांबवू शकत नाही. ज्यांचा दृढीकरणाचा विधी होतोय अशी काही मुलं आज आहेत पण काही दिवसांनी तीही निघून जातील कारण ही माती आता आणखी कोणालाही थांबवू शकत नाही.

काळोख आणखी दाटला आणि छप्परातून पाऊस आत घुसू लागला. चर्चमध्ये पाण्याची छोटी छोटी डबकी साठायला लागली आणि लोक पावसापासून स्वतःला वाचवण्यासाठी कोरडी जागा शोधू लागले. काही पांढरे झगे भिजले. एक मुलगी तर थंडीने प्रचंड कुडकुडू लागली, पण एवढ्या महत्वाच्या प्रसंगामुळे तिची चर्चबाहेर पडण्याची इच्छा झाली नाही. धीरगंभीर स्वरात बिशप मंत्र म्हणू लागले. परमेश्वरा, हे मूल तुझ्या कृपा कटाक्षाखाली, तुझ्या छत्रछायेखाली येत आहे. त्याच्यावर तुझ्या मायेची सावली नित्य असू दे, अंतिम क्षणी तुझ्या साम्राज्यात पोहोचेपर्यंत त्याचा तुझ्यावरील भक्तीभाव दिवसेंदिवस वाढतच जाऊ दे. दृढीकरणासाठी समोर आणल्या गेलेल्या प्रत्येक मुलासाठी आणि मुलीसाठी त्यांनी हे मंत्र म्हटले.

मुख्य विधीनंतर सगळेजण जेवण्यासाठी घरात शिरले. विजांचा कडकडाट आणि ढगांचा गडगडाट आता थांबला असला तरी पाऊस अजूनही कोसळतच होता. त्यामुळे आज ज्यांचा दृढीकरणाचा विधी झाला आहे अशी मुलं आणि त्यांचे आईवडील सोडून बाकीच्यांना चर्चमध्येच थांबायला कुमालोंना सांगावं लागलं. एवढी सगळी माणसं चर्चमध्ये थांबली असतानासुद्धा घर माणसांनी तुडुंब भरले होते. स्वयंपाकघर, जेवणाची खोली, झोपण्याची खोली; सगळ्या घरभर लोकच लोक!

पाऊस एकदाचा थांबला आणि कुमालोंच्या हिशोब करण्याच्या खोलीत बिशप आणि ते उरले. बिशपनी आपला चिरूट पेटवला आणि ते कुमालोंना म्हणाले, “मि. कुमालो, मला तुमच्याशी काहीतरी बोलायचंय.”

आता बिशप काय बोलणार ह्या भीतीने कुमालो मटकन खाली बसले.

“तुमच्यावर आलेल्या सगळ्या संकटांबद्दल मला खूप वाईट वाटत आहे, मित्रा.”

“हो बिशप फादर, मी अगदी पिचून गेलोय.”

“तुम्ही जे सगळं भोगलं त्यानंतर लगेच तुम्हाला काही त्रास द्यायला मन धजावत नव्हतं म्हणून ह्या दृढीकरणाच्या विधीपर्यंत मी बोललो नव्हतो.”

“हो, बिशप फादर.”

“हे बोलताना माझ्या मनात तुमच्याबद्दल आदरच आहे, हे लक्षात असू द्या.”

“हो, बिशप फादर.”

“मला असं वाटतं, की मि. कुमालो, तुम्ही आता न्दोत्शेनी सोडायला हवं.”

बोललात! ज्याची भीती वाटत होती तेच बोललात! मी न्दोत्शेनी सोडावं? मला कधीची ह्याचीच भीती वाटत होती. मला न्दोत्शेनीपासून दूर केलंत तर काही क्षणातच मी संपून जाईन. म्हातारा झालोय मी आता. नव्याने काही करण्याची उमेद माझ्यात राहिली नाहीये. दुबळा झालोय, खंगून गेलोय. तरीही ह्या लोकांना वडिलांची माया देण्याचा प्रयत्न करतोय. बिशप फादर, मी जेव्हा न्दोत्शेनीला परत आलो त्या दिवशी तुम्ही इथे यायला हवं होतंत. म्हातारा असलो तरी ही लोकं माझ्यावर अजून तितकंच प्रेम करतात हे तुम्हाला दिसलं असतं. –ऊम्फुंडीस, तुम्ही आलात हे किती चांगलं झालं, ते दुसरे ऊम्फुंडीस काय बोलतात ते आम्हाला समजतच नव्हतं असं बोलताना त्या मुलीला तुम्ही ऐकायला हवं होतं. आणि आता, जेव्हा मुलांसाठी दूध आलंय, शेती शिकवायला तरुण शेती तज्ञ आलाय, धरणासाठी काठ्या रोवल्या गेल्यात, जेव्हा नवीन काहीतरी निर्माण होण्याची सुरुवात होते आहे अशी आशा निर्माण झाली आहे तेव्हाच तुम्ही मला हे सोडून जायला सांगताय?

डोळे पाण्याने भरले गेले, मिटले गेले आणि लाडक्या सिमँगुच्या पैशातून खास दृढीकरणासाठी शिवलेल्या काळ्या कोटावर ओघळू लागले. म्हातारी मान आणखी वाकली, मनात आलेल्या विचारांपैकी एक अवाक्षर न बोलता लहान मुलासारखा तो म्हातारा माणूस बसून राहिला.

"मि. कुमालो." बिशप एकदा हळुवारपणे आणि एकदा मोठयाने बोलले.

"अं, हो हो बोला फादर."

"तुम्हाला त्रास देतोय त्याबद्दल मला माफ करा, तुम्हाला त्रास देतोय त्याबद्दल अगदी मनापासून मी माफी मागतो. पण इथून तुम्ही निघून जाणं हेच योग्य नाही का?

"तुम्हाला हेच सांगायचं होतं का, फादर?"

कोपर गुडघ्यावर टेकवत बिशप खुर्चीतून पुढे झुकले. "ज्यांच्या मुलाचा खून झालाय असे मि. जार्विस हे न्दोत्शेनीमध्ये तुमचे शेजारी आहेत, हे खरं आहे ना?

"हो, खरंय, फादर."

"मग खरं तर ह्या एकाच कारणासाठी तुम्ही इथून निघून जायला हवं असं मला वाटतं."

ह्या कारणासाठी मी इथून जायला हवं? जार्विस आणि माझे काय संबंध आहेत याबद्दल तुम्हाला काय माहित आहे? मला भेटण्यासाठी स्वतः जार्विस इथे येतात हे तुम्हाला माहित आहे? तो छोटा मुलगा केवढ्या आनंदाने मला भेटायला येतो हे तुम्हाला माहित आहे? गावातल्या मुलांसाठी ते दूध पाठवतायत हे तुम्हाला माहित आहे? स्वतः पुढाकार घेऊन त्यांनी इथल्या लोकांना शेती शिकवायला तरुण शेती तज्ञ पाठवलाय हे तुम्हाला माहित आहे? इंकोसिगाझ वारल्याने माझं मन शोकानी किती व्याकूळ झालंय हे तुम्हाला माहित आहे? मला निघून जायला सांगण्यापूर्वी जार्विस आणि माझे काय संबंध आहेत हे तुम्हाला जाणून घ्यावसं वाटत नाही का?

पण ह्या गोष्टी बिशपना, पंचक्रोशीतील एवढ्या मोठ्या माणसाला कोण सांगणार? अशा गोष्टी सांगितल्या जात नाहीत.

"मि. कुमालो, तुमच्या लक्षात येतंय का, मी काय म्हणतोय ते?"

"मला समजतंय, बिशप फादर."

"मी तुम्हाला पिटरमॅरिट्झबर्गला तुमचा जुना मित्र न्तोम्बेलाजवळ पाठवीन. तुम्ही तिथे त्याला मदत करू शकाल. तुमच्या खांद्यावरचं ओझं त्यामुळे कमी होईल. इमारत, शाळा, पैसे वगैरे गोष्टींची तो काळजी घेईल. तुम्ही धार्मिक कामात आपलं मन रमवू शकाल."

“जसं तुम्ही म्हणाल तसं, बिशप फादर.”

“मि. कुमालो, इथे राहिलात तर तुमच्या खांद्यावर कितीतरी ओझी असतील. मि. जार्विस तुमचे शेजारी आहेत हे जळजळीत वास्तव तर तुम्हाला सहन करावं लागेलच. हे चर्चही पुन्हा बांधायला लागणार आहे. त्यासाठी बरेच पैसे गोळा करायला लागतील, खूप धावपळ करायला लागेल. तुम्ही आज बघितलंच चर्चची काय अवस्था झाली आहे ते.”

“हो,खूपच वाईट अवस्था झाली आहे चर्चची.”

“मला असंही समजलंय की तुम्ही तुमच्या मुलाच्या बायकोला इथे घेऊन आला आहात आणि ती गरोदर आहे. त्यांनी इथे राहणं योग्य होईल असं तुम्हाला वाटतं का मि. कुमालो? ह्या सगळ्या गोष्टी जिथं माहीत नाहीत अशा ठिकाणी जाणं जास्त सोयीचं असेल असं तुम्हाला वाटत नाही का?”

“मला समजतंय तुमचं म्हणणं, फादर.”

दारावर टकटक झाली. जो मुलगा चिठ्ठी घेऊन गेला होता तो दाराशी उभा होता. त्याच्या हातात रेव्ह. एस. कुमालो, न्दोत्शेनी ह्यांच्यासाठी पत्र होतं. कुमालोंनी पत्र घेतलं, मुलाला धन्यवाद दिले, दार पुन्हा लावून घेतलं आणि ते बिशपांचे म्हणणे ऐकून घ्यायला पुन्हा त्यांच्या खुर्चीत बसले.

“तुमचं पत्र आधी वाचून घ्या, मि. कुमालो.”

म्हणून कुमालोंनी पत्र उघडलं आणि वाचलं.

ऊम्फुंडीस:

सहानुभूती व्यक्त करणाऱ्या संदेशासाठी आणि तुमच्या चर्चमध्ये तुम्ही करणार असलेल्या प्रार्थनेसाठी धन्यवाद. तुम्ही अगदी बरोबर लिहिलंत. ज्या गोष्टी केल्या जात आहेत त्या तिला माहीत होत्याच. एव्हढंच नाही तर त्यात तिचा फार मोठा वाटाही होता. आमच्या लाडक्या मुलाच्या स्मृतीप्रित्यर्थ आम्ही ते करत होतो. न्दोत्शेनीत नवे चर्च बांधावे ही तिच्या शेवटच्या काही इच्छांपैकी एक इच्छा आहे. लवकरच मी त्यावर चर्चा करायला तुमच्याकडे येईन.

तुम्हाला हे सांगणं मला महत्वाचं वाटतं की माझी पत्नी जोहान्सबर्गला जाण्यापूर्वीपासूनच आजारी होती.

तुमचा विश्वासू,

जेम्स जार्विस

**

कुमालो झटकन उभे राहिले आणि उत्साहाने बिशपना म्हणाले, “देवाने सांगावा धाडलाय.”

हसू, रडू, काळजी, भीती, शंका अशा सगळ्यापासून मुक्त असा तो पूर्ण मोकळा आवाज होता. चारी भिंतींकडे बघत ते उत्स्फूर्तपणे पुन्हा म्हणाले, “देवाने सांगावा धाडलाय.”

“मला बघायला मिळेल का देवाचा सांगावा?” बिशप कोरड्या स्वरात म्हणाले.

कुमालोंनी ताबडतोब ते पत्र बिशपना दिलं आणि त्यांचं वाचून होईपर्यंत ते अस्वस्थपणे उभे राहिले. बिशपांनी पत्र वाचलं आणि ते गंभीरपणे म्हणाले, मी जे आत्तापर्यंत बोललो ती मुर्खासारखी बडबड होती.

त्यांनी पत्र पुन्हा वाचलं, घसा खाकरला आणि पत्र हातात घेऊन ते तसेच बसून राहिले.

“सध्या कुठल्या गोष्टी इथे केल्या जातायत?” त्यांनी विचारलं.

मग कुमालोंनी त्यांना दूधाबद्दल, नवीन बांधल्या जाणार असलेल्या धरणाबद्दल आणि नुकत्याच आलेल्या तरुण शेती तज्ञाबद्दल सांगितलं. तीन चार वेळा घसा खाकरून बिशप कुमालोंना म्हणाले ही विलक्षण गोष्ट आहे. मी आत्तापर्यंत ऐकलेली ही सर्वात विलक्षण गोष्ट आहे.

आणि मग कुमालोंनी उत्साहात त्यांना पत्रातील ‘तुम्हाला हे सांगणं मला महत्वाचं वाटतं की माझी पत्नी जोहान्सबर्गला जाण्यापूर्वी पासूनच आजारी होती’ हे वाक्य पुन्हा वाचून दाखवलं. हे लिहिण्यामागची जार्विस यांची भूमिका, त्यांच्याबद्दल जार्विस यांच्या मनात असलेली अनुकंपा आणि सहवेदना हे सगळं त्यांनी समजावून सांगितलं. दया मिळाली का ह्या करुणेत भिजलेल्या शब्दांबद्दलही त्यांनी बिशपना सांगितलं. आणि

त्यांच्या आयुष्यात हास्याचे मळे फुलवणाऱ्या एका अनामिक ओढीने त्यांना येऊन भेटणाऱ्या छोट्या मुलाबद्दलही त्यांनी बिशपना सांगितलं.

बिशप म्हणाले तुमच्या चर्च मध्ये जर थोडी कोरडी जागा असेल तर चला, आपण जाऊन प्रार्थना करूया. त्यानंतर मात्र मला निघायला लागेल, खूप लांबचा प्रवास करायचाय. पण त्याच्या आधी मला तुमच्या पत्नीचा आणि सुनेचा निरोप घेऊ दे. तुमची सून, तिचं होणारं बाळ ह्यांच्याबद्दल काही सांगाल?

“आम्ही सगळ्या लोकांसमोर अगदी मोकळ्या मनाने प्रार्थना केली आहे, बिशप फादर. ह्यापेक्षा आणखी काय करायला हवं?”

“माणसाचा जेव्हा देवावर विश्वास असायचा तेव्हा असाच अडचणींचा निचरा व्हायचा. पण एवढं सगळं ऐकल्यावर तुम्हाला हे सांगायची काही गरजच नाही.”

घरातील माणसांचा निरोप घेऊन बिशप आणि कुमालो चर्चमध्ये गेले. चर्चच्या दरवाज्याजवळ ते थबकले आणि गांभीर्याने कुमालोंना म्हणाले, तुम्ही न्दोत्शेनी सोडावं अशी देवाची इच्छा नाही असं दिसतंय.

बिशप गेल्यानंतर बराच वेळ सुखद तंद्रीत कुमालो चर्चबाहेर उभे राहिले. पाऊस थांबला होता पण तरीही काळंभोर आकाश नवजीवनाचं आश्वासन देत होतं. हवेत गारवा होता आणि नदीवरून येणाऱ्या सुखाच्या झुळूकेने त्यांच्या आत्म्याला स्पर्श केला. पाणावल्या नजरेने खोऱ्याकडे बघतांना जणू स्वर्गवाणी त्यांच्या कानात घुमली. माझ्या लेकरांनो निश्चिंत रहा, आश्वस्त रहा, तुमच्यापर्यंत ही झुळूक मी पोचवत राहीन, मी नेहमीच तुमच्याबरोबर असेन.

सुखाचा परीसस्पर्श व्हावा अशी आशा अनेकांना असते, पण अशी आशा असो वा नसो सुख प्रत्येकाला कधीतरी येऊन बिलगतेच. हा स्पर्श इतका तरल होता की कोणाला तो आभास वाटावा, खिन्न मनाचा कल्पनाविलास वाटावा किंवा दैवी संकेत वाटावा.

**

ते घरात शिरले तर त्यांची बायको, सून, चर्चमधल्या आणखी काही बायका आणि त्यांचा दूध घेऊन येणारा मित्र पुष्पचक्र बनवण्यात मग्न होते. त्या मित्राच्या झोपडीजवळ आडोश्याला वाढलेले आख्ख्या पंचक्रोशीतले एकमेव सुरूचे झाड होते. दुःखाचे प्रतिक मानल्या गेलेल्या अशा सुरुच्या झाडाची फांदी त्यांनी आणली, त्याचे गोल चक्र बनवले आणि ते सुटू जाऊ नये म्हणून कशानेतरी बांधले. त्यात त्यांनी आपल्या दीनवाण्या खोऱ्यातील उदास कुरणावरची गवतफुलं माळली.

“मला हे तितकसं आवडलं नाहीये, ऊम्फुंडीस. काहीतरी चुकतंय. हे गोऱ्या लोकांच्या पुष्पचक्रासारखं अजिबात दिसत नाहीये.”

“ते पांढरी फुलं लावतात”, नवीन शिक्षिका बोलल्या. “मी पिटरमॅरिट्झबर्गला कितीतरी वेळा बघितलंय, त्यात पांढरी फुलं असतात.”

“ऊम्फुंडीस, पांढरी लिलीची फुलं कुठे आहेत मला माहित्ये.” त्यांचा मित्र उत्साहाने म्हणाला.

“हो, बरोबर, ते पांढरी लिलीची फुलंच वापरतात.” नवीन शिक्षिकाही उत्साहाने म्हणाल्या.

“पण ती बरीच लांब, कॅरिसब्रूकच्याही पलीकडच्या रेल्वे लाईनला लागून असलेल्या एका झऱ्याकाठी आहेत.”

“ते तर खूपच लांब आहे.” कुमालो म्हणाले.

“मी जाईन तिकडे, इतक्या महत्वाच्या गोष्टीसाठी ते काही फार लांब अंतर नाही. ऊम्फुंडीस, तुम्ही तुमचा कंदील मला द्याल का?”

“हो. नक्की ने मित्रा.”

“आणि पांढरी रिबीन पण लागते.” शिक्षिका म्हणाल्या.

“माझ्या घरी आहे पांढरी रिबीन. मी लगेच घरी जाते आणि घेऊन येते.” एक बाई बोलली.

“आणि स्टीफन, तू एक कार्ड बनवशील का? तुझ्याकडे आहे का एखादं कार्ड?”

“त्याच्या कडा काळ्या असायला हव्यात.” शिक्षिका म्हणाल्या.

“हो, मी कार्ड शोधतो आणि त्याच्या कडा शाईपेनाने काळ्या करतो.”

चर्चचा हिशोब करायला ते जिथे बसतात त्या खोलीत त्यांनी कार्ड शोधले आणि त्यावर लिहिले:

आम्ही तुमच्या दु:खात सहभागी आहोत.

न्दोत्शेनी, सेंट मार्क चर्चमधील लोकांकडून

त्यांच्या बायकोने जेवायला बोलावेपर्यंत शाईने कार्ड खराब होऊ नये याची काळजी घेत कडा रंगवण्यात ते मग्न झाले होते.

न्दोत्शेनी आणि आजूबाजूच्या सगळ्याच शेतात जोमाने नांगरणी सुरु झाली. पण नांगरणी वर खाली होऊ नये म्हणून लक्ष द्यायला तरुण शेती तज्ञ आणि दस्तुरखुद्द मुखिया हजर असल्यामुळे नांगरणीचा वेग काही वेळेस मंदावत होता. बांधावरून, डोंगराच्या भोवती अशा प्रकारे नांगरट होत होती की ते जुन्या नांगरणी सारखं अजिबात दिसत नव्हतं. बायका आणि मुलांनी शेण गोळा केलं, पण ते एवढं कमी होतं की मुखियांनी लगेच गुरांना एकत्र बांधता येईल आणि त्यांचे शेण गोळा करता येईल असे गोठे बांधण्याची आज्ञा दिली. शेणाची कमतरता बघून शेती तज्ञ आधी थोडा निराश झाला पण पुढच्या वर्षी ह्यात सुधारणा होईल असंही म्हणाला. बार्लीच्या बिया उकळवल्या जाताना खोऱ्यातले सगळे आश्चर्याने बघत होते कारण तिथे आत्तापर्यंत कोणी तसे केले नव्हते. पण जे गोऱ्या शेतकऱ्यांकडे मजुरी करतात त्यांनी हे बरोबर आहे असं सांगितलं ह्या बियांसाठी आधी एक दोन उजाड जागा निवडण्यात आल्या होत्या, पण त्या तरुणाने ह्या जमिनीत काही सकसपणाच नाही असे म्हणत त्याला नकार दिला. बियांसाठी राखून ठेवलेले मक्याचे दाणे त्यांनी लोकांना फेकायला सांगितले कारण ते अगदीच निकृष्ट दर्जाचे होते. चांगल्या दर्जाचे बी त्यांना जार्विसनी पाठवले होते. पण लोकांनी जुने मक्याचे दाणे फेकून दिले नाही, ते त्यांनी खाण्यासाठी म्हणून ठेवून घेतले.

हे सगळं काही झटपट आणि जादूने घडलं नाही. त्याआधी बऱ्याच नि:शब्द आणि निरुत्साही सभा झाल्या. केवळ मुखिया त्या सभेत असायचे म्हणून त्यातून काहीतरी निष्पन्न व्हायचे. ज्यांना आपली शेतं द्यावी लागली ते खूपच दुःखी झाले होते. कुलूसचा भाऊ कित्येक दिवस घुम्यासारखा हुप्प होता कारण धरणासाठी त्याची जमीन गेली होती आणि त्याबदल्यात मिळालेल्या जमिनीच्या तुकड्यावर तो समाधानी नव्हता. ऊम्फुंडीसना त्याचे मन वळवायचे काम दिले गेले. ते ऊम्फुंडीस होते म्हणून आणि त्यांच्यामुळेच त्याच्या भावाच्या मुलाला दूध मिळाले होतं आणि त्याचा प्राण वाचला होता म्हणून त्यानं कसंबसं ते मान्य केलं. मुखियांनी इशारा दिला की मागितलंय त्यापेक्षा कठीण गोष्टी मागितल्या जाणार आहेत, पण त्या एकदम न मागितल्यामुळे तरुण शेती तज्ञ नाराज झाला होता. पण सगळ्याच गोष्टींसाठी लोकांना इतक्या कमी वेळेत राजी करणं सोपं नव्हतं. जमिनीचा अतिशय खालावलेला पोत बघून ह्यावर्षी काही मोठा फायदा होणार नाही पण डोळ्यांना थोडासा बदल जाणवेल असं त्या तरुण शेती तज्ञाचं म्हणणं होतं.

सरकार मुखियांना बैल देणार आहे असं ऐकलं होतं. त्या तरुणाने फारसं उत्पादन न देणाऱ्या गाईंची वासलात लावावी असं सुचवलं खरं, पण त्यावर समोर कुणीच काही बोललं नाही. गुरांच्या संख्येवरून आपली श्रीमंती मोजणारे हे लोक सहजासहजी त्यांच्या गुरांना, अगदी भाकड गुरांनाही सोडतील अशी कोणालाच आशा नव्हती.

सगळ्यांना सगळ्यात मोठं आश्चर्य त्या अजस्त्र यंत्राचं वाटत होतं जे कुलूसच्या भावाच्या जमिनीशी युद्ध करून मातीला काठ्यांच्या रेषेपर्यंत ढकलत होतं. कुलूसचा खिन्न झालेला भाऊ सुद्धा या यंत्राची करामत बघून मधेच उत्साहित होत होता आणि पुन्हा गपगुमान बसत होता. पण त्याला त्यातल्या त्यात एक समाधान होतं की पुढच्या वर्षी जेव्हा हे धरण भरेल तेव्हा झुमा आणि त्याच्या भावाला आपली जमीन द्यावी लागेल. मोठ्या गोठ्यात बांधलेल्या गुरांना खाऊ घालण्यासाठी त्या जमिनीवर गोऱ्या लोकांकडचं गवत लावलं जाणार होतं. कुलूसच्या भावाला असे खिन्न बघून झुमा आणि त्याचा भाऊ त्याच्याकडे बघून हसायचे. अशाप्रकारे खिन्नतेतून सगळ्यांनी आपापली वाट काढली होती.

ह्या खोऱ्यात नक्कीच काहीतरी आगळं वेगळं घडत होतं. थोडसं चैतन्य निर्माण झालं होतं, लोकांमध्ये उत्साहाची हलकीशी लहर उमटली आली होती, मरगळलेल्या झोपड्यांमध्ये थोडीशी जिवंतपणाची लक्षणं दिसत होती. अजून काहीच झालं नसलं तरी काहीतरी नक्कीच झालं होतं.

**

आणखी एक नेपोलियन होता ज्याने खूप काही गोष्टी केल्या होत्या, कुमालो म्हणाले. त्याने इतक्या गोष्टी केल्या की त्याच्यावर पुस्तकं लिहिली गेली.

तरुण शेती तज्ञ हसला, त्याने खाली आपली नजर वळवली आणि पायावर पाय घासू लागला.

“ह्या खोऱ्यात नवचैतन्य निर्माण केल्याबद्दल तुला अभिमान वाटला पाहिजे. मी इतकी वर्षं इकडे राहतोय, पण इतक्या उत्साहात नांगरण पहिल्यांदाच झालेली बघितली.

काहीतरी नवीन घडतंय इकडे. पावसाने उत्साह वाढला हे खरं पण तो फक्त पावसामुळे नव्हता. कधीही इथे न दिसलेली आशा मला दिसते आहे." कुमालो म्हणाले.

"खूप जास्त अपेक्षा ठेऊ नका", तरुण सावधपणे बोलला. "यावर्षी काही फार फायदा होईल असं मला वाटत नाही. मका थोडासा मोठा होईल. सुगी थोडीशी बरी असेल, पण मातीचा पोत खूप खराब झाला आहे हे मात्र खरं.

"पण पुढच्या वर्षी गोठा असेल."

"हो", तो तरुण अधीरपणे बोलला. "गोठ्यात जास्तीत जास्त शेण आपण साठवू. ऊम्फुंडीस, लोकांनी मला सांगितलंय की कितीही कडक थंडी पडली तरी ते शेणाच्या गवऱ्या करून त्या पेटवणार नाहीत."

"झाडं मोठी व्हायला किती वर्षं लागतील?"

"बरीच वर्षं. मला सांगा, ऊम्फुंडीस, ते थंडीचे सात मोसम सहन करू शकतील?"

"धीर धर, तरुण माणसा, मुखिया आणि मी दोघेही तुला शक्य ती मदत करतोय."

"मी धरणासाठी उतावीळ झालोय", तरुण म्हणाला. "धरण झालं की गुरांना खायला गवत पिकवता येईल." उत्साहात तो पुढे म्हणाला, "ऊम्फुंडीस, तुम्हाला सांगू का ह्या खोऱ्यात मुबलक दूध असेल. तुम्हाला उगाचच गोऱ्या माणसाकडून दूध घेण्याची गरज राहणार नाही.

कुमालोंनी त्याच्याकडे बघितलं. गोऱ्या माणसाच्या दुधाशिवाय आपण कुठे असू? त्यांनी विचारले. आपल्यासाठी ते जे काही करतायत त्याच्याशिवाय आपण कुठे असू? तू सुद्धा कुठे असशील? तू इथे काम करशील का?

"मला ते पैसे देतात हे मला मान्यच आहे. मी कृतघ्न नाही." तो तरुण जरा ताठ्यातच बोलला.

"मग तू असं बोलत जाऊ नकोस." कुमालो जरा स्पष्टच बोलले.

वातावरणात एक तणाव जाणवत असतानाच तो तरुण शांतपणे म्हणाला, "ऊम्फुंडीस, मी इथे जीवापाड काम करतोय असं तुम्हाला वाटत नाही का?"

"हो, वाटतं ना. अगदी वाटतं."

“मी इतकं काम माझ्या देशासाठी करतोय, माझ्या लोकांसाठी करतोय. कुण्या एका मालकासाठी मी इतकी मेहनत घेतली नसती.”

“मालक नसते तर तू इथे आलाच नसतास.”

“मला पटतंय तुमचं.”, तरुण म्हणाला. “ते खूप चांगले आहेत, मला त्यांचा आदरच वाटतो. मात्र ज्या पद्धतीनं सगळं चालतं ते तसं चालायला नको.”

“मग कसं चालायला हवं?”

“ऊम्फुंडीस, ह्या गोऱ्या लोकांनी आपल्यासाठी अगदीच कमी जमीन ठेवलीय, आपल्याला जमिनीपासून तोडून अन्नासाठी दाही दिशा हिंडायला लावलंय. आपणही अडाणी होतो, बेफिकीर होतो. अशा अनेक गोष्टींचा एकत्रित परिणाम म्हणून ही खोरी उद्‌ध्वस्त झाली आहेत. म्हणूनच आता गोरी लोकं जे काही करतायत ते म्हणजे निव्वळ भरपाई आहे.”

“मला असं बोलणं अजिबात आवडत नाही.”

“मी समजू शकतो, ऊम्फुंडीस. मला तुमची भूमिका समजते आहे, पण एक गोष्ट विचारली तर चालेल?”

“विचार.”

“तुम्ही प्रार्थना करत असतां तसं हे खोरं पुन्हा पूर्वपदाला आलं तरी परतणाऱ्या आपल्या सगळ्या बांधवाना ते सामावून घेऊ शकेल?”

“मला खरंच माहीत नाही.”

“तुम्हाला नसेल, पण मला माहीत आहे, ऊम्फुंडीस. आता इथे जेवढे आहेत त्याचं जगणं सुसह्य होईल इतपतच सुधारणा होऊ शकते. पण ही मुलं जेव्हा मोठी होतील तेव्हा पुन्हा त्यांच्यापैकी काहींना कामाच्या शोधात बाहेर जावंच लागेल. आपल्या वाटयाला आली आहे तेवढी जमीन आपल्या सगळ्यांना पोसूच शकत नाही.”

काहीच बोलता येत नसल्यासारखे कुमालो शांत झाले. सुस्कारा सोडत ते म्हणाले, “इतकी विद्‌वत्ता मला झेपत नाही.”

“मला माफ करा, ऊम्फुंडीस.”

"तुला माफी मागायची काहीच गरज नाही. तुला मनापासून वाटतंय म्हणून तू तसं बोलतोयस. तुझ्या हेतूबद्दल माझ्या मनात शंका नाही, तुझ्या कामावरील निष्ठेबद्दल माझ्या मनात शंका नाही. तुला जे सत्य वाटतंय तेच तू बोलतोयस."

"सत्याचा शोध घ्यायला मला गोऱ्या माणसानेच शिकवलंय, ऊम्फुंडीस. सत्याची कास धरल्याशिवाय चांगली शेतीसुद्धा करता येणार नाही."

"अगदी बरोबर बोललास. तो माणूस चांगला विचारी असणार."

"त्यानेच मला शिकवलं की आपण कोण्या एका माणसासाठी काम करत नाही, आपण आपल्या मातीसाठी, आपल्या माणसांसाठी काम करत असतो. आपण फक्त पैशासाठी काम करत नसतो."

कुमालो हेलावून गेले. "कितीजणं तुझ्यासारखा विचार करत असतील?" ते म्हणाले.

"मला माहीत नाही, ऊम्फुंडीस. पण थोडे तरी नक्कीच आहेत असा विचार करणारे. उत्साहाने फुलून येत तो म्हणाला, इथल्या किंवा तिथल्या माणसासाठी नाही तर आपण आफ्रिकेसाठी काम करतो. गोऱ्या किंवा काळ्या माणसासाठी नाही तर आपण आफ्रिकेसाठी काम करतो."

"तू दक्षिण आफ्रिका का म्हणत नाहीयेस?"

"तसंही म्हणायला हरकत नाही", तो समजूतदारपणे बोलला. "आपल्या इंकोस सिकेलेल गाण्यात आफ्रिका म्हटलंय ना. बरेचदा आपण जसं गातो तसं बोलतो."

"काळोख पडत आलाय आणि आंघोळ ही करायची आहे." कुमालो म्हणाले.

"माझ्याबद्दल गैरसमज करून घेऊ नका, ऊम्फुंडीस", तरुण कळकळीने म्हणाला. "राजकारण हा माझा प्रांत नाही. तुमच्या खोऱ्यात काही गडबड करायची माझी इच्छा नाहीये. शक्य झालं तर इथे सुधारणा करायची एवढीच माझी इच्छा आहे."

"तुझी इच्छा पूर्ण होवो." कुमालोही तितक्याच कळकळीने म्हणाले. "बाळा, फक्त एक सांगू?"

"सांगा ना, ऊम्फुंडीस."

"तुझे विचार मी थोपवू शकत नाही. तरुण माणसाने एवढं खोलवर विचार करणं खरोखर कौतुकाचं आहे. पण कोणाचाही द्वेष करू नकोस. आणि कोणावर सत्ता गाजवण्याचा प्रयत्नही करू नकोस. माझ्या एका मित्राने मला शिकवलं की सत्ता माणसाला बिघडवून टाकते."

"माझ्या मनात कोणाबद्दलही द्वेष नाही, ऊम्फुंडीस. आणि मला कोणावर सत्ता गाजवायची इच्छा नाहीये."

"मग हरकत नाही. आपल्या मातीत आधीच द्वेषाचं भरपूर बी पसरलंय."

तरुण आंघोळीसाठी घरात गेला. सुधारण्याच्या मार्गावर असलेल्या खोऱ्यावर चांदण्या लुकलुकू लागल्या असताना कुमालो क्षणभर काळोखात उभे राहिले. आयुष्य संपत आलेलं असतांना त्यांच्यासाठी हे असे समाधानाचे काही सौम्य क्षण पुरेसे होते. कितीही खरे असले तरी बंडखोरीचे, खळबळ माजवणारे नवीन विचार त्यांना झेपत नव्हते. असे विचार करून आपल्याला मदत करणारे आपले प्रियजन दुखावले जातील असं त्यांना वाटायचे. हो, हे विचार त्यांना हाय प्लेस मधील माणसावर, इतकं सगळं सहन करायला लागूनही अपार करुणा जोपासणाऱ्या धीरगंभीर माणसावर आघात करणारे वाटत होते. या वयात इतके नवीन आणि बंडखोर विचार पेलणंही त्यांना शक्य नव्हतं. काही लोक त्यांच्यासारख्या माणसांना गोऱ्या माणसांचा कुत्रा म्हणायचे. पण ते आयुष्यभर तसंच जगले आणि तसेच मरतील.

ते वळले आणि तरुण मुलाच्या पाठोपाठ घरात शिरले.

7

आज चौदावा दिवस आहे. मी पर्वतावर जाणार आहे, कुमालो आपल्या बायकोला म्हणाले आणि त्याच्यामागचं गांभीर्य समजून तिने हो म्हटलं. तिला आठवत होतं, आतापर्यंत दोनदा ते पर्वतावर गेले होते. एकदा छोटा अब्सालोम आजारपणामुळे मरायला टेकलेला तेव्हा आणि आणखी एकदा, चर्चचं काम सोडून चर्च देऊ शकेल त्यापेक्षा जास्त पैसे कमावण्याच्या हेतूने एका बाक्सटर नावाच्या गोऱ्या माणसासाठी डोनीब्रूकला दुकान काढायचा त्यांचा विचार चाललेला तेव्हा. आणखीही एकदा ते गेले होते पण ते त्यांच्या बायकोला माहीत नव्हतं. एकदा ती कुठेतरी बाहेर गेली असताना न्दोत्शेनीतल्या एका एकाकी आणि अशक्त शिक्षिकेवर बळजबरी करण्याच्या तीव्र इच्छेने त्यांना झपाटून टाकलं होतं, तेव्हाही ते पर्वतावर गेले होते.

"तू येशील का माझ्याबरोबर? मला तुला एकटीला सोडून जावसं वाटत नाहीये."

तिला भरून आलं पण नाईलाजाने ती म्हणाली, "मुलीचे दिवस भरत आलेत, कळा कधी सुरु होतील सांगता येत नाही. मला नाही येता येणार स्टीफन, पण तू मात्र नक्की जा."

तिने त्यांना बाटलीभर चहा बनवून दिला आणि मक्याचे काही केक पण बांधून दिले. त्यांनी त्यांचा कोट घेतला, काठी घेतली आणि मुखियाकडे जाणाऱ्या रस्त्यावरून ते चालू लागले. थोडं चालून गेल्यावर उजवीकडे जायचं आणि मग आणखी एक डोंगर चढून त्या पर्वताच्या पायथ्याला असलेल्या झोपड्यांपर्यंत जायचं. तिथून पर्वताच्या कडेकडेने पूर्वेला इम्पायेनीच्या खोऱ्याच्या दिशेने चालत राहायचं. इम्पायेनी हे देखील न्दोत्शेनीसारखंच लाल आणि उजाड शेतांचं, म्हातारे, म्हाताऱ्या, आया आणि मुलांचं खोरं आहे. हा रस्ता संपून जिथे ह्या खोऱ्यात शिरायचा रस्ता सुरु होतो तिथून पर्वतावर चढायला सुरु करायचं. ह्या पर्वताला एमोयेनी म्हणतात. त्याचा अर्थ वाऱ्यामधला पर्वत. तो कॅरिसब्रूक आणि तिथलं पठार आणि न्दोत्शेनी आणि इम्पायेनीच्या वर उम्झीकुलूच्या संपूर्ण खोऱ्याच्या संरक्षणासाठी ताठपणे उभा आहे. त्यावर चढून तुम्ही खाली बघितलंत तर आफ्रिकेतील एक अतिशय मनोहर निसर्गदृश्य तुमच्या नजरेस पडेल.

उन्हं कलली होती आणि तिन्हीसांजेच्या ह्या कातरवेळी डोंगर दऱ्यातून फारसं कोणी भटकत नसल्यामुळे ते एकटेच होते. पण त्या खडकाळ वाटेवरून चढायला त्यांनी सुरुवात केली असेल, नसेल इतक्यात एका घोड्यावरच्या माणसाने त्यांना हाक मारली, "ऊम्फुंडीस, तुम्हीच आहात ना?"

"हो, उम्नूमझान. मीच आहे."

"मग बरं झालं आपण भेटलो ते. हे बघा, माझ्या पाकिटात तुमच्या चर्चमधील लोकांसाठी पत्र आहे." क्षणभर थबकून ते पुढे म्हणाले, "फुलं फारच सुंदर होती, ऊम्फुंडीस."

"खूप खूप आभार, उम्नूमझान."

"ऊम्फुंडीस, नवीन चर्च बांधावं असं वाटतं ना तुम्हाला?"

शब्द न फुटल्यामुळे कुमालोंनी मंद स्मित करत मान डोलावली. नाही म्हणताना हलते तशी जरी त्यांची मान हलली तरी जार्विसनी त्यातले भाव ओळखले.

"नवीन चर्चचा आराखडा लवकरच तुम्हाला मिळेल. तुम्हाला जसं चर्च हवंय तसाच तो आराखडा आहे ना हे मात्र तुम्ही सांगायला हवं."

"मी तो बिशपकडे पाठवीन, उम्नूमझान."

"त्याचं काय करायचं ते तुम्हालाच जास्त चांगलं माहिती असेल. पण जे करायचं ते लवकरात लवकर करावं असं मला वाटतंय, कारण लवकरच मीही इथून निघून जाणार आहे. "

वज्राघात झाल्यासारखे कुमालो उभे राहिले. काळोखामुळे जार्विसना दिसत नसलं तरी कुमालोंची मनस्थिती त्यांच्या लक्षात आली आणि ते लगेच पुढे म्हणाले, "मी सारखा सारखा इथे येतच राहीन. तुम्हाला माहीतच आहे, मला न्दोत्शेनीत मोठं काम करायचंय. तो तरुण मुलगा कसा आहे?"

"तो रात्रंदिवस मेहनत घेतोय. त्याच्यात स्वस्थता अशी नाहीच."

जार्विसना हसू फुटलं. "चांगलंच आहे की मग. माझ्या घरात आता मी एकटाच उरलोय. त्यामुळे मी जोहान्सबर्गला माझी सून आणि नातवंडं ह्यांच्याबरोबर राहायला जाणार आहे. तुम्हाला तो छोटा मुलगा माहीत आहे ना?"

“हो, हो, उम्नूमझान, मी ओळखतो त्याला.”

“तो त्याच्यासारखाच आहे का?”

“तो अगदी त्याच्यासारखाच आहे, उम्नूमझान.”

“त्याच्यासारखा मुलगा मी अजूनपर्यंत कधीच बघितला नाही”, कुमालो पुढे म्हणाले.

घोड्यावर बसलेला धीरगंभीर, स्थितप्रज्ञ माणूस हेलावून गेला. त्याने अधीर होऊन कुमालोंना विचारलं, “तुम्हाला काय म्हणायचंय, ऊम्फुंडीस?”

“त्याच्याकडे काहीतरी आगळंच तेज आहे, उम्नूमझान.”

“अगदी, अगदी. तो दुसराही तसाच होता. तुम्हाला आठवतोय तो?”

तो मुलगा फारसा आठवत नसला तरी भावनावेगानी, आत्यंतिक ओढीनी विचारलेल्या ह्या प्रश्नाला हो, हो आठवतोय ना असं उत्तर कुमालो देत राहिले.

काही न बोलता थोडा वेळ दोघेजणं उभे राहिले आणि मग जार्विस म्हणाले, “मला आता निघायला हवं.” पण लगेच न निघता त्यांनी कुमालोंना विचारलं, “इतक्या उशिरा तुम्ही कुठे चाललात?”

कुमालो बेचैन झाले. मी पर्वतावर चाललोय, जे बोलावसं वाटत होतं त्याच्याऐवजी काहीतरी बोलायचं म्हणून ते बोलले

जार्विसनी यावर काही म्हटलं नाही म्हणून शब्दांची ते काहीतरी जुळवाजुळव करणार इतक्यात जार्विस बोलले, मला कळतेय तुमची मनःस्थिती, मला सगळं कळतंय.

त्यांचं बोलणं इतकं आतून आलं होतं की कुमालोंच्या मनाचा बांध फुटला, ते रडू लागले आणि जार्विस घोड्यावरच चुळबूळ करत राहिले. ते खाली उतरले असते, हातात हात घेतला असता, पण तसं करणं जनरीतीला धरून नव्हतं. अंधारत चाललेल्या खोऱ्याकडे हात दाखवत ते म्हणाले, एक गोष्ट संपणार आहे हे खरंच आहे पण दुसऱ्या गोष्टीची नुकतीच सुरुवात होते आहे. मी जिवंत असेपर्यंत ही सुधारणा होतच राहील. सावकाश जा, ऊम्फुंडीस.

“उम्नूमझान!”

“बोला.”

“तुमचे आभार मानेपर्यंत कृपया जाऊ नका. तरुण माणसासाठी, दूधासाठी आणि आता चर्चसाठी.”

“तुम्ही माझे आभार मानताय? तुम्ही शोधेपर्यंत माझा माणूस माझ्यासाठी अंधारातच होता”, कसनुसं हसत जार्विस म्हणाले. “तुम्ही तुमच्या मुलाचा शोध घेतलात. कुठल्याही परिस्थितीत का होईना पण तुम्हाला सापडला तो. मी मात्र अजून माझा मुलगा शोधतोय. मला एकट्याला सापडत नाहीये. आपण दोघं मिळून शोधूया का त्याला?”

कदाचित खूप आतून वाटलं असेल किंवा कदाचित काळोखामुळे भीड चेपली गेली असेल पण प्रथमच स्पष्टपणे कुमालो बोलले, “अगदी मनापासून सांगतो, मला भेटलेल्या सगळ्या गोऱ्या लोकांमधील...”

“मी संत नाहीये.” जार्विस घाईघाईने बोलले.

“ते मला माहीत नाही, पण ईश्वराचा अंश आहे तुमच्यात.”

“तो तर तुमच्यातही आहे, ऊम्फुंडीस.” जार्विस म्हणाले. मग झटकन निघत ते म्हणाले, “सावकाश जा.. आजची रात्र सांभाळून रहा.”

कुमालोही आर्तपणे त्यांचा निरोप घेत राहिले.

आणखी कितीतरी गोष्टी, खास खोलवर जपून ठेवलेल्या गोष्टी त्यांना जार्विसना सांगता आल्या असत्या. पण अशा गोष्टी सहजासहजी कुठे सांगितल्या जातात?

घोड्यांच्या टापांचा आवाज मंद होईपर्यंत ते थांबले आणि मग जड अंत:करणाने खडकांना धरत धरत हळूहळू चढायला लागले. पर्वताच्या शिखरावर पोहोचेपर्यंत ते धापा टाकत होते, पूर्णपणे गळून गेले होते. काळोखात उठून दिसणारे इंगायली आणि पूर्व ग्रीकलँडमधील समोर विस्तीर्ण पसरलेलं खोरं बघत ते एका मोठ्या शिळेवर बसून राहिले. मग त्यांच्या लक्षात आलं की ते आधीच्यावेळी बसले होते ती, घोंघावणाऱ्या वाऱ्यापासून संरक्षण करणारी, एका माणसासाठी पुरेशी असलेली खडकातली खोबण इथे जवळच होती. सगळ्यात पहिल्यांदा ते इथे आलेले तो प्रसंग कदाचित तो पहिला प्रसंग होता म्हणून असेल किंवा कदाचित कोणतीही प्रार्थना वाचवू शकणार नाही अशा अवस्थेतल्या आपल्या मुलासाठी ते प्रार्थना करायला आले होते म्हणून असेल पण त्यांना अगदी स्पष्ट आठवत

होता. बाळाला तेव्हा काही लिहिता येत नव्हतं आणि आता मात्र त्याची तीन पत्रं त्यांच्याकडे होती, आणि त्या तिन्ही पत्रात त्यानी लिहिलं होतं की जर मला न्दोत्शेनीला परत येण्याची संधी मिळाली तर मी पुन्हा न्दोत्शेनी कधीच सोडणार नाही. एक दोन दिवसात त्याचं शेवटचं पत्रं कदाचित त्यांना मिळेल. दया मिळणार नाही हे कळल्यावरही यापुढं मी कोणतंही पाप करणार नाही असं वचन दिलेल्या, ज्याला मरावंच लागणार आहे अशा आपल्या मुलासाठी करुणेने त्यांची छाती भरून आली. ते त्याला आधी शोधू शकले असते तर... न्दोत्शेनीतून तो बाहेर जाऊ नये म्हणून आधीच काही केलं गेलं असतं तर... असह्य वेदना देणारे हे विचार पुन्हा मनात आल्याबद्दल त्यांना स्वतःचाच राग आला. जसं माझ्या बाबांना वाटेल तसं, जसं माझे बाबा बोलतील तसं, मला माहीत नाही बाबा, ह्या वाक्यांचं आता काय करायचं?

अशा भाकड विचारांना त्यांनी बाजूला सारलं आणि रात्रीच्या जागरणासाठी ते तयारी करू लागले. जोहान्सबर्गला जायला निघाल्यापासून आत्तापर्यंतच्या त्यांच्या पापांचा कबुलीजबाब द्यायला त्यांनी सुरुवात केली. ट्रेनमध्ये मारलेली बढाई, भावाबरोबर खोटं बोललेला प्रसंग, भावाने त्यांच्यासाठी धाडकन दरवाजा बंद केला तेव्हा त्यांच्या मनात आलेले विचार, जोहान्सबर्गमध्ये श्रद्धेवरुन ढळलेला विश्वास, मुलीचा छळ करण्याची इच्छा अशी काही पापं त्यांना नीट आठवत होती. जेवढा शक्य होता तेवढा पूर्ण कबुलीजबाब देऊन झाल्यावर त्यांनी ह्या पापांतून मुक्ती मिळावी म्हणून प्रार्थना केली.

त्यानंतर त्यांनी कृतज्ञता मानायला सुरुवात केली. ज्यांचे आभार मानायलाच हवेत अशा कितीतरी व्यक्ती त्यांच्या नजरेसमोर आल्या. प्रत्येकाला आठवत, केलेल्या मदतीबद्दल त्यांना धन्यवाद देत, त्यांच्यासाठी त्यांनी प्रार्थना केली. ह्या सगळ्यामध्ये सिमँगुचा खूप वरचा क्रमांक होता. माझ्या रागीट बोलण्यासाठी मला माफ करा असं कपाळावर आठ्या घालत रागारागाने बोलणारा सुधारगृहातील तो तरुणही या यादीत होता. नाहीतर मग आपला उपयोगच काय असं हसत हसत बोलणाऱ्या मिसेस लिथेबे त्यात होत्या. हातात हात घेऊन तुमच्यासाठी काहीही, काहीही करीन, तुम्ही फक्त सांगा असं म्हणणारे फादर विन्सेंट, देवासाठी खटला घेणारे आणि दया मिळणार नाही हे अगदी हळुवार आणि करुणामय शब्दांत कळवणारे वकील ह्यांच्यासाठीही त्यांनी प्रार्थना केली.

न्दोत्शेनीत परत आल्यावर त्यांची बायको आणि मित्र त्यांना घ्यायला आले होते. एका बाईने आनंदाने तिचा रुमाल फडकवला होता आणि बायका चर्चमध्ये त्यांची वाट

बघत होत्या ते सगळं त्यांना आठवलं. ते परत आल्यामुळे सगळ्यांना झालेल्या आनंदाने काही काळ वेदना विसरू शकले होते.

न्दोत्शेनीतून परत आल्यावर त्यांना आलेले अनुभव दुसऱ्या एखाद्याला क्वचितच आले असतील इतके विस्मयकारक होते. यातनांना आनंदात रुपांतरीत करण्याचा विलक्षण अनुभव एखाद्याला का दिला गेला असेल? देवाच्या आस्तित्वाची जाणीव करून देणारा दैवी अनुभव एखाद्याला का दिला गेला असेल? न्दोत्शेनीच्या सुधारणेसाठी प्रार्थना करण्याची प्रेरणा त्यांना का झाली असेल? ज्याच्या मुलाने त्याच्या मुलाचा खून केला आहे अशा बापाला जोडीला घेऊन काहीतरी नवीन घडवण्यासाठी सर्वस्व पणाला लावण्याची आस पर्वत माथ्यावर राहणाऱ्या एका गोऱ्या माणसाला का लागली असेल? इतकी सगळी उजाड खोरी असताना इतर कुणालाही सुधारणेसाठी प्रार्थना करण्याची प्रेरणा का झाली नसेल?

पण त्यांच्या मनात हे विचार जास्त काळ टिकले नाहीत. ह्या गोष्टी माणसाला कळणार नाहीत. ह्या विचारांना त्यांनी बाजूला सारलं कारण ते एक गुह्य आहे, गूढ गुपित आहे.

आभार मानायलाच हवेत असे जार्विस, नुकत्याच वारलेल्या इंकोसिगाझ आणि वेगळीच चमक असलेला तो छोटा मुलगा हे सगळेजण त्यांना आठवले. ह्या साऱ्यांनी त्यांचं मन इतकं व्यापून टाकलं की खूप प्रयत्न करूनही प्रार्थनेत आता आणखी कोणाचा समावेश ते करू शकले नाहीत. ह्या सगळ्यांबद्दल त्यांच्या मनात आयुष्याच्या अंतापर्यंत केवळ कृतज्ञताच असेल. अतिशय लीन होत समर्पित भावनेने त्यांनी मनातल्या मनात ही कृतज्ञता व्यक्त केली.

ते दचकून उठले. थंडी होती, पण अगदी कडाक्याचीही नव्हती. अशी जागरणं करताना त्यांना आत्तापर्यंत कधीच अशी झोप लागली नव्हती. पण आता ते म्हातारे झाले होते. पूर्ण विझले नसले तरी विझायला आले होते. एकेकाच्या जीवघेण्या यातना त्यांना आठवू लागल्या. दुबळ्या आणि वेड्या गर्टरुडच्या, शांती टाऊन आणि अलेक्झांड्रामधल्या लोकांच्या, ह्या क्षणी त्यांची बायको सोसत असलेल्या वेदनांच्या आणि अशा अनेकांच्या यातनांच्या नुसत्या विचारांनी त्यांच्या काळजाला घरं पडली. पण ह्या सगळ्यात त्यांचा मुलगा, अब्सालोम अग्रभागी होता. अब्सालोम, तो जागा असेल का

आता? पहाटेच्या आधीच्या ह्या रात्री त्याला झोप लागली असेल? त्यांचे जर्जर ओठ बाळा, बाळा, बाळा असे आक्रंदत राहिले.

ह्या आक्रोशाने त्यांना खडबडून जाग आली आणि त्यांनी घड्याळात बघितलं. एक वाजला होता. त्यांनी कळवलंय, पहाटे पाचच्या सुमारास जेव्हा सूर्य उगवेल तेव्हा ते काम केले जाईल. तो झोपला असेल तर बरंच आहे, त्याला झोपू दे. पण जर तो जागा असेल तर हे करुणेच्या सागरा, तू त्याच्या बाजूला अस. कळकळीने खूप वेळ त्यांनी येशूची करुणा भाकली.

त्यांची बायको जागी असेल का? ती हाच विचार करत असेल का? ती मुलगी नसती तर त्यांची बायकोही त्यांच्याबरोबर इथे आली असती. त्या मुलीला ते कसं बरं विसरले? पण ती नक्की झोपली असेल. तिच्या मनात नवऱ्याबद्दल प्रेम आहे पण तिच्या आधीच्यांपेक्षा त्याने तरी तिला असं काय अधिक दिलंय?

बायको आणि मुलाच्या वियोगाने शोकाकुल जार्विस, नवऱ्याच्या वियोगाने शोकाकुल झालेली त्यांची सून, वडिलांच्या वियोगाने शोकाकुल झालेली त्यांची नातवंडं, खास करून तो तेजस्वी आणि हसरा मुलगा त्यांना आठवला. तो छोटा मुलगा आतासुद्धा त्यांच्या डोळ्यासमोर आला आणि कुमालो त्याला म्हणाले, तू न्दोत्शेनीतून जाशील ना, तेव्हा न्दोत्शेनीची रयाच निघून जाईल. अच्छा? बरं, बरं. तो म्हणाला. तो लाजला नाही की शरमला नाही. बरं,बरं, दिलखुलास हसत तो म्हणाला.

आफ्रिकेतल्या यातना सहन करणाऱ्या सर्व लोकांच्या आठवणींनी त्यांना भरून आलं. त्यांची आफ्रिका, त्यांची जिवलग आफ्रिका. 'इंकोस सिकेलेल आफ्रिका - देवा, आफ्रिकेचे रक्षण कर' असं गाणं तर इथे गायलं जातं. पण पश्चात्तापाची भावना मात्र कुठेच दिसत नाही. पश्चात्ताप करण्याचा विचारसुद्धा कुणाच्या मनात येत नाही. कारण सगळी मनं भीतीने व्यापली आहेत. अगदी खरं सांगायचं तर गोरे त्यांना, त्यांच्या बायकोला, सिमँगुला, त्या तरुण शेती तज्ज्ञाला घाबरत होते. काळ्यांच्या अभिलाषांमध्ये, प्रबळ इच्छांमध्ये चुकीचं काय होतं? ते ज्या भूमीत जन्मले तिथं ताठ मानेने जगण्याची आणि तिथल्या छोट्या छोट्या आनंदांचा उपभोग घेण्याची आस ठेवण्यात वाईट काय होतं? तरीही गोरे त्यांना घाबरत होते. काळजात खोल खोलवर रुजलेल्या भीतीमुळे एकतर अंगभूत प्रेमळपणा लपवून तरी ठेवत होते किंवा चिडीतून, तुच्छ नजरेतून राग तरी

उधळत होते. ते संख्येने खूप कमी होते म्हणूनही घाबरत होते. ही भीती फक्त प्रेमानेच दूर केली जाऊ शकते.

कोणत्याही माणसाबद्दल द्वेष न बाळगणारा त्यांचा मित्र सिमँगु एकदा म्हणाला होता, माझ्या मनात एक भयंकर भीती आहे. एके दिवशी जेव्हा ते प्रेमाने एकमेकांच्या जवळ येतील तेव्हा ते तितक्याच वेगाने एकमेकांचा द्वेष करू लागतील.

किती भयानक आणि अस्वस्थ करणारा विचार आहे हा!

**

त्यांना पुन्हा जाग आली तेव्हा पूर्वेकडचं आकाश किंचित बदललं होतं. छातीत धस्स होऊन त्यांनी घड्याळात बघितलं. चार वाजलेले बघून त्यांना जरा हायसं वाटलं. आता उठायची वेळ झाली, कारण बहुतेक तिकडे त्यांनी त्यांच्या मुलाला उठवून तयार व्हायला सांगितलं असेल. ते जागेवरून उठले पण पाय थंड आणि बधीर झाल्यामुळे त्यांना धड उभं रहावेना. पूर्वेकडे नीट बघता येईल अशी दुसरी जागा त्यांनी शोधली, कारण त्यांनी कळवलं होतं की सूर्य जेव्हा क्षितिजाच्या वर येईल तेव्हा ते काम केले जाईल.

त्यांनी असं ऐकलं होतं की अशा पहाटे त्यांना जे खायचं असेल ते खायला दिलं जातं. अशा वेळेस माणसाला काही खावंसं वाटतं म्हणजे कमाल आहे. एखादी काळी शक्ती हे शरीर आता नष्ट होणार आहे हे माहीत नसल्यामुळे भुकेला उद्युक्त करते का? मुलगा आत्ता शांत असेल का, शांतपणे कपडे घालत असेल का? न्दोत्शेनीचे विचार आत्ता त्याच्या मनात असतील का? त्याच्या डोळ्यातून आसवं गळत असतील की तो ती पुसून मर्दासारखा ताठ उभा असेल? मला खायचं नाही, प्रार्थना करायची आहे, असं तो म्हणेल का? त्याच्याजवळ सिमँगु किंवा फादर विन्सेंट असतील का? फाशीची त्याला भीती वाटत असेल तर त्याला शांत करण्याचं, हिम्मत देण्याचं काम ते किंवा तिथले धर्मगुरू करत असतील का? त्याला त्याच्या कृतीचा पश्चात्ताप होत असेल की त्याचं हृदय फक्त स्वतःसाठीच्या भितीने भरलेलं असेल? आता काहीच होऊ शकत नाही का? चल माझ्याबरोबर, माणसाच्या नव्हे तर देवाच्या आज्ञेने मी तुला घ्यायला आलोय असे कोणी एखादा देवदूत त्याला सांगू शकेल का?

झाकोळलेल्या डोळ्यांनी फिकट आभा पसरलेल्या पूर्वेकडे त्यांनी पाहिलं. पण लगेच स्वतःला शांत केलं आणि मक्याचा केक आणि चहा दगडावर ठेवला. पाकीट फोडून त्यांनी केक खाल्ला, वर चहा प्यायला. मग अतिशय समर्पित भावनेने त्यांनी प्रार्थना सुरु केली आणि प्रत्येक प्रार्थनेनंतर ते आकाशाकडे बघत राहिले. पूर्व दिशा हळूहळू उजळत चालली होती आणि तो क्षण आता फार दूर नाही हे त्यांच्या लक्षात आलं. तो क्षण आला असं त्यांना जेव्हा वाटलं तेव्हा ते हॅट जमिनीवर काढून, हात पुढे घट्ट बांधून घेऊन उभे राहिले. ते उभे रहात असतानाच आकाशात सूर्य उगवला.

**

हो, ती पहाट आली आहे. टिटवी झोपेतून जागी होऊन आर्त स्वरात गायला सज्ज झाली आहे. इंगायली आणि पूर्व ग्रीकलँडमधील पर्वतांना सूर्याने उजळवून टाकले आहे. उम्झीकुलूचं विस्तीर्ण खोरं अजून काळोखात असलं तरी प्रकाश तिथे पोहचणारच आहे. न्दोत्शेनीचं खोरं अजून काळोखात असलं तरी प्रकाश तिथेही पोहचणारच आहे. हजारो शतकांपासून जशी येते आहे तशीच पहाट आजही न चुकता आली आहे. पण ती उद्धार करणारी, गुलामगिरीची भीती आणि भीतीची गुलामगिरी यातून बंधमुक्त करणारी पहाट कधी येणार हे अजून गूढच आहे.